भू. प्रवास
८८१

म.ग्रं.सं ठाणे
विषय : भू-प्रवास
सं क्र ८८१

REFBK-0027548

# अमेरिका :
# एक
# दिवास्वप्न

सीताराम मेणजोगे

RLI BK-0027548

नवचैतन्य प्रकाशन

प्रकाशिका
सौ. सुप्रिया शरद मराठे
नवचैतन्य प्रकाशन
शशाक को. ऑप. सोसायटी
A-००२, तळमजला,
एक्सर रोड,
लक्ष्मीनारायण मंदिराजवळ,
बोरिवली (प.)
मुंबई ४०० ०९२

© सौ. नलिनी मेणजोगे
१४, मकनजी मॅन्शन,
बाळ गोविंददास रोड,
माहीम, मुंबई ४०० ०१६

प्रथमावृत्ती
जुलै १९९४

मुखपृष्ठ
मनोज आचार्य

मुखपृष्ठछपाई
बॉंबे सर्वोदय प्रेस, मुंबई

मुद्रक
सौ. शामला अनंत चिंचणीकर
माधुरी मुद्रण
४४३, शिवाजीनगर,
पुणे ४११ ००५

मूल्य : सत्तर रुपये

शैलू – अनितास

# प्रास्ताविक

सध्याच्या परिस्थितीत जर कुणाला वाटत असेल, किंवा कोणी अमेरिकेत जाऊन स्थायिक होण्याचा विचार करत असेल, (अर्थात स्थायिक होणे सोपे नाहीच) तर त्याचा निर्णय सर्वस्वी चुकीचा म्हणावा लागेल सान्या जगाचीच आर्थिक परिस्थिती अत्यत खराब झालेली आहे अमेरिका त्याला अपवाद नाही अमेरिकेतही महागाईचे प्रमाण वाढत आहे सर्वच वस्तूचे भाव वाढत आहेत आपल्याकडे दुधाचे भाव वाढले तसे तिकडे पण दुधाचे वाढले गेल्या दहा वर्षांत इथे दुपटीने भाव वाढलेले आहेत

गेल्या वर्षापासून अमेरिकेत मदीचा काळ येऊ पातलाय असे वाटते मोठमोठे कारखाने बंद पडत आहेत उद्योगधदे बद पडत आहेत आय बी एम् सारखी कपनी हलाखीच्या स्थितीला आलीय केंटकी स्टेटमधली त्याची सबध शाखा बद केली गेली व त्यातले हजारोंनी कामगार बेकार झाले कित्येक औद्योगिक शहराची दिवाळी वाजलेली आहेत बँका बद पडत आहेत मोठमोठी सुपर मार्केट्स बद पडत आहेत जूनमध्ये वर्तमानपत्रात बातमी आली होती, न्यूयॉर्क शहराने आठ हजार कामगारांना घरी बसवले Employment Exchange ऑफिसे, उद्योगविनिमय केंद्राना कामच राहिलेले नाहीय त्यामुळे ती बद पडत आहेत

ज्यांच्या नोकऱ्या चालू आहेत त्याना सारखी अस्थिरता जाणवत आहे ऑफिसमध्ये जातोय खरा, पण आजचा दिवस जातोय की नाही ? कुणी सांगावे ? ज्या कपन्यांत पुरेसे स्थैर्य आहे व चागल्या चालत आहेत तिथेसुद्धा काटकसरीच्या सबबीवर बऱ्याच नोकराना काढून टाकण्यात येते त्यामुळे जे कामावर असतात त्याचे काम वाढते नुकतीच एक बातमी कानावर आली कपनीतल्या एका माणसाला कळले की आपल्या बरोबरच्या दोन-तीन माणसाना नोकरीवरून काढून टाकले त्या माणसाला हृदयविकाराचा झटका येऊन तो गेला एक दिवस कपनीच्या खात्याचा बॉस कामगाराला भेटायला बोलावतो त्या वेळी तो सांगतो, हा एक बॉक्स तुला दिलाय तुझ्या सर्व वैयक्तिक गोष्टी (Personal things) अर्ध्या तासात या बॉक्समध्ये घाल तुझी नोकरी सपली आहे आर्थिक मदत वगैरे दिली जाते पाच वर्षे नोकरी झालेली असेल तर सहा महिन्याचा पगार दिला जातो दोन आठवड्यांपूर्वी एका कपनीच्या असोसिएट डायरेक्टरला एकाएकी काढून टाकण्यात आले आणि त्या वेळी सिनीअर असोसिएट डायरेक्टरला

(Demote) केले गेले असे बरेच प्रकार ज्या कंपन्या चालू आहेत तिथे केले जात आहेत सर्व कपन्यामध्ये स्पर्धा चालू असल्याने प्रत्येक कपनीत खर्च कमी करण्यासाठी असे प्रकार चाललेले आहेत

अमेरिकेत जशा सर्वत्र सुविधा आहेत तसे कर पण जबरदस्त आहेत मिळवत्या माणसाला कर हा भरावाच लागतो करातून कोणाचीही सुटका नाही तिकडे सुविधा असतात पण त्याकरता पैसेही मोजावे लागतात व करही वसूल केले जातात त्यामुळे तिथला प्रत्येक नागरिक आपल्या हक्काकरता जागरूक असतो प्राप्तीकर तिथे चुकवला तर कसलीही दयामाया दाखवली जात नाही, मग तो कोणीही असो कितीही मोठा माणूस असो त्याला जबरदस्त शिक्षा ही होतेच

अमेरिकेचे अध्यक्ष किती कर भरतात हे तिथल्या सर्वसामान्य नागरिकालाही माहीत असते अमेरिकेचे अध्यक्ष बुश आणि त्याची पत्नी यानी १९९० साली ९९,२४१ डॉलर्स इतका इन्कमटॅक्स भरला १९८९ साली त्यानी एक लाख डॉलर्सच्यावर इन्कमटॅक्स भरला होता १९९० साली कमी भरला कारण त्या वर्षी त्याचे उत्पन्न कमी होते १९९० साली त्याचे वार्षिक उत्पन्न ४,५३,००० डॉलर्स होते आणि १९८९ मध्ये त्याचे उत्पन्न ४,५६,००० डॉलर्स इतके होते

अमेरिकेच्या अध्यक्षाचा वार्षिक पगार २,००,००० डॉलर्स आहे १९८९ साली मिसेस बुशनी 'रीडर्स डायजेस्ट'मध्ये एक लेख लिहिला 'मुलाना वाचून दाखवणे किती महत्त्वाचे असते' हा विषय होता त्याचे मानधन त्याना एक हजार डॉलर्स मिळाले बाकीचे उत्पन्न बुशना त्याच्या पैशाच्या गुतवणुकीतून मिळालेले होते त्याच्या पैशाची गुतवणूक त्याचे इतर हितसबधी करतात १९८९ पेक्षा १९९० साली त्याना कमी फायदा झाला कारण देशाची आर्थिक परिस्थिती या आर्थिक परिस्थितीचा फटका सर्वांनाच बसलेला आहे गेल्या वर्षापासून परिस्थिती आणखीनच बिघडत गेलेली आहे

१९८८ साली प्रेसिडेंट बुश यानी एक पुस्तक लिहिले पुस्तकाचे नाव 'Looking Forward' १९९० मध्ये त्यांना पुस्तकाच्या रॉयल्टीचे ३९,००० डॉलर्स मिळाले ते पैसे त्यानी युनायटेड निग्रो कॉलेज फडाला देणगी म्हणून देऊन टाकले अमेरिकेचे अध्यक्ष इतर नागरिकाप्रमाणे वेळचे वेळी इन्कमटॅक्स रिटर्न भरतात हे सारे अमेरिकेच्या नागरिकाना माहीत असते कर हा कुणालाही माफ नाही

अमेरिकेला जाऊ इच्छिणाऱ्या किंवा तिथे स्थायिक होऊ इच्छिणाऱ्याला इशारा म्हणून हे प्रास्ताविक लिहिले आहे योग्य तो बोध घ्यावा

— लेखक

श्री सीताराम मेणजोगे यांनी लिहिलेल्या व नवचैतन्य प्रकाशनने प्रकाशित केलेल्या 'मार्गारेटचे ब्रिटन' या पुस्तकासंबंधी विख्यात लेखिका शिरीष पै याचा अभिप्राय

●

मी अलीकडे वाचलेल्या पुस्तकापैकी ज्या पुस्तकानी मला अतर्मुख केल, ती म्हणजे रत्नाकर मतकरी याच 'अॅडम' आणि सीताराम मेणजोगे याच 'मार्गारेटच ब्रिटन' ही पुस्तक मेणजोगे याच्या पुस्तकात आपला देश वाचविण्याचा आटोकाट प्रयत्न आणि त्यासाठी त्याग करणाऱ्या विलक्षण देशभक्त स्त्रीची कहाणी आहे तिला घडवण्यामध्ये तिच्या नवऱ्याचा मोठा वाटा आहे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अनुक्रम
दा. क्र. १०७७
२८५७८
३०१४९
शाखा

भारतात आपण कुठेही पाहण्यासारखी स्थळे पहायला गेलो म्हणजे तिथल्या वस्तूची विक्री करणारी माणसे आपल्याला दिसतात भिकाऱ्याचे लेंढार मागे लागते तिथे मिळणाऱ्या वस्तू महाग असनात खाण्याचे पदार्थ पण जरा चढ्या भावाने विकले जातात अजठा एलोरा पहायला गेलो म्हणजे त्यातल्या प्रतिकृती विकत मिळतात प्लास्टिकच्या मण्याच्या माळा वगैरे. गोव्याला गेल्यावर I Love Goa च्या टोप्या आणि टी-शर्ट्स् विकणारे भेटतात

तसेच अमेरिकेत कुठेही साइट-सीईंगला गेलात की असाच देखावा दिसतो आता आम्ही स्वतत्रतादेवीचा पुतळा फेरी-व्हार्फमधून दुरून पाहण्याकरता गेलो त्या वेळी फेरी-व्हार्फमध्ये टी-शर्ट विकणारे, प्लॅस्टिकच्या मण्याच्या माळा विकणारे होते गाणे गाऊन पैसे मिळवणारी बाईपण होती एखादा माणूस एखादी सिग्रेट देता का ? असे मागणाराही भेटला बूटपॉलिशवालेपण होते अमेरिकेतले सगळेच चागले म्हणणारे असख्य लोक इथे आपल्याला भेटत असतात पण अमेरिकेतले दारिद्र्य न्यूयॉर्कसारख्या मोठ्या शहरात चटकन दिसून येते

खर म्हणजे स्वतत्रतादेवीचा पुतळा त्या बेटावर जाऊन पहाता येतो स्वतत्रतादेवीचा पुतळा आहे तिथे एक जुन्या अमेरिकेचे प्रदर्शनपण आहे निग्रोना इथे गुलाम म्हणून आणले गेले व त्याना त्या वेळी कशी वागणूक मिळत होती त्याची प्रसगचित्रे पहायला मिळनात शिवाय स्वतत्रतादेवीच्या पुतळ्याच्या मुगुटापर्यंत वरती आतून लिफ्टने जायची सोयपण आहे. तरीसुद्धा फेरी-व्हार्फमधून पुतळ्याच्या बेटाच्या बाजूने हजारो अमेरिकन लोक निरनिराळ्या स्टेट्स्मधून आलेले असतात ते दुरून पहातात व समाधान मानतात कारण फेरी-व्हार्फमधून फेरी मारायला फक्त २५ सेंटस् पडतात तर स्वतत्रतादेवीच्या पुतळ्यावर जायला बरेच डॉलर्स खर्च करावे लागनाल व वेळ पण खूप मोडतो म्हणजे हजारो लोक दुरून पाहूनच समाधान मानणारे आहेत

फेरी-व्हार्फमधे एका वेळी हजार-बाराशे माणसे सहज मावतात जाऊन-येऊन एक तास लागतो म्हणजे दिवसात रात्रीपर्यंत किती फेऱ्या होत असतील आणि किती माणसे पहात असतील याचा हिशेब करावा तिथे खाण्यापिण्याचे पदार्थ महागच विकले जातात शेकडो घाणेरडी माणसे तिथे रेंगाळत असतात व रेस्टरूम्स ( टॉयलेट ) अत्यत गलिच्छ व सिग्रेट्सच्या थोटकानी भरलेली असतात जे अमेरिकेचे कौतुक करीत असतात त्यानी या गोष्टींचे वर्णन कधीच केलेले नसते किंवा या गोष्टीकडे काणाडोळा केलेला असतो

तसेच न्यूयॉर्कचे ग्रँड सेंट्रल स्टेशन आपल्याकडचे बॉबे सेंट्रल स्टेशन त्या मानाने खूपच स्वच्छ दिसेल बॉबे सेंट्रल स्टेशनचे उदाहरण द्यायचे कारण त्या स्टेशनाशी ग्रँड सेंट्रल स्टेशनचे पुष्कळसे साम्य आढळले ग्रँड सेंट्रल स्टेशनवर कित्येक बेकार तिथल्या कळकट बाकावर झोपा काढत असताना दिसतील तर पुष्कळसे गलिच्छ पोशाखातले गप्पाटप्पा मारत व चकाट्या पिटत असताना दिसतील तिथल्याही रेस्टरूम्स ( Toilet ) अत्यत गलिच्छ अवस्थेत व साफसफाई न केलेल्या दिसतील स्टेशनबाहेर हातगाडीवर शेगड्या ठेवून हॉट-डॉग्ज विकणारे व फेरीवाले पण दिसतील एवढेच काय, फोर्टमध्ये जसे फूटपाथवर विकणारे आपल्याला दिसतात तसेच इथेपण दिसतात नाक्या-नाक्यावर हातगाड्यावर शेगड्या ठेवून हॉट-डॉग्ज व कोल्ड्रिक्स् विकणारे पण कमी नाहीत

आपण मुबईत लोकलमधून प्रवास करतो तस न्यूयॉर्कमध्ये मेट्रोमधून म्हणजे भुयारी गाडीतून पण ह्या लोकलगाड्या आतून-बाहेरून रगीबेरगी फराट्यानी रगवलेल्या असतात या लोकलगाड्या आतून-बाहेरून कोण रगवतो याचा रेल्वे अधिकाऱ्याना पत्ता लागत नाही ऑफिसटाईमच्या वेळेला गाड्या आपल्या इकडच्यासारख्या खच्चून भरल्यामुळे गाडी सोडून द्यावी लागते रेल्वे-गाड्यात भिकारी, फेरीवाले येऊच शकत नाहीत आणि प्लॅटफॉर्मवर पॅसेंजर्स- शिवाय कोणी जाऊ शकत नाही इथे एक बरे आहे इथे फर्स्टक्लास नाही लेडीजचा निराळा डबा नाही या भाडवलशाही राष्ट्रात फर्स्ट आणि सेकड असा भेदभाव नाही कुठल्याही डब्यात बसावे आणि लेडीज-जेंट्स असाही फरक नाही गरीब-श्रीमत, स्त्री-पुरुष असा फरक नाही याबाबतीत इथे समाजवाद आपोआप दिसतो इथे लोकलचे तिकीट नसते तिकिटाच्याऐवजी टोकन दिले जाते टोकन फिरत्या दरवाजाच्या खाचाच्या पेटीत टाकले की फक्त एकाला जाता येते त्यामुळे चेकर लागत नाही गाडीत चेकर येत नाही आपले स्टेशन आले की उतरून निघून जायचे बाहेर पडताना फिरता दरवाजा सरकतो पण कित्येक वेळा टोकन विकत घेताना व स्टेशनबाहेर पडताना टोकनला पैसे कमी आहेत म्हणून पैसे मागणारे

अधुनमधून दिसतात व आपल्याकडे मागतात कोणालातरी दया येते कोणीतरी पैसे देतात पण बनावटगिरीचे धंदे पण चालतात रेल्वेचे टोकन ७५ सेंटला पडते ७५ सेंटमध्ये कुठेही जाता येते न्यूयॉर्कमध्ये कारने जाताना टोलनाकी लागतात टोलनाक्यावर जाणाऱ्या-येणाऱ्याकरता टोकन्स एकदम महिन्याची विकत घेणारे पुष्कळ असतात एका टोलनाक्यावर २५ सेंट्स्ची टोकन्स होती ती बरोबर लोकल स्टेशनवरच्या टोकन्ससारखीच वजनाने व आकाराने बनवली गेली त्या टोलनाक्याची टोकन्स प्रमाणाबाहेर विकली गेली व ती टोलनाक्याची टोकन्स लोक स्टेशनवर वापरायला लागले त्यामुळे रेल्वेचे नुकसान व्हायला लागले व ते रेल्वेच्या ताबडतोब लक्षात आले ताबडतोब सध्याकाळच्या टी व्ही न्यूजवर इशारा देण्यात आला की टोलनाक्यावरची टोकन्स स्टेशनवर टाकताना पकडल्यास शिक्षा व दड होईल त्या टोलनाक्यावरची टोकन्स रद्द करण्यात आली व दुसरी तयार होईपर्यंत २५ सेंट्स् रोख घेणे सुरू केले जगात कुठल्याही ठिकाणी फसवाफसवी ही चालतेच त्यात आपले तेवढे वाईट व बाकीचे तेवढे चागले, असे म्हणण्यात काही अर्थ नाही अमेरिकेत कोणी कोणाशी फारसे बोलत नाही असे नाही कुठल्या गाडीने जायचे व उतरल्यानतर पुढे कसे जायचे असे कुणाला विचारले तर पुष्कळ लोक मदत करणारे पण भेटतात मदत करणारी माणसे भेटतात तशीच फसवणारी पण भेटतात आपण मात्र कोणास विचारायचे आणि कुणाशी चौकशी करायचे ते आपणच ठरवायचे आपल्याच देशात काय आणि कुठल्याही देशात काय व्यक्ती तितक्या प्रकृती असतात

दुपारी लच टाइमच्या वेळी बारा-साडेबारापासून न्यूयॉर्कमध्ये फास्टफूड रेस्टॉरंट्स्मध्ये ही तुफान गर्दी होते बसायला जागा मिळणे मोठे मुष्किल होते जसे मुबईमधल्या हॉटेल्स्मध्ये खाणारे उठायची वाट बघत उभे राहून गर्दी करतात तसाच प्रकार बाहेर रस्त्यावर, कोपऱ्यावर व अधुनमधून हातगाडीवर खायला मिळते सगळीकडे खाणाऱ्याच्या रागाच रागा लागलेल्या दिसतात आपल्याकडे रस्त्यावर खात उभे राहातात तसेच अमेरिकेत साहेबलोक त्याना साहेब म्हणणे म्हणजे साहेबाची थट्टाच म्हटली पाहिजे कारण आता साहेबी टोपी ( हॅट ) घालणारा साहेब आणि टाय लावून हिंडणारा शोधावाच लागेल टाय लावणारे थोडे फार दिसतील, पण पहिल्यासारखी टायची शोभा आता राहिलेली नाही

माझा मुलगा इंडिया फौंडेशनची लोन स्कॉलरशिप मिळण्याकरता मुलाखतीला जायचा होता त्याचे आजोबा म्हणाले, " अरे शैलू, टाय वगैरे लावून जा व बूटाला पॉलिश करून जा " शैलू मुलाखतीला जायला निघाला शर्ट-पॅंट व चपला घालून आजोबा म्हणाले, " अरे, तुला मी काय सागितले ? टाय आणि बूट पाहिजेच " तो

म्हणाला "माझ्या टाय बूटाकडे पाहून माझी निवड करणार आहेत की, माझ्याकडून मिळणाऱ्या उत्तराकडून ? टायबूट आता साहेबाच्या राज्यातसुद्धा पहायला मिळणे मुष्कील झालेय "

आम्ही लेक्झिंग्टनला राहात होतो, तेव्हा आमचे घर सोडून तीन-चार घरे टाकून पलीकडे एक वयस्कर अमेरिकन गृहस्थ आपल्या घरापुढच्या लॉनवर खुर्ची टाकून रोज पेपर वाचीत बसत असत त्याची थोडी ओळख झालेली होती ते फेल्ट हॅट घालून बसलेले असत एकदा सहज माझ्याशी गप्पागोष्टी करताना ते मला म्हणाले, "काय हो, हल्ली सगळेच बिघडलेय कोणी काही रीतीरिवाज पाळत नाही हे हल्लीचे तरुण सगळे उघडे बोडके फिरत असतात डोक्यावर कोणीच काही घालत नाही हॅट तर आता इतिहासजमाच झालीय बायका-मुलीसुद्धा हॅट घालत नाहीत डोके उघडे टाकून केस मोकळे सोडून बायका-मुली फिरतात काही सभ्यताच राहिलेली नाही काय म्हणावे याना ? कोणाला बोलायची सोयच राहिली नाही तुमच्याकडे इंडियातसुद्धा असेच चालते का ? ' मी काय सागणार त्याना, माझ्या डोक्यावरसुद्धा काहीच नव्हते म्हटले, ' ही तरूण पिढी सगळीकडे अशीच आमच्याकडे पण हाच प्रकार आहे. काळ बदललाय, दुसरे काय ! माणसे इथून तिथून सारखीच "

निसर्गाचे सौंदर्य आहे त्या स्थितीत पाहण्यात खरोखरच एक वेगळा आनद आपल्याला मिळतो त्यात मानवाने काहीच इकडचे तिकडे हलवले नाही तर त्याची खरी शोभा पण मानवाने त्यात ढवळाढवळ केली तर निसर्गाचा सत्यानाश व्हायला वेळ लागत नाही ही गोष्ट मात्र काही बाबतीत सत्य आहे पण सगळ्याच बाबतीत खरी नाही

न्यूयॉर्क शहराचे मुख्य आकर्षण म्हणजे मॅनहॅटन मॅनहॅटन हा न्यूयॉर्क शहराचा एक भाग झाला बारा मैल लाबीचे एक छोटेसे अरुद बेट यातला दोन चौरस मैलाचा भाग जगात सर्वात जास्त वीज खर्च करतो न्यूयॉर्कच्या मुख्य चार भागातून अठ्ठावीस पूल आणि असख्य बोगदे आहेत समुद्राखालून पण बोगदा आहे ते कुठून कुठे गेलेत याला महत्त्व नाहीये पण हे सर्व न्यूयॉर्कला जोडणारे मार्ग आहेत त्यात ब्रुकलीन पुलाची हकीगत विशेष रहस्यपूर्ण व चमत्कारिक आहे हा पूल जॉन रोऐब्लिग हा इजिनीयर बाधत होता पुलाचे काम चालू असताना तो अपघातात गेला त्यानतर त्याचा मुलगा पुलाच्या कामाचा मुख्य इजिनीयर झाला त्याला पण पूल बाधत असताना अपघात झाला पण तो मेला नाही, जबर जखमी झाला बारा वर्षे सतत अथरुणावर बसून पूल बाधण्याच्या सूचना देत व त्याप्रमाणे ती बाधताना पहात १८८३ त त्याने पूल पुरा केला या ब्रुकलीन ब्रीजचा दुर्लौकिक असा की या पुलावर

जास्तीतजास्त लोक जीव देतात

पहाटेपासून न्यूयॉर्कमध्ये लाखो लोक मॅनहॅटनमधल्या कचेऱ्यामध्ये कामाला येत असतात या शहरात कारने येताना रोज चार-पाच डॉलर्स टोलनाक्यावर पूल ओलाडताना मोजावे लागतात त्यातले जवळजवळ एकचतुर्थांश लोक न्यूयॉर्कमध्ये राहणारे असतात याचा अर्थ असा की, लाखो लोक सकाळ-सध्याकाळ तासाभरात हे अठ्ठावीस पूल आणि बोगदे पार करून जातात हे इकडे न्यूयॉर्कला इतका त्रास करून ये-जा करतात त्यात काही अर्थ आहे म्हणूनच न्यूयॉर्कमध्ये असख्य लोकाची ये-जा चाललेली असते इथे लोक कसे राहतात व कामे करतात हे महत्त्वाचे नाहीये पण परक्या माणसाला ते कसे दिसते ?

दिसते अर्थातच अती प्रचड उच क्रिसलर व एपायर स्टेट बिल्डिगचे एकशे सहा मजले वर्ल्ड ट्रेड सेंटरची जुळी टॉवर्स पाव मैल उच आहेत उच इमारती जशा आहेत त्यात पॅन ॲमच्या इमारतीची फ्लोअर स्पेस जगात सर्वांत मोठी आहे वर्ल्ड ट्रेड सेंटरमध्ये बावीस हजारावर लोक काम करतात मौल्यवान हिऱ्याची आणि सोन्याच्या दागिन्याची बाजारपेठ सत्तेचाळिसाव्या रस्त्यावर डायमडरो भाग आहे. तेथे ॲमिलीयात ऐंशी टक्के हिऱ्याचा व्यापार चालतो सेव्हन्थ अव्हेन्यू बेचाळिसावा आणि सत्तेचाळिसाव्वा रस्ता याच्या त्रिकोणात न्यूयॉर्कचा टाइम्स स्केअर आहे. न्यूयॉर्क स्टॉक एक्सचेंज व नासू (NASSU) वॉल स्ट्रीटवर जगभरच्या आर्थिक उलाढाली चाललेल्या असतात मॅनहॅटनचा ए-तीस ब्लॉक भाग रेडीमेड कापडाच्या कारखान्यानी गजबजलेला असतो दोन लाखावर कामगार तिथे काम करतात पचेचाळिसावा रस्ता आणि शुबर्ट गल्ली या टाइम्स स्केअरच्या भागात जवळपास तीसच्यावर सिनेमा व नाट्यगृहे आहेत

न्यूयॉर्क शहरात एकदर ४६१ रेल्वेस्टेशने आहे ७ अडरग्राऊड रेल्वे ट्रॅक दोनशे तीस मैलाचा आहे गाड्याना सतत गर्दी असते गाड्या गलिच्छ असतात पण वेळेवर सुटत असतात आणि वेगाने धावतात रेल्वेसर्व्हिस एकदर वाखाणण्यासारखीच आहे.

न्यूयॉर्कमधल्या चागल्या भागाचे जसे सागितले तसे तेथे हार्लेम भाग आहे तेथे काळ्या लोकाची घरे दिसतील लहान-लहान खुराड्यात शाळा दिसतील जुन्या कळकट चाळी दिसतील उघड्यावर मासे, भाज्या विकताना दिसतील न्हावी केस, दाढी रस्त्यावर करताना दिसेल एकशेएकोणीसाव्या रस्त्यावर तर एकदम जुनाट, पडायला आलेल्या कळकट चाळी दिसतील रस्त्यावर मुले बास्केट बॉल खेळताना दिसतील तसाच दक्षिण ब्रॉक्सचा भाग दारिद्र्याने पिचलेला दिसेल रात्रीच्या वेळी सरासरी तेहतीस आगी लागतात किंवा लावल्या जातात पुष्कळ वेळा लॅंडलॉर्डचे लोक

आग लावून देतात त्यामुळे नवीन अपार्टमेंटस् बांधायची परवानगी मिळते जुन्या इमारती, जुनी भाडी आणि कर भरमसाट, त्यामुळे हे घडते मुंबईत हेच प्रकार थोड्याफार प्रमाणात आपण पहातो.

करोना विभागात सगळी इटालियन लोकांची वस्ती १९२० च्या सुमारास इटालियन लोकांचा लोंढा अमेरिकेत आला त्याच वेळी सोफिया लॉरेन ही नटी आलेली आहे.

न्यूयॉर्कमध्ये पुष्कळ देशातले लोक येऊन येथेच स्थायिक झाले त्यात मेनहॅटनच्या पश्चिमेला ग्रीक लोकांनी आपली वसाहत केली तिथे साडेतीन लाखावर ग्रीक लोक आहेत

स्पॅनिश लोक अगदी अलीकडे प्युअर्टोरिकोमधून १९४५ च्या सुमारास आले न्यूयॉर्कमध्ये न्यूयॉर्कच्या लोकसंख्येच्या एकदशांश स्पॅनिश आहेत त्यांनी आता चळवळ चालवलीय की न्यूयॉर्कची दुसरी बोलीभाषा स्पॅनिश करावी स्टोअर्समध्ये दुकाना-दुकानात आठ दिवसात भिंतीवर कित्येक ठिकाणी स्पॅनिश बोलीभाषा झालीच पाहिजे अशा घोषणा लावलेल्या दिसतील

साऊथ ब्रॉक्स व हंट्स पेन्ट भागात पुशर्स ड्रग ॲडिक्ट गँगवॉरमधले गुड यांचे वास्तव्य असते निकामी झालेली गोदामे जळलेले भाग, पडक्या चाळी इथे दिसतील हे सारे दारिद्र्य आणि गुन्हेगारीचे जग

ब्रुकलीन, क्विन्स, मिड टाऊन, लॉंग आयलंड हा न्यूयॉर्कमधल्या श्रीमंत लोकांचा राहाण्याचा भाग इथे सगळे स्वच्छ, चकचकीत जिकडे तिकडे गर्द झाडी, हिरव्यागार प्रशस्त लॉन्स प्रत्येक बंगला दोन-अडीच एकराच्या कंपाउंडात

न्यूयॉर्कमधल्या माणसाला कशाचेच काही नसते सारे शहर सुखसमृद्धीच्या सुंदर अपार्टमेंटस्‌नी युक्त असे आहे. इमारतीला लागून इमारती आहेत वीज, पाणी याबाबतीत काही तक्रारी नाहीत सर्व काही उत्तम, व्यवस्थित आहे. एकदम गचाळ नाही आणि एकदम राजेशाही नाही पण तिथे तीन बेडरूमच्या अपार्टमेंटला साधारण चार ते साडेचार हजार डॉलर्स भाडे पडते तिथून तुम्हाला खिडकीतून सेंट्रल पार्क दिसेल अशा हजारो लोकांना जगप्रसिद्ध सेंट्रल पार्क आपल्या अपार्टमेंटमधून दिसू शकते कित्येकांचे ते फ्रंट यार्ड असते जगातल्या कोणत्याही मोठ्या शहरात सेंट्रल पार्कएवढा भाग काही एक बांधल्याशिवाय ठेवलेला आढळणार नाही या सेंट्रल पार्कमध्ये फिरणे फार धोक्याचे आहे असे म्हटले जाते तिथे पुष्कळ प्रकारचे गुन्हे घडत असतात पण तसे म्हटले तर सगळीकडेच तसे असते

मॅसी, गिंबेल ब्लूमिंगडेलसारखी मल्टी सुपर मार्केट्स् इथे आहेत तशी इतर

ग्रोसरीची दुकाने प्रचड मोठी आणि विपुल आहेत

हडसन नदीवर उन्हाळ्यात कुठेही रस्त्यार कमीतकमी कपड्यात माणसे वावरताना दिसतील ग्रीनवीच व्हिलेज भागात घराच्या पायऱ्यावर साइडवॉकवर उघड्याने स्त्री-पुरुष पसरलेले दिसतील उन्हाळा इतका कडक असतो की कित्येक वेळा रस्त्यावरचा पाण्याचा नळ फोडून रस्ताभर पाणी करतील थडी पण कमालीची असते बर्फ पडायला लागले म्हणजे बाहेर पडता येत नाही शहर अस्वच्छ होते मग लोक मेयरने राजीनामा द्यावा अशी मागणी करतील

आता न्यूयॉर्क शहराचा रोजचा कचरा सरासरी २३,००० टन असतो तो वाहून नेण्याकरता ११०० ट्रक व २२६ यात्रिक झाडूवाले काम करतात वर्षाचा साधारण सात मिलीयन टन कचरा न्यूयॉर्कमध्ये होतो

तीनशे मैलावरून शहराला पाणी आणले जाते आणि रोज सरासरी दीड मिलीयन गॅलन पाणी शहराला लागते

देशातून शेकडा पधरा टक्के बेकार व इतर देशातले निरनिराळे लोक इथे येन राहतात हुषार तरुण न्यूयॉर्कमध्ये राहायला तयार होत नाहीत शहरात कर पुष्कळ आहेत राह्यला जागा मिळणे अत्यत कठीण आहे किंवा परवडण्यापलीकडे आहे लाबून नोकरीला यायचे म्हणजे खर्चाचे आणि त्रासाचे पण इथे नोकऱ्या, उद्योगधदे पुष्कळ आहेत आणि त्या मानाने शहराबाहेर कामच नाहीये

न्यूयॉर्कमधल्या माणसाला कशाचेच कौतुक नसते तो उच इमारतीकडे बघत नाही गर्दी-गडबड-गोधळ-धावपळीकडे त्याचे लक्ष नसते तो आपला त्याच्या कामात गर्क असतो न्यूयॉर्कमध्ये काय मिळत नाही ? काय मिळत नाही ते विचारा असेच म्हणावे लागेल सात फूट उचीचा माणूस असेल किंवा चौसष्ट इचाची कबर असेल तर त्याचीसुद्धा पॅटशर्ट तुम्हाला मिळेल अगदी दुर्मिळ असे बेल्जमचे चीज पाहिजे असेल तर तेही मिळेल आणि १९२३ सालामध्ये बनवलेला गियर पप पाहिजे असेल तर तोही मिळू शकेल

न्यूयॉर्कचे हवामान उन्हाळ्यात उन्हाळा अतिशय कडक आणि थडी तर विचारूच नका तुफान वारे आणि पाऊस असा की छत्रीचा काहीच उपयोग होत नाही पण छत्री तर लागते, पण गमतीची गोष्ट अशी की निसर्ग आणि न्यूयॉर्क शहर यात पुष्कळच एकता आहे दोघानाही मानवी परिस्थितीची अजिबात फिकीर नाही न्यूयॉर्कला या सगळ्या गोष्टींची चागलीच सवय झालेली असते आणि तो सगळ्या अडचणीना यशस्वीपणे तोड देतो माणूस एकदा न्यूयॉर्कर झाला की त्याची त्याला आपोआप सवय लागते मार्गात कसल्याही अडचणी आल्या तर तो वरून जाईल

वरून मार्ग नाही मिळाला तर तो खालून जाईल, नाहीतर बाजूने जाईल पण तो थांबणार नाही चालतच राहील अडून बसणार नाही कुरकूर करणार नाही शेवटी तो मुक्कामाला पोहोचेलच कधीच हार खाणार नाही जिकडे तिकडे गर्दी असते पण त्यामुळे त्याला सुरक्षितताच वाटत एकटा असून सगळ्यात असल्यासारखा तो असतो आपल्या अपार्टमेंटमध्ये तो एकटा असतो त्याच्या खाजगी आयुष्यात कोणीही डोकावून बघणार नाही. आसपास शेजारी असतात पण जो तो आपल्याच नादात असतो पण असे तिथे सगळ्याचेच असते

न्यूयॉर्क शहरात पाच हजार आंधळी माणसे आहेत ही सारी माणसे गर्दीतून रोज चालत असतात रस्ता स्वत एकटेच ओलांडत असतात काहींना जर मदत करायला गेलो तर म्हणतात, ओऽऽ आय ॲम ओके ', आय ॲम ऑल राईट त्याना कोणाची मदत स्वीकारायची नसते वा उपकार नको असतात

न्यूयॉर्कला टॅक्सीने सगळीकडे हिंडून फिरून पाहिले, तर वाटेल काय हे शहर ? इथे कोणाला कसली दयामायाच नाहीय गर्दीत सरळ धकाधकीत ही माणसे कुठे चालली आहेत ? काय करताहेत ? सगळ्याची नुसती धावपळ, पळापळ हे सारे निष्ठुरपणे चालले आहे

अमेरिकेतल्या इतर राज्यामधून रोज नवीन माणसे आपले नशीब काढायला इथे येत असतात या शहरात सर्वात गरीब माणसेच जास्त आहेत तसेच अतिशय श्रीमत माणसाचे पण हे आगर आहे अमेरिकेत किती सपत्ती आहे आणि ती जर उघड्या डोळ्यानी पहायची असेल तर न्यूयॉर्कसारखे शहरच पाहण्याजोगे ठरेल पण इथे श्रीमतीचा कोणी हेवा करीत नाही कारण इथले लोक जरी परिस्थितीने गरीब असले तरी प्रत्येकाची श्रीमत होण्याची धडपड सतत चालू असते हेही दिवस जातील आणि कधीतरी आपणही चागले भरपूर पैसेवाले होऊ हे स्वप्न ते उराशी बाळगून असतात ज्यानी भरपूर पैसा मिळवलेला असतो त्याच्यापासून आपल्याला काय धडा घेता येईल याकडे त्याचे लक्ष असते ते कसे बोलतात, कसे वागतात याकडे त्याचे लक्ष असते एखादी श्रीमत बाई टिफनी या जवाहिऱ्याच्या दुकानातून किंमती हिऱ्याची अगठी विकत घेऊन बाहेर पडली व आपल्या मर्सिडीज गाडीकडे जाताना रस्त्यावर एखादा भुकेला माणूस बाजूने गेला तर तिचे लक्षही त्याच्याकडे जाणार नाही व त्या माणसालाही त्याचे विशेष काही वाटणार नाही

न्यूयॉर्क शहर म्हणजे अमर्यादितपणा प्रत्येक बाबतीत अफाट, अमर्याद, प्रचड, अतिप्रचड, उच, अतिउच, खोल, अतिप्रचड खोल चागले, अतीचागले, अत्युत्तम आणि वाईट म्हणजे अगदी कल्पना करता येणार नाही इतके वाईट Good

Better and Worse नुसती कल्पना करून काही साधणार नाही १९७२ साली न्यूयॉर्कमधल्या पोलीसावरच ७३ कोटी डॉलर्सचे हिरॉइन चोरल्याचा आरोप होता वर्षाला साधारण दोन हजार खून नोंदवले जातात न्यूयॉर्कच्या गुन्हेगारी जगावर भाष्य करण्यात काही उपयोगाचे नाही पण शहराच्या निराळेपणावर, भिन्नतेवर मात्र खूपच लिहिला येण्यासारखे आहे न्यूयॉर्क हे जगात एक असे शहर आहे की, त्यावर कितीही लिहिले आणि बोलले तरी ते नेहमीच अपुरे राहील त्याविषयी पूर्णपणे लिहिणे एकदर कठीणच आहे.

न्यूयॉर्क हे जरी अमेरिकेतले नबर एकचे मोठे शहर असले आणि अमेरिकेतल्या पन्नास स्टेट्सपैकी नावाजलेले जगप्रसिद्ध असले तरी न्यूयॉर्क हे शहर राजधानीचे शहर नाही न्यूयॉर्क प्राताची राजधानी अलबनी हे छोटे शहर आहे न्यूयॉर्कची सगळी सरकारी ऑफिसे अलबनी शहरात आहेत देशाच्या व्यापारी उलाढाली, शेअर बाजार जरी न्यूयॉर्कमध्ये असला, तरी सरकारी कारभार होतो अलबनीमधून न्यूयॉर्क शहराची अमर्याद वाढ झाल्यामुळे या शहराचा व न्यूयॉर्क राज्याचा कारभार चालवण्याकरता न्यूयॉर्क ही राजधानी न ठेवता त्या करता एक नवीनच शहर करण्याची योजना आखण्यात आली

मुबई शहर बेट असल्यामुळे त्याची वाढ वाढत, आता कुठे बाधायला सोयिस्कर जागा उरल्या नाहीत तेव्हा नव्या मुबईची कल्पना पुढे आली आणि नवी मुबई वाशीसारख्या ठिकाणी स्थापित करण्यात आली ती पण अतिशय अव्यवस्थितपणे आपल्या देशातील राजकारणी, पुढारी मडळी, टाऊन प्लॅनिंगमधले अधिकारी निरनिराळ्या समस्या अभ्यासण्याकरता अमेरिकेच्या वाऱ्या करतात पण एकाच्याही डोक्यात ही कल्पना आली नाही की न्यूयॉर्कची राजधानी जशी अलबनी केलीय तशी मुबईची राजधानी पण नव्या ठिकाणी उभी करावी

न्यूयॉर्कची राजधानी अलबनी करायचे त्यानी इ स १८६६ मध्ये ठरविले व तिथे कॅपिटॉलची बिल्डिग बाधायचे ठरवले न्यूयॉर्क सरकारने लेजिस्लेटिव्ह असेंब्ली, राज्यकारभाराच्या इमारती व न्यायदानाच्या इमारती अलबनीमध्ये उभारण्यास सुरुवात केली सर्व सरकारी कचेऱ्या अलबनीमध्ये बाधल्या गेल्या त्यामुळे न्यूयॉर्क शहरात सरकारी कामाकरता येणाऱ्याचा लोंढा कमी झाला आज आपल्याकडे काय दृश्य दिसते ? महाराष्ट्राच्या सर्व जिल्ह्यातून सरकारी कामानिमित्त लोकाचे लोंढेच्या लोंढे मुबईत येऊन थडकतात व मुबईच्या अमर्याद अडचणीत त्याची भर पडते

• • •

अमेरिका हा देश अत्यत पुढारलेला व श्रीमत देश आहे जगात जी प्रमुख बलाढ्य व सपन्न राष्ट्रे आहेत त्यात अमेरिकेची गणना होते, हे नव्याने सागण्याची गरज नाही सर्व ऐहिक सुखे व आधुनिकता या देशात जिकडे तिकडे पहावयास मिळते नवीन प्रथमच गेलेल्या भारतीयाना इथे सगळा मायाबाजार वाटतो आपण दुसऱ्या ग्रहावरच गेलोय की काय असे त्याना वाटते सर्व सुखसोयींनी युक्त व रोज नव्या नव्या शोधानी इथले सारे जीवन सुखसमृद्धींनी भरल्यासारखे दिसते त्यामुळे दर वर्षी हजारो लोक या देशात काहीना काही निमित्त काढून आश्रय घ्यायला बघत असतात

अमेरिकेला तशी सस्कृती वगैरे काही नाही अमेरिका खडाचा ज्या वेळी प्रथम शोध लागला त्या वेळी युरोपात ज्याचा धर्मामुळे छळ होत होता ते प्रथम आपला देश सोडून अमेरिकेत स्थायिक होण्याकरता गेले जसे ब्रिटिश भारतात आले आणि त्यानी भारतीयावर दीडशे वर्षे राज्य केले तसेच ब्रिटिशानी अमेरिकेतल्या लोकावर सत्ता गाजविली ब्रिटिश मालाचा खप व ब्रिटिश सत्ता वाढवण्याचा प्रयत्न केला मॅचेस्टरचे कापड तेथे खपावे व ब्रिटिश यत्रसामुग्री विकत घेतली जावी व अमेरिकेत कसलेही कारखाने उभारले जाऊ नयेत म्हणून ते सतत प्रयत्नशील राहिले पण अमेरिकन लोकानी ४ जुलै १७७६ मध्ये ब्रिटिशाच्या गुलामगिरीतून मुक्तता करून घेतली अमेरिकन स्वातत्र्याचा इतिहास तसा फक्त दोनशे वर्षांचा आहे युरोपातल्या प्रत्येक देशातून लोक इथे आले अमेरिकेत अफाट सुपीक प्रदेश आहे व खनिज सपत्ती विपुल प्रमाणात आहे असे समजल्यावर पूर्वेकडून चिनी लोकही अमेरिकेत मोठ्या प्रमाणावर आले व जगातल्या कानाकोपऱ्यातून लोक अमेरिकेचा रस्ता पकडू लागले लोक आपल्या देशातले चबूगबाळे उचलून तिकडे जाऊ लागले गोल्ड रशचा तो काळ होता अनेक रक्तपात त्या वेळी झाले १९२० च्या सुमारास इटालियन लोकाचा लोंढा अमेरिकेत लोटला अगदी अलीकडे १९४५ मध्ये प्युअर्टोरिकन न्यूयॉर्कमध्ये भरपूर

प्रमाणात आले १९५० नतर आपल्या भारतातून शिक्षणाकरता विद्यार्थी अमेरिकेत जाऊ लागले केनेडी प्रेसिडेंट होते त्या वेळेस दरवर्षी Exchange of Students सुरू झाले भारतीय लोक जास्त प्रमाणात जाऊ लागले स्वातत्र्यानतर भारतीयाची अमेरिकेत जाणाऱ्याची सख्या हळूहळू वाढू लागली आहे कित्येक भारतीय नाना तऱ्हेने आणि प्रकारानी अमेरिकेत स्थायिक होण्याचा प्रयत्न करीत आहेत अमेरिकेच्या द्वारात शिरण्यापूर्वी जो तिथे स्वतत्रतादेवीचा पुतळा उभारलेला आहे, ती म्हणते ज्या कोणाला स्वातत्र्याविषयी प्रेम आहे, त्याला इथे यायला मुक्त प्रवेश आहे. जगातील सर्व देशातले लोक इथे येऊन स्थायिक झालेले आहेत आणि त्यानी इथे निरनिराळ्या प्रातात आपल्या वस्त्या केलेल्या आहेत

इथे लडन आहे मँचेस्टर आहे. पॅरीस आहे फ्रँकफूर्ट हे शहर केंटकी प्राताची राजधानी आहे कायरो आहे रोम आहे. एवढेच काय, दिल्ली, अहमदाबाद, बॉबे, सिमला, बगलोर, सालेम, मेरकारा अशी भारतीय शहराची पण नावे आहेत दहा लाख भारतीय लोक इथे स्थायिक झालेले आहेत पटेल या नावाच्या आणि जमातीच्या लोकानी अमेरिकेत सर्व ठिकाणी आपली मोटेल उघडलेली आहेत न्यूयॉर्क शहरात वर्तमानपत्रे, साप्ताहिके, मासिके विकणाऱ्याचे स्टॉल्स् भारतीयाच्या ताब्यात आहेत रस्त्या-रस्त्यावर चॉकलेटस्, च्युईंगम, सिग्रेट्स् व इतर किरकोळ विक्रीची दुकाने भारतीयाची आहेत इटालियन लोकानी बेकरी, हॉटडॉग्ज, इटालियन पिझा कुकीज विकण्यात नाव कमावले आहे. तसेच चिनी लोकानी चिनी हॉटेल्स व चिनी पदार्थ लोकप्रिय केलेले आहेत न्यूयॉर्क, शिकागो, वॉशिंग्टन इथे काही भाग भारतीयानी व्यापून तिथे दुसरा भारतच निर्माण केला आहे न्यूयॉर्कला दाणाबाजार आहे. शिकागोला डेव्हॉनॲव्हेन्यूत गेलात तर सगम साडीज, बॉबे साडीज, सत्कार हॉटेल, किराणामालाची दुकाने दिसतील पुष्कळ भारतीय मालाची दुकाने आहेत तिथे साबुदाणा, शेंगदाणे, बासमती तादूळ, तूरडाळ, मुगडाळीपासून अळूवड्या, सुरणाच्या चकत्या, शेवग्याच्या शेंगा, तोडली, वागी, मिरची कोथिंबीर एवढेच काय पानमसाला एकशेवीस तीनशे तबाखू किमाम, मसाला पानपट्टी सर्व काही मिळेल निराजने उदबत्त्या भारतीय देव-देवताच्या तसबिरी, मूर्तिदेखील विकत मिळू शकतात रविवारी सकाळी टी व्ही वर भारतीय कार्यक्रम होतात हिंदी चित्रपट, छायागीत, बातम्या इत्यादी कार्यक्रम हिंदीतून पहायला मिळतात इथे दोन भारतीय टी व्ही सेंटर्स आहेत भारतीय साप्ताहिके मासिके आहेत मराठी पण साप्ताहिक आहे सध्या टी व्ही वर पूर्वाई व बुनियाद या सिरीयल्स दाखविल्या गेल्या

सगळी समृद्धता असल्यामुळे जो तो इथे स्थायिक होण्याचा प्रयत्न करीत

असतो भारतात अतिशय लोकप्रिय असलेल्या नट-नट्या इथे आल्या तर त्याना इथे कोणी ओळखतही नाही भारतात कुठेही गेले तर त्याच्याभोवती त्याच्या चाहत्याचा सारखा गराडा पडतो त्याना रस्त्याने हिंडतासुद्धा येत नाही इथे कोणीतरी आपल्याला ओळखावे असे पुष्कळाना वाटते एकदा देव आनदची परिस्थिती अशीच झाली त्याने एका भारतीय तरुणीला विचारले, " तू मला ओळखलेस काय ? " तर ती म्हणाली, " नाही मी तुम्हाला कधी पाहिलेल नाही " तो म्हणाला, " तू भारतीयच आहेस ना ? ' ती म्हणाली, " हो मी भारतीयच आहे पण मी तुला कुठे पाहिलेल नाही " तेव्हा त्याला सागावे लागले की, तो हिंदी सिनेमातला प्रसिद्ध नट आहे. तेव्हा ती म्हणाली " अस का ? ' तो म्हणाला, " भारतात कधी आलीस तू तर आमच्या स्टुडिओत ये " त्याने आपले कार्ड तिला दिले

पुढे ती तरुणी मुबईला ज्याच्याकडे उतरली होती, त्याना तिने सारी हकीगत सागितली तेव्हा घरातली तरुण मडळी म्हणाली, " आम्ही पण येतो देवआनदचे शूटिंग पहायला ' ती सर्वांना घेऊन गेली आणि देव आनदने पण सर्वांचे स्वागत केले

लेक्झिंग्टनला माझा मुलगा एकदा रस्ता ओलाडत होता तेव्हा त्याला एक तरुण भेटला त्याला पत्ता सापडत नव्हता त्याने माझ्या मुलाला विचारला मुलाने त्याला कसे जायचे ते सागितले तेव्हा तो तरुण माझ्या मुलाला म्हणाला, " तू भारतीय आहेस काय ? तेव्हा मुलगा म्हणाला, " हो, मी भारतीय आहे. "

तू हिंदी चित्रपट पहातोस काय ? पाहिलेले आहेत ? "

माझा मुलगा म्हणाला, " हो "

" मग तू मेहमूदला ओळखत असशील "

" हो मी मेहमूदला ओळखतो "

तो तरुण म्हणाला, " मी त्या मेहमूदचा मुलगा इथे मी घोड्याचे ट्रेनिंग शिकायला आलोय '

लेक्झिंग्टनला हॉर्सपार्क आहे व घोड्याची पैदास व घोड्याच्या रेसकरता जगप्रसिद्ध आहे मुबईला मेहमूदचे स्वत चे घोडे होते आता आहेत की नाहीत हे मात्र माहीत नाही

अमेरिकेत स्थायिक होण्याकरता पुष्कळाची धडपड चालू असते मेक्सिकन बॉर्डरवरून पुष्कळ लोक अमेरिकेत घुसत असतात अमेरिकेत राहायला मिळावे, नोकरी करायला मिळावी, धदा करायला मिळावा म्हणून बाहेरच्या देशातल्या लोकाचे सारखे प्रयत्न चालू असतात

भारतीय विशेषत विद्यार्थी म्हणून शिकायला येतात त्यातले सगळे हुषारच

असतात पुष्कळ विद्यार्थ्यांना हुषार असल्यामुळे ग्रीनकार्ड मिळायला त्रास पडत नाही विद्यार्थ्याचे लग्न झाले की त्याच्या पत्नीला ग्रीनकार्ड सहज मिळते त्यानतर तो आई-वडिलाना आणतो आई-वडिलाना ग्रीनकार्ड मिळायला त्रास पडत नाही नतर आई-वडील आपल्या मुला-मुलीकरता प्रयत्न करतात अशा तऱ्हेने काही वर्षांत सारे कुटुब अमेरिकन होऊन जाते ज्याना ग्रीनकार्ड मिळायला अडचणी येतात त्याच्याकरता इथे वकिली सल्ला देणारे पुष्कळ वकील आहेत त्याच्या फर्म्स आहेत बहीण-भावाना ग्रीनकार्ड मिळायला पुष्कळ अडचणी निर्माण होतात पुष्कळ आई-वडील अमेरिकेत स्थायिक होण्यास तयार नसतात वये तर झालेली असतात सर्व जन्म भारतात गेल्यामुळे व काहीच उद्योग नसल्यामुळे त्याना अमेरिकेत करमत नाही कित्येकाना हवामान मानवत नाही आई-वडील आले नाहीत तर बहीण-भावाना ग्रीनकार्ड मिळायला फार वर्षे लागतात

नुसत्या नव्या दिल्लीत अमेरिकन एबसीमध्ये रोज दोनशेच्यावर व्हिसाचे अर्ज हाताळले जातात १९८१ ची ही गोष्ट अमेरिकन कौन्सुलेटच्या भुलाभाई देसाई रोडवर असलेल्या ऑफिसवरून केव्हाही सकाळी चक्कर टाका अडीच-तीनशे माणसे निरनिराळ्या व्हिसाकरता लाईनीत उभी राहिलेली दिसतील १९८२ च्या अमेरिकेच्या खानेसुमारीवरून पाच लाखाच्यावर भारतीय अमेरिकेचे कायम नागरिक झालेले आहेत आणि त्यातले बहुसख्य डॉक्टर्स, इजिनियर्स, कॉम्प्युटर सायटिस्ट आणि इतर टेक्निशियन्स ऑब्झर्व्हर्स आहेत त्यातले सगळे प्रथम अमेरिकन विद्यापीठात शिकायला म्हणून आले व गेल्या दहा वर्षांत त्यातले ७८ टक्के लोक अमेरिकन नागरिक बनले

पुष्कळ विद्यार्थी शिक्षण झाले तरी तसेच अमेरिकेत राहाण्याचा प्रयत्न करतात हल्ली अमेरिकन सरकारने ग्रीनकार्डचे कायदे पुष्कळसे कडक केले आहेत अशा स्थितीत शिक्षण झाल्यावर विद्यार्थ्याला परत भारतात जावे लागते दोन-चार वर्षांपूर्वी एक केस अमेरिकन कोर्टात आली त्यात वकीलाने आपल्या अशिलाची बाजू माडली तो म्हणाला, अमेरिकेच्या प्रवेशद्वाराशी जो स्वतत्रता देवीचा पुतळा आहे त्यावर कोरलेले आहे. 'Give me your tired your poor, your huddled masses yearning to breathe free ती म्हणते, ज्याना स्वातत्र्याविषयी प्रेम आहे त्याना इथे यायला मुक्त प्रवेश आहे माझा अशिल इथे जन्मला नसेल पण त्याला या देशाविषयी उत्कट प्रेम आहे त्या वेळी न्यायाधीशानी निर्णय दिला, की हा गृहस्थ अमेरिकेत जन्मला नसूनही त्याला अमेरिकेविषयी इतके प्रेम आहे की, त्याला अमेरिकेत कायम राहावेसे वाटतेय स्वत च्या जन्मभूमीपेक्षाही त्याला अमेरिका अधिक प्रिय वाटतेय, तर तो अमेरिकन नागरिकापेक्षाही जास्त अमेरिकन आहे त्याला अमेरिकन नागरिकत्व

मिळालेच पाहिजे

अमेरिकन नागरिकत्व मिळवण्याकरता हजारो लोकाची धडपड सतत चाललेली असली तरी अमेरिकन लोकाची प्रत्यक्ष स्थिती तिथे काय आहे याचा कोणी फारसा विचार करत नाही

अमेरिकेत प्रत्येक पाच माणसात एकात Mental disorder असते सर्वसाधारण माणूस क्रेझी नसतो तरी पण १६ ६ टक्के माणसे प्रेमाची भुकेली असतात त्याना कोणाकडून आस्थापूर्वक प्रेम न मिळाल्यामुळे त्याचा प्रेमाच्या बावनीत स्क्रू थोडा ढिला झालेला असतो मानसशास्त्रतज्ज्ञ ( सायकिआट्रिस्ट ) डॉक्टराचा धदा इथे फार तेजीत चालतो आणि त्यातसुद्धा पाच डॉक्टरात एकात नक्कीच मेंटल डिसऑर्डर असते, कारण तो भरमसाट Appointments देत राहतो व भरपूर पैसे काढतो भरमसाट Appointments मुळे त्याचेच डोके कामातून गेलेले असते

• • •

रोज सकाळी लवकर उठून मला मॉर्निंग वॉकला जायची सवय मी ज्या वेळी मुलाकडे गेलो त्या वेळीही रोज सकाळी लवकर उठून मी मॉर्निंग वॉकला जात असे इथे पुष्कळ गारठा होता म्हणून पॅंटशर्टवर स्वेटर व त्यावर डोके झाकता येईल अशी टोपी असलेला जाड कोट घालून मी बाहेर पडत असे पण रस्त्यावर कोणीही चालणारे स्त्री-पुरुष अजिबात आढळत नसत मी आपला एकटाच चाललेला असे तासभर चालल्यावर एखादा पुरुष अगर स्त्री दिसत असे सकाळी सात-सव्वा सातचे सुमारास मुले-मुली दप्तरे घेऊन रस्त्याच्या नाक्यावर शाळेच्या बसची वाट पहात उभी असलेली दिसत बाकी रस्त्यावर मोटारींची अखंड ये-जा चाललेली दिसे चालणारा माणूस क्वचितच दृष्टीस पडे आसपास दुतर्फा घरे असत तिथे माणसे रहातात असे वाटणारसुद्धा नाही, इतकी शांतता दिसत असे घराच्या पुढच्या कंपाउंडमध्ये पुष्कळ वेळा एखाद्या ठिकाणी तीन चाकी सायकल, एखादा मोठा चेंडू किंवा इतर खेळणी पडलेली दिसत, पण त्याला कोणीही रस्त्यावरचा परका माणूस हातसुद्धा लावत नसावा बारीक सारीक चोऱ्या अजिबात होत नसाव्या सगळीकडे शांत शांत मधूनच एखादी गाडी कंपाऊंडमधून बाहेर पडे इतकेच मी घरी साडेसातपर्यंत पोहोचत असे तेव्हा माझ्या मुलाची पण युनिव्हर्सिटीत जायची तयारी पूर्ण झालेली दिसे व तो आपल्या गाडीकडे वळे

चहा ब्रेकफास्ट झाल्यावर थोडेसे वाचन व रोजचा पेपर वाचल्यावर आरामशीर स्नान करून मी परत दहा, साडेदहाला बाहेर फिरायला जात असे घरापासून थोड्याच अंतरावर पोस्टऑफिस होते पोस्टऑफिस चांगलेच मोठे होते व बाहेर पार्किंग स्पेसपण पुष्कळ मोठी होती पुढे दीड-दोन फर्लांग चालत गेल्यावर K मार्ट नावाचे मोठे स्टोअर होते. दीड-दोनशे गाड्या पार्क करता येतील एवढी पार्किंग स्पेस होती त्याच्याच पलीकडच्या रस्त्यावर गोल्डसर्कल नावाचे दुसरे आणखी एक स्टोअर होते Hills

म्हणून आणखी थोड्या अंतरावर आणखी एक स्टोअर होते गोल्ड सर्कलच्या थोडे पुढे गेल्यावर डावीकडे SEARS कंपनीचे मोठे स्टोअर्स होते (या SEARS कंपनीने शिकागो शहरात सर्व जगात उंच अशी एकशेसहा मजली बिल्डिंग बांधलेली आहे तिला SEARS TOWERS असे म्हणतात मी रोज आलटून पालटून एखाद्या मोठ्या स्टोअर्समध्ये चक्कर टाकत असे ह्या कोणच्याही मोठ्या स्टोअर्समध्ये गेले की तास दोन तास मजेत करमणुकीत वेळ सहज निघून जात असे व आत रोज कुठल्याना कुठल्या तरी भागात सेल हा असेच त्यात काही स्वस्तात मिळाले तर खरेदी पण करीत असे पण खरेदी क्वचितच नुसते विंडो-शॉपिंग पण काही वेळेला सेलमध्ये दोन-तीन डॉलर्सना चांगले शर्ट्स आणि चार-पाच डॉलर्सना चांगल्या पँट्स पण मिळून जात चार-पाच डॉलर्सना चांगले शूज पण मिळत प्रत्येक स्टोअर्स म्हणजे आपल्यासारखा मायाबाजारच ह्या स्टोअर्समध्ये सारे काही मिळते तान्ह्या मुलाच्या कपड्यापासून ते थेट आपल्या अंगाच्या कपड्यापर्यंत त्यात विभाग असतात लहान मुलाचा कपड्याचा भाग, मुलींचा निराळा, स्त्रियाच्या कपड्याचा भाग, तरुण मुलाचा, पुरुषाचा कपड्याचा भाग अगणित व्हरायटीज व फॅशन्स त्यात नुसते शर्ट्स् साइझेसप्रमाणे, स्वस्त, बेताचे, महाग, रंगीत, चौकटीचे, नुसते प्लेन तशाच पँट्स सगळे काही उघड्यावर आकर्षक रीतीने हँगर्सवर लटकवून मांडलेले असते आपण त्या त्या भागात शिरायचे, आवडेल ते काढून घ्यायचे बाजूला ट्रायलरूम असते तिथे घालून बघायचे आवडले नाही तर तिथेच ठेवायचे वाटले तर दोन-चार शर्ट्स् घालून बघा पँट्स् घालून बघा नको असतील तर तिथेच सोडून द्या कोणीही तुम्हाला काहीही बोलणार नाही तिथून पुढे तुम्ही बूट, सँडल्स् बघायला जा सगळे उघड्यावर व्यवस्थित ठेवलेले तिथेसुद्धा लहान मुलाचा भाग, स्त्रियाचा भाग, पुरुषाचा विभाग निराळा सर्व भाग एवढे प्रचंड मोठे की आपणच चालून चालून दमून जाऊ पुढे गेलात तर स्वैपाकाच्या भांड्याचा भाग, पुढे काचेच्या सामानाचा भाग, तिथे कपबशा, ग्लासेस, फ्लॉवरपॉट्स, तिथून पुढे स्टेशनरी कागद, पेन्सिली, पेन्स, पाकिटे, ग्रीटिंग कार्डस्, शेकडो प्रकारची त्याचे पुढे कार्पेटस्, गालिचे, उशा, गाद्या, त्याची कव्हर्स, चादरी, फर्निचर त्याचे पुढे टीव्ही सेट्स, ट्रान्झिस्टर्स, रेकॉर्ड प्लेयर्स , सेंट्स, तेले, प्रसाधने, शांपूज, वगैरे ज्युवेलरी, घड्याळे रिस्ट वॉचेस, वॉशिंग मशिन्स, डीश वॉशर मशिन्स, बागकामाचे सामान, त्याची अवजारे हत्यारे, रंगाचे सामान, रंग, ब्रशेस, हार्डवेअर, औषधे, कॅमेरे, फिल्म्सचे रोलस्, मुलाच्या खेळण्याचा भाग त्यात नाना प्रकारची खेळणी मुले, त्याचे आई-बाप त्या भागात जातात, वाटेल ते खेळणे हाताळतात, फिरवून बघतात काही मुले तर तिथे बैठक मारून पुष्कळ खेळणी चालवून खेळून

बघतात या स्टोअर्समध्ये खायच्या गोष्टी सोडून सारे काही मिळते स्टोअर्समधला कोणचा विभाग कुठे आहे हे जर माहीत करून घ्यायचे असेल तर स्टोअर्समध्ये शिरण्यापूर्वी बाहेर स्टोअर्सची माहिती असलेला छोटीशी सुदर छपाईची रगीन पुस्तिका आपल्याकरता ठेवलेली असते त्यात कोणचा विभाग कुठे आहे त्याचा नकाशा दिलेला असतो मासिके, बेस्ट सेलर्स पुस्तके, ब्लेड्स्, सिग्रेट्स, गोळ्या, कॅडीज, चॉकलेट्स्, च्युईंगम वगैरे बारीक सारीक गोष्टी ह्या बाहेर पडायच्या ठिकाणी कॅश कौंटर्सच्या लेनमधून बाहेर पडताना आढळतात

एवढे मोठे स्टोअर्स असून मुख्य म्हणजे इथे विक्रेते नसतात प्रत्येक वस्तूवर किंमत लिहिलेली असते फक्त कॅमेरे, टीव्ही, ट्रान्झिस्टर, वॉशिंग मशिन्स, बागकामाचे अवजड सामान, ज्युवेलरी, सेंट्स् इथेच फक्त विक्रेते असतात मोठ्या अवजड सामानाच्या वस्तू हप्त्यावर मिळतात इतर कुठेही आपल्याला विक्रेता दिसणार नाही खरेदी केलेल्या वस्तू हातगाडीवर आपण कॅशकौंटर लेनमध्ये घेऊन यायच्या तिथे खरेदी केलेले सामान पाहून बिल तयार केले जाते व हातगाडीत टाकले जाते सामान पिशवीत व्यवस्थित भरून दिले जाते बँकेचे क्रेडिट कार्ड दाखवले की मशिनवर फिरवून परत केले जाते व बिलाची एक कॉपी व बँकेचे क्रेडिट कार्ड परत मिळते क्रेडिट कार्ड नसल्यास कॅशपण स्वीकारली जाते

एवढ्या मोठ्या स्टोअर्समध्ये विक्रेते नसून ते कसे व्यवस्थित चालते याचे आपल्या- सारख्याला आश्चर्य वाटते इथे आपण कितीही वेळ घालवू शकतो कोणीही तुम्हाला काहीही बोलणार नाही काही घ्यायचे नाही आणि काही नाही, उगाच काय फिरताहात असे आपल्याला कोणीही म्हणणार नाही अमेरिकन मार्केट हे गिऱ्हाईकाचे विकत घेणाऱ्याचे आहे Buyers. Market गिऱ्हाईकाला इथे अजिबात दुखावले जात नाही कोणी काहीही बोलत नाही माल पसत पडला नाही आणि आठवड्याने परत केला तरी तो न कुरकुरता परत घेतला जातो किंवा दुसरा दिला जातो पैसे परत पाहिजे असल्यास पैसेही परत मिळतात खेळण्याच्या विभागात एखादे खेळणे कुणाकडूनही मोडले तर त्याची किंमत वसूल केली जात नाही तुम्ही काहीही खरेदी न करता जरी दोन तास फिरून निघून गेलात तरी कोणी काही बोलणार नाही आतमध्ये फिरताना एखादी वस्तू धक्का लागून खाली पडली तरी कोणी बोलणार नाही पडून फुटली तरीसुद्धा चक्कार शब्दाने विचारणार नाहीत एकदा मी व माझा मुलगा असेच एका स्टोअर्समध्ये रात्रीचे टाइमपास म्हणून हिंडायला गेलो एके ठिकाणी माझा एका काचेच्या मोठ्या कलात्मक भाड्याला धक्का लागला व ते पडून फुटले भाडे फुटल्याचा खळकन मोठा आवाज झाला आसपासच्या लोकाचे लक्ष पण वेधले गेले पण काहीच झाले नाही

एक-दोन मिनिटात एक नोकर आला त्याचे हातात छोटासा झाडू होता त्याने सान्या काचा गोळा केल्या जसे काही काहीच घडले नाही मी मात्र पुरता घाबरून गेलो मनात म्हटले आता वीस-पचवीस डॉलर्सला आपल्यामुळे फटका बसणार आणि नाही नाही ते ऐकून घ्यावे लागणार, '' देण नास्ती, घेण नास्ती उगीचच येतान हे काय घेणार माल ? वगैरे वगैरे पण मुलगा म्हणाला, काही घाबरायचे कारण नाही इथे काही एक होणार नाही आपण आपले चालत राहू पुढे काहीच घडले नाही जी वस्तू फुटली त्याची किंमत २० डॉलर्स होती

एक गोष्ट मात्र पूर्ण लक्षात ठेवायची, स्टोअर्समधली कोणतीही बारीक सारीक वस्तू खिशात घालायची नाही एवढी खबरदारी घ्यायची एवढ्या मोठ्या स्टोअर्समध्ये एखादी बारीकशी वस्तू खिशात घातली तर कोणाच्या लक्षात येणार आहे, असे एखाद्याला वाटेल पण तो स्टोअर्समधून बाहेर पडायला लागला की टू टू टू असे सिग्नल येतात व चोरी करणाराला ताबडतोब पकडले जाते मग मात्र दयामाया नाही पोलीसाच्या स्वाधीन केले जाते स्टोअर्समध्ये छुप्या जागात टी व्ही कॅमेरे बसविलेले असतात शिवाय स्टोअर्सने खाजगी वेशात सिक्युरिटी गार्ड्स ठेवलेले असतात

मी कधी Kmart कधी Hills मध्ये, तर कधी Gold Circle मध्ये जात असे SEARS मध्येही जात असे 'Sears', 'G Fox' J C Penny, Macy's पुष्कळशी दर्जेदार किंमतीची स्टोअर्स तर केमार्ट सर्वसाधारण गरीब मध्यम वर्गाला परवडतील अशा किंमतीचे गोल्ड सर्कल हे दोघातल्या मधले या शिवाय निरनिराळ्या गावात कॅलडॉर, वूलवर्थ, ट्रबलटन, '' जी फॉक्स '' अशा पुष्कळ कपन्याच्या स्टोअर्स शृखला ( शाखा ) आहेत प्रत्येक स्टोअर्सचा पसारा दीड-दोन मैलाचा असतो बाहेर पार्किंगला भरपूर जागा व्यवस्थित ठेवलेली असते तशीच क्रोगर '' स्टॉप अँड शॉप ' अशा कपन्याची फूड स्टोअर्स गावोगावी असतात ह्या फूड स्टोअर्सच्या बाहेर पण भरपूर पार्किंग स्पेसची जागा असते व जवळच शे-सव्वाशे स्टीलच्या हातगाड्या उभ्या असतात स्टीलची हातगाडी आपण आपली गाडी पार्क केल्यानतर घ्यायची दरवाजाजवळ गेले की आपोआप दरवाजा उघडला जातो स्टोअर्समध्येही हातगाड्या असतात कित्येक वेळा आतल्या गाड्या सपलेल्या असतात विशेषत शुक्रवारी सध्याकाळी किंवा सुट्टीच्या आदले दिवशी स्टोअर्समध्ये पालेभाज्या, फळभाज्या, कांदे, बटाट्याच्या पाच पौंडाच्या पिशव्या, मिरची, कोथिंबीर, लिंबापासून सर्व काही असते सर्व तऱ्हेची फळे सुबक रीतीने माडलेली असतात प्रत्येक ठिकाणी त्याचे दर दिलेले असतात जेवढे आपल्याला पाहिजे असेल तेवढे घ्यायचे बाजूला प्लॅस्टिकच्या पिशव्या ठेवलेल्या असतात त्यात आपण घालून घ्यायचे व स्टीलच्या गाडीत टाकत

जायचे फळाच्या रसाचे जार्स, दुधाचे गॅलन, दूध दोन-तीन प्रकारचे असते, लोणी, लोण्याची निरनिराळ्या कपन्याची पॅकेटस्, दहा-पधरा प्रकारचे ब्रेड, मटनाची पॅकेट्स्, चिकनची पॅकेट्स, त्यातली नुसते लेग्ज, ब्रेस्टस् वगैरे, चीज दहा-पधरा प्रकारचे व निरनिराळ्या कपन्याचे, जामचे जार्स निरनिराळ्या कपन्याचे कुकीज बिस्किटस्, चॉकलेट्सचे पुष्कळ प्रकार, अड्याचे ट्रेज, सुकामेवा खारे काजू, खारे पिस्ते, मिस्क्ड ड्रायफ्रूटचे डबे, वेफर्स, निरनिराळ्या प्रकारचे कोल्ड्रिक्स, कोक, पेप्सीचे क्रेटस, शिवाय निरनिराळ्या प्रकारची आईस्क्रीम पाकीटे, बियर्स निरनिराळ्या कपनीची, त्याचे क्रेटस, याशिवाय सिग्रेट्स, पाईपच्या तबाखूची पाकीटे सर्व काही खाण्यापिण्याचे या स्टोअर्समध्ये मिळते बहुतेक कुटुबे मुलासह इथे येतात हे स्टोअर्स खूप मोठे, अवाढव्य असते इथेही मासिके, वर्तमानपत्रे, बेस्ट सेलर्स पुस्तके विक्रीस ठेवलेली असतात जे काही पाहिजे असेल ते घ्यायचे व स्टीलच्या गाडीत टाकत जायचे कॅशकौंटर्सच्या लेनस् असतात लेनमधून गाडी न्यायला लागले की कॅशरसमोर एक एक ठेवत जायचे ते मशिनच्या पट्ट्यावरून खाली सरकत जाते कॅशर ज्याचे वजन करणे आवश्यक असेल त्याचे वजन करतो व मशिनवर किंमतीची नोंद करते दुसऱ्या बाजूला जसे सामान जाते तिथे एक नोकर उभा असतो तो मोठ्या ब्राऊन पिशव्यामध्ये सामान भरतो व आपल्या हातगाडीत टाकतो नेहमीप्रमाणे बँक क्रेडिट कार्डच आपण कॅशरजवळ देतो बिल व क्रेडिट कार्ड परत दिले जाते ब्राऊन पिशव्यामध्ये भरलेले सामान आपण हातगाडीवर स्टोअरमधून बाहेर घेऊन जायला लागतो त्या वेळी कॅशर व नोकर हसतमुखाने म्हणतात, 'हॅव अ गुड डे कम अगेन ' गाडी दरवाज्यासमोर आल्यावर दरवाजा आपोआप उघडला जातो ही स्टीलची गाडी आपण आपली गाडी जिथे उभी केली आहे. तिथपर्यंत घेऊन जायची मोटारच्या डिकीत सर्व सामान भरून झाले की स्टीलची गाडी आपण तिथेच सोडून जायची या एवढ्या मोठ्या स्टोअर्समध्ये आपल्याला विक्रेते कुठेच आढळणार नाहीत सर्व स्टोअर्स स्वच्छ व लखलखीत असते माल ताजा असतो सर्व ठिकाणी किंमती लिहिलेल्या असतात समजा, कुठे सांडले लवडले तर कोणी काहीही बोलत नाही एक-दोन मिनिटात स्टोअरचा नोकर येतो व जागा साफ स्वच्छ करून जातो आपल्याला एखाद्या विशिष्ट बाबतीत मदत पाहिजे असल्यास प्रत्येक विभागात एखादा नोकर कुठेतरी उभा राहिलेला दिसेल त्याला विचारल्यावर तो आपणास मदत करतो इथेही आपल्याला नुसते पहायला जायला हरकत नाही पण काही- एक खरेदी न करता नुसतेच तोंडाला पाणी सुटणार, याला काय अर्थ आहे ? इथे खरेदीला येतात ते बहुतेक आठवड्याचे सामान एकदम खरेदी करायला येतात रोज वेळ आहे कुणाला ? त्यातून काही गोष्टी अधेमधेच

सपल्या तर गोष्ट निराळी ८२ साली मी इथे अमेरिकेत होतो त्या वेळी एकदर बाजारात ज्या किंमती होत्या त्या मानाने आता ८८ साली मला त्याच मालाच्या किंमती पुष्कळशा वाढलेल्या दिसल्या म्हणजे अमेरिकेतही महागाई वाढत आहेच ८२ साली डॉलरचा भाव भारतात साधारण ९.७५ ने १० रु होता व आता ८८ साली १२ ५० ते १३ रु होता आता ९० मध्ये १९ रुपये अमेरिकेतही महागाई आपल्यासारख्याला ताबडतोब जाणवते भारतात जशी महागाई प्रांताप्रांतात निराळी आहे तशीच परिस्थिती अमेरिकेत पण आहे महाराष्ट्रात जितकी महागाई जाणवते तितकी केरळ, कर्नाटक व मद्रासमध्ये जाणवत नाही मध्य अमेरिकेतल्या राज्यात जे भाव आहेत तेच उत्तरेकडे यायला लागले म्हणजे थोडे वाढत जातात महागाईचा चटका सगळीकडेच बसतो आहे आता ९० मध्ये तर भाव आणखी वाढत आहेत

रस्त्याने चालताना आपण फक्त एकटेच चालणारे आहोत हे जाणवत राहते तासा अर्ध्या तासाने कोणीतरी एखादी स्त्री अगर पुरुष रस्त्यावरून चालताना दिसतो नजरानजर झाली तर समोरील व्यक्ती न चुकता "हाय" म्हणून हात वर करून पुढे निघून जाते पोस्टमनसुद्धा जीपने पत्रे टाकायला बाहेर पडतो तो कधी एखादेवेळी , रस्त्यात दिसला तर तोसुद्धा "हाय" म्हटल्याशिवाय पुढे जात नाही रस्ता ओलांडताना मोटारी सारख्या वेगाने जात असताना दिसतात पण आपण फूटपाथवर रस्ता ओलांडायला उभे राहिलो की, मोटार चालवणारा आपली मोटार थांबवतो व आतून आपल्याला खूण करतो की आता रस्ता ओलांडून जा तोपर्यंत मागचे मोटारवाले पण थांबतात हे येथील खास वैशिष्ट्य पायी चालणाऱ्याला पहिला मान आपल्यासारख्या भारतीय माणसाला हे सारे पाहून आश्चर्याचा धक्काच बसतो कारण आपल्याकडचे मोटारवाले स्वत ला काय समजतात, कुणास ठाऊक ? पायी चालणारा म्हणजे किरस झाड की पत्ती ? सिग्नल दाखवला गेला तरी दामटून मोटार नेणारे आपण इकडे बघतो पादचारी रस्ता ओलांडत असले म्हणजे मोटारचे इंजिन सारखे घूर घूर करीत "आत्ता सुरू करतो पळा, पळा," असे भेडसावणारे आपल्याकडचे मोटारवाले कुठे आणि हे इथले अमेरिकेतले कुठे ? एखादा पादचाऱ्याचा ग्रीन सिग्नल गेला की मग पादचारी गेला खड्ड्यात अशी भावना याचे कारण अर्थातच उघड आहे. जन्माच्या कर्मी एकदाची मोटार घेतलेली असते आणि इकडे प्रत्येक घरी मोटार असते

• • •

अमेरिकेत साधारणत साडेचार ते पाच लाख रेस्टॉरट्स् आहेत बोस्टन, सान फ्रान्सिस्को आणि ऑर्लिन्समध्ये विशेषत उत्तम रेस्टॉरट्स् आहेत आता आतापर्यंत फ्लोरीडामध्ये पण होती न्यूयॉर्कमध्ये शभर-दीडशेवर उत्तम रेस्टॉरट्स् आहेत अशी इतर ठिकाणी पहायला मिळणार नाहीत पण त्यातही काही विशेष चागल्या सुधारणा झाल्यामुळे त्या ठिकाणी ती उत्तम राहिलेली नाहीत

अमेरिकेच्या दक्षिण भागात दक्षिणी पद्धतीची, सिनसिनाटी कॅनसासिसिटी, पिट्स्बर्ग इडियाना या भागात फार उत्तम रेस्टॉरट्स् आहेत हौस्टन टेक्सास फोएनिक्स अरिझोनामध्ये खाद्याचे निरनिराळे चवदार प्रकार मिळतील आयओवा सर्वात जास्त अन्नसमृद्धीच्या बाबतीत प्रसिद्ध आहे आणि तेथील लोक नेहमी फुशारकी मारत असतात की आमच्याकडे सर्वात जास्त चागले खाद्यपदार्थ मिळतात अमेरिकेत बहुतेक ठिकाणी फ्रोझन फूडच रेस्टॉरटमधून असते पण ठीक असते जसे मेनमध्ये तसेच ओक्लोहामामध्ये

पण अलीकडे काही वर्षांपासून या रेस्टॉरट्स्चा धदा फास्टफूड मालिकानी (Chain of Fast food Restaurants नी ) अमेरिकेतल्या हॉटेलाचा धदा पार बसवून टाकला आहे छोटी-मोठी रेस्टॉरट्स् तर पार बुडून गेली फास्ट फूड रेस्टॉरट्स्च्यासुद्धा स्वतत्र साखळ्या आहेत कुणी फक्त स्टेक नावाचा खाण्याचा प्रकार त्यात स्टेकचे अनेक प्रकार खिलवतात सर्वांत मोठी रेस्टॉरट्स्ची साखळी आहे ती " मॅकडोनॉल्ड " रेस्टॉरटची नुसती अमेरिकाच नव्हे तर कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि गल्फ देशात पण पसरलेली आहेत कोट्यावधी डॉलर्स ती कमवत आहेत त्याचबरोबर बर्गरकिंग, विंडीज, केटकी फ्राईड चिकन, " आरबीज " आणि पिझा पार्लर्स, पिझाहट, या रेस्टॉरट्स्नी अमेरिका गजबजून गेली आहे.

हॅबर्गर्स अमेरिकेत सर्वांत जास्त खपतात त्यानतर हॉट डॉग्ज सर्वांत मोठा

अत्यंत यशस्वी फास्ट फूडचा धंदा मॅक्डोनाल्डचा आहे. या मॅक्डोनाल्डवाल्यांनी लहान रेस्टॉरंटचा धंदा करणाऱ्यांना पार नाहीसे करून टाकले ड्राइव्ह इन म्हणजे गाडीत बसून रेस्टॉरंटमधले खाण्याचे पदार्थ घेऊन जाण्याची त्याची हायवेवर, शहरातल्या रस्त्यावर व्यवस्था आहे मॅक्डोनाल्डचा हॅंबरगर एक डॉलर पंचाहत्तर सेंटला पडतो हॅंबरगरबरोबर फ्रेंच फ्राय ( तळलेल्या बटाट्याची सळी ) आणि कोकची किंवा मिल्क शेक हे टिपिकल अमेरिकन खाणे एवढे खाल्ले की लंच पुरे होते हॅंबरगरमध्ये खिम्याचे मटण, कच्चा कांदा, टोमॅटो, चिज, सॅलड, सॉस ठेवलेला असतो खाली व वर गोल पावामध्ये हे सारे भरलेले असते सॉस आपण पाहिजे तेवढा घ्यावा आपल्याकडे जसा वडापाव अमेरिकेत माणसाचा आवडता खाण्याचा पदार्थ म्हणजे मॅक्डोनाल्डचा हॅंबरगर मॅक्डोनाल्डमधली व्यवस्था स्वच्छ तत्पर आणि खरोखरच अतिजलद आहे आणि त्यामुळे आपल्याला कुठेही मॅक्डोनाल्ड गजबजलेले दिसेल ते इतक्या उत्तम तऱ्हेने तयार करून कागदामध्ये गुंडाळून बॉक्समध्ये व्यवस्थित घालून देतात आणि इतक्या शिस्तीत आणि चपळाईने आणि हसतमुखाने देतात व वर म्हणतात Come again की नुसते पहात राहावे अमेरिका म्हणजे मॅक्डोनाल्ड इतके त्याचे समीकरण झालेले आहे.

अमेरिकेतले लंच म्हणजे हॅंबर्गर त्याशिवाय नाव घेण्यासारखे त्यांना विशेष काही बनवता येत नाही हॅंबरगर मिल्कशेक किंवा कोक किंवा पेप्सी बास त्याच्या खालोखाल इटालियन रेस्टॉरंट्स्. छत्तीस टक्के अमेरिकन इटालियन रेस्टॉरंट्स्मध्ये खातात पस्तीस टक्के अमेरिकन लोक कुठे ना कुठे चायनीज रेस्टॉरंट्स्मध्ये खात असतात चायनीजमध्ये कॅंटोनीज निराळी असतात चॉसुए आणि चॉव मे अगदी अस्सल चायनीज फ्रेंज रेस्टॉरंट्स् मोठ्या शहरातून आहेत ती पण चांगलीच लोकप्रिय आहेत तशीच जपानी रेस्टॉरंट्स् पण आहेत जपानी स्टेक शेल फूड, चिकन, मोड आलेले वाटाणे, घेवड्याचे दाणे (Arech Beans) आणि कांद्याच्या चकत्या तुमच्या समोर तयार करून देतात जो तयार करून देतो त्याला कामी काझे पायलट म्हणून संबोधले जाते एक प्रकार, हाडे नाहीत, चरबी नाही आणि मुख्य म्हणजे जपान्यांचा सुशी बार सुकियाकी सुशी बारमध्ये Tuna Squirt Mackcaral म्हणजे आपला बांगडा ऑक्टोपस बरोबर भात आणि त्याबरोबर Sea Weed खायला देतात टेबलावर ज्या वेळी प्लेट ठेवतात त्या वेळी तो जपानी पेंटिंगचा नमुनाच वाटेल पण जपानमध्ये अशा प्रकारचे पदार्थ मिळतात की नाही कुणास ठाऊक ?

केंटकी फ्राइड चिकनची रेस्टॉरंट्स्‌ची साखळी पण वाढत आहे फ्राइड चिकनचे पुष्कळ प्रकार, शिवाय आईस्क्रीम आणि इतर थंड पेये, कोक पेप्सी वगैरे

मिळते फ्राइड चिकनचे प्रकार पोटभर खाऊन लच होते महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपल्याला कुठेही कळकट रेस्टॉरंट शोधून सापडायचे नाही सर्व ठिकाणी स्वच्छता, टापटीप, तत्परता, नम्रता अनुभवायला मिळते सर्व फास्टफूड रेस्टॉरट्स्मध्ये सेल्फ्सर्व्हिस असते वेटर्स नसतात डिशेस, काटे, चमचे, नॅपकीन्स आपण स्वत च घ्यायच टेबल खुर्च्यांवर आपण स्वत हून घेऊन यायचे व खाऊन झाल्यावर सगळे गोळा करून कचऱ्याच्या पिंपात सोडून द्यायचे पदार्थांची ऑर्डर काउटरवर द्यायची पदार्थांची यादी काऊटरमागे भावासहित लिहिलेली असते तोपर्यंत आपण डिशेस, काटेचमचे, ग्लासेस घेऊन यायचे ट्रेमध्ये सारे पदार्थ ठेवले जातात ते कॅश काऊटरवर दाखवल्यावर तिथेच पैसे द्यायचे व मग आपल्या टेबलावर घेऊन जायचे सर्व ठिकाणी क्रेडिट कार्ड चालते कॅशच दिली पाहिजे अशी सक्ती नाही फास्ट फूड रेस्टॉरट्स् अशी असतात

भारत जसा सर्व धर्मियाचा देश आहे, तसा अमेरिका हा सर्व देशियाचा देश आहे. आपल्याकडे पूर्वी इराणी रेस्टॉरट्स्चा सुळसुळाट होता त्याची जागा आता उडपींनी घेतली व नतर पजाबी, सिधी, चहार्ची हॉटेल्स, राजस्थानी अमृततुल्य आणि थोडी फार उरलीसुरली मराठी व गुजराथी लोकाची हाताच्या बोटावर मोजण्याइतकी त्यानतर हल्ली बगालीवाल्याची मेवामिठाईची थोडीफार चायनीज व त्यानतर क्लासवन ज्याचा सर्वसाधारण लोकाशी सबध येत नाही, तिथे जास्त करून भ्रष्टाचारी, स्मगलर्स, नुवोरीच लोकाचा व कधीतरी केव्हातरी उच्च मध्यम वर्गाचा सबध येतो

पण अमेरिकेत सर्व देशीय रेस्टॉरट्स् आहेत अमेरिकन तर आहेतच पण ती निरनिराळे पदार्थ बनवण्याच्या बाबतीत पुष्कळशी अज्ञ आहेत आईस्क्रिमस् मात्र पुष्कळ प्रकारची आहेत परदेशीय रेस्टॉरट्स्मध्ये फ्रेंच, जर्मन, ग्रीक, इटालियन, हंगेरियन, इडोनेशियन, मेक्सिकन, रशियन आणि भारतीय शिवाय काळ्याची क्रीओल्ड, इग्लिश कॉटिनेंटल आणि इतर देशीय सोडून, बीफ हौसेस, बार्बक्यू, रिबस, क्रॅब हौसेस, स्टेकस, पिझा पार्लर्स ही निराळी मॅक्डोनाल्ड, केंटकी फ्राईड चिकन, वेंडीज, पाडारोसा, पिझाहट आरबी आणि स्टेकस ही सगळी फास्टफूड रेस्टॉरट्स् इथे वेटर्स नसतात सगळी सेल्फसर्व्हिस विशेषत रविवारी व सुट्टीच्या दिवशी काही रेस्टॉरट्स्मध्ये ईट ॲज मच ॲज यू कॅन ' वाट्टेल तेवढे भरपूर खा कन्सेशनल रेटमध्ये बुफे टाइप जेवण असते तिथे मात्र बाहेर वेटिंगमध्ये बसून राहावे लागते कित्येक ठिकाणी बारा ते दोन गर्दीची वेळ सपली म्हणजे हॅपी अवर्स ठेवलेले असतात दुपारी दोनच्या पुढे चार वाजेपर्यंत सवलतीच्या दरात नेहमीचेच पदार्थ मिळतात

आपल्या इकडे पूर्वी रेस्टॉरट्स्मध्ये भितीला सगळीकडे आरसे व काचेवर रगीत भडक चित्रे चित्तारलेली असत तो जमाना जाऊन सगळीकडे सनमायकाचा वापर करू लागले तसेच अमेरिकेन पूर्वी रेस्टारट्स्मध्ये भिती आरशानी सजवलेल्या असायच्या व ऑर्डर्स घ्यायला वेटर्स असायचे आता तशी हॉटेल्स् कचितच दृष्टीस पडतील गेल्या पचवीस-तीस वर्षांत सगळे स्वरूप बदलून गेलेय सगळीकडे रगाचे युग आलेय विशेषत लाल आणि निळ्या क्रीम कलरने भिती सजू लागल्या व वेटर्स नाहीसे झाले दिवे मोठमोठ्या शेड्स्चे लावू लागले त्यानतर थीम रेस्टॉरट्स्चा काळ आला रेस्टॉरट्स्ना निरनिराळे आकार येऊ लागले इटिरीयर डेकोरेशननी हॉटेले सजू लागली हॉटेलातल्या खाण्याच्या पदार्थांपेक्षा आतल्या सजावटीचे युग आले काही जुन्या पद्धतीने जुन्या काळात घेऊन जाणारी रेस्टॉरट्स् सुरू झाली तिथे वेस्टर्न सिनेमात जशी रेस्टॉरट्स् दाखवली जात असत त्याप्रमाणे रेस्टॉरट्स्चे डेकोरेशनस् सुरू झाली मेनूवर सगळा इतिहास लिहिला जाऊ लागला व त्याची माहिती खाणाऱ्याला वाचायला मिळू लागली त्याची लाट आपल्याकडे पण आली आहे. मोगल स्टाईलवर किंवा पुण्याला कित्येक रेस्टॉरट्स्मध्ये पेशवाई डेकोरेशन होऊ लागलेले आपण पाहिले असेल

जी काही भारी उत्तम हॉटेल्स् असतात तिथे मेनूवर कसा काय पदार्थ असतो, त्याचे वर्णन केलेले असते त्यात पदार्थाच्या आधी त्याचे वर्णन होऊ लागले विशेषत
1) Freshly 2) Tender 3) Mouth watering 4) Succulent, 5) On a Bed of 6) Tangy, 7) Hearty 8) Luscious 9) To your liking, 10) Topped with, 11) Savory, 12) Tempting and Delicious (Tie), 13) Surrounded by, 14) Golden Brown, 15) By our chef 16) Seasoned to Perfection 17) Choice Morsels of 18) Dedicately and Thick, 19) Crisp, 20) Not Responsible for Personal Property

फ्रेशली म्हणजे प्रत्येकाला फ्रेशली देणे म्हणजे खर तर फ्रेशली अगदी ताजेतवाने सकाळपासून रात्रीपर्यंत देणे हे कस शक्य आहे ? Savoury याचा अर्थ सुवासिक पण पुष्कळ रेस्टॉरट 'u'मध्ये घालतात Savoury म्हणजे स्वादिष्ट व खमग खमग कधी होते तर जास्ती करपले म्हणजे सराऊडेड बाय आणि ऑन ए बेड ऑफ दोघाचा अर्थ जवळ जवळ सारखाच आता 'गोल्डन ब्राऊन' सगळेच गोल्डन ब्राऊन पदार्थातल्या हिरव्या पालेभाज्या पण गोल्डन ब्राऊन तक्रार करायला जागाच राहाणार नाही बाय आवर शेफ रेस्टॉरटमध्ये शेफ नसला तरी ठोकून देतो ऐसाजे डेलिकेटली आणि थिक आणि शिवाय क्रिस्प हे सारे एकदम कसे शक्य पण शब्दाचा

भुलभुलैया करण्यात सारे पटाईत !

आपल्या इकडे जसे ग्रेड वन् हॉटेलमध्ये दोन-तीन माणसाचे सहज तीन-चारशे रुपये बिल होते, तसे तिथे उत्तम हॉटेलमध्ये जेवावयास गेल्यावर सहज तीन-चारशे डॉलर्सचे बिल होते पण्त एवढे खर्च करून पोट भरेलच याची खात्री देता येणार नाही शेवटी आपल्या मध्यमवर्गाचे फास्टफूडच बरे असे वाटेल

• • •

आपल्या इकडे भारतात कोणत्याही शहरात गेले तर आपल्याला महात्मा गांधी रोड आणि जवाहरलाल नेहरू रोड कुठेना कुठे आढळतील त्यानंतर सुभाषचंद्र बोस, महाराष्ट्रात टिळक रोड, सेनापती बापट मुंबईत तर तानाजी मालुसरे, संत तुकाराम, साहित्यिकांपैकी न चिं केळकर, वि स खांडेकर तर काही ठिकाणी कोचिन, गोवा, मलबार त्याशिवाय अलीकडे काही त्या त्या भागातील दादाची, पुढाऱ्याची पण नावे रस्त्यांना चौकांना दिलेली आहेत रस्त्यांना नावे ठेवण्याची अगदी कमाल मर्यादा गाठली आहे त्यातून हायवेज पण सुटलेले नाहीयेत

इतर देशात पाहिले तर लंडनमध्ये अर्धा डझन नावे सांगता येतील ती म्हणजे बाँड स्ट्रीट, फ्लीट स्ट्रीट, कार्नाबी स्ट्रीट, पिकॅडली पॅरीसमध्ये चॉपस् एलीझे, बर्लीनमध्ये अंडरडेन लीनडेन, लेनिनग्राडमध्ये नेव्हस्की पॉस्पेक्ट

अमेरिकेत मिशिगन बुलवर्ड, सनसेट बुलवर्ड काही रस्त्यांना नावेच नाहीयेत न्यूयॉर्कमध्ये फिफ्थ अव्हेन्यू फॉर्टीसिकंड स्ट्रीट. फिफ्थ हे सगळीकडे रस्त्याच्या नावात फार लोकप्रिय आणि सर्वांत जास्त रस्ते लिंकन या नावाचे आहेत त्यानंतर ओक स्ट्रीट, मेपल स्ट्रीट आणि त्यानंतर वॉशिंग्टन आणि त्याहून जास्त रस्ते पार्क स्ट्रीट नावाचे आहेत पार्क अव्हेन्यू, पार्क टेरेस, नुसतेच पार्क किंवा पार्क हे आणि पार्क ते अमेरिकेच्या प्रेसिडेंट्सपैकी सात प्रेसिडेंट्सची नावे रस्त्यांना दिलेली आढळतील रस्त्याचा आणि नावाचा इथे काही वेळा काही संबंधच येत नाही जसे आपल्याकडे टामरींड लेन, फोर्ट, मुंबई येथे आहे पण तिथे एकही चिंचेचे झाड दिसणार नाही तसेच अमेरिकेत ओक स्ट्रीटवर ओकचे एकही झाड दिसणार नाही पुष्कळ वेळा बेव्ह्यूच्या ठिकाणी समुद्र शोधावा लागेल तसेच ' हिलसाईड रस्त्याच्या आसपास एकही टेकडी दिसणार नाही

पण रस्त्यांना नावे ठेवण्याचे खूळ अमेरिकेत तसे विशेष नाही कारण

अमेरिकेत जे हजारानी हायवेज आहेत त्याना फक्त आकडे दिलेले आहेत आणि आकड्याबरोबर दिशाची नावे जोडलेली आहेत सर्व रस्त्याना नबर दिलेले आहेत व दिशा आहेत त्यामुळे कुठूनही कोणत्याही ठिकाणी जायचे असेल तर आधी आपल्याला रस्त्याचे नबर व दिशा माहिती करून घ्याव्या लागतात आणि त्यामुळे अमेरिकेत कुठेही फिरायला अतिशय सोपे जाते अमेरिकेत नवीन आलेल्या माणसाजवळ रस्त्याचा नकाशा असला व गाडी चालवण्याचे लायसेन्स असेल तर अमेरिकेत तो कुठेही सहज जाऊ शकतो

आपल्या इकडे मुबईत गिरगावात भटवाडी, खोताची वाडी, काळबादेवी, भुलेश्वर किंवा दादरला वाड्यातून काही जुनी घरे अजून शिल्लक आहेत तसेच पुण्यात सगळ्या पेठातून जुने वाडे, जुनी घरे अजून पुष्कळशी शिल्लक आहेत तिथे पिढ्यान् पिढ्या आपल्या कुटुबियासमवेत लोक राहात होते आणि आता जुनी घरे, वाडे जाऊन तिथे सोसायट्याच्या उच इमारती उभ्या झाल्या व होत आहेत सारे जुने स्वरूप पालटून जात आहे.

प्रत्येक देशात या अशा अशा घडामोडी मोठ्या प्रमाणावर होत आहेत अमेरिका तर अत्यत पुढारलेला देश बावीस-तेवीस कोटी लोकसख्येत चार-पाच कोटी घरे आहेत थोडक्यात भारतात दहा माणसाना जेवढी जागा लागते तेवढी जागा एका अमेरिकन माणसाला लागते पूर्वीची वाडाटाइप घरे जाऊन आता आधुनिक पद्धतीने घरे बाधली जात आहेत जास्तीत-जास्त प्रमाणात लाकडाची घरे बाधली जातात तिकडची घरे बाधण्याची पद्धत पण सर्वस्वी निराळ्या प्रकारची आहे दगडी विटाची घरे त्या मानाने कमी प्रमाणात असतात घराचे नाना प्रकार पहावयास मिळतील निरनिराळ्या आकाराची काही चौकोनी, काही वर्तुळाकार, काही सहा काटकोनात सगळीच घरे शोभिवत बनवलेली दिसतात आपल्यासारखा भारतीय माणूस चटकन अमेरिकन घराच्या प्रेमात पडतो काही घरे फिरती असतात फिरती म्हणजे त्या घराला अक्षरश चाके असतात आपल्या वाहनाला घर लावून ते घरवाल्याना जिथे जायचे असेल तिथे ते घेऊन जाऊ शकतात

नवीन घर बाधले जाते त्यात जितकी माणसे राहाणार असतील तेवढ्या बेडरूम्स असतात एक मोठी लिव्हिंग रूम, किचनला जोडून डायनिंग रूम, टॉयलेटमध्ये सडास व बाथरूम एकत्र असते बाथरूममध्ये टब व वॉशबेसीन व त्यात खाली-वर कॅबिनेटस् व शिवाय आत एक मोठे कपाट घराला बेसमेट असते तिथे एक मोठी लिव्हिंग रूम व टॉयलेटची व्यवस्था शिवाय घराला अटीक असते कपडे धुण्याच्या मशीनकरता एक खोली व स्टोअर्सची एक खोली असते पूर्वीच्या घराला

पोर्च असे पण आता पोर्चची फॅशन इतिहासजमा झाली आहे. पण घराला गॅरेज असणे अत्यंत आवश्यक गोष्ट समजली जाते घराला जोडूनच गॅरेज असते घराच्या गॅरेजवर त्या कुटुबाचा दर्जा लोक ओळखतात साधारण दोन-तीन मोटारीचे गॅरेज हे उच्च मध्यम वर्गीयाचे लक्षण Status symbol समजले जाते आता घराच्या पुढे मोटार आणल्यावर मोटारीत बसूनच रिमोट कट्रोलने गॅरेजचा दरवाजा उघडून मोटार गॅरेजमध्ये नेणे व रिमोट कट्रोलनेच दरवाजा बद करून घरात प्रवेश केला जातो आता अमेरिकेत दहा कोटी अमेरिकन मोटारगाड्या आहेत आत दोन गॅरेज असूनही गाड्या ड्राइव्हवेवरच ठेवतात दोन गॅरेजपैकी एकाची खोली करून त्याचा वापर करतात घराला जसे फ्रटयार्ड असते तसेच बॅक यार्ड असते पण बहुतेक अमेरिकन लोक फ्रटयार्डपेक्षा बॅक यार्डचाच जास्त उपयोग करतात त्याना जास्तीतजास्त प्रायव्हसी आवडायला लागलेली आहे घराला कुपणे घालणे हे जवळ जवळ नाहीसे झालेले आहे. सगळे उघडे असते घरापुढची आणि मागची जागा वेळोवेळी गवत व्यवस्थित कापून चागली ठेवावी लागते ज्याच्या ह्या जागा व्यवस्थित ठेवलेल्या असतात ते चागलेच सधन असतात

ज्या वेळी आपण अमेरिकेत सगळीकडे हिंडून अमेरिकन घरे पाहू लागतो तेव्हा काही ओळखीच्या ठिकाणी आपण घरात प्रवेश करून घरे पहातो त्या वेळी आपण जवळ जवळ प्रत्येक अमेरिकन घराच्या प्रेमात पडतो हे चागले की ते चागले, असा आपल्याला प्रश्न पडतो घरात सर्वच घरभर इथून तिथून स्वैपाकघरापासून टॉयलेटस्‌मध्येही गालीचानी घर आच्छादलेले असते घरात ट्यूबलाईटस्‌ कोणीही लावलेल्या दिसणार नाहीत लिव्हिंग रूम अगर हॉल व जेवणाची खोलीमध्ये सीलिंगला दिव्याचे छोटेसे झुबर दिसेल बाकी सीलिंगला दिवे लावण्याची पद्धत तिकडे नाही प्रत्येक ठिकाणी लॅपशेडचे स्टॅड दिसतील आपल्या इकडे कुठेही राहायला गेले की गोदरेजची स्टीलची कपाटे घ्यावी लागतात पण तिकडे कपाटे आधी कुठे मिळत नाहीत कारण कपाटाना गिऱ्हाईकच नाही कारण घरामध्ये कपडे व इतर वस्तू ठेवण्याकरता प्रत्येक खोलीत कपाटे बाधलेली असतात घरात प्रवेश केल्यावर प्रथमच दरवाजाजवळ पाहुण्याचे ओव्हरकोटस्‌ टागण्याकरता कपाट असते सगळी घरे बद असतात आपल्याकडच्याप्रमाणे दरवाजे, खिडक्या कधी उघड्या दिसणार नाहीत कारण घर थड वा गरम करण्याची सोय घरात केलेली असते पुष्कळ लोकाच्या बॅकयार्डमध्ये छोटासा पोहोण्याचा तलाव असतो मुलाना झोपाळे, मकीबार असतात ते फ्रट यार्डचा विशेष उपयोग करीत नाहीत

सर्वसाधारण आजचे अमेरिकन्स पाच वर्षांनी एकदा तरी घर बदलतात किंवा

आपले पहिले घर विकतात किंवा सबध जीवनात बारा-तेरा वेळा तरी घर बदलले जाते वीस टक्के कुटुंबे सारखी घरे बदलत असतात घर विकतात त्या वेळी त्याची किंमत चागलीच वाढलेली असते जवळ जवळ दुप्पट पैसे त्याना मिळतात आणि नव्या घराची किंमत त्याना परवडण्यासारखी असते पण ज्याचे घर ते विकत घेतात ते त्याने केवढ्याला घेतलेले असते ते त्याचे त्यालाच माहीत पण चागला फायदा झाल्याशिवाय तो ते थोडेच विकणार ?

जगात अमेरिकन घरे फार प्रसिद्ध आहेत उत्तम घर राहायला पाहिजे असेल तर अमेरिकन घरात राहावे उत्तम जेवण जेवायचे असेल तर चिनी लोकाचे जेवण जेवावे व उत्तम बाई सोबतीला पाहिजे असेल तर जपानमध्ये जावे असे म्हणतात मी अजून फक्त जपानमध्ये गेलेलो नाहीय बाकी पहिल्या दोन्ही गोष्टींचा अनुभव मी घेतलेला आहे तेवढा मला पुरेसा आहे.

एवढी घरे असूनसुद्धा अलीकडे अमेरिकेत भाड्याने जागा घेणे अथवा घर घेणे परवडत नाही असे कितीतरी लोक आढळतात मुबई-पुण्यासारख्या शहरात रस्त्यावर झोपणारे लोक आढळतात काही गरीब कुटुबे तर मोटारीतच दिवस काढतात किंवा रिकाम्या मोकळ्या जागी रात्रीचा तबू ठोकून राहातात अर्थात् पोलिसाना चुकवून हा खेळ चालतो बेघराकरता तेथील सस्थानी ( सरकारी निमसरकारी ) झोपण्याकरता सोयी केलेल्या आहेत कारण थडीच्या दिवसात व बर्फ पडते त्या वेळी ही गरीब माणेस मरूनच जातील गरीब माणसे जगभर आहेत अमेरिका त्याला अपवाद नाही

• • •

अमेरिकेत टेलिफोनशिवाय घर सापडणे मुष्किल घरात टेलिफोन हा पाहिजेच घर गावातल्या गावात जर बदलले तर तासा-दोन तासात टेलिफोन कपनीचे लोक येऊन टेलिफोन फिक्स करून जातात तुमचा एकदा टेलिफोनला दिलेला नबर बदलला जात नाही तोच राहतो दुसरी गोष्ट म्हणजे तुम्हाला ठराविकच टेलिफोन नबर पाहिजे असेल तर तसाही तो मिळू शकतो लक्षात राहण्याकरता म्हणून सोयीचा टेलिफोन नबर मिळू शकतो एकाचा नबर ८७६५४३२ आठापासून दोनापर्यंत किंवा अक्षरातसुद्धा नबर मिळू शकतो अर्थात असे नबर बहुतेक जाहिरात करण्याकरताच घेतले जातात

आपल्याकडे टेलिफोन मुख्य म्हणजे बैठकीच्या खोलीत बसवून घेतात घरी कोणी आले की टेलिफोन प्रथम दिसला पाहिजे तो एक प्रेस्टिजचा प्रश्न समजला जातो दुसरी गोष्ट म्हणजे शेजाऱ्याचा फोन आपल्या घरी वारवार येतो तेव्हा त्यानी बाहेरच्या बाहेर फोन करून किंवा आलेला फोन रिसीव्ह करून निघून जावे, हा हेतु असतो पण अमेरिकेत प्रत्येक घरात बहुधा स्वयपाकघरात व त्याचेच कनेक्शन बेडरूममध्ये असते घरात जरी एक फोन असला तरी त्याचे इटरकनेक्शन दोन-तीन ठिकाणी असतेच त्यामुळे फोन आला आणि दोघाना एकच फोन आलेल्याशी बोलायचे असेल आणि गप्पागोष्टी करायच्या असल्या तर सोयीचे पडते फोनच्या वायर्स पण लाबलचक घेतलेल्या असतात त्याचे कारण स्वयपाक करता करता गृहिणी बोलू शकते व बेडरूममध्ये आरामात पलगावर पडून गप्पागोष्टी करता येतात हातात फोन घेऊन घरभर फिरत मुलेपण बोलत राहातात टेलिफोनच्या आसपास पॅड आणि पेन्सिलपण ठेवलेल्या असतात आणि कित्येकाना फोन करता करता पॅडवर वाटोळी काढ, चौकोन, त्रिकोण किंवा नुसत्या रेघोट्या ओढण्यात मजा वाटते इथे सहसा टेलिफोन बिघडत नाही आवाज स्पष्ट येतो घरात बसून जगात कुठेही डायरेक्ट फोन करता येतो ऑपरेटरची गरज लागत नाही घरात आपण नसलो आणि आपल्याला

कुणाचा फोन आला तर फोनवर आपोआप सांगितले जाते की घरात कोणी नाहीय आपणाला काही मेसेज द्यायला असेल तर तो देऊन ठेवा व टेलिफोन ज्याने केलेला असतो त्याचा निरोप पण नोंदविला जातो आपण घरी आल्यानंतर आपल्याला कुणाकुणाचे फोन आले व त्याचे निरोप काय होते हे पण आपल्याला समजते कॉर्डलेस टेलिफोन पण हल्ली वापरू लागले आहेत आता गेल्या एक-दोन वर्षापासून पत्रव्यवहार व कागदपत्रे पण टेलिफोनवर पाठवायची सोय अमेरिकेत सुरू झाली आहे सबंध पुस्तकपण टेलिफोनवरून पाठवता येते दुसऱ्या टेलिफोनवर सर्व छापील लेखी मजकूर पाठविता येतो सध्या या टेलिफोनची किंमत सर्वसाधारण लोकांना परवडण्यासारखी नाही हे टेलिफोन अमेरिकेत व्यापारी कंपन्या, मोठे व्यापारी, टॅक्स कन्सल्टंट, डॉक्टर्स वापरतात आपल्या इकडे भारतात पण काही मोठ्या कंपन्याकडे हे टेलिफोन आलेले आहेत

• • •

अमेरिकेत सारी आबादीआबाद आहे सान्या जगातून लाखो लोकाची धडपड अमेरिकेन जाण्यासाठी चाललेली असते सारे काही सुदर, चागले चाललेले अमेरिकेत दिसते आणि फक्त आपल्या देशातच दारिद्र्य आणि दैन्यावस्था आपल्याला दिसून येते, पण अमेरिकेतही दारिद्र्य आहे, भिकारी आहेत, बेघर लोक आहेत, असे जर कोणी सागू लागला तर त्याला लोक वेड्यातच काढतील पण खरोखरच अशी वस्तुस्थिती आहे आणि अमेरिकेतल्या बेघराचा आणि गरीब व भिकारी लोकाचा प्रश्न सोडवण्यात अनेक कार्यकर्ते गुतलेले आहेत अशा कार्यकर्त्यांत अमेरिकेचे माजी अध्यक्ष रोनाल्ड रेगन याची कन्या पॅटी डेव्हीस ही एक आहे. हे सागितल्यावर तर तुम्हाला आश्चर्याचा धक्काच बसेल

ती म्हणाली,

*तीन एक वर्षापूर्वी सकाळचे वेळी मी माझ्या कुत्र्याला बरोबर घेऊन बाहेर पडले होते आकाश सारे भरून आलेले होते व क्षितिजावर नारिगी राखाडी रग पसरलेले होते त्या वेळी एका रेस्टॉरटच्याबाहेर एक बाई उभी होती तिने पुरुषाची बॅगी पॅट घातलेली होती पुरुषाचेच पायाला मोठे होणारे बूट घातलेले होते तिचे अग धुळीने माखलेले व उन्हाने ताबडे पडलेले दिसत होते तिच्या अगावरल्या कोटाचा रग इतका मळलेला होता की त्याचा रग कळणे कठीण होते त्यानतर ती एका दुकानातल्या काचेच्या खिडकीत लावलेल्या दोनशे डॉलर्सच्यावर स्वेटर्सच्या किमती असतात त्याकडे पहात उभी राहिली होती मी त्या बाजूने जाऊ लागले तर तिने आपले डोळे वर न करता मला कार्टर ( २५ सेंट्सचे नाणे ) मागितला पचवीस सेंट्समध्ये अलीकडे एक कप कॉफी पण मिळत नाही मी तिला एक डॉलर दिला*

*ती मला बेघर अशी एकटीच दिसली नाही साता मोनिका शहरात असे कितीतरी बेघर लोक मी पाहिलेले आहेत पण तिने माझ्या विचाराला चालना दिली*

कदाचित् तिच्या वयामुळे माझ्या मनात विचार आले असतील ती फार फार तर तीस वर्षांची असावी तिच्या या परिस्थितीमुळे मला तिची दया आली आणि मनात विचार आले की माझी जर अशी परिस्थिती असती तर त्या विचारानी मी घाबरून गेले

ती मला रोज दिसायची मी तिला जाता जाता, "गुड मार्निंग" करायची पण ती आपले शरीर आकुंचन करून दुसरीकडे पहायची कधीतरी ती पैसे मागायची कधी नाही काही वेळी ती काहीच मागत नसे आणि मी पण स्वत हून काही देत नसे मी माझ्या मनाशी काही नियम ठरविले होते पण नक्की काय ते मला सागता येणार नाही काही वेळा सकाळी ती कॉफी घेण्याकरता रेस्टॉरटमध्ये शिरत असे पण त्या वेळी मी पाहिलेय, जो तो तिला चुकवण्याचा व तिचा स्पर्श होऊ नये म्हणून काळजी घेण्याचा प्रयत्न करीत असे भय आणि असुरक्षितता असा नृत्याचा प्रकार होत असे आश्चर्य असे की तिने कधी मान वर करून पाहिलेही नाही

१९८१ पूर्वी साता मोनिकामध्ये जेवढे काही बेघर आणि भिकारी होते ते आम्हा सर्वांना माहीत होते त्याचे चेहरे आमच्या रोजच्या परिचयाचे झालेले होते काहीची ठराविक वैशिष्ठ्ये होती काहींना काही लोक पैसे द्यायचे आणि काही लोक अजिबात द्यायचे नाही काहींना नावानेही ओळखत असत

यात बदल पडत गेला रेगनच्या राजवटीत १९८१मध्ये जादा खर्चाला कात्री लावायचे ठरवले गेले जे बेघर आहे, जे काहीही मिळवत नाहीत किंवा ज्याना कुठे नोकरी मिळत नाही, जे जवळ जवळ भिकारी अवस्थेत आहेत, त्याच्या भत्त्यात कपात करायची ठरवली गेली त्याना फूडस्टॅम्प्स् दिले जातात त्यात कपात करण्याचे ठरवले गेले आमच्या अध्यक्षानी एक गोष्ट सागितली की एका माणसाने फूडस्टॅपची सत्री विकत घेतली व सुटे पैसे मिळाले त्याची त्याने व्होडका विकत घेतली हा मदतीचा दुरुपयोग नाही का ? लोकाकडून आम्ही कराच्या रूपाने पैसा घेतो व तो पैसा आम्ही गरीबाकरता देतो

आपल्यालासुद्धा या गोष्टीचा राग येईल

बेघर आणि भिकाऱ्याची सख्या दिवसेंदिवस वाढत आहे मध्यवर्ती सरकारच्या १९८४च्या अदाजानुसार अडीच ते साडेतीन लाख लोक बेघर आहेत

आता अलीकडे कित्येक अनोळखी चेहरे आमच्याकडे रोखून बघत असतात आम्हाला कोणाला द्यावे आणि कोणाला देऊ नये हे कळेनासे झाले आहे. रोजच्या जीवनात बघता बघता बेघराची सख्या रोज वाढतच चाललेली दिसतेय मी रोज पालीसाडे पार्कच्या बाजूने धावायला जात असे तेव्हा पॅसिफीक कोस्ट हायवेवर लोक सूर्यास्त पहायला उभे असत कित्येक वेळा पामच्या झाडाखाली किंवा एखाद्या

बाकावर ब्लँकेट घेऊन कोणीतरी झोपलेले दिसत जर तुम्ही भल्या सकाळी किंवा सध्याकाळी गेलात तर तुम्ही त्याची झोपमोड होणार नाही अशी दक्षता घ्याल

१९८५च्या सुमारास तुम्हाला झाडाखाली झोपणाऱ्याच्या झोपण्याच्या बॅगाचे ढिगारे दिसले असते आणि कित्येक सकाळी उठलेले बेघर लोक तुमच्याकडे सावधपणे पाहताना दिसले असते तुम्ही त्याच्या जवळपाससुद्धा जाऊ शकला नसता

त्या वेळी माझ्या एका मित्राने एक गोष्ट सांगितली तो म्हणाला, मी रोज सकाळी धावायला जातो एक दिवस मी धावत असताना एका माणसाने सरळ चाकूच काढला व मला म्हणाला, ही माझी हद्द आहे. ह्या हद्दीत जर तू परत धावायला आलास तर दुसरे दिवसापासून मी त्या बाजूला धावायचे सोडून दिले तुम्ही म्हणाल, की मी त्याला का म्हणून का नाही विचारले त्याच्याशी वादविवाद करण्यात काही अर्थ होता का ? ही तर देशाची दु खातिका आहे. ज्याना घरेदारे नाहीत अशा माणसाशी वादविवाद करून काय मिळणार आहे ? अमेरिकेतल्या रस्त्यावर झोपण्यात त्याना काय मजा वाटत असेल ?

रेगन राज्यकारभाराच्या दुसऱ्या टर्ममध्ये नॅशनल कोॲलिशन फॉर होमलेस, आपल्या रिपोर्टमध्ये म्हणते की, सबध देशात वीस ते तीस लाख लोक रस्त्यावर राहतात तरीसुद्धा १९८५मध्ये मध्यवर्ती सरकार म्हणते की फक्त साडेतीन लाख लोकाना घरे नाहीत मोजणी करण्यात नक्कीच बेदरकारपणा दिसून येतोय ही मोजणी कशी केली जाते त्याचे त्यानाच माहीत आकडे देण्यात नक्कीच गफलत होतेय पण सत्य परिस्थिती जगातला हा अत्यत श्रीमत देश डोळ्याआड करू शकणार नाही आम्ही त्याना रोज दरवाजाबाहेर आशाळभूतपणे उभे राहिलेले बघतोय प्लास्टिकच्या बाटलीत ते लघवी सोडतात आमच्याकडे सतापलेल्या नजरेने बघत असतात आम्हाला काय माहीत की ते दारू प्यायलेले आहेत की धोकादायक आहेत की भिकारी आहेत आम्ही काही एक बोलत नाही नुसते सरळ त्याच्या बाजूने जातो आम्हाला त्याच्याशी बोलावेसे वाटत नाही आणि काय बोलायचे ? बोलायचे काय ते समजत नाही त्याच्यापासून शक्यतो आम्ही दूर राहतो त्याच्यात आणि आमच्यात एक अविभाज्य अदृश्य रेषा निर्माण झालेली आहे.

१९८७ साली धावण्याचा मी एक नवा कोर्स सुरू केला होता एक दिवस अशीच मी एका लहानशा रेस्टॉरटमध्ये कॉफी घेऊन बाहेर पडत होते तर बाहेर एक माझ्याच वयाची एक तरुणी म्लान चेहरा करून उभी होती तिच्या अगावर एक जुनाट मळकट कळकट कोट होता आणि डोक्यावर तसेच हूड ( कानटोपीवजा टोपी ) होते तिचे शरीर लाल लाल झालेले दिसत होते ती हळूहळू माझ्या आगेमागे झाली व हळूच

म्हणाली, मला एक डॉलर द्या मी तिला पाच दिले आणि एकदम तिने माझ्याकडे पाहिले मी पण तिच्याकडे पाहिले तिचे डोळे निळे होते मला ती सुदर वाटली ती माझ्याकडे पाहून हसली तिचे दात मला दिसले नाहीत तिचे ते हास्य चमत्कारिक होते तिच्या आणि माझ्या आयुष्यात किती फरक आहे याचा विचार करीत मी निघून गेले

त्यानतर ती काही काळ दिसेनाशी झाली मला वाटले, बहुतेक ती मेलीबिली असावी आणखी एका निष्पाप जिवाची भर पण एकदा मी मोटारने जात असताना तिला रस्ता ओलाडताना पाहिले माझ्या मोटारीसमोरूनच ती रस्ता ओलाडताना मी तिला पाहिले त्या वेळी क्रॉसिगला लाल दिवा होता पण तिचे लक्षच नव्हते तिच्या अगावरचे कपडे फाटलेले होते एक खादा उघडाबोडका दिसत होता त्यावर जखम दिसत होती कोट चिखलाने भरलेला होता नक्की तिला काय झाले असावे ? काय आपत्ती तिच्यावर कोसळली असावी ? पण मला तर मानवी जीवाचे अध पतनच दिसत होते

आता १९८८ साली ' नॅशनल अलॉयन्स टू एड होमलेसनेस ' या सस्थेने सात लाख पस्तीस हजाराना घरे नाही म्हणून म्हटले आहे पण या वर्षात साधारण वीस लाख लोक बेघर होण्याच्या अवस्थेत आहेत असेही पुढे म्हटले आहे सहा लाख लोकाना कुठेतरी आसरा मिळतो कुठे छपराखाली, कुठे चर्चेसच्या आवारात तर कुठे तात्पुरत्या शेड्समध्ये सरकारने पण रात्री आसऱ्याकरता सामुदायिक सोय मोठ्या शहरात केली आहे काहींच्या जवळ गाडी आहे पण घर नाही, असे हजारानी लाखानी आहेत

आम्ही सर्व माहिती गोळा करत आहोत व बेघराचा प्रश्न कसा सोडवावा यावर विचार करत आहोत भुकेल्या लोकाना जास्तीत जास्त अन्नाचा पुरवठा कसा करता येईल या प्रश्नावर उपाय शोधत आहोत काही बेघर, उपाशी फूडस्टॅम्पसचा दुरूपयोग करीत असतीलही, म्हणून सर्वांना त्याचप्रमाणे समजणे चुकीचे नाही का ? सबध देशातल्या बेघर लोकाचा विचार करायचा तर अशा थोड्या लोकाकडे दुर्लक्षच केले पाहिजे

वरील लेख रोनाल्ड रेगन याची कन्या पॅटी डेव्हीसने रविवारच्या परेड साप्ताहिकात २३ सप्टेंबर १९९० मध्ये लिहिलेला आहे ती बेघराच्या सस्थेकरता काम करत असते

यापुढे मी तुम्हाला आणखी एक गमतीची गोष्ट सागतो माझ्या मुलाने

रिजफिल्ड कॉनेक्टिकट येथे तीन वर्षापूर्वी घर विकत घेतले इस्टेट एजंट भारतीय होती तिचे नाव नलिनी अय्यागिरि ही भारताचे माजी अध्यक्ष गिरि यांची नात तिथे तिने यशस्वी इस्टेट एजंट म्हणून नाव कमावलेले आहे तिचे नाव अधुनमधून वर्तमानपत्रात चमकत असते

● ● ●

अमेरिका आणि सिनेमा अमेरिकेतली चित्रपटसृष्टी जगभर प्रसिद्ध क्लार्क ग्रेबल, ग्रेटा गार्बो, मर्लीन डिट्रीच, नॉर्मा शेरअर, स्पेन्सर ट्रेसी, वॉल्टर पिजन, ग्रियर गारसन, रॉबर्ट टेलर, टॉयरॉन पॉवर, रीटा हेवर्थ, हम्फ्री बोगार्ट, चार्लस् बॉयर, लॉरेन्स ऑलिव्हीएर, एलिझाबेथ टेलर, रिचर्ड बर्टन, मेर्लीन मन्रो किती नावे सागावी तेवढी थोडीच पडतील यादी लाबतच जाईल

पन्नास वर्षांपूर्वी असे कोणाला स्वप्नातसुद्धा वाटल नसत की ही चमचमणारी झगमगीत अमेरिकन सिनेसृष्टी पार नेस्तनाबूत होऊन जाईल हॉलीवूडच्या मोठमोठ्या भव्य स्टुडिओजना टाळी लागून धूळ खात पडतील हॉलीवूडचे सारे रस्ते गजबजलेले असत सिनेसृष्टीत पदार्पण करण्याकरता जगाच्या पाठीवरून सारे तरुण-तरुणी धडपड करून हॉलीवूडची पढरी गाठत असत अशा अज्ञ तरुण-तरुणींवर पण चित्रपट निघत सगळ्या हॉलीवूडवर रात्रदिवस ही धूमधाम चाललेली असे सिनेमा नटनट्या दृष्टीस पडाव्या म्हणून हजारो लोकाची रीघ लागलेली असे सगळे स्टुडिओ आतून बाहेरून गजबजलेले असत नटनट्याच्या मोटारींची स्टुडिओत जाताना एकच तारांबळ उडत असे कारण त्याच्या दर्शनाकरता स्टुडिओच्या दाराशी लोकाची तुफान गर्दी असे तासन् तास तरुण-तरुणी त्याची वाट पाहत दाराशी उभे राहात हॉलीवुडची रेस्टॉरट्स, हॉटेल्स्, रस्ते सगळे गजबजलेले असत

पण आता जर हॉलीवूड पहायला गेले तर सारे स्टुडिओ धूळ खात पडलेले दिसतील स्टुडिओतील रस्ते ओस पडलेले मेट्रो गोल्ड्वीन, ट्वेंटीएथ सेंच्युरी फॉक्स हे जगप्रसिद्ध स्टुडिओ आता निर्मनुष्य झालेत तिथे आता काहीही राहिलेले नाही नटनट्याच्या खोल्या, तिथले फर्निचर साऱ्यावर धूळ साचलीय रेकॉर्डप्लेअर्स निकामी होऊन पडलेत काही दरवाजे सताड उघडे आहेत तर काही प्रयत्न करूनही उघडता येत नाहीयेत खिडक्याच्या पडद्याचे रग विटलेत, कुठे पडदे विरलेत, फाटलेत

रिजफिल्ड कॉनेक्टिकट येथे तीन वर्षापूर्वी घर विकत घेतले इस्टेट एजंट भारतीय होती तिचे नाव नलिनी अय्यागिरी ही भारताचे माजी अध्यक्ष गिरी यांची नात तिथे तिने यशस्वी इस्टेट एजंट म्हणून नाव कमावलेले आहे तिचे नाव अधुनमधून वर्तमानपत्रात चमकत असते

● ● ●

अमेरिका आणि सिनेमा  अमेरिकेतली चित्रपटसृष्टी जगभर प्रसिद्ध  क्लार्क गेबल, ग्रेटा गार्बो, मर्लीन डिट्रीच, नॉर्मा शेरअर, स्पेन्सर ट्रेसी, वॉल्टर पिजन, ग्रियर गारसन, रॉबर्ट टेलर, टॉयरॉन पॉवर, रीटा हेवर्थ, हम्फ्री बोगार्ट, चार्लस् बॉयर, लॉरेन्स ऑलिव्हीएर, एलिझाबेथ टेलर, रिचर्ड बर्टन, मेर्लीन मन्रो  किती नावे सांगावी तेवढी थोडीच पडतील  यादी लांबतच जाईल

पन्नास वर्षांपूर्वी अगर कोणाला स्वप्नातसुद्धा वाटल नसत की ही चमचमणारी झगमगीत अमेरिकन सिनेसृष्टी पार नेस्तनाबूत होऊन जाईल  हॉलीवूडच्या मोठमोठ्या भव्य स्टुडिओजना टाळी लागून धूळ खात पडतील  हॉलीवूडचे सारे रस्ते गजबजलेले असत  सिनेसृष्टीत पदार्पण करण्याकरता जगाच्या पाठीवरून सारे तरुण-तरुणी धडपड करून हॉलीवूडची पदरी गाठत असत  अशा अज्ञ तरुण-तरुणींवर पण चित्रपट निघत सगळ्या हॉलीवूडवर रात्रदिवस ही धूमधाम चाललेली असे  सिनेमा नटनट्या दृष्टीस पडाव्या म्हणून हजारो लोकाची रीघ लागलेली असे  सगळे स्टुडिओ आतून बाहेरून गजबजलेले असत  नटनट्यांच्या मोटारींची स्टुडिओत जाताना एकच ताराबळ उडत असे  कारण त्याच्या दर्शनाकरता स्टुडिओच्या दाराशी लोकाची तुफान गर्दी असे तासन् तास तरुण-तरुणी त्याची वाट पाहत दाराशी उभे राहात  हॉलीवुडची रेस्टॉरट्स हॉटेल्स्, रस्ते सगळे गजबजलेले असत

पण आता जर हॉलीवूड पहायला गेले तर सारे स्टुडिओ धूळ खात पडलेले दिसतील  स्टुडिओतील रस्ते ओस पडलेले  मेट्रो गोल्ड्वीन, ट्वेंटीएथ सेच्युरी फॉक्स हे जगप्रसिद्ध स्टुडिओ आता निर्मनुष्य झालेत  तिथे आता काहीही राहिलेले नाही नटनट्यांच्या खोल्या, तिथले फर्निचर साऱ्यावर धूळ साचलीय  रेकॉर्डप्लेअर्स निकामी होऊन पडलेत  काही दरवाजे सताड उघडे आहेत तर काही प्रयत्न करूनही उघडता येत नाहीयेत  खिडक्यांच्या पडद्याचे रंग विटलेत, कुठे पडदे विरलेत, फाटलेत

सगळीकडे स्मशानशांतता पसरलीय आता सारे इतिहासजमा झालेय पहिल्या काही इमारतींत व्यापारी कंपन्यांची ऑफिसे उघडली आहेत बाकी सारे इतिहासकालीन झालेय तिथे कोणी गाईड नाही की गार्ड नाही टी व्ही सुरू झाले आणि सारे काही संपलेय ग्रीनविच व्हिलेज, सनसेट बुलवर्ड येथील बंगले पण विकायला काढलेले आहेत जिकडे तिकडे सुनसान झालेले आहे. वैभवात लोळणारे आणि रात्ररात्र संगीत जल्लोषात आणि पार्ट्या-मेजवान्यात दंग असणारे बंगले ओस पडून विकायला काढलेले दिसतील हॉलीवूडचे वैभव पूर्णपणे नष्ट झालेय

अशीच परिस्थिती आणखी पाचसात वर्षांत भारतातल्या सिनेजगतात पण निर्माण होणार आहे हे सांगायला कोणा ज्योतिषाची जरूरच नाहीये

• • •

अमेरिकेतल्याही टी व्ही वर चोवीस तास कार्यक्रम चालू असतात शभरच्या आसपास टी व्ही चॅनेल्स् आहेत विविध प्रकारचे कार्यक्रम निरनिराळ्या वेळात सारखे चालू असतात एखादा आपला कार्यक्रम चुकला तर तोच परत दुसऱ्या चॅनलवर दुसऱ्या वेळी पहाता येतो कॅरोल ब्रूनेट, आय लव्ह ल्यूसी, हिली बिलीज, जेफरसन्स, रिची रिच, लव्ह कनेक्शन, बॉब न्यूहार्ट, बिविच्ड, थ्री इज कपनी, मिआमी व्हॉइस, टीम डायनॅस्टी असे असख्य अर्ध्या तासाचे रोज नवीन नवीन कार्यक्रम असतात काही कार्यक्रमात दुसरे दिवशी काय होणार अशी सतत उत्कठा ठेवणारे कार्यक्रम असतात याशिवाय असख्य सोप ऑपेराज असतात त्याची कथानके वर्षानुवर्षे चालतात कित्येक लोक काही दिवस मुलाकडे अमेरिकेत आलेले भारतात परतल्यावर पत्राने चौकशी करतात की नायकाचे पुढे काय झाले ? इतकी पकड या सोप ऑपेराजनी घेतलेली असते अमेरिकन न्यूजपण ऐकण्यासारखी व पाहण्यासारखी असते बातम्या सागणाऱ्याचे चेहरे उल्हसित व ताजेतवाने दिसतात बोलण्यात व बातमी सागण्यात ऐट असते बातम्या ऐकण्या पाहण्यातसुद्धा एक प्रकारची गमत वाटते आपल्या इकडच्यात बातम्या सागणारे एका सुरात सारखे खाली मान करून वाचत व पुष्कळ वेळा अति कटाळवाण्या सुरात सागतात व कधी एकदा बातम्या सपताहेत असे आपल्याला होऊन जाते तिकडे बातमी सागणारा अगर सागणारी स्वत चे नाव सागून उत्साहाने तजेलदार स्वरूपात बातम्या सागते बातम्यात एका गोष्टीत मात्र समानता आहे आपल्या इकडे बातम्यात राजीव गाधी पडद्यावर एकदातरी आलेच पाहिजेत तसेच तिकडे अमेरिकेचे अध्यक्ष रोनाल्ड रेगन पडद्यावर यायचेच आपले शत्रु राष्ट्र पाकिस्तान तसे अमेरिकेचे रशिया रशियाविषयीच्या बातम्या चेतावणी स्वरूपात असतातच Russians are comming जगातल्या बातम्यामध्ये भारताविषयीची चागली बातमी विशेष कधी नसतेच असली तर एखादी वाईट बातमीच दिलेली

असते रशियासबंधी बातम्या जरी सांगितल्या तरी त्यात नेहमी अमेरिका कशी वरचढ आहे, हेच ध्वनित केलेले असते पण पाकिस्तानच्याबाबतीत आपल्याकडे जरा गोष्ट निराळीच आहे. स्टॉक एक्स्चेंज व मर्नीमॅटर्सविषयी पण रोज संपूर्ण माहिती दिली जाते अमेरिकेत कुठे ना कुठे फुटबॉलच्या मॅचेस चालूच असतात सतत रोज पाहिल्यावर आपल्याला त्यातली गमत कळून येते आपल्याइकडे भारतात बातम्याबरोबर शेवटी हवामानाचा अदाज सांगितला जातो व एकदर हवामान कसे आहे हे अगदी टाळ आणि रुक्षपणे सांगितले जाते पण अमेरिकेत हवामानाकरता एक खास चॅनल आहे त्या चॅनेलवर सतत हवामानाचे अदाजच सांगितले जातात हवामानाच्या बातम्या इतक्या उत्तम प्रकारे सांगितल्या जातात की आपण एखादी गोष्टच ऐकत आहोत असे वाटावे पडद्यावर नकाशा दाखवून त्यावर व्यवस्थितपणे सांगणारा समजावून सांगत असतो सांगणाऱ्याने सांगत राहावे व आपण सारे बदल पहात, ऐकतच राहावे असे वाटते खूपच मनोरंजक रीतीने सांगितले जाते आपल्याकडे मध्यतरी त्या धर्तीवर प्रयोग करून झाले पण एकालाही हे जमले नाही आणि जमेल असे वाटत नाही त्याची कारणे निराळीच आहेत बाहेरगावी प्रवासाला निघायचे असले की घरून निघायच्या वेळी आधी हवामानाचे चॅनेल लावून आपल्याला ज्या शहरात जायचेय त्या मार्गावर हवा कशी असेल याचा बिनचूक अदाज मिळतो अमेरिकेत सारे स्वत चे गाडीने आणि वेगाने प्रवास करतात व तेथील हवामान सारखे बदलत असते म्हणून हवामानाची माहिती असणे जरूरीचे असते अमूक वेळेला पाऊस पडणार म्हणजे पाऊस पडतोच अदाज सहसा चुकत नाहीत

माणसाला कशाची ना कशाची तरी आवड ही पाहिजेच वाचायची, फिरायची नाहीतर टी व्ही पहाण्याची त्यात जे कोणते विषय आवडतील त्याची निवड करून टी व्ही पाहू शकतो मला अमेरिकन चित्रपट पाहण्याची फार आवड मुलाची शिक्षणे चालू होती व मी माझ्या नोकरी-व्यवसायात फार व्यग्र असे त्यामुळे त्या काळात पुष्कळ जुने चित्रपट पहायचे माझे राहून गेले होते तेव्हा मुलाने माझी आवड लक्षात ठेवून मी प्रथम अमेरिकेत गेलो त्या वेळी त्याने Movie चॅनेल घेतली होती त्या चॅनेलवर निरनिराळ्या वेळात आलटून पालटून चोवीस तास नवे-जुने चित्रपट दाखवले जात होते मी जुने नवे असख्य चित्रपट पाहिले कटाळा असा कधी आलाच नाही तिकडे एखादी खास चॅनेल टी व्ही वर घ्यायची तर त्याचे पैसे मात्र भरावे लागतात पण टी व्ही पहायचा कटाळा येत असेल तर मात्र अमेरिकेत भारतीय माणसाचा वेळ जाणे कठीण आहे

थोडा वेळ टी व्ही पहावा लच वगैरे घ्यावे थोडी वामकुक्षी करावी थोडे

बाहेर फिरून यावे थोडेफार वाचन करावे रोजचा पेपरच साठ-सत्तर पानी असतो व त्यात पाच सहा निरनिराळ्या विषयाचे भाग असतात दुपारी शाळेतून नातवडे येतील संध्याकाळी मुलगा, सून कामावरून येतील मग त्याच्याशी गप्पाटप्पा संध्याकाळची जेवणे झाली की मॉलमध्ये कुटुबाबरोबर हिडाफिरायला जावे अमेरिकेत वेळ मजेत जाईल कटाळा अजिबात येणार नाही

• • •

अमेरिकेत सर्वसाधारण छोट्या गावामध्ये लोक सकाळी लवकर उठतात, कारण सहासाडेसहाच्या सुमारास घराबाहेर कामावर जाण्यासाठी बाहेर पडावे लागते सहासाडेसहाच्या आत तोंड धुणे, जमले तर स्नान करणे व कपडे घालून ऑफिसला जायला तयार होणे गावाबाहेर कामाचे ठिकाण असो किंवा गावात असो, मोटारगाडीनेच जावे लागते रेल्वेस्टेशन जवळ असेल तर स्टेशनपर्यंत कारने जायचे व पुढे रेल्वेने कारण शहरात पार्किंगकरता फार पैसे खर्च होतात मुलांची तोंड धुणे, दात घासणे झाले की, त्यांची आई मुलांना बाऊलमध्ये थंड दुधात त्यांची सिरीयल त्यांना खायला देते आईला उशीरा कामास जायचे असेल तर मुले आघोळी करतात नाहीतर सगळे आपापले कपडे घालून तयार होतात आई गाडी घेऊन कामावर जाते व मुले आपली दप्तरे घेऊन रस्त्याच्या कोपऱ्यावर शाळेच्या बसची वाट पाहात उभी असतात बहुतेकाजवळ जेवणाचा डबा असतो डब्यात बहुतेक सँडविचेस, दूध व एखादे ॲपल असते. सकाळी आपण फिरायला बाहेर पडलो तर हे दृश्य आपल्या दृष्टीस पडते घरातली सगळी मंडळी बाहेर गेलेली असतात घरात कोणीही नसते जो तो आपल्या उद्योगाला निघून गेलेला असतो

संध्याकाळी पाच-सहापर्यंत कामावरून माणसे घरी आलेली असतात मुलांच्या शाळा तीन-साडेतीनला सुटलेल्या असतात पण मुले घरी आईवडील आल्याशिवाय घरात जाऊ शकत नाहीत त्याकरता जवळपास काहीतरी छंद जोपासण्याकरता आईवडील मुलांना क्लासमध्ये घालतात मुले व्हायोलीन, पियानो वगैरे शिकायला जातात काही व्यायामशाळेत जातात पोहायला शाळेत शिकवले जाते तिथे पोहायला शिकतात ज्यांना क्लासमध्ये घालणे परवडत नाही, ती मुले घराच्या कंपाऊंडमध्ये हुंदडत बसतात अगदीच लहान असतील त्यांना जवळपासच्या घरात जाण्यास सांगितलेले असते त्यांच्याकडे लक्ष ठेवण्यासाठी आईवडिलांना पैसे द्यावे

लागतात मुलाना आईवडिलाचे प्रेम, जिव्हाळा वगैरे काही मिळत नाही त्यामुळे मुले एक तर बेडर होतात, निगरगट्ट होतात किंवा एकदम भित्री तरी होतात किंवा एकलकोंडी होतात सध्याकाळी आईवडील कामावरून येतात ती बरीचशी थकलेली असतात सध्याकाळी आल्यावर आंघोळी करतात व प्रथम थोडेसे हलकेसे खाऊन चहा-कॉफी घेतल्यावर मुलाची आई स्वयपाकाला लागते सकाळचे खाणे, लच वगैरे सगळे बाहेरच झालेले असते त्यामुळे सध्याकाळचे जेवण हेच खरे मुख्य जेवण त्यामुळे जेवण करण्यात बाईचा पुष्कळ वेळ जातो मुलाचे वडील आघोळ करून चहा-कॉफी झाल्यावर थोडा वेळ पेपर वाचतात किंवा टी व्ही पहात बसतात मुलाच्या पण आघोळी वगैरे होतात व ती आपापल्या खोलीत शाळेत दिलेले होमवर्क करतात किंवा एकमेकाशी खेळत बसतात किवा टी व्ही बघत बसतात कोणी वाचन करतात तसे शाळेत मुलाना फारसे होमवर्क देत नाहीत सात साडेसातपर्यंत सध्याकाळचे जेवण होते आईने स्वयपाक केला तर वडील बाकीचे सगळे आवरून ठेवतात डिशेस, ग्लासेस व भाडी विसळून आवरून ठेवतात अर्थात् हे सारे मशीनने होते पण वडील हे सर्व करून ठेवतात तोपर्यंत आई मुलाना त्याच्या शाळेतल्या अभ्यासाविषयी विचारते व थोडा वेळ टी व्ही पहात बसते किंवा ती पण वाचीत बसते

सर्वांचे साधारण आठपर्यंत सारे आटोपते त्यानतर वेळ घालवण्याकरता सर्वजण मॉलमध्ये भटकायला कारने बाहेर पडतात किंवा घरातच वाचन किंवा टी व्ही पहात बसतात फिरायला जाणे म्हणजे मॉलमध्ये जाणे मॉल म्हणजे सुपरमार्केट त्याची कक्षा असते दीड दोन मैलाची दुकानादुकानातून फिरत वेळ घालवायचा कारण, रस्त्यावर सगळीकडे हवामानानुसार एकदम थड तरी असते किंवा अतिशय गरम तरी असते त्यामुळे मॉलमध्ये फिरण्याशिवाय गत्यतर नसते नऊच्या सुमारास घरी येतात व घरी आल्यावर प्रथम सगळे आईस्क्रीम खातात झोपण्यापूर्वी खाऊन झाले की जो तो आपल्या खोलीत झोपायला जायची तयारी करतो कारण झोपण्यापूर्वी बहुतेकजण आपले दात टूथपेस्ट-ब्रशने घासून व झोपायचे कपडे घालून झोपतो

आईवडिलाची झोपायची खोली निराळी असते व मुलाच्या झोपायच्या खोल्या निराळ्या असतात लहान मुलाना आपल्याजवळ घेऊन आईवडील झोपत नाहीत कारण तशीच पद्धत इथे आहे मूल लहान असल्यापासूनच तशी सवय लावली जाते

मुलाची झोपायची खोली थोडी दूरच असते काही मुले सुरुवातीला एकटे झोपायला रडतात पण रडण्याकडे मुळीच लक्ष दिले जात नाही चार-पाच वर्षाच्या मुलाला रात्री मध्यरात्री जाग येते, ती घाबरतात आणि रडून रडून शेवटी झोपी जातात

आपल्याकडे लहान मुलाला आई किंवा वडील आपल्या हाताने खायला घालतात त्याना जेवायला भरवले जाते अरे बाळा खा, काऊ आला, चिऊ आली, हा मम्मीचा घास, हा बाबाचा घास, हा आजोबाचा असे करून बळेबळे त्याला खायला घालतात मुलाची समजूत घालून त्याला जेवण भरवतात पण अमेरिकन आई डिशमध्ये मुलाचे जेवण त्याच्यापुढे ठेवते तो जेवढे खाईल तेवढे खाईल, बाकी सारे सरळ फेकून देईल अमेरिकन आई मुलाला आपल्या बेडरूममध्ये ठेवून देते मग तिकडे बघत नाही पण भारतीय आईबापाना मुले रात्री जागवतात आई जवळ असल्याशिवाय मुलाना झोप येत नाही

आधी लहान मुलाची गोष्टीची पुस्तके असतात ती भुते, राक्षस, हडळी (Witches) याची असतात त्याच्या भयानक गोष्टी लहानपणापासून ऐकत असतात लहान मुलाची खेळणी मिळतात तीसुद्धा इतकी भयकर असतात की ती पाहूनदेखील किळस येईल रक्ताळलेले बोट, काळा मोठा कोळी असलेली अगठी, दाताचे सुळे त्यामुळे मुले भयानक स्वप्ने पडून दचकून जागी होतात व घाबरून रडत बसतात पण त्याचेकडे कुणाचे लक्षच नसते बहुतेक घरात रात्री नऊ-साडेनऊपर्यंत झोपी जातात कारण सकाळी लवकर उठून कामावर जायचे असते जागरण करून अजिबात चालत नाही दुसऱ्या दिवशीचे कामाचे वेध रात्रीपासूनच लागलेले असतात बाकी विचार करायला वेळच नसतो टी व्ही इथे चोवीस तास चालू असतो पण पहायला वेळ आहे कुणाला ? मुलाना टी व्ही पहायचा असतो तो शिस्तीत बद केला जातो

शनिवार-रविवार सुट्टी असते. शुक्रवारला त्यामुळे इथे फार महत्त्व आलेले असते 'T G I FRIDAY' नावाचे हॉटेल बहुतेक प्रत्येक गावात असतेच 'टी जी आय फ्रायडे' म्हणजे थँक गुडनेस इट्स फ्रायडे पण या हॉटेलात बहुतेक तरुण-तरुणींची गर्दी असते शुक्रवारचे डेटिंग इथेच ठरलेले असते पण समारी लोकाची फूड स्टोअर्समध्ये गर्दी होते आठवड्याचे सर्व सामान त्या दिवशी खरेदी केले जाते किंवा शनिवारी सकाळी दुपारी फूडस्टोअर्समध्ये भाजीपाला, फळे, दूध, चीज, बटर, ब्रेड, फळाचे रस, चिकन, मटण, कॅन्ड फूड, सूप्स, कोल्डड्रिंक्स, कोक पेप्सी, बिअर, आईस्क्रीम, सिग्रेटस, ब्लेड्स सर्व काही मिळते ही आठवड्याची खरेदी होते शनिवारी सकाळी कोणी लवकर उठत नाही उठले तर घरापुढील झाडाची गळलेली पाने गोळा करणे, गवत कापणे इत्यादी कामे करतात दुपारी लायब्ररीत जाऊन पुस्तके निवडून आणणे, व्ही डी ओ टेप्स पाहणे व सध्याकाळी परत मॉलमध्ये काही विशेष खरेदी करणे किंवा नुसतेच फिरणे फक्त उन्हाळ्यात पार्कमध्ये जाणे शक्य असते सध्याकाळी मॉलमध्येच मित्रमडळी भेटतात सर्व देशीय फास्टफूड रेस्टॉरट्स तिथे

असतात इटालियन, ग्रीक, मेक्सिकन, शिवाय मॅक्डोनाल्ड केटकी फ्राइड चिकन सरकते जिने, विविध प्रकारची खेळण्याची दुकाने, क्वचित मेरी गो राउड्स पण असतात, मुलाचा वेळ पण मजेत जातो कुठेतरी फास्टफूड रेस्टॉरटमध्येच खाऊन पिऊन सर्वजण घरी येतात हा सुट्टीच्या दिवशीचा कार्यक्रम असतो रविवारी सकाळी नऊ-दहा वाजता उठतात त्या दिवशी रविवारचा पेपर साधारण शभर पानी असतो तो चाळत बसतात सेल ठिकठिकाणी असतात सेलच्या जाहिराती पाहण्यात व सर्वात स्वस्त व आवश्यक वस्तू काय आहेत हे पाहण्यात बराच वेळ जातो रविवारी रेस्टॉरट्सच्या जाहिराती पण पुष्कळ असतात 'ईट ॲज मच ॲज यू कॅन' आणि तेसुद्धा 'थोड्या किमतीत पाहिजे तेवढे भरपूर खा ' तिथे अक्षरश चागलीच गर्दी झालेली असते आपल्याला थोडा वेळ थाबावे लागते मेक्सिकन, चायनीज, इटालियन, याना आलटून पालटून भेट दिली जाते सेलमध्ये काही खरेदी करायची निवड केली असेल तर तिकडे भटकून होते

दुपारी वाचन, टी व्ही किवा घरापुढील गवत मशीनने कापणे, घराची झाडलोट करण्यात वेळ जातो कारण इतर दिवशी कुठे काही लक्ष द्यायला वेळच मिळत नसतो

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
प्रथम
दा. क्र.

अमेरिका हा अत्यत पुढारलेला, अत्यत श्रीमत व सुशिक्षित असा देश मानला जातो अमेरिकेचा शोध तसा फार अलीकडे लागलेला अमेरिका खड शोधून काढले कोलबसने त्या वेळी तिथे फक्त रेड इडियन लोकाची वस्ती होती प्रथम युरोपातून लोकाचा लोंढा अमेरिकेत वळला मूळ रहिवासी रेड इडियनाची फार मोठ्या प्रमाणावर कत्तल करून त्याचा नायनाट करून युरोपातील लोकानी तिथे वसाहती केल्या युरोपातून गोरे लोक आफ्रिकेतील काळ्या निग्रोंना गुलाम म्हणून काम करण्याकरता घेऊन गेले काही गोऱ्यानी अमेरिकेत या निग्रो गुलामाचा व्यापार केला हे सर्व आपण इतिहास-भूगोलात वाचलेलेच आहे यात मी नवीन असे विशेष काहीच सागितले नाही आता फारच थोडे रेड इडियन अमेरिकेत राहिले आहेत

एका शहरात एका झू मध्ये इतर जगली प्राण्याबरोबर एका रेड इडियन माणसाला पण पिंजऱ्यात लोकाना पहायला ठेवले होते काही सहृदय सुशिक्षित माणसाना त्या रेड इडियन माणसाची दया आली व या विसाव्या शतकात मनुष्यप्राण्याला पिंजऱ्यात ठेवणे हे अमानुषपणाचे लक्षण आहे असे वाटले व वर्तमानपत्रात लेख आले शेवटी लोकाग्रहावरून त्याची मुक्तता करण्यात आली पण त्या रेड इडियन माणसाला मोकळ्या, खुल्या वातावरणात फार दिवस जगता आले नाही तो पिंजऱ्यातून सुटल्यावर वर्षभरातच लवकरच मरून गेला तेव्हा ' झू 'च्या अधिकारी वर्गाने जाहीर केले की आम्ही त्याची चागली काळजी घेत होतो तो स्वतत्र व्हायला तयार नव्हता त्याला पिंजऱ्यात राहण्यातच सुख वाटत होते त्याला आम्ही स्वतत्र केल्याने तो अल्पकाळात मरून गेला त्याला स्वतत्र करणाऱ्यानीच त्याचा बळी घेतला ही सारी सत्यकथा आहे. अगदी अलीकडची अमेरिकेतली

दुसरी एक गोष्ट केंटकी प्रातात लेक्सिंग्टन जवळ शेकर्स टाऊन नावाचे गाव आहे तिथे या आधुनिक जगातली एकही गोष्ट पोहोचलेली नाहीये तिथे वीज नाही

तेलाचे कदील वापरतात अजून पुरातन पद्धतीने जीवन जगतात. रेडिओ, ट्रेन्झीस्टर, टी व्ही या वस्तू कुणाकडेही नाहीत तिथले लोक निसर्गापासून वस्तू बनवतात व त्या वापरतात. शेक म्हणजे हालणे हलवणे अग हलवून नृत्य करतात म्हणून त्याना शेकर्स म्हणतात तर असेही लोक अमेरिकेत अजून आहेत

आता अमेरिकेत लाखो लोक अशिक्षित आहेत म्हटले तर आश्चर्य वाटेल पण ही खरी परिस्थिती आहे. अमेरिकेत साक्षरता प्रचाराची मोहीम ही आपल्याला मोठी आश्चर्याची गोष्ट वाटेल तिथे प्रौढ शिक्षणाचे वर्ग पण चालतात अमेरिकेत एकूण दोन कोटी सत्तर लाख प्रौढ लोक निरक्षर आहेत, असे अमेरिकेच्या शिक्षणखात्याने अगदी अलीकडे म्हणजे मे १९८८ त जाहीर केले आहे. साक्षरता प्रसाराच्या स्वयसेवकाच्या डायरेक्टर रोझमेरी स्टार्क म्हणतात की, " आम्ही या बाबतीत अत्यत काळजीपूर्वक गोळा केलेली माहिती गुप्त ठेवली आहे कारण पुष्कळ लोकाना चागल्या नोकऱ्या आहेत आणि त्याना लिहिता-वाचता येत नाही हे त्यानी लपवून ठेवले आहे "

जगातल्या सर्व देशातून लोक अमेरिकेत स्थायिक होण्याकरता येत असतात त्याना त्याच्या देशातील भाषा येत असते पण इग्लिशचा गध नसतो आणि अमेरिकेत सर्व ठिकाणी इग्लिश बोलले जाते ही त्याची राष्ट्रीय भाषा आहे परदेशातून अमेरिकेत आल्यावर इग्लिश येत असल्याशिवाय काहीच करता येत नाही इग्लिश शिकवण्याकरता स्वयसेवकाना प्रथम इग्लिश कसे शिकवायचे याकरता प्रशिक्षण दिले जाते हे प्रशिक्षण चर्चेसमध्ये व लायब्ररीजमध्ये दिले जाते प्रौढ शिक्षणाच्या कोर्सकरता टेक्स्ट बुके तयार केलेली आहेत इग्लिश बोलीभाषेत कसे बोलायचे, रोजच्या व्यवहारात व मार्केटिंग करताना कोणत्या पदार्थांना काय बोलतात हे पण शिकवले जाते व नतर शब्द, वाक्यरचना व वर्तमानपत्र कसे वाचायचे ते शिकवतात आठवड्यातून दोन दिवस सकाळी असे आठ सेशन्समध्ये प्रौढ शिक्षण कसे द्यायचे या करता आधी स्वयसेवक तयार केले जातात या स्वयसेवकाना ज्याच्या त्याच्या स्वभावानुसार अशिक्षित माणसे निवडून त्याना साक्षर करण्याकरता पाठविले जाते

पाच अमेरिकन लोकात एक अशिक्षित आढळून येतो यात कित्येकानी शाळेत शिक्षण घेतलेले असूनसुद्धा त्याना नीट वाचता येत नाही कित्येकानी दोन-चार इयत्ता शिक्षण झाल्यावर शिकायला जमत नाही म्हणून शाळा सोडून काम करायला लागलेले असे सतरा टक्के लोक आहेत

प्रौढ शिक्षणाकरता काही चर्चेस व सामाजिक सस्था देणग्या देतात व त्यावर साक्षरता-प्रसारमोहिमेचा खर्च चालतो

शाळाच्या शिक्षणपद्धतीत सुधारणा व्हाव्यात म्हणून अमेरिकेत टी एच्. बेल

सतत कार्य करीत असतात पुष्कळ अमेरिकन्स त्याना शैक्षणिक चळवळीचे पितामह म्हणून ओळखतात तीन वर्षे ते रोनाल्ड रेगनच्या कॅबिनेटमध्ये होते शाळामध्ये मुलाना नीट वाचता येत नाही हायस्कूलचा मिळालेला डिप्लोमा धड वाचता येत नाही मुले अर्धवट शाळा सोडून जातात त्यात पुष्कळशी मुले गरिबीने गाजलेली असतात आणि बहुतेक अल्पसख्याक असतात या मुलाचा प्रश्न सोडवण्याकरता टी एच् बेल यानी निरनिराळे मार्ग सुचविले व एक रिपोर्ट तयार केला पण रेगन सरकार याबाबतीत काही एक हालचाल करण्याचे लक्षण दिसेना तेव्हा त्यानी चिडून आपल्या मत्रीपदाचा राजिनामा दिला शिक्षणखात्याचे सेक्रेटरी म्हणतात, आपण तीस ते चाळीस टक्के उगवत्या पिढीचे नुकसान करीत आहोत ही मुले शाळेच्या बाहेर पडतात त्याना कुठे नोकरी मिळू शकत नाही आणि त्याना नोकरी मिळण्याच्या लायकीची ती नसतात ही आहे अमेरिकन सरकारी शाळाची परिस्थिती आपल्याकडे जिल्हा परिषदेच्या व खेड्यामधल्या शाळाचे चित्र यापेक्षा काही निराळे नाहीये

• • •

कष्ट आणि सतत कष्ट करत राहणे थोडाही मोकळा वेळ मिळाला तर त्याचा पैशात हिशोब करणे हे अमेरिका, कॅनडात गेल्यावर भारतीय लोकाना चागले कळून आलेले आहे. Work is Worship सतत काम करणे व पैसे मिळवणे हे प्रत्येकाचे ध्येय असते कोणी काही का म्हणेना, पण कोणतेही काम करण्यात लाज ही कसली धरायची ? आपल्याइकडे साधारण मध्यमवर्गीय विचारसरणीने, विद्यार्थ्यांनि घरोघरी वर्तमानपत्र टाकणे हे अगदी कमीपणाचे लक्षण समजले जाते स्वत चे घरदार आहे, गाडी आहे आणि दारोदारी पेपर टाकण्याची ही कसली अवदसा आठवली आहे असे म्हटले जाईल, किंवा दुपारी घरात मोकळा वेळ आहे तर दुसऱ्याची मुले कशाला साभाळायची ? आता आपल्याकडे दुसऱ्याची मुले साभाळणे पण कमीपणाचे समजले जाते काही जरूरी आहे काय दुसऱ्याची मुले साभाळायची ? असे म्हणून त्याची टिंगल केली जाईल अशी दिसायला साधी सोपी कामे पण असल्या कामाना पण अमेरिकेत बऱ्यापैकी पैसे मिळतात सुट्टीत हॉटेलात वेटरची किंवा खाद्यपदार्थ पुरविण्याची कामे म्हणजे कमालच झाली, असे आपल्याकडे म्हटले जाईल ही का कामे आम्ही करायची छी ! छी ! पण उन्हाळ्याच्या सुट्टीत किंवा ज्या वेळी दोन-तीन तास वेळ मोकळा मिळेल तेव्हा डिग्रीचा अभ्यास करणारी घरीदारी सुस्थितीत असलेली विद्यार्थी-विद्यार्थिनी ही कामे करतात तासाला साधारण कमीतकमी साडेचार ते सात डॉलर्स कामाचे मिळतात सर्वजण काळ, काम, वेगाची गणिते इथे करीत असतात

दारोदारी सकाळचा पेपर टाकणे व वेळी प्रसगी दुसऱ्याची मुले हौसेने सभाळणे ही तर नित्याची गोष्ट आहे. पण एकदर विचार केला तर अशा कामापासून महिन्याची प्राप्ती चागलीच मोठ्या प्रमाणात होते वेळप्रसगी आपली पण मुले आपल्याला दुसऱ्याच्या घरी सभाळायला ठेवता येतात व त्याबद्दल पैसे मोजावे लागतात हे कळून आल्यावर आपल्याला पण हाच मार्ग स्वीकारावा लागतो सुरुवातीला आपल्या घरी पेपर

टाकायला येणारा मुलगा आपण पाहातो त्या वेळी थोडी चौकशी केल्यावर लक्षात येते की, अरे हा मुलगा तर चागल्या कुटुबातला आहे. घरी आईवडील चागले पैसे मिळवणारे आहेत सुशिक्षित आहेत मोटारगाड्या आहेत सारे काही आहे तरी हा रोज दारोदारी वर्तमानपत्र टाकून स्वत चे चार पैसे स्वत मिळवतो आहे थडीच्या दिवसात झाडाची गळलेली पाने गोळा करून कपाउड स्वच्छ पण करून दिले जाते कपाउडमधले गवत MOW करून देणे झाडावरची फळे काढून देणे ही कामे शेजारपाजारची मुले ताशी साडेचार-पाच डॉलर्स घेऊन करून देतात आपल्या भारतीय कुटुबातली मुले पण अमेरिकन मुलाचे पाहून ही काम करू लागली आहेत

अशाच एका भारतीय कुटुबात मी १९८२ साली राहायला गेलो होतो माझ्या मुलाचे ते मित्र त्याचे स्वत चे मोठे घर व दोन मोटारगाड्या होत्या घरात सगळ्या सुखसोयी आईवडील दोघेही ऑफिसमध्ये काम करणारे दोघेही पोस्टग्रॅज्युएट त्याची तीन मुले दोन मुली व एक मुलगा व त्या गृहस्थाची आई वय सदुसष्ट-अडुसष्ट मुले शाळेत जाणारी मुले पहाटे उठून दारोदारी पेपर टाकत असत घरात सगळी कामे म्हाताऱ्या आजीबाई करीत असत स्वयपाक व घरची देखरेख

आता मी सहा वर्षांनी म्हणजे ८८ साली त्याच्याकडे गेलो तेव्हा त्यानी नुकतेच नवे चागले भलेमोठे दुमजली घर विकत घेयलेय, ते बाधून पुरे झालेय पण अजून राहायला जायचेय म्हणून त्यानी आम्हाला दाखवायला नेले पहिल्या घराच्या अडीचपट ते मोठे आहे आणि चागलेच प्रेक्षणीय बाधलेले आहे. आता त्याचे उत्पन्न खूप वाढलेय दोन मुलींपैकी एक कॉलेजात आहे व दुसरी कॉलेजातच शिकतेय आणि तिने ब्यूटिशियनचा कोर्स पूर्ण केलाय ती फावल्या वेळात ब्यूटीपार्लरमध्ये काम करते शाळेत असताना मुले सकाळी पेपर टाकत होती ज्याच्याकडे ती पेपर टाकायचे काम करीत होती त्याने आपला चालता धदा सोडून दुसरा धदा करायचे ठरवले त्याने या मुलाना विचारले की वर्तमानपत्र वितरणाची लाईन तुम्ही चालवता का ? मुलानी आईवडिलाना सारी हकीकत सागितली सगळ्या कुटुबाने एकत्र बसून विचार केला व आयती वर्तमानपत्रे वितरणाची लाईन चालवायला मिळतेय, त्याचा पुरेपूर फायदा करून घ्यायचे ठरविले आता सध्या त्याच्या घरात अशी परिस्थिती आहे की आईवडील ऑफिसमधून घरी आले की सध्याकाळी सात वाजता जेवणे उरकतात व आठ वाजेपर्यंत सारे कुटुब झोपी जाते व मध्यरात्री साडेतीन-चारला उठते व वर्तमानपत्रवितरणाच्या कामाला लागते वर्तमानपत्राचे गठ्ठे वाहून नेण्याकरता एक ट्रक विकत घेतलाय आईवडील व मुले सर्वजण मिळून काम करतात पहाटे चार ते सकाळी सातपर्यंत काम करतात त्यानी कामाची एरिया वाढवली एक उच्च इमारत

मिळाली की दोन-तीनशे गिऱ्हाईके वाढली सगळा रोख व्यवहार, त्यामुळे Income Tax चा प्रश्न नाही वार्षिक उत्पन्न पन्नास हजार डॉलर्सने वाढले सकाळी सातला काम सपले की मुलाची शाळा-कॉलेजे व आईवडिलाची ऑफिसला जायची तयारी म्हाताऱ्या आजी सर्वांची घरी वाटच पहात असतात ब्रेकफास्ट तयार असतो प्रत्येकाचे डबे तयार करून ठेवलेले असतात आजींची किंवा इतर कुणाची कसलीही कुरकुर नसते सबध दिवस आजी घरात असतात सकाळ-सध्याकाळचा स्वयपाक त्या करतात सबध दिवस त्याची देखरेख असते पेपरच्या कामाला सुट्टी नाही पण शनिवार-रविवार ऑफिसे, शाळा-कॉलेजेस् बद असतात त्या वेळी आजी व सर्व कुटुबियाचे आरामात चालते आठवड्याची राहिलेली कामे या दोन दिवसात करतात तर असे हे प्रचड मेहनत करणारे एक भारतीय कुटुब

• • •

रस्त्यात अगर घरापुढे कुठेही कचरा, घाण टाकण्यास मनाई आहे घरातला कचरा एका मोठ्या गोणीएवढ्या पिशवीत साठवायचा पिशवीचे तोंड घट्ट बांधून ती पिशवी घरासमोर ठराविक ठिकाणी ठेवायची कचऱ्याची ही पिशवी ठराविक वेळी कचऱ्याच्या पिशव्या गोळा करणारा ट्रक ती घेऊन जातो घरापुढे रस्त्यात जरा कचरा दिसला तर घरमालकाला दंड होतो घरापुढील गवतसुद्धा कापले पाहिजे हिवाळ्यात झाडांची पाने कपाऊंडमध्ये साचतात तीसुद्धा गोळा करून पिशव्यात भरून कचऱ्याच्या पिशव्याबरोबर ठेवली पाहिजेत कचऱ्याच्या प्लॅस्टिकच्या पिशव्या मॉलमध्ये ( सुपरमार्केटमध्ये) विकत मिळतात पातळ हलक्या पिशव्या मुळीच चालत नाहीत पिशवी न फाटता ती कचरा उचलणाऱ्यांना नेता आली पाहिजे

अमेरिकेत बाटल्या, पिशव्या, दुधाचे प्लॅस्टिकचे गॅलन्स, कागदी पुठ्ठ्याचे बॉक्सेस, वर्तमानपत्राची रद्दी, नको असणारे कागद, अंडी ठेवण्याचे ट्रेज, फूड कॅन्स, ज्यूसचे पुठ्ठ्याचे खोके सारे काही कचरा म्हणून टाकून दिले जाते फ्रीजमध्ये पाण्याच्या बाटल्या कोणीच ठेवत नाही त्याऐवजी कोक पेप्सी कोलाच्या ज्यूसचे जार्स ठेवतात पाणी सहसा कोणी पीतच नाही

एवढे सगळे कडक वातावरण असले तरी काही ठिकाणी लोक कचरा करतातच कोक पेप्सीचे कॅन्स आपल्याला रस्त्यात टाकलेले दिसतातच न्यूयॉर्क-शिकागोसारख्या शहरात तर कचरा पुष्कळ ठिकाणी दिसतो तरी पण स्वच्छता बहुतेक ठिकाणी दिसते

भटकी कुत्री, गाई, बैल, घोडा तिथल्या रस्त्यावर दिसणार नाहीत जनावरे पाळीव असतात कुत्रे पुष्कळांकडे दिसतील पण ते त्यांच्या कपाऊंडमध्ये पाळीव कुत्र्याने रस्त्यात घाण केली तर ती घाण कुत्र्याच्या मालकाला काढावी लागते व त्याची विल्हेवाट मालकाने लावायची असते आपल्याकडे अशा घाणीवर चुकून पाय पडला

जातो कुत्रा जर एखाद्या पादचाऱ्याला चावला तर कुत्र्याच्या मालकाला सर्व औषधपाण्याचा खर्च तर करावा लागेलच शिवाय ज्याला चावला आणि जर का त्याने मालकाविरुद्ध फिर्याद केली की, कुत्रा चावल्यामुळे माझे नुकसान झाले तर जसा पादचारी असेल त्याप्रमाणे एक लाख डॉलर्सपर्यंत नुकसानभरपाई मालकाला द्यावी लागते एवढेच नव्हे, पण एखाद्याच्या घरासमोर एखादा माणूस पाय घसरून पडला तर त्या घरमालकाला हॉस्पिटलचा खर्च अधिक नुकसानभरपाई द्यावी लागते त्यामुळे आपल्या घरासमोरचा भाग पण स्वच्छ व चालताना बिनघसरड्याचा ठेवावा लागतो

माझ्या मुलानेच एक गोष्ट सांगितली की त्याच्या एका मित्राने पार्टीकरता काही मित्र बोलावले होते त्याच्या मित्राचा मित्र आपल्या पत्नी व दोन मुलांसह पार्टीला त्याच्याकडे गेला व घराच्या पायऱ्या चढताना पाय घसरून पडला मित्र आणि तो अगदी जिवलग मित्र कॉलेजपासूनचे पण त्याने आपल्या मित्रावर हॉस्पिटलचा खर्च व वैयक्तिक नुकसानीची फिर्याद केली त्याच्या मित्राला काहीच खर्च पडणार नव्हता हॉस्पिटलचा खर्च व नुकसानभरपाईचा खर्च इन्शुरन्स कंपनीकडून मिळणार होता अपघात व आगीपासून संरक्षणाचे घराचे इन्शुरन्स केलेले होते यात मैत्री वगैरे जरी असली तरी कोणी यात गैर काहीच मानले नाही घराचे इन्शुरन्स हे आवश्यक असते घराजवळ जर आगीच्या पाण्याच्या पाईपचे कनेक्शन असेल तर इन्शुरन्स कंपनी आगीच्या इन्शुरन्सचा हप्ता कमी लावते पण एकदा का आग विझवण्याकरता बंब येऊन गेले व आग विझवली तर परत विमा उतरवताना हप्ता जास्त बसतो

अमेरिकेत इन्शुरन्सचा धंदा फार तेजीत चालतो घर घेतल्यावर घराचे, अपार्टमेंट जर असेल तर त्याचे, मोटारीचे आणि आपले स्वत च्या जीवाचे, आरोग्याचे, अपघाताचे अशी पुष्कळ प्रकारची इन्शुरन्स केली जातात अमेरिकन माणूस इन्शुरन्समाईंडेड असतो पण मी एक पाहिले, इथल्या इन्शुरन्स एजंटामध्ये घाणेरडी चढाओढ नसते घाणेरडी म्हणजे दुसऱ्याची गिऱ्हाईके, आपल्याकडे खेचून घ्यायची तशी चढाओढ मला दिसली नाही पूर्वीचा जो एजंट असेल त्याच्याकडेच जा आम्ही काही तुमचे इन्शुरन्स बदलणार नाही असे एजंट सांगतो

जीवनाच्या विम्याला इथे हप्ता फार जास्त पडतो इथले विमा फक्त वर्षापुरतेच घेतात दर वर्षी विमा काढावा लागतो हप्ता भरला की वर्षभरात जर काही बरेवाईट झाले तर पैसे मिळतील मुदत संपल्यावर एकदम मोठी रक्कम वगैरे काही मिळत नाही मुदतीच्या जीवनाचा हप्ता जास्त असतो एकदा का काही अपघात झाला की पुढच्या वेळी हप्ता वाढलाच म्हणून समजा हार्टफोर्ड कॉनेक्टिकट प्रांताची राजधानी इथे मोठमोठ्या इन्शुरन्स कंपन्या आहेत इन्शुरन्स कंपन्यांचेच हे शहर म्हणून प्रसिद्ध आहे.

आग, अपघात याची चौकशी पोलीस खाते करते तशी इन्शुरन्सची माणसे पण चौकशी करतात व मगच क्लेम सेटल होतो पण पुष्कळ वेळा इन्शुरन्स कंपन्या या क्लेम देण्यामुळे बुडीतखाती गेलेल्या आहेत कारण ज्यानी इन्शुरन्स केलेले असते ते दहावीस लाखाचे क्लेमस्करता कोर्टात जातात साधे दात जर बिघडले तर हजार डॉलर्स सहज गेले इन्शुरन्सकडून पैसे मिळणार म्हणून डॉक्टर्स पण जादा चार्ज लावतात पण इन्शुरन्स कंपनी सगळे पैसे देत नाही व त्यातले काही चार्जेस शिताफीने गाळते

• • •

अमेरिकेतल्या वर्तमानपत्रात मी नुकतीच एक बातमी वाचली न्यायालयाने आरोपी स्त्रीला सिगरेट ओढण्यास मनाई करण्याचा हुकूम दिला Smoker ordered to quit स्वन न्यायाधीश १९५६ पर्यंत दिवसाला वीस सिगरेटची दोन पाकिटे ओढत असत त्यानतर त्यानी सिगरेट ओढण्याचे सोडून दिलेले आहे. वेळ पडली तर अशा तऱ्हेची सिगरेट सोडून द्यायची शिक्षा परतसुद्धा मी देईन असे ते स्पष्टपणे म्हणाले

ज्या स्त्रीला पूर्वी गुराच्या कळपात चोरी करताना अटक झाली होती, तिला चागल्या वागणुकीच्या जामिन-मुचलक्यावर सोडून देण्यात आले होते पण दर आठवड्याला पाच वर्षांपर्यंत पोलीस-स्टेशनवर हजेरी लावली पाहिजे अशी अट घातली गेली होती ज्युली विदरबी लुन्सफोर्ड हे आरोपी स्त्रीचे नाव तिला १९८३ साली चोरीबाबत अटक झालेली होती तिला पोलीस-स्टेशनवर गेली दोन वर्षे हजेरी न लावल्याबद्दल अटक केली गेली

ती हजेरी का लावत नाही म्हणून प्रोबेशन ऑफिसरने तिला विचारले, तर तिने उत्तर दिले की ती बेकार आहे आणि नोकरी कुठे मिळत नाही अत्यत गरिबीत ती दिवस काढीत आहे तेव्हा प्रोबेशन ऑफिसरने तिला विचारले की,' तू धूम्रपान करतेस का ? ' तर ती म्हणाली, ' हो ' तर प्रोबेशन ऑफिसर म्हणाला, ' जर तुला नोकरी नाही आणि गरिबीत तू दिवस काढतेस तर तुला धूम्रपान करणे परवडते कसे ? '

तेव्हा न्यायाधीशाने तिला हुकूम केला की, तीस दिवसाच्या आत तिने धूम्रपान सोडून दिले पाहिजे आणि यापुढे दर आठवड्याला पोलीस-स्टेशनवर हजेरी लावली पाहिजे खर म्हणजे तुला तुरुगातच पाठवायला पाहिजे पण तुला पाच लहान मुले आहेत आणि त्याच्याकडे कोण पहाणार ? म्हणून ही फारच सौम्य अशी शिक्षा देत आहे आता हा हुकूम ती पाळते की नाही हे पहाणे हट कौंटी प्रोबेशन खात्याचे काम आहे

अमेरिकेतल्या नंबर एकच्या शहरात, न्यूयॉर्कमध्ये आता धूम्रपानबंदी कायद्याने केली आहे. आता सिगरेट ओढणाऱ्याना मैल दोन मैल चालून सिगरेट कुठे ओढता येईल अशी जागा शोधावी लागेल ' न्यूयॉर्कच्या नोकरशाहीने एकमताने लोकाचा कौल घेऊन हा कायदा केलेला आहे, ' असे क्वीन्स कॉलेजचे फिलॉसॉफीचे प्रोफेसर अलेक्झांडर बारडोश म्हणाले त्याच्या तोडात सदैव पाइप असतो हा कायदा पाळला जातो की नाही हे पहायचे म्हणजे अतिशय सूक्ष्मपणे पाहिले पाहिजे नाही तर एकदर कठीणच जाणार आहे असे ते म्हणाले

ते पुढे म्हणाले, ' न्यूयॉर्क शहरात हिरॉइन, ब्राऊन शुगर यासारखे ड्रग्ज विकणारे लाचखाऊ राजकारणी आणि शहरातील वाहने काबूत आणू शकत नाहीत ते आता लोकाचे धूम्रपान काबूत आणू पहात आहेत मला वाटते, त्याना काहीतरी काबूत आणायचे आहे मी स्वत पुढे रस्त्यात सिगरेट पेटवणार नाही की पाइप ओढणार नाही पण मला कुणी हे बद करा असे म्हटले तर नक्कीच राग येईल अर्थात् मी कायदा मोडणार नाही हे नक्कीच '

धूम्रपान-बंदीचा कायदा सार्वजनिक टॉयलेटस, मोठी सभागृहे, लिफ्ट्स, थेटर्स, करमणुकीची ठिकाणे, व्याख्यानाचे हॉल, लायब्ररीज्, म्युझियम्स् गॅलरीज, जिमखाने, इनडोअर गेम्सचे हॉल, हॉटेलच्या लॉबीज आणि सुपर मार्केट्स् जिथे दीडशे किंवा अधिक माणसे असतील तिथे लागू आहे. रेस्टॉरट्स्मध्ये पन्नास टक्के जागा धूम्रपान न करणाऱ्याकरता ठेवली पाहिजे आणि ज्या कपनीत पधरापेक्षा जास्त काम करणारे असतील तिथे धूम्रपान न करणाऱ्याना आठ फूट दूर ठेवले पाहिजे जे कायद्याचे उल्लघन करतील त्याना शभर ते पाचशे डॉलर्स दड ठोठावला जाईल नागरी खात्यातील बहुतेक इन्स्पेक्टर्सना अमलबजावणीचे काम दिलेले आहे ते आपल्या कामाकरता जिथे जिथे जातील त्या वेळी त्याना कायद्याचा भग होत असलेला दिसला तर तिथल्या तिथे ते दडाचे तिकीट देतील अचानक कुठेही धाड टाकली जाणार नाही कुठे तक्रारी आल्या तरच लक्ष घातले जाईल कायदा झाल्यापासून आम्हाला चारशे कॉल्स् आले, असे न्यूयॉर्कचे हेल्थ डिपार्टमेंटचे बॅरी ॲडकिन्स म्हणाले, पण बहुतेकानी त्यात धूम्रपानबंदीच्या कायद्याविषयी अधिक विचारणा केली होती फक्त चाळीस कॉल्स् असे होते की त्यानी धूम्रपानबंदीविषयी नाराजी व्यक्त केली होती

न्यूयॉर्कचे पोलीसखाते म्हणाले की, आम्ही धूम्रपान करणाऱ्याला समन्स काढत बसणार नाही पण जिथे धूम्रपानबंदी आहे तिथे आम्ही कायदा पाळला जातो की नाही एवढे मात्र बघू आमचे सारे लक्ष ड्रग्जचा गैरव्यवहार करणाऱ्याकडेच जास्त आहे

शिकागोमध्ये पण धूम्रपानबंदी करण्याचा त्या सरकारचा विचार आहे पण

अजून तिथे भरपूर प्रतिसाद मिळत नाही

न्यूयॉर्कमधल्या रेस्टॉरंट्स्ना याचा जबर फटका बसणार आहे, कारण बार्समध्ये धूम्रपान-बंदी नाही

न्यूयॉर्कमधल्या बड्या 'सार्डी' रेस्टॉरंटचे मॅनेजर म्हणाले, 'या धूम्रपानबंदीमुळे आमची मोठीच पंचाईत होणार आहे कारण आमचे गिऱ्हाईक फारच मोठे आणि मोठ्या श्रीमंत गिऱ्हाईकाचे आहे तिथे धूम्रपानबंदीच्या जागेत आमचे गिऱ्हाईक जर सिगरेट ओढू लागले तर त्याला तिथे ओढू नका असे आम्हाला सांगता येणार नाही आणि समजा इन्स्पेक्टरने पकडले तर दंड मात्र आम्हाला भरावा लागेल

हल्ली खरं म्हणजे चारात एक सिगरेट ओढणारा असतो पण गोष्ट अशी की, आमच्या गिऱ्हाईकात मोठमोठे पुढारी, राजकारणी, जगभर नावाजलेले कलावंत पण आहेत नेल्सन डबल डे आणि हेन्री किसींजर हे धूम्रपान करीत बसले तर आम्ही कुणाला उठा आणि दुसरीकडे जाऊन बसा म्हणून सांगणार ?

न्यूयॉर्कमधल्या रशियन टी रूमचे मॅनेजर म्हणाले, आम्ही कायदा व्हायच्या आधीपासून पन्नास टक्के जागा स्मोकिंग करणाऱ्याकरता व पन्नास टक्के जागा धूम्रपान न करणाऱ्याकरता ठेवली आहे अजून कोणीच तक्रार केलेली नाहीये अजून कुठेही मारामाऱ्या, वादावादी होत नाहीये न्यूयॉर्क हिल्टन हॉटेलमधे लॉबी वगैरे सर्व सोडून कॉकटेल लूजमध्ये फक्त धूम्रपान करण्याची सोय ठेवली आहे लोकांची प्रतिक्रिया समजायला वेळ लागेल, असे हिल्टन हॉटेलची प्रवक्ती लोला प्रिंस म्हणाली

अमेरिकन वर्तमानपत्रातच मी एक लेख वाचला होता त्या वेळी लेखकाचे विचार मला एकदम पटले होते कारण ते माझ्या विचाराशी पुष्कळसे मिळतेजुळते होते लेख होता धूम्रपानावर अमेरिकेत गेली सात-आठ वर्षे धूम्रपानबंदीवर फार मोठ्या प्रमाणात प्रचार चालू आहे ब्याऐंशी साली मी अमेरिकेस गेलो होतो त्या वेळी टी व्ही वर नंग असे सांगितले जात होते की, कोणालाही कामावर ठेवताना जर तो धूम्रपान करणारा असेल तर त्याला नोकरी देऊ नका त्याचा पुष्कळसा वेळ धूम्रपान करण्यात जाईल जर त्याने केले नाही तर त्याचे कामात लक्ष लागणार नाही धूम्रपान करणारी माणसे काम कमी करतात शिवाय हवेचे प्रदूषण होते ते निराळेच पण मी जो लेख वाचला तो जरा तक्रारवजा होता लेखक म्हणत होता की आमच्या वेळी जे सिनेमा आम्ही पाहिले त्यात हिरो मोठ्या रुबाबात ओठात तिरपी सिगरेट ठेवून पेटवीत असे क्लार्क गेबलच्या ओठातली तिरपी सिगरेट त्याला एकदम शोभून दिसत असे क्लार्क गेबल, रॉबर्ट टेलर, हम्फ्री बोगार्ट हे एकामागून एक सिगरेट ओढायचे त्यांचे सिगरेट ओढणे पाहून तरुणपणी आम्ही पण सिगरेट ओढायला लागलो त्या वेळी

कुठल्याही ऑफिसात गेले तर बहुतेक सगळे लोक सिगरेट ओढत असत व जिथे जावे तेथे सिगरेट ऑफर केली जात असे सिगरेट न ओढणाराच गावढळ ठरत असे अशा जमान्यात आम्ही सिगरेट ओढायला लागलो तर आता आमची सिगरेट कशी सुटणार ?

अमेरिकेतले लोक पुष्कळसे हेल्थकॉन्शस आहेत आता धूम्रपानामुळे कॅन्सर रोग होतो म्हटल्याबरोबर त्यावर धूम्रपानबंदीचा प्रचार जोरात चालू झाला आहे प्रथम सुरुवातीला त्याच्याकडे कुठेही गेले तर पाट्या लावल्या असत ' नो स्मोकिंग ' पण त्याचा विशेष परिणाम होईना म्हणून पुढे अशा पाट्या काही ठिकाणी लावल्या गेल्या Thank you for not smoking काही त्यापुढे जाऊन SMOKING NOT PERMITTED असे लिहू लागले पण बोर्ड ऑफ एज्युकेशनच्या हुकुमामुळे शाळकरी मुले काही करायची थांबली आहेत का ? हा एक निराळाच विषय आहे

पूर्वी वेस्टर्न चित्रपटातले सारे लोक एकदम रफटफ दाखविले जात असत दारू पाण्यासारखी ढोसताना दाखवत असत सामाजिक चित्रपटात पण नुसती व्हिस्की ऑन रॉक्स पिताना दाखवत असत त्यामुळे आपल्याकडे सर्वसाधारण लोकाची समजूत अशी की अमेरिकेत दारू पिण्यावर काहीच धरबंद नाही पण अमेरिकेत काही प्रांतात शनिवार, रविवार व सुटीचे दिवशी दारूबंदी असते संध्याकाळी आठच्या पुढे दारू विकण्यास बंदी आहे एवढेच नव्हे तर, साध्या दुकानातही आठचे पुढे बियर विकण्यास बंदी आहे. तिकडे परमीट-रूम्स वगैरे भानगड नाही पण दारूचे बार आहेत काही बार्समध्ये संध्याकाळी पहिले दोन तास निम्म्या दरात दारू प्यायला मिळते त्या वेळी तिथे पुष्कळ गर्दी असते पण कोणालाही वाट्टेल तेवढी दारू पिता येत नाही दारू पिणाऱ्यावर बारच्या माणसाचे लक्ष असते कारण पिणाऱ्याने मोटारचा अपघात केला तर ज्या बारमध्ये तो दारू प्यायला असेल त्या बारच्या मालकाला पन्नास हजार डॉलर्सपर्यंत दंड ठोठावला जातो याकरता समजा, एखादा माणूस जास्त प्यायला असेल तर त्याची दारू उतरल्याशिवाय त्याला बारच्या बाहेर पडू देत नाहीत या करता बारमध्ये चांगले पेहलवान ( Muscle men ) ठेवलेले असतात बार चांगले प्रशस्त असतात त्यात नृत्य करण्याची सोय असते व संगीत पण नृत्याला अनुरूप असे असते दारू प्यायला एकट्या दुकट्या स्त्रिया पण येतात पुरुष समूहाने येणारे, तसेच स्त्रिया पण आपआपल्या मैत्रिणींसह प्यायला येतात रंगीबेरंगी दिव्यांची रेलचेल असते व निरनिराळ्या प्रकारची प्रकाशयोजना सारखी बदलती ठेवलेली असते एकंदर वातावरण उत्साहाचे व मौजमजेचे असते त्याच वेळी मोटार-ड्रायव्हिंग नियमानुसार करा, गाडीचा वेग वाढवू नका व सेफ ड्रायव्हिंग करा, असे इशारे प्रकाश अक्षरांच्या साह्याने दिले जात असतात

इशाऱ्यावरून गमत आठवली अमेरिकेत काय आणि भारतात काय, सगळीकडे सूचना-इशाऱ्याचे फलक आपल्याला दिसतात 'KEEP OUT " जरी आपल्याला तिकडे जायचे नसले तरी वाटते, हे हा कोण सागणार ? खड्ड्यात गेली KEEP OUT वगैरे जाऊन तर बघू NO PARKING चे फलक तर जागोजागी त्यापेक्षा ' नो पार्किंग ॲट एनी टाईम व्हायोलेटर्स विल बी टोड अवे ॲट ओनर्स एक्सप्रेस '' तिथे पण मोटारगाड्या उभ्या दिसतात पण मोटारगाड्या पार्किंगची समस्या अमेरिकेत मात्र मोठ्या प्रमाणावर आहे. शहरात जर वाटेल तिथे गाडी पार्क केली तर पन्नास डॉलर्स दड पडलाच म्हणून समजावे दयामाया नाही रस्त्यावर पार्किंग-मीटर्स बसवलेली असतात मीटरमध्ये पचवीस सेंट टाकायचे व गाडी पार्क करायची फक्त अर्ध्या तासाकरता पण आपल्याला पार्किंग शोधण्यातच अर्धा तास लागतो न्यूयॉर्क, शिकागो शहरात पार्किंगला तासाला साडेतीन-चार डॉलर्स द्यावे लागतात किंवा मग शहराच्या सबर्बमध्ये दिवसाला पाच डॉलर भरून गाडी पार्क करायची व लोकलने किंवा मेट्रोने ( अडरग्राऊड रेल्वे ) आपल्याला शहराच्या ज्या भागात जायचेय तिथे जायचे अमेरिकेत राह्यचे म्हणजे गाडी ही आवश्यक बाब आहे. त्याशिवाय रोजचे व्यवहार करणे केवळ अशक्य आहे आपण भारतात रोज भाजीपाला व घरात लागणाऱ्या वस्तू जवळच असलेल्या मार्केटमधल्या आणि वाण्याच्या दुकानातून आणतो तशी अमेरिकेत सोय नाही त्याकरता फूड-स्टोअरमध्ये गेले की भाजीपाला, फळे, पाव, अडी, दूध, चीज, फळाचे रस, बिस्किटे व इतर खाण्याचे जिन्नस शिवाय चिकन, फिश सगळे आठवड्याचे सामान घेऊन जाण्याकरता गाडीची आवश्यकता आहेच एवढे सर्व सामान हातात घेऊन जाणे केवळ अशक्यच आपल्याजवळ गाडी नसली तर मित्राच्या किवा शेजाऱ्याच्या गाडीने असे किती वेळा जाणार ? पण गाडी घेणे कठीण नसते शभर डॉलरचा हप्ता भरून गाडी विकत घेता येते आणि सेकडहँड गाडी शभर-दीडशे डॉलरलासुद्धा मिळू शकते इथे चालणारे लोक कमी मोटारगाड्या मात्र भरमसाट चालायला मिळत नाही त्यामुळे दिवसातून कधीही वेळ मिळेल त्या वेळी लोक जॉगिंगला बाहेर पडतात शरीराला काहीतरी व्यायाम हा पाहिजेच ना रस्त्याने चालताना माणसे क्वचितच दिसतात मैल दीड मैल चालल्यावर एखादा माणूस रस्त्याने चालताना दिसतो एवढ्या असख्य प्रमाणात अमेरिकेत मोटारगाड्या असण्याचे कारण जरा निराळेच आहे इथे कुठे गावाला जायचे असेल तर बसने जायचे ग्रे हाऊड बस सर्व्हिस सर्व अमेरिकेतून जाते नाहीतर मोटारने सुरुवातीला रेल्वे होत्या पण मोटारींच्या कारखानदारानी रेल्वे कपन्या खरेदी केल्या आणि रेल्वे रस्ते उखडून टाकले व मोटारी व बसेस बनवण्यास सुरुवात केली आता एका गावाहून

दुसऱ्या गावाला जायला रेल्वेच नाही तेव्हा मोटारगाड्या व बसेस याचा खप व्हायला लागला आता अमेरिकेत फारच थोड्या प्रमाणात रेल्वे आहेत अमेरिकन जीवनात मोटार ही एक आवश्यक वस्तू ठरली आहे. तिच्याशिवाय अमेरिकेत राहाणे कठीण आहे मुले सोळा वर्षांची झाली की त्याना मोटार चालवण्याचे लायसेन्स मिळते मोटार चालवण्याचे नियम मात्र फार कडक आहेत सोळाव्या वर्षी मोटार चालवायला लायसेन्स देण्याबद्दल पुष्कळ पालकाचा विरोध आहे. कारण मुले फार बेदरकारपणे मोटारगाड्या चालवतात काही राज्यात अठरा वर्षे पूर्ण झाल्यावर लायसेन्स मिळते मुले वयात आली की, मोटारगाडी घेण्याचा हट्ट पालकापाशी करतात मोटार चालवायला मिळाली की, त्याना एक नवा खेळच मिळाल्यासारखे होते जास्तीतजास्त ताशी पचावन्न मैल वेगाने गाडी चालवण्याचा नियम आहे हायवेवर साठ-सत्तर मैल वेगाने तर पुष्कळ पालकच चालवतात व पोलीस कार दिसली की मग परत पचावन्नवर येतात एक गोष्ट मात्र आपल्या नजरेत भरते ती म्हणजे पायी चालणाऱ्याची इथे कदर केली जाते पादचाऱ्याना जर रस्ता ओलाडायचा असेल तर वेगात असलेली गाडी थाबवून पादचाऱ्याना रस्ता ओलाडण्यासाठी मोटारीतूनच इशारा करतात आपल्याकडे क्वचितच चालणाऱ्याकडे लक्ष देतात त्यानाच फक्त कामाची घाई असते पादचारी म्हणजे किस झाड की पत्ती अशा गुर्मीत वागवले जाते दुसरी म्हणजे ' स्टॉप अँड गो अशी पाटी असते तिथे अक्षरश गाडी थाबवतात व नतर पुढे जातात हा नियम कटाक्षाने पाळला जातो व पाळणे खरे म्हणजे आवश्यक असते पण मी आपल्याकडे पाहिलेय कोणताही ड्रायव्हर अशा पाटीकडे सपूर्ण दुर्लक्ष करतो स्कूल बसला आधी वाट करून दिली जाते आधी स्कूल बस जाईल व नतर बाकीच्या गाड्या जातील स्कूल बसला तिथे फारच प्राधान्य दिले जाते तिच्या बाबतीत जर कोणा ड्रायव्हरने उल्लघन केले तर त्याला फार कडक शिक्षा होते

अमेरिकेतल्या बसेसना कडक्टर नसतो ड्रायव्हरच्या बाजूने बसमध्ये चढायचे व पन्नास सेंटचे नाणे त्याच्याजवळ उभारलेल्या खाबात टाकायचे ड्रायव्हर बसचे तिकीट देतो कुठूनही कुठे जायला एकच दर ही झाली छोट्या गावातल्या बसची कथा आपला उतरण्याचा स्टॉप आला की आपणच बसची घटी ओढायची व खाली उतरायचे स्टॉपवर जर माणसे उभी असली तर ड्रायव्हर बस थाबवतो चढणारे चढतात, उतरणारे उतरतात कोणाला चढायचे उतरायचे नसले तर बस पुढच्या स्टॉपवर चालतच राहाते

नवी गाडी घेतल्यावर गाडीला नबर द्यायच्याऐवजी आपले मनपसद नाव नबरच्याऐवजी देता येते आपले आडनाव किंवा स्वत चे किवा मुलाचे, मुलीचे

कोणतेही नाव रजिस्टर करता येते आपल्याकडे रिक्षावाले आपल्या पत्नीचे किंवा मुलीचे वा प्रिय व्यक्तीचे नाव रिक्षाला देतात पण रिक्षाला नंबर हा आवश्यक असतोच अर्थात् नंबरच्याऐवजी नाव रजिस्टर करायला थोडासा जादा चार्ज घेतला जातो

अमेरिकेतल्या पन्नास प्रांतापैकी ( राज्ये ) सत्तावीस राज्यांनी आपल्या राज्याविषयी एक वैशिष्ट्यपूर्ण स्वतंत्र घोषणा तयार करून घेतली आहे आणि ती लोकप्रिय होण्याकरता एक नवीनच शक्कल लढवली आहे. प्रत्येक मोटारच्या नंबरप्लेटवर ती घोषणा असलीच पाहिजे, असा त्यांनी नियम केलेला आहे. आता अमेरिकेतलेच काही लोक म्हणतात की, ही प्रत्येक मोटारीच्या नंबराजवळ त्या राज्याची घोषणेची जाहिरात चुकीची व अक्षम्य आहे. खर म्हणजे त्या घोषणेचा आणि राज्याचा तसा अर्थाअर्थी काही संबंध नाही आता उदाहरणच द्यायचे म्हटले तर ' ऱ्होड आयलंड ' ह्या राज्याची घोषणा आहे ओशन स्टेट मुळात ऱ्होड आयलंड स्टेट हे बेट नाही आणि इतर पधरा राज्याजवळ समुद्र जास्त जवळ आहे. पण त्याची घोषणा ओशन स्टेट तसेच कॉनेक्टीकट स्टेट ' कॉन्स्टिट्यूशन स्टेट खर म्हणजे पेनसिल्व्हानिया हे Constitution स्टेट आहे पण त्याची घोषणा आहे, Key Stone स्टेट न्यू हॅपशायर स्टेटची घोषणा 'Live or Die' ही घोषणा पास करून घेण्यासाठी राज्याला कोर्टाशी लढत द्यावी लागली विस्कॉन्सिन स्टेटची घोषणा आहे, अमेरिकाज डेरीलँड आता इडाहो ह्या राज्याची घोषणा आहे ' फेमस पोटॅटोज ' इडाहोमधल्या नागरिकाने आपल्या मर्सिडीज बेंझ गाडीवर नंबरप्लेटवर Famous Potatoes पण सहन करायचे ? आता मॉंताना स्टेटचे घोषाचे शब्द आहेत, 'Big Sky' आता 'Big Sky' चा आणि मॉंताना स्टेटचा काय संबध ? केंटकी स्टेटचे ' ब्लू ग्रास ' आता गवत कधी निळे असते काय ? केंटकीमध्ये मी असताना आमच्याकडे एक सरदारजी गृहस्थ पार्टीच्या वेळी आले होते ते म्हणाले, ' पहाटे उठून पाहिले तर गवत निळे दिसते ' तर अमेरिकन लोकांच्या डोक्यात काय येईल आणि ते काय करायचे ठरवतील काही सांगता येत नाही राज्य जर चांगले असेल तर त्याला जाहिरातीची काय जरूरी आहे ?

• • •

बँकाचे राष्ट्रीयीकरण झाल्यापासून बँकेच्या खातेदाराना राष्ट्रीयीकरणापूर्वी जशी सेवा मिळायची तशी सेवा आता मिळेनाशी झाली आहे म्हणून सागितले जाते चेकचे पैसे मिळायला ताटकळत बसून राहावे लागते पुष्कळ वेळा कौंटरवर डीलिग असिस्टटचाच पत्ता नसतो प्रवासी चेक मिळायला वेळ लागतो गिफ्ट चेक पाहिजे त्या रकमेचे मिळायला तास-दोन तास थाबावे लागते पुष्कळ वेळा सरळपणे उत्तरे पण मिळत नाहीत आमचाच नाईलाज असतो म्हणून आम्ही बँकेत जातो

मी अमेरिकेत माझ्या मुलाकडे गेलो, त्या वेळी प्रथमच त्याच्याबरोबर बँकेत गेलो त्या वेळी त्याच्याबरोबर त्याची तीन वर्षांची मुलगी पण बरोबर होती बरोबर एक लहान मूल पाहिल्याबरोबर बँकेतल्या डीलिंग असिस्टटने तिच्या हातावर ( कँडी ) एक गोळी ठेवली मुलाचे काम दोन मिनिटात झाले त्यानतर पुष्कळ वेळा निरनिराळ्या बँकात काहीना काही निमित्ताने मी गेलो दोन-तीन मिनिटावर कधी बँकेत थाबावे लागले नाही सुनेबरोबर दोन नाती व एक नातू मिळून आम्ही आत गेलो तिन्ही मुलाना कँडीज मिळाल्या सुनेचे काम चटकन् झाले बँकेत कौंटरवरून सहज आतल्या डीलिग असिस्टटशी बोलता येते सर्व सेवा हसतमुखाने होते सगळी स्वच्छता, टापटीप, प्रसन्न वातावरण, बँकेच्या निरनिराळ्या योजनाचे सुदर छपाईतले फॉर्म खातेदाराना व्यवस्थित चटकन नजरेस पडतील असे ठेवलेले बँकेत एक-दोन मिनिटाचे वर कोणी उभे राहिलेले दिसणारच नाही कुठेही लाईन नाही माणसाची गर्दी नाही गडबड नाही बडबड नाही सारे कसे शात आणि सुरळीत चाललेले

मला भारतात खरेदी केलेले अमेरिकन एक्सप्रेसचे प्रवासी चेक कॅश करायचे होते मी एकटाच बँकेत गेलो व प्रवासी चेक कॅश करायचेत म्हणून सागितले डीलिग असिस्टटने मला चेकवर सह्या करण्यास सागितले व पहिल्या चेकवर मागे नाव, पत्ता व टेलिफोन नबर लिहिण्यास सागितला तिने मला ओळखपत्र मागितले नाही पासपोर्ट

मागितला नाही फक्त सही बरोबर आहे की नाही पाहिली व दोन मिनिटात मला पैसे देऊन मोकळी झाली कसलीही खरखर नाही

अमेरिकेत कोणीही पाकिटात विशेष पैसे ठेवत नाही बँकाची क्रेडिट कार्ड ठेवतात क्रेडिट कार्ड कुठेही चालते सुपर मार्केट, फूड स्टोअर्स, गॅस स्टेशन ( पेट्रोलपप ), रेस्टॉरट्स्, फास्ट फूड रेस्टॉरट्स् सगळ्या ठिकाणी क्रेडिट कार्ड दाखवले की काम भागते

बँका बद झाल्या तरी वाटेल त्या वेळी आपल्याला बँकेतून पैसे काढता येतात बँकेच्या आवारात किंवा इमारतीत भिंतीत मशीन बसवलेले असते पैशाची जरूरी लागली तर बँकेने दिलेले कार्ड मशीनमध्ये सरकवायचे तेव्हा कार्डवरच्या अकौंट नबराची मशीन नोंद घेते व कार्ड दुसऱ्या बाजूने बाहेर येते व बँकेत आपला किती बॅलन्स आहे तो आकडा आपल्याला मशीनवर दिसतो मग आपल्याला जेवढ्या पैशाची जरूरी आहे तेवढ्याची बटणे दाबावयाची व नोटा कशा पाहिजेत त्याचेही बटण दाबावयाचे एवढे केले की आपल्याला आपली इच्छित रक्कम ताबडतोब मशीनमधून मिळते शनिवार, रविवार, सुट्टीच्या दिवशी व दिवसातल्या कोणच्याही वेळी आपल्याला पैसे काढता येतात दुसरी गोष्ट म्हणजे आपण प्रवासात असलो व वाटेवर दुसऱ्या गावी असलो आणि तिथे आपल्या बँकेची शाखा असेल तर तिथेही पैसे मिळू शकतात समजा एखादे वेळी बँकेची शाखा नसली पण त्या गावातल्या बँकेशी त्याचे अर्थिक सबध असतील तर पैसे मिळण्यास अडचण पडणार नाही

माझ्या मुलाने रॉचेस्टरला असताना एका बँकेत नवीन अकौंट उघडला त्या वेळी बँकेने जाहीर केले होते की जो आमच्या बँकेत नवीन खाते उघडेल त्याला एक फोल्डिग छत्री किंवा घड्याळ मोफत मिळेल अर्थात् मोफत वस्तू स्वस्त किमतीच्या असतात पण स्पर्धा ही गोष्ट निराळीच आहे.

आपल्या इकडे बँकेकडून कर्ज मिळणे म्हणजे किती कटकटीचे काम असते ते प्रत्यक्ष अनुभव घेतल्याशिवाय समजणार नाही याबद्दल जास्त न लिहिलेलेच बरे पण तिकडे बँका पुष्कळ सढळपणे कर्ज देतात खातेदाराना व सर्वसाधारण लोकाना पत्रे पाठवतात की आम्ही कर्जे देतो ज्याने पूर्वी कधीच कर्ज काढलेले नसेल त्याला कर्ज मिळायला थोडा त्रास होतो पण जो नेहमी कर्ज काढणारा आहे त्याला कर्ज मिळायला अजिबात त्रास होत नाही त्याला सहज कर्ज मिळते

सुपरमार्केटमध्ये उधारीवर माल घ्या किंवा हप्त्याने पैसे भरा, म्हणून जाहिरात करतात त्याकरता फॉर्म ठेवलेले असतात तुम्ही घ्या किंवा घेऊ नका पण नुसता फॉर्म सही करून दिलात तरी काहीतरी बक्षीस देतात

घर विकत घेण्याकरता, मोटारगाडी घेण्याकरता बँका कर्ज देतात काहीही विकत घेण्याकरता कर्ज पाहिजे असेल तर बँका कर्ज द्यायला तयार असतात कर्ज सुलभपणे मिळते अमेरिकेत अजून बँकाचे राष्ट्रीयीकरण झालेले नाहीये त्यामुळे जिकडे तिकडे स्पर्धा दिसून येते बँकेत येणाऱ्याला खूष ठेवण्याकडे बँकेचा कल असतो धंदा वाढवायचा असतो अजून तिकडे सहकार आणि सर्वांचा उद्धार आलेला नाही सहकारी मडळी आणि स्वत ची घरे भरी अजून तिथे सुरू झालेल्या नाहीत दिलेली कर्जे पूर्णपणे वसूल केली जातात तिथे दयामाया नाही कर्जे माफ हे शब्द मी कुठे वाचले नाहीत

अमेरिकेत बँकांची नावे ठेवली जातात ती कशी काय ठेवली जातात ? तर त्यात एक ठराविक पद्धत नाही पण बँकेचे जर वॉशिंग्टनशी सबध असतील तर तिथे एक तसा कायदाच आहे बँकेला प्रथम नॅशनल किंवा फेडरल म्हटलेच पाहिजे मग त्यापुढे काय वाटेल ते नाव द्यायचे असेल ते द्यावे युनायटेड नॅशनल किंवा कॉस्मोपालिटन नॅशनल, नॅशनल बँक ऑफ पाईक सिटी, नॅशनल बँक ऑफ अमेरिका, नॅशनल बँक ऑफ उटा अशी बँकांची नावे दिली गेली आहेत वॉशिंग्टनमध्ये Hemisphere National Bank आहे Hemisphere म्हणजे अर्धी पृथ्वी, भूगोलार्ध

काहींना नॅशनल ' हा शब्द तेवढा आवडत नाही त्या मानाने फेडरल आवडतो कोलबिया फेडरल, इडिपेंडन्स फेडरल मेट्रोपॉलीटन फेडरल, सेंट्रल किंवा मिडवेस्ट फेडरल कट्री किंवा स्टेट फेडरल बँकांची नावे देणाऱ्याना नाव ठेवण्यात तसा काही अर्थ असतो अस काही नाही पण काहीतरी वैशिष्ट्य शोधत असतात आता एका बँकेचे नाव आहे. PERPETUAL FEDREL SAVINGS आणि परपिच्युअलचा अर्थ चिरस्थायी शाश्वत

सर्वात मोठे आणि लाबलचक असे एका बँकेचे नाव आहे मला वाटते अमेरिकेतच काय कदाचित जगातसुद्धा एवढे मोठे बँकेचे नाव नसावे बँकेचे नाव आहे, ' नॅशनल होम परमनट फेडरल सेव्हिंग्ज अँड लोन ' या बँकेच्या नावात सगळे काही आलेय पण त्यामुळे सेव्हिंग्ज का लोन यापैकी कोणचे परमनट हे त्यानी स्पष्ट केलेले नाही आणि यातच सारी ग्यानबाची मेख आहे फक्त अमेरिकन हा शब्द त्यानी त्यात घातलेला नाही नाहीतर अमेरिकन लोकाना एक चागली म्हणा किंवा काहीही म्हणा सवय जडलेली आहे. प्रत्येक गोष्टीमागे ' अमेरिकन हा शब्द ते वापरतातच

बँकाना ट्रस्ट हा शब्द फार आवडतो ट्रस्ट म्हणजे विश्वास गिऱ्हाईकाचा बँकेवर की बँकेचा गिऱ्हाइकावर हा मुद्दा निराळा पण पैशाचा प्रश्न आला की विश्वास हा शब्द महत्त्वाचा नॅशनल सेव्हिंग्ज ट्रस्ट, आयव्हिंग ट्रस्ट, पण नुसते नॅशनल फेडरल, अमेरिकन होम अँड ट्रस्टेड याशिवाय प्रत्येक बाबतीत फर्स्ट हा शब्द पुष्कळाना फार

प्रिय त्यामुळे The First National Bank of पुढे मग आपल्याला काय पाहिजे ते नाव द्यायचे त्यानतर फर्स्ट युनियन बॅंक, फर्स्ट सेव्हिंग्ज अँड लोन एकदा फर्स्ट म्हटले की सेकड, थर्ड, फोर्थ असे नाव कोणी देणार नाही पण न्यूयॉर्कमध्ये एकदम Nineth नाईंथ फेडरल बॅंक आहे नवीन म्हणजे आता फर्स्ट वीमेन्स बॅंक निघालेली आहे

काही बॅंका फार जुन्या आहेत शभरी उलटून गेलेल्या ह्या बॅंका अजूनही चागला धदा करीत असतात अशीच एक बॅंक न्यूयॉर्क शहरात आहे नाव वाचून आपल्याला हसूच येईल ' डाइम सेव्हिंग्ज बॅंक ' डाइम म्हणजे दहा सेंटचे नाणे आता रस्त्यात चालताना जर दहा सेटचे नाणे पडले तर कोणी वाकून उचलून तरी घेईल का ? आता दहा सेंटला मिळतेय काय ? आणि दहा सेंट साठवून बॅंकेत टाकायचे दिवस केव्हाच इतिहासजमा झालेयत पण ' डाइम सेव्हिंग्ज बॅंक ' मात्र अजून चालू आहे

• • •

मी पडलो पोस्टातला माणूस भारतभर मी फिरलेलो आहे. मी ज्या प्रांतात, शहरात, गावात जाईन तिथे पोस्टऑफिस पहात असे माझा एक पोस्टातच काम करणारा मित्र पूर्वेला चीन, जपान, मलेशिया, इंडोनेशिया, सिंगापूर, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड व पश्चिमेला युरोप, इंग्लंड, जर्मनीकडे जाऊन आलेला तो म्हणाला, भारतातल्याप्रमाणेच पोस्ट खात्याची सगळीकडे आबाळ झालेलीच दिसली पोस्टखाते जगभर एकदम दुर्लक्षित खाते

आता अमेरिकेत प्रथमच मी छोट्या पोस्टात गेलो, तेव्हा पाहिले तर वाटले की तुलनेच्या मानाने पोस्ट ऑफीस इथून तिथून सारखेच पण लेक्सिंग्टनच्या पोस्टात गेलो तर ते पोस्ट ऑफिस पुष्कळच चांगले वाटले स्वच्छ वाटले जागा चांगलीच मोठी व प्रशस्त वाटली व आवार पण खूप मोठे होते पोस्टात जाऊन तिथल्या पोस्टमास्तरांना मी भेटलो पोस्टमास्तरांना स्पेशल केबिन होते त्यांनी मला सारे पोस्ट ऑफिस स्वत दाखवले सॉर्टिंगखात्यात घेऊन गेले तिकडे सगळे फर्निचर स्टीलचे होते मी त्यांना सांगितले की आमचेकडे लाकडी फर्निचर असते सॉर्टिंगला लाकडी कॅबिनेट असतात त्या वेळी त्यांना आश्चर्य वाटले तिथला एक सॉर्टर म्हणाला, की त्याने जर्मनीत पण लाकडी कॅबिनेटस् वापरताना पाहिल्या लाकडी कॅबिनेट्स् त्यांनी का परत केल्या ते मला कळले नाही

अमेरिकेतल्या पोस्टमनना पत्रांचा बटवडा करण्याकरता जीप्स पुरवलेल्या आहेत ते पत्रांचा बटवडा दिवसातून एकदा करतात ८२ साली पोस्टमन घराच्या दरवाज्याजवळ लेटरबॉक्स लावलेली असे त्यात पत्रे आणून टाकत असे पण आता ८८ साली कंपाऊंडबाहेर प्रत्येकाने आपल्या नावाची लेटरबॉक्स ठोकून ठेवली पाहिजे व त्यावर रस्त्याचा नंबर ठळक अक्षरात लिहिलेला असला पाहिजे लेटरबॉक्स लांब-रुंद व त्याचे दार सहज उघडता आले पाहिजे व बंद करता आले पाहिजे व येणारी पत्रे त्यात

मावली पाहिजेत अशी बॉक्स असली पाहिजे अशी पेटी असली तरच पोस्टमन पत्रे टाकील तुमच्या घरात येऊन पत्रे टाकणार नाही तुम्हाला पोस्टात जाऊन जी पत्रे पोस्ट करायची असतात ती जर तुम्ही लेटरबॉक्समध्ये ठेवली तर पोस्टमन ती पत्रे आपल्याबरोबर घेऊन जातो व ती पोस्ट करतो वर्षातून एकदा Mail Box Improvment Week पाळला जातो लेटरबॉक्सला ते ( मेल बॉक्स ) म्हणतात जर मेल बॉक्स बरोबर लावली नसेल तर पोस्टाकडून नोटीस पाठवण्यात येते त्यात पोस्टमनशी सल्लामसलत करून मेल बॉक्स नीट लावावी अशी सूचना केलेली असते आपल्याकडे दिवाळी, ख्रिसमसला पोस्टमनला पोस्त दिली जाते आता पोस्टमनच दिवाळी, ख्रिसमसची पोस्त हक्काने मागतात व दारोदारी फिरतात पण इथे अमेरिकेत, लोकाना वाटले तर ते बक्षीस म्हणून पोस्टमनला त्याच्या मनाला येईल ते देतात किंवा देतही नाहीत आणि पोस्टमन तुमच्या दारात बक्षिसीसाठी येतही नाही तो आपले बटवड्याचे काम नेहमीप्रमाणे करत राहतो गेल्या वर्षी माझ्या मुलाकडे ख्रिसमसची पुष्कळच प्रेझेंट्स् आली होती तेव्हा त्याने एक फ्लॉवरपॉटचे प्रेझेंट आपल्या मेलबॉक्समध्ये पोस्टमनला ख्रिसमस प्रेझेंट म्हणून ठेवून दिले दुसरे दिवशी ज्या वेळी मुलाने त्या दिवशीची आलेली पत्रे मेलबॉक्समधून काढली त्यात पोस्टमनचे एक पत्र होते पत्रात त्याने ख्रिसमसचे प्रेझेंट दिल्याबद्दल त्याचे आभार मानले होते

अमेरिकेतील पोस्टऑफिसे फक्त कार्ड, स्टॅंपस्, इंटरनॅशनल एअरोग्रामस् विकते बुक-पोस्ट, पार्सले स्वीकारते व पत्रे व कार्डे, बुक-पोस्ट, पॅकेट्स व पार्सलाचा बटवडा करते त्यात एक्सप्रेस मेल व प्रायॉरीटी मेल असे आणखी विभाग आहेत जास्त प्रमाणात स्टॅंप खरेदी करायचे असतील तर स्टॅंपचे शीटम् मशीनवर मिळतात पोस्टात स्त्रिया पण काम करतात पुष्कळ स्त्री-पोस्टमनपण आहेत हल्ली आपल्याकडे पण स्त्रिया पोस्टमनचे काम करतात पोस्ट ऑफिस सेव्हिंग बँक, कॅश सर्टिफिकिटे वगैरे इतर कोणतेही काम पोस्ट ऑफिस करत नाही पोस्टातून अश्लील वाङमय पाठवायला बंदी आहे त्याकरता पोस्टल इन्स्पेक्टर नेमलेले असतात

अमेरिकेत पोस्टात काय किंवा बँकेत काय, गर्दी असेल तर क्यूची पद्धत आहे. पण तेथे क्यूची पद्धत फारच चागली आहे कौंटरवर एका वेळी एकच माणूस असेल बाकीचा क्यू कौंटरपासून साधारण सहा ते आठ फूट दूर असतो त्यामुळे कौंटरवर काम करणाऱ्यावर दडपण येत नाही व चोरी-मारी, पैशाचा घोटाळा होत नाही कौंटरपासून दूर क्यू असल्यामुळे आरडा- ओरडा, हात चालवा, वगैरे ओरडा होत नाही व कौंटरवर क्यूशिवाय माणसाला जाता येत नाही आपल्यासारखा नवखा माणूस कौंटरजवळ गेला तर कौंटरजवळचा माणूस आपल्याला क्यू कुठे आहे ते तो दाखवतो व तिथे जाऊन उभे

राहण्यास सांगतो  कौंटरचा माणूस काय काम करतोय ते सर्वांना दिसते  कारण सारे उघडे असते  काचेतून सर्व दिसते  त्यामुळे कौंटरवरच्या माणसाला टगळमगळ करता येत नाही  आपल्याकडे कार्डे संपली, स्टँप संपले  Out of Stock असे पोस्टात गेल्यावर पुष्कळ वेळा सांगितले जाते  तशा इकडे पण लोकांच्या तक्रारी आहेत  मी तिथे असताना एका माणसाने वर्तमानपत्रात रीजफील्ड पोस्टाविषयी तक्रार केली होती की पोस्टात कार्डे घेण्यास गेलो तर कार्डे संपली आहेत  Out of Stock असे तेथील कारकुनाने सांगितले  मंगळवारीच कार्डे संपली तर आठवडाभर आम्ही काय करायचे ? त्या वेळी पुष्कळांची निराशा झाली  एकाला तर पाच हजार पोस्टकार्ड्स् पाहिजे होती आता त्याला गावातल्या इतर पोस्टात जाऊन कार्डे आहेत की नाहीत ते पहावे लागणार आहे. त्या वेळी पोस्टातला कारकून म्हणाला, की ही अत्यंत लाजिरवाणी गोष्ट आहे पेट्रोल संपले म्हणून मोटार पेट्रोलपंपावर न्यायची आणि त्याने म्हणायचे पेट्रोलच संपले आहे  यासारखा प्रकार आहे  या पत्रावरून आपल्याला असे दिसून येईल की आपल्या पोस्टासारखी अमेरिकेत पण पोस्टऑफिसे आहेत  यात आपण कमीपणा मानण्याचे कारण नाही

मी रीजफिल्ड गावात राहात असतानाच तिथे नव्या पोस्टमास्तराची नेमणूक झालेली वर्तमानपत्रात वाचली  त्यात नव्या पोस्टमास्तराची माहिती दिलेली होती एलिझाबेथ बेकर या बाईची पोस्टमास्तर म्हणून नेमणूक झालेली होती  त्या सहा वर्षांपूर्वी पोस्टात नोकरीला लागल्या  त्या वेळी त्या चौथ्या दर्जाची मेल हाताळण्याचे काम करीत होत्या  त्यांचे फक्त शाळेचे शिक्षण झालेले होते  कॉलेजमधले शिक्षण अजिबात नव्हते  मुलगा थोडा मोठा झाल्यावर त्या पोस्टात नोकरीस लागल्या  बाईंचे वडील पण पोस्टात काम करून निवृत्त झालेले आहेत  ते न्यूयॉर्कच्या एका जिल्ह्याच्या पोस्टलमेल विभागणीचे डायरेक्टर म्हणून निवृत्त झाले  बाईंनी – त्यांच्या मुलीने – पोस्टात नोकरी धरली  त्या वेळी त्यांनी मेल ट्रकमधल्या मेलबॅगा काढण्याचे काम केले थोड्याच अवधीत त्यांचा युनिफॉर्म जाऊन त्यांना साध्या नेहमीच्या पोषाखात कौंटरवर काम करण्याची बढती मिळाली  पोस्टमास्तरांना त्यांच्या चांगल्या कामाबद्दल जनतेची पत्रे आली  १९८५ साली पोस्टातल्या दोन वर्षांच्या ट्रेनिंगला त्यांना पाठवण्यात आले ट्रेनिंग संपल्यावर बाईंची वेस्टचेस्टर न्यूयॉर्क फील्ड डिव्हिजनमध्ये नेमणूक झाली आणि आता २५ एप्रिल ८८ पासून त्या रीजफिल्डला पोस्टमास्तर म्हणून आल्या आहेत आता पोस्टात काम करून त्या कॉलेजात Administration च्या पदवीक्रमाचा अभ्यास करीत आहेत  त्यांचे पती पण पोस्टात काम करणारेच आहेत  त्या म्हणाल्या, पोस्टाविषयी पुष्कळ भयानक तक्रारी आजपर्यंत मी ऐकत आले आहे  पोस्टातल्या

कामगाराविषयी लोकांचे चागले मत व्हावे यासाठी मी प्रयत्न करणार आहे माझ्या केबिनचे दार नेहमी उघडे असेल कोणीही माझ्याकडे यावे आणि मला भेटावे, असे त्या म्हणाल्या

आमच्याकडे भारतात पण साधे क्लास फोर पॅकर म्हणून कामाला लागलेले पोस्टल इन्स्पेक्टर, पोस्टमास्तर झालेले पुष्कळ आहेत ज्याला कुठेच नोकरी मिळत नाही किंवा नुसतेच शालेय शिक्षण झाले त्याला पोस्टात सहज नोकरी मिळते व असेच शेवटी पोस्टखात्याकडे वळतात बाप पोस्टात, मुलगाही पोस्टात आणि त्याचा मुलगाही पोस्टात, तर घरातले वडील चुलते पोस्टात अशी कितीतरी घराणी मला माहीत आहेत सागायचे तात्पर्य एवढेच, की अमेरिकेतली ही गोष्ट आम्हाला पण नवीन नाही, जगभर कुठेही जा, पोस्टखात्याची सगळीकडे एकच तऱ्हा

पोस्टखात्याला समातर अशी सेवा अमेरिकेत उपलब्ध आहे त्याची सेवा अमेरिकन पोस्टल सेवेपेक्षा जास्त चागल्या तऱ्हेने चालते अर्थात् चार्ज थोडा जास्त असतो आपल्याकडे पण अशा खाजगी कोरिअर सर्व्हिसेस पोस्टाची मक्तेदारी असून चालू आहे व त्यापण पोस्टापेक्षा जास्त विश्वसनीय व जलद काम करणाऱ्या ठरलेल्या आहेत

• • •

भारतात विमानाने प्रवास करण्याची सोय प्रथम टाटानी एअर इंडिया कंपनी स्थापन करून केली. टाटाची एअर इंडिया होती तेव्हा एअर इंडिया कंपनीचा दबदबा होता. एकदर व्यवस्था फार उत्तम होती. एअर इंडियाची सेवा जास्तीतजास्त उत्तम आणि सुखावह कशी करता येईल इकडे लक्ष दिले जाई. एअर होस्टेसेस, स्टूअर्डस् व विमानातली जेवणाखाण्याची व्यवस्था फार उत्तम म्हणून नावाजलेली होती. आपले भारतीय लोक बहुतेक एअर इंडियानेच प्रवास करीत असत. पण एअर इंडियाची एअर इंडिया इंटरनॅशनल होऊन त्याचे राष्ट्रीयीकरण झाले आणि उत्तम सेवा, उत्कृष्ट सेवा ही ढासळू लागली. एअर इंडिया इंटरनॅशनलने परदेशी जायला निघावे तर देशी माणसापेक्षा परदेशी माणसाकडे जास्त लक्ष देणे सुरू झाले. विमाने वेळेवर सुटेनाशी झाली. ज्यानी पूर्वी एअर इंडियाने प्रवास केला त्याना जुने दिवस आठवायला लागले. कुठेही राष्ट्रीयीकरण झाले की त्यात गलथानपणाला सुरुवात होते. तशीच स्थिती अमेरिकेत कोणत्याही गोष्टीचे राष्ट्रीयीकरण झाले की होत असावी.

अमेरिकेत पॅसिफिक साऊथ वेस्ट एअर कंपनीची विमाने उत्तम सेवेबद्दल प्रसिद्ध होती. सुरुवातीला ज्या वेळी ही कंपनी सुरू झाली, त्या वेळी फक्त दहा डॉलर्समध्ये लॉज एंजेलीस ते सान फ्रान्सिस्को जाता येत होते. पण अमेरिकन सरकारने ह्या कंपनीचे राष्ट्रीयीकरण केल्यावर एकदम दहा डॉलर्सचे ४९ डॉलर्स भाडे केले. ज्या वेळी पॅसिफिक साऊथ वेस्ट एअर होती, त्या वेळी रिझर्व्हेशन वगैरे काही भानगडी नव्हत्या. राष्ट्रीयीकरण झाल्यावर रिझर्व्हेशन आले. पूर्वी वेळेवर विमाने सुटायची. दर अर्ध्या तासाने फ्लाईट असायची. एकदर व्यवस्था फार उत्तम होती. आता लोक म्हणतात, कशाचाही काही भरवसा नाही. ' केबिनमध्ये प्रेशर कमी झालेय तर अधिक सावधानता म्हणून पॅसेंजर्सनी ऑक्सिजन मास्क तोंडावर लावावा व नंतर आपल्या मुला-बाळाच्या तोंडावर लावावा. तुमच्या सीटस् सरळ ताठ ठेवा म्हणजे जास्त सुखदायक होतील.

त्यामुळे लॅंडिंगच्या वेळी विमान उतरायच्या वेळी त्रास होणार नाही ' अशा सूचना विमान उतरायच्या वेळी देत पॅसिफिक साउथ वेस्ट एअरची विमाने खूप मोठी होती ही विमाने सोळा वर्षे उडत होती आणि सारे लोक खूष होते कॅलिफोर्नियाचे उद्योगधंद्यातले लोक Industrialist, राजकारणी, इजिनियर्स आणि इतर कितीतरी लोक दर अर्ध्या तासाने फ्लाईट जायची त्याचा उपयोग करून घ्यायचे पण सरकारीकरण झाले आणि त्याला उतरती कळा लागली

१९४९ मध्ये सॅन डिॲगोच्या पायलट स्कूलमधून एक DC 3 विमान लीजवर घेऊन कपनीने सुरुवात केली आणि थोडक्याच अवधीत सत्तावन्न जेट विमाने उडू लागली १९६० ते सत्तरच्या काळात विमानभाड्यात कन्सेशन देऊन आपली विमाने त्यानी सबध वेस्टकोस्ट आणि ईस्टकोस्टवर पसरून विमानसेवा वाढवली पण पॅसिफिक साऊथवेस्ट एअरचे सरकारीकरण झाले आणि सगळेच वातावरण बदलले जसे आपल्याकडे एअर इडिया आणि इडियन एअर लाईन्सचे झाले

● ● ●

अमेरिकेत विमानप्रवास करणे किती त्रासदायक झालेय यावर अमेरिकेनलेच एक सुप्रसिद्ध कॉलमिस्ट आर्टबुचवॉल्ड याचा लेख इथे मुद्दाम देत आहे त्यावरून आपल्याला चागलीच कल्पना येईल

*आजकाल विमानाने प्रवास करायचा म्हणजे एक गमतीचाच विषय झालाय आत्ताची विमानउड्डाणे पाहिली म्हणजे ज्यानी दुसऱ्या महायुद्धात युरोपातून विशिष्ट कार्याकरिता जी विमानउड्डाणे व्हायची ती कशा प्रकारे होत असतील याची त्याना कल्पना येईल*

*असाच मी विमानतळावरच्या प्रतीक्षागृहात एका अडगळीच्या जागेत, कोपऱ्यात माझी एअरबॅग सावरत माझ्या पत्नीला मी विमानाने निघत आहे यासबधी पत्र लिहित बसलो होतो त्या वेळी मी ग्रेगरी पेकला सपूर्ण युनिफॉर्ममध्ये एअरलाईनच्या काउटरवरून आमच्या प्रतीक्षालयाच्या दरवाजाकडे येताना पाहिले*

*अटेंशन सावधान कोणीतरी पुकारा केला*

*“ आरामात बसा ” पेक म्हणाला त्याने झटकन् नकाशाची सुरळी उलगडली व हातातली नकाशा दाखवण्याची छडी घेऊन तो म्हणाला, जरा इकडे लक्ष द्या हा एअरपोर्टचा नकाशा आहे. प्रवाशानो, मी तुम्हाला थोडक्यात विमानाच्या उड्डाणाची परिस्थिती समजावून सागायला आलो आहे परिस्थिती फार गभीर आहे आणि यातून नक्की काय निष्पन्न होणार आहे, ते सारे सशयातीत आहे म्हणून तुम्ही सर्वांनी इकडे नीट लक्ष द्यावे अशी माझी विनती आहे*

*तुम्ही इथे आहात गेट सी तुमचे विमान इथे आहे*

*ते कुठे आहे सर ? दिसत नाहीये*

" ते तुम्ही नकाशात पाहू शकणार नाही पण मी आता तुमच्याबरोबर बोलत असताना ते हँगरकडे घेऊन जात असणार कारण त्या विमानाची सपूर्ण तपासणी केल्याशिवाय ते आणले गेले होते "

' विमानच घेऊन गेल्यावर प्रवास कसा होणार ? "

पेकने नकाशाकडे लक्ष वेधून सागायला सुरुवात केली " एक विमान मिनेपोलीसवरून बाराच्या मुमारास वर आकाशात आलेले असेल आमची अपेक्षा आहे की साधारण तीनच्या सुमारास ते खाली येईल आणि त्यात मग पेट्रोल भरून चारच्या सुमारास कदाचित् ते सुटेल "

" पण ते नक्की त्या वेळी सुटेल ना ? "

" नाही कारण या विमानाला पायलट क्रचू (Crew) नाहीये ते सगळे डेट्रुआटला निघून गेलेत "

" मग आम्ही कधी बाहेर पडायच ? "

पेकने आम्हा सगळ्याकडे एकदा नजर टाकली व तो म्हणाला, ' इथे कोणी जेट चालवू शकणारा आहे का ? "

आमच्यापैकी कोणीही आपला हात वर केला नाही तेव्हा पेक म्हणाला, " तर मग तुमच्यापैकी कोणातरी दोघाना शिकायला पाहिजे "

" पण सर, तुम्ही दुसरा विमान चालवणाराचा क्रचू का आणू शकत नाही ? "

" आत्ता आमच्याजवळ एकच क्रचू आहे नाही अस नाही तो मिळण्याची शक्यतापण आहे. पण त्याना पार्किंग लॉटमध्ये जागा मिळत नाहीये मी टेक्सासमधल्या आमच्या हेडकार्टर्सला कोणीतरी पायलट पाठवा म्हणून कळवले पण टेक्सासमध्ये हवा खराब झालेली आहे आणि त्यामुळे ऑफिसमध्ये ऑर्डर अमलात आणण्याकरता कोणीही ऑफिसर नाहीयेत "

" मग तुम्ही काय करायचे ठरवलेय ? "

" मी या खोलीतल्या सर्वांना प्रत्येकी एक कुपन देतो त्यावर तुम्हाला लचचा एक छोटासा बॉक्स कॅफेटेरियात मिळेल पण त्यात बियर किंवा डाएटड्रिक्स्चा समावेश नाही कॅफेटेरीया एकदम टोकाला लगेजच्या मेरी गो राऊडच्या बाजूला आहे "

" लचनतर आम्ही विमानाची वेळ होईपर्यंत जमिनीवर झोपू शकतो ना ? " कोणीतरी विचारले

" नाही तुम्हाला या गेटवर उभे राहावे लागेल कारण विमानाचे उड्डाण केव्हा होईल ते नक्की कसे सागता येईल '

माझ्यासमोरची बाई रडायला लागली पेकने धारदार आवाजात सागितले,

रडायचे काही कारण नाही रडे आवर बाई प्रत्येकाने झटपट आवराआवर करायची आणि एअर पॅसेंजर जसे नेहमी वागतात तसेच वागायचे सार तुम्हाला माहीतच आहे.

" सर, आम्ही तुम्ही जाल तिथे तुमच्या मागे मागे येत राहू " मी म्हणालो

" आता या क्षणी माझ्याजवळ जरी क्रचू असला तरी मी कोणालाही विमानात बसवू शकणार नाही ' पेक म्हणाला

" का नाही ? "

" कारण विमानात उतरण्याकरता आता गेटच राहिले नाही इथून सारे काही शिकागोकडेच पाठविण्यात येत आहे "

" मग आता आम्ही काय करायचे ? "

" मी विमानातल्या चॅपलीनला तुमच्यापैकी प्रत्येकाला थोडक्या शब्दात सारी परिस्थिती समजावून सागायला सागितलेय आमच्याकडे पुरेसे पायलट नसतील पण आमच्याकडे उत्तम आकाश जाणणारे व्यवसायी कारभारी आहेत बर तर मग, ही झाली सकाळची भावी प्रवासाची रूपरेषा मी आता अपेक्षा करतो की, इथे तुम्ही सर्वांनी बरोबर चार वाजता पुढील हवामानाचा अदाज ऐकायला हजर असले पाहिजे "

" विमान कधी निघेल यासबधी एखादी मन उल्हसित करणारी बातमी तुमच्याजवळ नाही का ? "

" हे बघा, तुम्ही एवढे लक्षात ठेवा की जेव्हा तुम्ही अगदी एवढे वैतागून गेलेला आहात तेव्हा विमान पाच तास उशीरा सुटेल हे सागणे म्हणजे सगळा सारा डर्टी बिझिनेस आहे पण कोणाला तरी हे करायलाच पाहिजे "

• • •

अमेरिकन लोकाचे आवडते खेळ म्हणजे बास्केटबॉल, बेसबॉल, फुटबॉल

बास्केटबॉलचा स्टँड बहुतेक अमेरिकन घराच्या बॅकयार्डमध्ये रोवलेला आपल्याला दिसेल जेव्हा मुलाना वेळ मिळेल तेव्हा मुले, मुली बास्केटबॉलच्या स्टँडच्या सर्कलमधून बॉल टाकण्याची प्रॅक्टिस करताना दिसतील बास्केटबॉल हा अमेरिकन घराघरात खेळणारा खेळ झाला आहे. आपण ऑलिंपिक गेम्समध्ये पाहिले असेल की, अमेरिकन तरुण-तरुणींनी सारी बास्केटबॉलची गोल्ड मेडल्स मिळवली आहेत वेळ मिळेल तेव्हा जिकडे तिकडे मुले, मुली बास्केटबॉलची प्रॅक्टिस करीत असतात शाळेत पण दुसऱ्या यत्तेपासून बास्केटबॉल खेळ शिकवला जातो

बेसबॉल हा खेळ तर अमेरिकेत फारच लोकप्रिय आहे बेसबॉल हा बॅट व बॉलने खेळायचा असतो बेसबॉलच्या खेळाला तेथे The National Past time म्हणतात या खेळाची वर्ल्ड चॅंपियनशिपची सुरुवात कित्येक वेळा अमेरिकेचे अध्यक्ष पहिला बॉल फेकून करतात हा खेळ फार अटीतटीचा होतो आपल्याकडील क्रिकेटप्रमाणे या खेळातल्या खेळाडूना एक फार वाईट सवय असते तोंडात तबाखू ठेवून ती चघळत व थुकत ते खेळत असतात खेळताना सारख्या तबाखूच्या पिचकाऱ्या टाकतात

या खेळाचे जे मॅनेजर असतात, त्याना या खेळात फार महत्त्वाचे स्थान असते अंपायरने जर निर्णय बरोबर दिला नाही असे त्याच्या मनाने घेतले तर ते मैदानावर अंपायरशी हुज्जत घालायला येतात पण अंपायर आपण दिलेला निर्णय सहसा बदलत नाही

प्रत्येक गावातल्या क्लबस् (लिटल लीग) टीम्स् या गावातल्या कोणत्यातरी स्टोअर्सने पुरस्कृत केलेल्या असतात आपल्याकडे जशी गल्लीबोळात मुले क्रिकेट खेळतात तसे अमेरिकेत बेसबॉल खेळ खेळला जातो

यात गमत अशी की, बेसबॉलचे चेंडू हैतीमध्ये बनवले जातात आणि ग्लोव्हज्

तायवानमध्ये दुसऱ्या महायुद्धानंतर हा गेम तायवानमध्ये खेळायला अमेरिकनांनी सुरुवात केली अमेरिकन सैनिकांनी हा खेळ तायवानीज तरुणांना खेळायला शिकवला १९६० मध्ये तायवानीज अमेरिकेत बेसबॉल खेळायला आले आणि सतत तीन वर्षे त्यांनी चॅंपियनशिप मिळवली मग अमेरिकन बेसबॉल मॅनेजर्सनी बेसबॉलचे नियम आपल्याला पोषक असे बनवले त्यामुळे तायवानीज हरू लागले स्पोर्टस्मन स्पिरिट हे असे आहे

ऑगस्टपासून फुटबॉल गेम हा अमेरिकेत सर्वत्र खेळला जातो आपण टी व्ही लावला तर कुठे ना कुठे फुटबॉलची मॅच चाललेली दिसेल कोण कोणाशी खेळतय याला महत्त्व नसते पण ती पाहण्यात फार मजा असते अमेरिकन फुटबॉल हा आपल्याकडे खेळतात तसा खेळला जात नाही मैदानाच्या मध्यभागी आखलेल्या वर्तुळामध्ये फुटबॉल हा ठेवलेला असतो दोन्ही टीम्स त्याच्याभोवती कोंडाळे करून उकीडवे बसतात व खेळ सुरू झाला की तो चेंडू उचलून खेळाडू पळत सुटतो गोलच्या दिशेने प्रति पार्टीने त्याला अडवून आपल्या बाजूच्या गोलकडे तो घेऊन जायचा या खेळात झोंबाझोंबी, हमरातुमरी फार होते खेळाडू फार प्रमाणात जखमी होण्याचा संभव असतो म्हणून डोक्याला हेलमेट व तोंडावर लोखंडी जाळी लावलेली असते खेळ फारच चपळाईने खेळला जातो पुष्कळांना या खेळातले नियम वगैरे काही माहीत नसतात तरी पहायला फार मजा येते

या अमेरिकन खेळात आपल्या पार्टीच्या खेळाडूंना स्फूर्ती देण्याकरता चियर लीडर्स म्हणून एक प्रकार असतो प्रत्येक शाळा-कॉलेजातून चियर लीडर निवडले जातात चियर लीडरचे क्वालिफिकेशन म्हणजे प्रथम दिसायला अत्यंत देखणे व शरीराने चपळ असावे लागते पुष्कळ तरुण मुलींची महत्त्वाकांक्षा चियर लीडर बनण्याची असते आपल्या पार्टीने गोल केला किंवा करायला आणला की नाना प्रकारचे नाच, कसरती करून आपल्या पार्टीला जल्लोषात प्रोत्साहन देणे हे चिअर-लीडर्सचे काम

या चिअर लीडर्सना सर्व लोकांसमोर नृत्य करणे, चपळाईच्या कसरती करणे, गाणी गाणे यामुळे मॉडेलिंगच्या ऑफर्स मिळू शकतात पुढे-मागे दूरदर्शनवर, कदाचित् चित्रपटातही काम करण्याची संधी प्राप्त होते म्हणून शाळा-कॉलेजातल्या प्रत्येक देखण्या व चपळ तरुण-तरुणींची चिअर-लीडर म्हणून निवडून येण्याकरता धडपड चाललेली असते

भारतात भविष्यावर पुष्कळच लोक अवलंबून असलेले आपण पहातो ज्योतिषशास्त्र आपल्याकडे फारच प्रगतीपथावर आहे असे पुष्कळांना वाटते लग्न ठरवताना जन्मकुंडली वगैरे अगदी सुशिक्षित माणसेसुद्धा पाहात असतात अमुक ग्रह

आडवा आला आणि सध्या साडेसाती चालू आहे असले संवाद आपण दिवसानून एक-दोनदा कुठे ना कुठे तरी ऐकत असतो अगदीच नाही तर वर्तमानपत्रात येणारे आजचे भविष्य व रविवारी येणारे आठवड्याचे भविष्य शेकडा ऐंशी-नव्वद टक्के माणसे वाचत असतात अडाणी माणसेच काय, पण पुष्कळ सुशिक्षित म्हणवणारीसुद्धा फुटपाथवर बसणाऱ्या कुडमुड्या ज्योतिषाला आपला हात दाखवतात काही प्रश्नाचे उत्तर मिळण्याकरता पिंजऱ्यातल्या पोपटाच्या किंवा एखाद्या छोट्या पक्ष्याच्या चोचीतून निवडलेल्या चिठ्ठीतून काय आहे ते जाणून घेण्याचा प्रयत्न करतात याशिवाय मोठमोठे ज्योतिषी आपल्या जाहिराती वर्तमानपत्रात, मासिकात देतात व भविष्य वर्तवण्याकरता जबरदस्त फी आकारतात

अमेरिकेतही भविष्य सांगणाऱ्याची चांगलीच चलती आहे सर्वसाधारण १२०० वर्तमानपत्रात रोजच्या भविष्याकरता काही जागा खर्च केली जाते वर्तमानपत्रवाल्यांना जर गंभीरपणे कोणी विचारले, की तुमचा वर्तमानपत्रात छापणाऱ्या भविष्यावर विश्वास आहे का ? तर बहुतेक ते म्हणतील, 'नाही आमचा भविष्यावर विश्वास आहे असं काही नाही पण लोकांच्या समाधानाकरता काहीतरी त्यांना हवं असतं ते आम्ही त्यांना पुरवतो खरं म्हणजे भविष्यावर विचार करण्यात लोकांचा वेळ मजेत जात असावा म्हणून आम्ही भविष्य छापतो ' अमेरिकेतल्या एकाच्या अंदाजानुसार संबंध देशात कमीतकमी निदान दहा हजार लोक तरी ज्योतिषाच्या धंद्यावर जगत असले पाहिजेत त्यातले बहुतेक जन्मतारखेवरून गणिताच्या साह्याने कॉम्प्युटरची मदत घेऊन ग्रहांची स्थाने पक्की करून जन्मकुंडली बनवतात व सर्व काही निश्चित केल्यावर त्यावरून पुढचे दिवस चांगले का वाईट जाणार हे सांगतात भविष्यावर जसे आपल्याइकडचे पुष्कळ मंत्री-महामंत्री अवलंबून असतात, तसे अमेरिकेतही प्रकार आहेत रोनाल्ड रेगनची पत्नी नॅन्सी रेगन ज्योतिष्याचा वारंवार सल्ला घेत असते असे नुकतेच वर्तमानपत्रात आले होते

आपल्याकडे होळीच्या वेळी अभद्र शिव्यागाळी, विशेषत खालच्या वर्गात करीत असत आणि पुष्कळशा अश्लील काव्यरचनेला उत येत असे रस्तोरस्ती सभ्य स्त्री-पुरुषांना चालणे मुष्कीलीचे होई धुळवडीच्या दिवशी रंग उडविणे, गुलाल अंगभर उडवणे, चिखलाने, मातीने कपडे खराब होत म्हणून जे कोणी होळी-धुळवडीत भाग घेत नसत, त्यांना घराबाहेर पडणे कठीण होऊन बसे अशा वेळी जुनीपुराणी भांडणे उकरून काढून कित्येक ठिकाणी खून, मारामाऱ्या पण झालेल्या आहेत आता हे प्रकार हळूहळू कमी होऊ लागलेत पोलीसखात्याने त्या दिवसाकरता हुकूम काढून तंटे-बखेडे व गोंधळ पुष्कळसे आटोक्यात आणले आहेत होळी-धुळवडीच्या दिवशी सोंगे पण

घेतली जात पुरुष-स्त्री वेषात व इतर नाना तऱ्हेचे मुखवटे पण धारण करीत रस्त्याने नाच-गाणी करत हिंडत असत

अशाच प्रकारचा एक दिवस अमेरिकेत पण साजरा केला जातो पण तेथे अश्लील वा अभद्र असे काही करण्याचा रिवाज नाही फक्त दुष्ट प्रवृत्तींचे मुखवटे घालून हिंडतात अमेरिकेत तीस ऑक्टोबरला हॅलोवीनचा दिवस साजरा करतात हॅलोवीनच्या दिवशी खर म्हणजे लहान मुले निरनिराळे मुखवटे घालून सगळीकडे गावभर हिंडतात हॅलोवीनचा (Hallo ween) दिवस म्हणजे 'ऑल सेंट्स डे' 'सर्व साधुसताचा दिवस' लहान मुले निरनिराळ्या दुष्ट माणसाचे मुखवटे घालून हिंडतात सुपरमार्केटमध्ये, स्टोअर्समध्ये त्या वेळी हॅलोवीनच्या मुखवट्याचा विभाग उघडतात त्यात भुताचे, पिशाच्चाचे, हडळींचे अतिशय अक्राळविक्राळ चेहऱ्याचे, तर काही मुखवटे हातात धरायलासुद्धा लहान मुलाना भीती वाटेल इतके भयकर विद्रूप आणि क्रूर दिसणारे असतात याशिवाय जेसी जेम्स दरोडेखोराचा व समुद्रावर चाचेगिरी करणाऱ्या चाच्याचे असेही मुखवटे असतात मी, माझा मुलगा व नात सुजाता त्या आठवड्यात स्टोअर्समध्ये गेलो त्या वेळी सुजाता नेमकी हॅलोवीनचा मुखवटा घेण्याकरता मागे लागली व त्या विभागात गेल्यावर मुखवटे निवडण्याकरता मुलाची व पालकाची चिक्कार गर्दी तिथे होती अशा वेळी गमत म्हणून मुद्दाम अत्यत हिडीस व भयकर दिसणारा मुखवटा मुलाने घेतला तर सुजाता अक्षरश किंचाळ्या मारून रडू लागली जो तो गमतच करीत होता व नाना तऱ्हेचे मुखवटे घालून बघत होता विशेषत तरुण मुले-मुली एवढेच काय, मुलाचे आईबाप पण असले मुखवटे खरेदी करताना दिसत होते

हॅलोवीनचा उद्देश दुष्टाचा, दुष्ट शक्तींचा नायनाट असा असावा पण त्याचे असे विकृत स्वरूप झालेले आहे. हॅलोवीनच्या दिवशी लहान मुला-मुलींनी आपल्या ओळखीच्या ठिकाणी व नातेवाईकाकडे व शेजारीपाजारी मुखवटे घालून जायचे व त्याना भिववायचे अर्थात् सगळ्याना माहीत असते की, आपल्याकडचीच मुले आहेत, पण मुलाच्या समाधानाकरता त्याना मजा वाटण्याकरता आपण भ्यालो आहोत असे नाटक करायचे व त्याबद्दल मुलाना खाऊ म्हणून कँडीज, चॉकोलेटस् वगैरे द्यायचे मुलाचा हा खरा गमतीचा खेळ. अमेरिकन स्टोअर्स, मॉलस फूड स्टोअर्स व बहुतेक घराच्या प्रवेशद्वारात मोठ्या लाल भोपळ्याला दोन डोळे कोरलेले व भोपळ्याच्यामध्ये तोंडाचा मोठा भाग कोरून काढलेला असा भोपळा लटकवलेला असे ह्याचा अर्थ 'इडापिडा टळो व भूतपिशाच्चाला थारा नको,' असा असावा त्या दोन दिवसात मोठे लाल भोपळे खूप विक्रीला येत असत व बहुतेक अमेरिकन घराच्या दरवाजात ह्या

भोपळ्याचे दर्शन होते

ऑक्टोबरच्या तीस तारखेला हॅलोवीनचा दिवस असल्यामुळे त्या आठवड्यात वर्तमानपत्रात हॅलोवीनच्या जाहिराती येऊ लागत वर्तमानपत्रात हॅलोवीनच्या सणावर लेख येत मी ज्या वर्षी तेथे होतो त्या वेळी पुष्कळ शाळाच्या प्रिन्सिपॉलनी खास सूचना वर्तमानपत्रातून केल्या होत्या की, '' मुलानी यदा मुखवटे घालून सण साजरा करावा पण कोणाही अनोळखी माणसाकडून खाऊ, कॅडीज, गोळ्या स्वीकारू नयेत आपल्या ओळखीच्या ठिकाणी व नातलगाच्या घरी जावे ज्या शेजाऱ्याशी चागले सबध असतील त्याच्याकडेच जावे कॅडीज, चॉकोलेट्स इतर कोणीही दिल्या तर घेऊ नयेत शक्यतो आईवडिलाबरोबर जावे कारण दरवर्षी विषबाधेने मुले बेशुद्ध पडल्याची वा मेल्याची घटना काही ठिकाणी घडू लागल्या आहेत पालकानी या गोष्टींची नोंद घ्यावी '' ह्या हॅलोवीनच्या सणाचा काही दुष्ट प्रवृत्तीचे लोक निराळ्या तऱ्हेने फायदा घेऊ लागले आहेत हॅलोवीनच्या दिवशी जसे मुखवटे घालून हिंडतात, तसेच सोंगे पण घेऊन हिंडतात आत्तापर्यंत सारे खेळीमेळीने घेतले जात असे पण या गोष्टीचा फायदा काही दुष्ट बुद्धीची माणसे आपला वैयक्तिक सूड उगवण्याकरता करून घेऊ लागली काही वेळा वेष बदलून बॅकावर दरोडे पण घातले गेलेत कित्येक वेळा मानसिक विकृती असलेली व्यक्ती वेष बदलून पिस्तुलाच्या गोळ्या झाडून खूनही करू लागली बलात्कार पण होऊ लागले इतके विकृत स्वरूप ह्या हॅलोवीनच्या दिवसाला तिकडे आलेले आहे.

हॅलोवीनच्या दिवशी सध्याकाळी आमच्याकडे पण शेजारची व आसपासची मुले मुखवटे घालून आली होती त्याना सगळ्याना कॅडीज दिल्या त्याच्याबरोबर फक्त शेजारीपाजारी सुजाता जाऊन आली तिने साधाच भोपळ्याचा मुखवटा घातला होता भोपळ्याचा मुखवटा शुभ असतो बाकीच्या मुखवट्याना तीच घाबरत होती शेजारीपाजारी जाऊन आल्यावर तिने बातमी आणली की मॉलमध्ये बक्षिसे वाटताहेत व तिने मॉलमध्ये जाण्याचा हट्ट धरला मॉलमध्ये आम्ही गेलो तर सगळीकडे मुले मुखवटे घालून आपल्या आईवडिलाबरोबर हिंडत होती मोठी माणसे पण निरनिराळे वेष बदलून आलेली दिसत होती त्यात एकाने पिशाच्चाचा व एकीने हडळीचा हिडीस वेष केला होता व दोघे हातात हात घालून हिडत होते कोणी अरब व त्याची बुरखेवाली बाई अशा पोषाखात होती कोणी काही, कोणी काही, चित्र-विचित्र पोषाख केले होते एका ठिकाणी तर राक्षस, पिशाच्चे, भुते, हडळी, डाकिणी राक्षसिणी याची मिरवणूकच चालली होती त्यातच त्याना मजा वाटत होती

सुदैवाने त्या दिवशी कुठेच काही अनुचित प्रकार घडला नाही हे गावाचे नशीब

ह्या हॅलोवीनच्या सणावर पुष्कळ सूडकथा प्रसिद्ध झालेल्या आहेत त्यात अल्फ्रेड हिचकॉकने पण अत्यंत भयानक अशी निवडलेली गोष्ट मी वाचलेली आहे ह्या हॅलोवीनवर प्रथम एक चित्रपट निघाला त्यात कमालीची हिंसा दाखवली गेली होती तो लोकाना आवडल्यावर हॅलोवीन सेकंड निघाला पहिला हॅलोवीन मी पाहिला नव्हता पण हॅलोवीन सेकंड ज्या वेळी टी व्ही वर दाखवणार होते त्या वेळी मुलगा म्हणाला, हॅलोवीन सेकंड तुम्हाला बघवणार नाही, इतकी भयानक क्रूरता व हिंसा त्यात दाखवली आहे अर्थात् असे चित्रपट तिकडे रात्री अकरानंतरच दाखवतात त्यात पहिल्यापेक्षा जास्त क्रूर खून दाखवले आहेत मानसिक विकृती असलेला माणूस कुठल्या थरापर्यंत जातो याची भयानक चित्रे काढण्यात व पाहाण्यात या अमेरिकन लोकाना काय समाधान मिळते ते समजत नाही मला वाटते असे चित्रपट पहाणारे पण विकृत मनोवृत्तीचे असावेत हॅलोवीन थर्ड निघालाय असे मी ऐकलेय खरे-खोटे अमेरिकनच जाणे आत्यंतिक हिंसा व लैंगिकता अमेरिकन चित्रपटात दाखवली जाते व त्याचेच लोण आपल्याकडे येऊन पोहोचले आहे

आपल्याकडे सिनेमाच्या तिकिटाचा काळाबाजार होतो तसा काळाबाजार अमेरिकेत होत नाही आता तर तिकडे अशी परिस्थिती आहे की सिनेमागृहे मोठ्या शहरात बंद पडत चाललेली आहेत शिकागोला फिरताना मुंबईतल्या मेट्रोएवढे मोठे तिथले ' ग्रॅनाडा 'सिनेमागृह चक्क बंद असलेले दिसले सिनेमागृहावर प्रचंड धूळ साचलेली दिसली पूर्वी काय परिस्थिती होती हे कळायला काही मार्ग नाही टी व्ही व्ही सी आर शिवाय टीव्हीवर साठसत्तर चॅनल्स् असल्यावर व नवे-जुने चित्रपट व त्याच्या व्ही डी ओ कॅसेटस् भरपूर प्रमाणात उपलब्ध असल्यामुळे सिनेमागृहावर परिणाम झाला असला पाहिजे शिवाय टीव्हीवर मूव्ही चॅनेल घेतली तर दिवसाचे चोवीस तास नवे-जुने चित्रपट आलटून पालटून निरनिराळ्या वेळात दाखविले जातात लायब्ररीत तर व्ही डी ओ कॅसेटस् फुकटच वापरायला मिळतात लहान शहरात सिनेमागृहे आहेत दुपारचे वेळी निम्म्या दरात सिनेमा पहावयास मिळतो व रात्रीच्या खेळाला पूर्ण तिकिटाचे पैसे द्यावे लागतात सुपरमार्केटस्– ज्याना मॉल म्हणतात– तिथे तर दुपारचे वेळी स्त्रियाना आणि मुलाना काही ठिकाणी मोफत सिनेमा दाखवतात जाताना मॉलमध्ये चक्कर टाकून काही खरेदी होईल अशी अपेक्षा असते

अमेरिकेत गेल्यापासून दोन-तीन महिन्यात मी सिनेमागृहामध्ये चित्रपट पाहिला नव्हता अमेरिकेतली सिनेमागृहे कशी असतात याचे मला एक कुतूहल होते म्हणून मी शैलेंद्राला म्हणालो, आपण थिएटरमध्ये सिनेमा पहायला जाऊ, तेव्हा तो म्हणाला, सध्या An Officer and Gentleman हा अमेरिकन चित्रपट फार गाजत आहे आणि

तो इथे आपल्याजवळच्याच सिनेमागृहात लागलेला आहे. तो आपण पहायला जाऊ मी आणि तो सहाच्या शोला जायला निघालो ज्या टॉकीजला हा सिनेमा लागला होता, तिथे एका मोठ्या इमारतीत चार सिनेमा थिएटरे होती त्यापैकी एकाला An officer and Gentleman हा चित्रपट लागला होता मोटारगाड्या पार्क करायला भरपूर जागा होती त्या कंपाऊंडलाच सिनेमा कॉम्प्लेक्स असे नाव होते त्यात चार नंबरच्या सिनेमागृहाकडे आम्ही वळलो सिनेमाथिएटरवर अजिबात माणसे नव्हती आम्ही वळलो तिथे चालू असलेल्या सिनेमाचे पोस्टर होते शे-दोनशे सहज मावतील एवढी थिएटरबुकिंगच्या पुढे हॉलसारखी जागा होती हॉलवजा जागेत पॉपकॉर्न, आईस्क्रीम विकणाऱ्याचा मोठा स्टॉल होता तो पण निर्मनुष्य होता तिथे आम्ही गेल्यावर सहा वाजायला पाचदहा मिनिटे कमी होती स्टॉलवर एक माणूस उभा होता त्याच्याकडून पॉपकॉर्नचे दोन पुडे मागितले त्याने कच्चे पॉपकॉर्न मशीनमध्ये सोडून त्यात बटर घातले थोड्याच वेळात बटरमध्ये फ्राय करून मसालेदार पॉपकॉर्नचे पुडे कागदाच्या मोठ्या कोनमध्ये त्याने आम्हाला दिले व विचारले, ' सिनेमाची तिकिटे घेणार ना ? ' तेव्हा मुलगा म्हणाला, ' हो

तो स्टॉलमधून बाहेर पडताना म्हणाला, ' दोन डॉलर्स पॉपकॉर्नचे ' ते त्याला दिले स्टॉलमधून बाहेर पडल्यावर तो तिकीट बुकिंग ऑफिसमध्ये गेला दोन डॉलर्सचे एक तिकीट याप्रमाणे त्याने चार डॉलर्स घेऊन दोन तिकिटे दिली तो म्हणाला, सिनेमा सुरू व्हायची वेळ झालीय तेव्हा तुम्ही आत जाऊन बसा अर्धी तिकिटे फाडून त्याने आम्हाला आत सोडले आत आम्ही शिरलो त्याने दारावरचा पडदा ओढून घेतला व तो निघून गेला सिनेमाचा हॉल खूपच मोठा होता खाली स्टॉल वर बाल्कनी स्टॉल व बाल्कनी दोनच क्लास बाल्कनीमध्ये बहुधा कोणीच नसावे कारण खाली स्टॉलमध्ये पडद्याच्या अगदी जवळच्या एक दोन रांगेत एक-दोन डोकी दिसत होती बाकी थेट मागेपर्यंत सर्व खुर्च्या रिकाम्या दिसत होत्या माझा मुलगा म्हणाला, अमेरिकन प्रेक्षक पडद्याजवळच्या खुर्च्यांवर बसून सिनेमा पहातात बसून सिनेमा पहायची हौस मी म्हणालो, आपण मधे बसू थेटर चांगले स्वच्छ, उत्तम, गुबगुबीत खुर्च्या होत्या लाईटची व्यवस्था चांगली होती रंगसंगती उत्तम होती वातावरण एकदर मन प्रसन्न करणारे होते थेटर अर्थातच एअरकंडीशंड होते चित्रपट पण उत्तम आणि गाजलेला होता सिनेमा सुरू होण्याची बेल वाजली तेव्हा आणखी एक जोडपे आले व आमच्या पुढच्या रांगेत बसले त्यांच्या हातात पॉपकॉर्नचे कोन होते सिनेमाच्या जाहिराती सुरू झाल्या तेव्हा आणखी एक प्रेक्षक आला तो थेट पडद्याजवळच्या पहिल्या-दुसऱ्या रांगेत बसायला गेला

प्रथम सिनेमा सुरू झाला त्या वेळी सिनेमागृहात आम्ही दोघे धरून फक्त नऊ प्रेक्षक होते मला एकदम सदतीस-अडतीस सालची मुबईतल्या आल्फ्रेड रॉयल सिनेमा थेटराची आठवण झाली त्या वेळी दुपारच्या खेळाला अशीच पाच-सात माणसे आख्ख्या थेटरमध्ये असत व तिकिटाचा दर दोन आणे होता गर्दी नसतानाही मध्यतरात स्टेजवर बाईचा नाचही दाखवत असत अशी परिस्थिती होती

मी मुलाला विचारले की, " एवढा चागला चित्रपट असून प्रेक्षक काहीच नाहीत आणि मग हे थेटर चालते कसे आणि चालवणारे चालवतात कसे ? "

तो म्हणाला, " कुणास ठाऊक ? कदाचित् रात्रीच्या खेळाला गर्दी होत असेल त्या वेळी मात्र याच्या दुप्पट दर असतात " एकदरीत या सिनेमा थेटराचे भवितव्य कठीणच दिसतेय "

पण त्यानतर काही महिन्यान्नी गावात ' गाधी ' चित्रपट लागला त्या वेळी मात्र खूप गर्दी झाली होती अमेरिकेत गाधी चित्रपट मात्र गाजला

त्यानतर जवळ जवळ आठ वर्षांनी म्हणजे या वर्षी मी आणि माझा मुलगा एका रविवारी डॅनबरी गावात सध्याकाळी चित्रपट पहायला गेलो घरी मुलाची हॅलोवीन सणाची पार्टी होती घरात पोराचा धागडधिगा चालणार म्हणून आम्ही थेटरमध्ये चित्रपट पहायला बाहेर पडलो आमच्या रिजफिल्ड गावातले सिनेमागृह महिन्यापूर्वी कायमचे बद झालेले होते तेव्हा जवळच्या डॅनबरी गावात आम्ही चित्रपट पहाण्यास गेलो

रविवारचा दिवस सगळी स्टोअर्स, दुकाने सहाला बद होतात रस्त्यावर शुकशुकाट सुपर मार्केट्स् पण बद पण सुपरमार्केटजवळ जुळी चित्रपटगृहे होती सिनेमा थेटराजवळ गेलो तिथे लाईट वगैरे झगमगाट होता पण माणसे नव्हती नवे खेळ सात व साडेसातला होते एका सिनेमागृहात दोन सिनेमाहॉल होते एकात White Palace होता दुसऱ्यात Hot Spot होता बुकिंग-ऑफिस चालू होते दोन्ही सिनेमाचे एकच बुकिंग-ऑफीस तिकिटे विकणारी अमेरिकन गोरी तरुणी तिला आम्ही विचारले, " कोणचा सिनेमा चागला आहे ? '

ती म्हणाली, " दोन्ही चागलेच आहेत "

' तरीपण त्यातल्या त्यात ? "

ती म्हणाली, " पोस्टर पाहून तुम्हीच ठरवा मला तर दोन्ही चागले वाटतात "

मला तर गमत वाटत होती आपल्याकडे इतकी शातता व गप्पागोष्टी करायला बुकिंग क्लार्कला वेळ कुठे असतो ? आपल्याकडे पाठीमागे लाईन असती व मागचे लोक ओरडायला लागले असते, " जलदी करो भाय "

आम्ही ' हॉट स्पॉट ' सिनेमाची तिकिटे काढायचे ठरवले कारण तो सातला सुरू होणार होता तेवढ्यात तिकिटे काढण्याच्या खिडकीवर लिहिले होते, सिनीअर सिटीझन्सना अर्धा दर

मी म्हणालो, ' मी सिनीअर सिटीझन आहे. ' त्या वेळी तिने काही जास्त चौकशी न करता माझ्या मुलाचे सबध तिकिटाचे च माझे निम्मे पैसे घेऊन दोन तिकिटे दिली

सिनेमा सुरू व्हायला वेळ होता म्हणून आम्ही तेथून जवळच असलेल्या फास्टफूड रेस्टॉरटमध्ये जेवण उरकले व सिनेमागृहात आलो

सिनेमा हॉलमध्ये आम्ही धरून एकूण आठ प्रेक्षक होते

सिनेमा चागला होता त्यात सिनेसृष्टीत गाजलेला नट होता कथानक चागले होते

पण सिनेमा पहायला रविवारीही प्रेक्षकाचा तुटवडा होता

सिनेमा सपल्यावर आम्ही बाहेर पडत होतो पुढच्या खेळाला माणसे अशी दिसत नव्हती

मला आपले उगीचच वाटत होते की, या अमेरिकन सिनेमागृहाचे शेवटी काय होणार आहे कुणास ठाऊक ?

● ● ●

मुबईला फोर्टमध्ये रस्त्याने चालायला लागले की कसला न् कसला मोर्चा हमरस्त्यावरून चाललेला आपल्याला दिसतो फौंटनला हुतात्मा चौकात कित्येक वेळा कोणी ना कोणी कसल्यातरी निमित्ताने उपवासाला बसलेली मडळी आपल्याला दिसतात आम्ही वॉशिंग्टनला गेलो होतो युनायटेड स्टेट्स् ऑफ अमेरिकेच्या प्रेसिडेंटचे व्हाइट हाऊस असेच शहरात आहे प्रेसिडेंटचे व्हाईट हाऊस पहायला म्हणून आम्ही गेलो तर व्हाईट हाऊसच्या भोवती हजार-बाराशे माणसांची लाईन लागलेली होती सकाळी शक्य तितक्या लवकर आम्ही घरून निघालो होतो पण तिथे पोहोचेपर्यंत अकरा वाजलेले होते एवढ्या लाईनीत आमचा नबर कधी लागणार ? आम्ही व्हाईट हाऊस आतून पहायचे रद्द केले पण बाहेरून नुसते गाडीतूनच पहायचे ठरवले त्याकरता त्याच्याभोवती दोन चकरा मारायच्या ठरवल्या एकदर रस्त्यावर वाहने मोठ्या प्रमाणात असल्याने गाडी हळूच चाललेली होती तेव्हा व्हाईट हाऊसभोवती आपल्या मागण्या मान्य होण्यासाठी कित्येक मोर्चे ठाण देऊन बसलेले पाहिले मागण्यांची पोस्टर्स लोकांजवळ दिसत होती कित्येक व्यक्ती आपले चबूगबाळे घेऊन तिथे ठिय्या देऊन आपल्या मागण्याचा बोर्ड लावून बसलेली दिसली एकदर काय, आपल्याकडे जसे मोर्चे, उपोषणे चालतात तसाच प्रकार इथेही चालतो म्हणायचा

वॉशिंग्टनला अर्लिंग्टन राष्ट्रीय दफनभूमी आहे तिथे ऐतिहासिक प्रसिद्ध अशा वीरांचे आणि थोर अलौकिक अशा व्यक्तींचे दफन केलेले आहे धारातीर्थी पडलेल्या अज्ञात सैनिकाचे स्मारक तिथे आहे जॉन केनेडींचे दफन तिथेच करण्यात आलेले आहे, आणि त्यांच्या एका लहान मुलाचे पण तिथे एक ज्योत अखड तेवत ठेवलेली आहे या दफनभूमीत सर्वांत जास्त गर्दी केनेडींच्या दफनाची जागा पहायला जमते जास्तीतजास्त वेळ लोक केनेडींच्या दफनाच्या ठिकाणी घालवतात केनेडी अजूनही अमेरिकेन लोकप्रिय आहेत केनेडी कुटुबाविषयी अमेरिकेतल्या कुठल्या ना कुठल्या

वर्तमानपत्रात, साप्ताहिकात, मासिकात काही ना काही रोज लिहिले जाते

जॉर्ज वॉशिंग्टनचे वॉशिंग्टनमध्ये पाचशे पचावन्न फूट उच असे स्मारक उभारलेले आहे हेच काय ते एक उच असे स्मारक त्यात आतून लिफ्टने वरपर्यंत जाता येते बाकी त्याहून उच अशा इमारती वॉशिंग्टनमध्ये आपल्याला पहायला मिळणार नाहीत तिथे उच इमारती बाधायला परवानगी नसावी मी तिथे असतानाच या वॉशिंग्टन स्मारकात एक माणूस ट्रक घेऊन आला व कोणाच्या नकळत आत त्याने बॉंब व दारूगोळा नेला व पोलिसाना कळवले की, अणुबॉंब नष्ट करून अधिक शस्त्रास्त्रस्पर्धा बद करण्याचे लेखी वचन प्रेसिडेंट रोनाल्ड रेगनने द्यावे, नाही तर वॉशिंग्टन स्मारक मी उडवून टाकीन हे प्रकरण दोन दिवस टी व्ही वर व वर्तमानपत्रात गाजले अखेर त्या माथेफिरूला पोलिसानी शिताफीने अटक केली जॉर्ज वॉशिंग्टन, अब्राहम लिंकन जेफरसन व जॉन केनेडी हे प्रेसिडेंट सर्वात जास्त लोकप्रिय आहेत असे दिसते अब्राहम लिंकन व जेफरसन याचे वॉशिंग्टनमधले पुतळे प्रेक्षणीय आहेत

वॉशिंग्टनला वॉशिंग्टन स्मारकाच्या सभोवार सगळी म्युझियम्स व पाहण्यासारखी स्थळे आहेत ती दिवस दिवस पाहिली तरी सपणार नाहीत या स्थळापासून ठराविक अतरावर चिनी लोकाची मोटार व्हॅनमधली मोबाईल रेस्टॉरंट्स उभी असतात रस्त्यात उभे राहून हातात चिनी डिशेस घेऊन लोक अणि टूरिस्ट खात असतात हे सारे पाहून नरीमन पॉईंटजवळच्या रस्त्यावरच्या दुकानाची आठवण झाल्याशिवाय रहात नाही

वॉशिंग्टन शहरातून सध्याकाळी आम्ही साडेपाच-सहाच्या सुमाराला घरी परत जायला निघालो होतो आमची गाडी व्हाइट हाऊसच्या बाजूने चालली होती सगळीकडे रस्त्यात काळे लोक आपल्या पाठीवर व छातीवर आपल्या मागण्याची पोस्टर्स लावून हिंडताना दिसत होते पोलीस बदोबस्त कडक दिसत होता हाताहातावर पोलीस छड्या घेऊन उभे असलेले दिसत होते व रस्त्यावरची रहदारी कमी करण्याचा प्रयत्न करीत होते जिकडे तिकडे सामसूम व्हायला लागलेली दिसत होती दुकाने पटापट बद होत होती वातावरण तग झालेले दिसत होते मला त्या वेळी शिवसेनेच्या मोर्च्याची आठवण झाली बरोबर पावणेसहाला आम्ही नाक्यावरचे सिग्नल पास केले मोकळ्या रस्त्यावरून गाडी भरवेगाने सोडली

सध्याकाळी घरी आल्यानतर टी व्ही वर बातम्या लावल्या त्या वेळी व्हाईट हाऊस जवळ Ku Kux Klan च्या मोर्चाच्या वेळी लोकानी दगल, लुटालूट केली व दुकानाची व रस्त्यावर असणाऱ्या गाड्याची मोडतोड केल्याची दृश्ये दाखवली व शेकडो लोक जखमी झाल्याचे वृत्त सागितले गेले नुकतेच आम्ही तेथून आलो होतो

जरा वेळ झाला असता तर आमचे व आमच्या गाडीचे काय झाले असते कोण जाणे? शेवटी भारतात काय किंवा अमेरिकेत काय, दगली, मोर्चे, उपोषणे ही चालूच आहेत आणि चालू रहाणारच आहेत माणसे आहेत तिथे हे सर्व प्रकार आहेतच माणसे इथून तिथून सारखीच

वॉशिंग्टन डी सी हे शहर अमेरिकेची राजधानी अमेरिका म्हणजे न्यूयॉर्क, शिकागोला ज्या प्रचड इमारती दिसतात त्या पाहिल्या म्हणजे वाटते, वॉशिंग्टन शहरात पण प्रचड, उच्च इमारती दिसायला लागतील पण इथे उच्च इमारती अजिबात दृष्टीस पडत नाहीत पण पसरट, अतिभव्य व लाब दूरवर पसरलेल्या दिसतील राजधानीचे शहरात लोक कशाकरता आणि कसल्या कसल्या कामाला येतात याचे जर सशोधन करायचे म्हटले तर तोच एक प्रचड शोधाचा विषय होईल अमेरिकेत प्रचड-अतिप्रचड आणि भव्य-अतिभव्य हे शब्द सारखेच वापरात येतात कारण सगळ्या गोष्टींचे वर्णन करायला शब्दच मुळी अपुरे पडतील किवा नवीन शब्द निर्माण करावे लागतील आणि ते पण अपुरे पडतील कारण दर वर्षी सर्वसाधारण अडीच ते तीन कोटी लोक वॉशिंग्टनला काही ना काही कामानिमित्त भेट द्यायला आलेले असतात त्यात टूरिस्ट लोकाची सख्या धरायची नाही टूरिस्ट लोक चटकन ओळखता येतात ते बिचारे म्युझियम्स, स्मारके, सरकारी इमारती, व्हाईट हाऊस, कॅपिटॉल वगैरे पाहण्यासारखी स्थळे पाहण्यात गुग असतात ते टॅक्सीतून किवा कडक्टेड टूर्सच्या बसेसमधून प्रवास करताना दिसतात त्याचे आऽऽ वासलेले चेहरे जागोजागी दिसत असतात पण हे अडीच-तीन कोटी लोक कामाकरता आलेले असतात ते कुठे ना कुठे सरकारी, निमसरकारी ऑफिसच्या बाजूला लाईन लावून उभे असलेले दृष्टीस पडतात

इथे जर एखाद्याला सरकारी कामकाजानिमित्त पत्ता शोधून जायचे असेल तर शहरात चकरा मारण्यातच चार-पाच दिवस सहज निघून जातील समजा, पत्ता शोधून शोधून कटाळला आणि वॉशिंग्टन शहराचे गाईड विकत घ्यायचे ठरवले तरी गाईड बुक काही ऑफिसचा पत्ता सागू शकेल तर ते जवळ जवळ अशक्यच असते प्रथम कुठल्यातरी इमारतीत गेल्यावर डावीकडे जायचे की उजवीकडे जायचे हे ठरवण्यात व ठराविक ऑफिसच्या जवळून बाजूने जाऊनसुद्धा ते चटकन सापडण्यातच दिवस निघून जाईल आणि तोपर्यंत ऑफिस बद तरी झालेले असेल किंवा ऑफिसमध्ये ज्याला भेटायचे तो कुठल्यातरी मीटिंगमध्ये अडकलेला असेल आपल्या भारतात तरी काय दिसते? प्रत्येक राज्यातल्या राजधानीच्या शहरात हेच दिसून येते राजकारणी पक्षाचे विरोधी पक्षाचे कुठे ना कुठे नवीन नवीन प्रश्न निर्माण करून मडळे खाती, कचेऱ्या निर्माण करतच असतात व आपआपल्या सोयी करून ठेवत असतात तसाच प्रकार

इथेही चालतो जगात कोणी कोणास नावे ठेवायची जरूरी नाही तिकडे सर्वच मोठे आपले त्या मानाने मिनी तशा ह्या गोष्टी पण मिनीच

इथल्या सरकारी ऑफिसात सर्वसाधारण तीस ते पस्तीस लाख नोकराना चाळीस ते पचेचाळीस बिलीयन डॉलर्स पगारापायी वाटले जातात इतक्या प्रचड प्रमाणात कचेऱ्या आणि नोकरशाही इथे बसलेली आहे एक मुख्य कारण म्हणजे कायद्याचीच कायद्याकरता ही इतकी विविध खाती व त्याच्या कचेऱ्याच्या इमारती इथे उभारल्या गेलेल्या आहेत पण ज्याकरता एखादे ऑफिस उघडले गेले त्याचे महत्त्वाचे काम सपल्यानतर ते कायद्याने बद झाल्याचे मात्र दिसणार नाही जशी सरकारी नोकरी एकदा कायम झाली की कायम मग ते सरकारी खाते कधीच बद होत नाही नाव बदलले जाईल पण खाते चालूच राहते आता तस पाहिल तर Civil Defence या खात्याची काही जरूरी आहे काय ? कुठे युद्ध वगैरे चालू असेल तर Civil Defence खात्याची जरूरी आहे. पण त्याचे नाव बदलून Civil Preparedness Agency हे नाव ठेवले हे खाते आता नैसर्गिक आपत्तीकडे लक्ष पुरवते देशात वादळे, भूकप, पूर, महापूर जर कुठे होत असतील तर ( O E P ) Ottik of Emergency Preparedness झाले आणि याच ऑफिसचा आणखी एक भाग म्हणजे F D.A.A ( Federal Disaster Assistance Agency ) म्हणजे नैसर्गिक आपत्तीत सापडलेल्याचे पुनर्वसन करणे

अमेरिकन सरकारचे आरोग्य, शिक्षण आणि स्वास्थ्य Health Education and Welfare ( H E.W ) या खात्यात जवळ जवळ दीड लाखाच्यावर नोकरवर्ग आहे आणि वॉशिंग्टनमध्ये फक्त सत्तावन्न इमारतीमध्ये ही खाती पसरलेली आहेत यावरून वॉशिंग्टनमध्ये एकदर सरकारी इमारती तरी किती आहेत ही चौकशी जनरल सर्व्हिसेस ॲडमिनीस्ट्रेशनच्या ऑफिसमध्ये केली तर त्याना नक्की काहीच सागता येईना पण त्यानी माहिती पाहिजे असल्यास दीडशे डॉलर्स भरल्यावर लिस्ट देऊ म्हणून सागितले पण त्यात एकदर जगात अमेरिकन सरकारच्या इमारती आणि जर्मनीच्या किती आहेत याची पण यादी मिळू शकते म्हणून सागितले यावरून लक्षात आले की अमेरिकन सरकारच्या सर्व जगात पाच लाखावर सरकारी इमारती आहेत त्याशिवाय सी आय ए च्या बारक्यासारख्या गुप्त जागाचा त्यात समावेश नसणारच

अमेरिकेच्या एकदर कारभारात सिव्हिल सर्व्हिसमध्ये एक तपापूर्वी एक लक्ष बहात्तर हजार नोकर होते त्यात एकदर मुख्यत पाच ग्रेड्स त्यातल्या सर्वसाधारण काम करणाऱ्याला त्या वेळी ९००० डॉलर्स वार्षिक पगार मिळत होता व वरच्या पहिल्या तीन ग्रेड्समध्ये काम करणाऱ्याला ३६००० हजार वार्षिक पगार पडत होता

या तीन ग्रेड्समध्ये एकदम वरच्या पदाला पोहोचणे अगदी अशक्यच जास्तीतजास्त सवलत म्हणजे शुक्रवारी जरा लवकर ऑफिस सोडता यायचे, एवढेच

आपल्याकडे जशी वशिल्याने कामे होतात किंवा नोकरीला लावता येते असे म्हणतात, मला काही तसा अनुभव नाही पण आपल ऐकून आहे, तसा प्रकार तिकडे पण चालतो एखाद्याला सरकारी नोकरीत लावायचे असले आणि एखाद्याच्या मनात ती गोष्ट असली तर तो व्यवस्थितपणे गाजावाजा न करता करू शकतो आता त्याच्या एखाद्या मित्राला नोकरीला लावायचे असेल आणि त्याने जर समजा कुठे कॉलेजच्या मासिकात काम केले असेल आणि तात्पुरत्या बँकेच्या नोकरीचा एक-दोन महिन्याचा अनुभव असेल तर ज्याला नोकरीला लावायचेय तो थोड्याच दिवसात सरकारी प्रसिद्धीखात्यात जातो व सागतो की, आपल्याला ज्याला मासिकात थोडेफार काम केल्याचा अनुभव आहे व बँकेचे व्यवहार पाहू शकेल अशा माणसाची गरज आहे.

मग सरकारी खाते कॉम्प्युटरवर असा कोणी अर्ज केलाय का ते पहाते त्या वेळी मित्राचे नाव व पत्ता येतो व त्याला नोकरी मिळून जाते

वॉशिंग्टनमध्ये सिव्हिल सर्व्हिसमध्ये गणल्या जात नाहीत तरी पण ज्या अधिकाऱ्याच्या जागा असतात त्याची नामावली मोठी गमतीदार आहे

सेक्रेटरी टू द सेक्रेटरी

सेक्रेटरी अटेंडट टू द सेक्रेटरी

शोफर टू द सेक्रेटरी

*( शोफरला सेक्रेटरी नाही हे नशीब )*

आता Confidential

CONFIDENTIAL STAFF ASSISTANT

CONFIDENTIAL STAFF ASSISTANT TO THE ASSOCIATE DIRECTOR

CONFIDENTIAL ASSISTANT

CONFIDENTIAL STAFF ASSISTANT

सगळीकडेच CONFIDENTIAL वॉशिंग्टनमध्ये CONFIDENTIAL ASSISTANT म्हणजे कोण हे जर माहिती करून घ्यायचे असेल आणि आपण चौकशी केली तर तो तुम्हाला काहीही सागणार नाही कोणीच सागणार नाही आता आणखी असेच काही अधिकारी

ASSOCIATE DEPUTY ADMINISTRATOR

DEPUTY ASSOCIATE ADMINISTRATOR

DEPUTY ASSISTANT SECRETARY

SPECIAL ASSISTANT TO THE ASSISTANT SECRETARY

STAFF ASSISTANT TO THE DEPUTY ASSISTANT SECRETARY

ASSISTANT ADMINISTRATOR FOR ADMINISTRATION

DEPUTY ASSISTANT ADMINISTRATOR FOR ADMINISTRATION

या अधिकाऱ्यापैकी एखाद्याला जर भेटायचे असेल तर चौकशी करण्यात आणि शोधण्यात किती वेळ खर्च होईल याचा विचारच करवत नाही हे सारे सरकारी अधिकारी एकत्र पण राष्ट्रीय नोकर म्हणवून घ्यायला तयार नसतात त्याची कारणे निराळीच आहेत

वॉशिंग्टनमध्ये संरक्षणखात्यात आता लाखाच्यावर नोकर काम करतात हा नोकरवर्ग वॉशिंग्टनमध्ये ज्या निरनिराळ्या शेकडो खाजगी कंपन्या आहेत, त्यांच्याशी निरनिराळ्या प्रकारचे करारमदार करीत असतो यातल्या बहुतेक कंपन्या सरकारला फक्त सल्ला-मसलत देत असतात

सरकार सगळ्या महत्त्वाच्या प्रसंगाचे, ठरावाचे, कायद्याचे, नियमाचे आणि इतर बारीकसारीक गोष्टीचे रेकॉर्ड ठेवते वॉशिंग्टन हे अमेरिकेच्या राजधानीचे शहर आहे आणि जगात हे एक असे शहर आहे की इथे वाचणाऱ्या वाचकापेक्षा लिहिणारे लेखकच जास्त आहेत प्रत्येकजण काहीतरी लिहितच असतो त्याच्या कॉपीज काढल्या जातात, छापल्या जातात आणि प्रत्येकाला वाटल्या जातात पण प्रत्यक्ष वाचणारा मात्र कधीच दिसणार नाही

युनायटेड स्टेट्सचा वॉशिंग्टनमधला सरकारी छापखाना भरपूर शब्द कागदावर इतके छापत असतो की जगात इतकी छपाई कुठेच होत नसेल नुसती कॉंग्रेस सेशन्सचीच अत्यंत महत्त्वाची कागदपत्रे छापणे म्हणजे एक अतिप्रचंड आणि भव्य काम आहे आठशे तीस लिनोटाइप ऑपरेटर्स आणि संपादक रोज रात्र रात्र काम करीत असतात कॉंग्रेस सेशनच्या दिवसाच्या जास्त-कमी कामाची मोजणी केली तर साधारण एक दिवसात पाच लाख तरी शब्द होतात

शब्द शब्द आणि शब्द ! त्यात सगळेच काही महत्त्वाचे नसते जे अनावश्यक असते ते अक्षरश जाळले जाते आवश्यक कागद निराळे काढून फाईल करायला सरकारला वर्षाला जवळजवळ अडीच ते तीन बिलीयन डॉलर्स खर्च येतो

मुख्य गोष्ट म्हणजे कोणतीही कागदपत्रे टाकून देण्यापूर्वी सरकार त्याची

झेरॉक्स प्रत काढते तरीसुद्धा सरकार सर्व कागदपत्रे ठेवत नाही

पेंटॅगॉन हे सरकारचे गुप्त कागदपत्राचे मुख्यालय आणि तिथे रोज गुप्त खलबते चालतात आणि नष्ट केली जातात पेंटॅगॉन हे सर्व जगातले सर्वात मोठे गुप्त कागदपत्र नष्ट करण्याचे ठिकाण असावे दिवसाला साधारण दहा ते चौदा टन कागदाचा भुगा इथे केला जातो केवळ भुगाच नव्हे तर त्याचा लगदा केला जातो

अमेरिकन सरकारला कागदाचा खर्च अदाजे तीस बिलियन डॉलर्स वर्षाला येत असावा हा कागदाचा खर्च कमी कसा करता येईल याकरता सर्व सरकारी नोकराकडून दर वर्षी उपयुक्त सूचना मागवण्यात येतात व त्याकरता पुष्कळ पुरस्कार देण्यात येतात पुरस्काराचा मोठा गाजावाजा करून समारभ आयोजला जातो व त्या वेळी कॉकटेल पार्टी, लच वगैरेवर भरपूर पैसा खर्च केला जातो

वॉशिंग्टनमध्ये ऑफिसमधले एक काम सोडले तर कुठे ना कुठे जो तो जात असतो चौकशी केली तर कळते की तो साहेबाच्या खोलीत आहे. साहेब मीटिंगमध्ये आहेत कॉन्फरन्स चालू आहे लचला गेलेत दर आठवड्याला हजारो छोट्या-मोठ्या पार्ट्या चालू असतात आणि असे दिसून येते की काही लोक सगळ्या पार्ट्यांना हजेरी लावत असतात

कामधद्यापेक्षा सुखसोयींकडेच जास्त लक्ष पुरविले जाते आपल्याकडे जसा पेशवाई कारभार चालतो, थडपणे चालतो, तसाच प्रकार इथे चाललेला असतो भेटीगाठीत आणि दिवस मोकळा घालवण्याकडेच जास्त कल असतो लच म्हणजे अगदी जेवण किंवा नुसते खाणेपिणेच नसते इतरही पुष्कळ गोष्टी त्यात समाविष्ट झालेल्या असतात

बहुतेक वेळा जगातल्या कुठल्याही सरकारी खात्यात आपण काही क्षुल्लक म्हणा किंवा अतिशय महत्त्वाच्या कामाकरता जातो त्या वेळी आपल्याला सरकारी लाल फितीमुळे पुष्कळच धक्के खावे लागतात व वाटते, आपले काम कोणाच्या मध्यस्थीशिवाय अगर कुठल्यातरी सरकारी अधिकाऱ्याच्या ओळखीशिवाय होणार आहे की नाही असा सभ्रम निर्माण होतो पण पुष्कळ वेळा आपल्याला सुखद अनुभवही येतात आणि वाटते, सगळेच काही असं नाहीये वजन ठेवल्याशिवाय सहज चुटकीसरशी पण कामे होतात अडचणीत सापडलो तर मदत पण केली जाते

वॉशिंग्टनमध्ये सरकारी कचेऱ्यामध्ये चागले आणि तत्परतेने काम करणारे सरकारी नोकर पण पुष्कळ आहेत आम्ही काही सरकारी खात्यातील हेड ऑफ डिपार्टमेंटशी बोललो त्याची नावे वर्तमानपत्रात मोठ्या जाड टाइपातल्या मथळ्यात

कधीच येत नाहीत पण ते आपापल्या कामात पूर्णपणे तरबेज आहेत आणि आपली कामे यशस्वीपणे हाताळीत असतात कामे होतच असतात जगात आपण कुठेही गेलो तरी बरीवाईट माणसे ही असणारच पण चागली काम करणारी माणसे आहेत म्हणूनच जग चाललय लोकशाहीत कुठलीही राजवट राज्य करणारी येऊ दे, ती नेहमी लोकहितालाच फार महत्त्व देते

• • •

अमेरिकेत गेल्यावर आपली मुले सहसा एके ठिकाणी तीन-चार वर्षांपेक्षा जास्त गहात नाहीत अमेरिकेन राहणाऱ्या लोकांप्रमाणेच सारख्या जागा बदलत राहतात आता माझ्या मुलाचेच पहा ना प्रथम ता रॉचेस्टर विद्यापीठात पीएच् डी करायला गेला तेथे तो पीएच् डी मिळेपर्यंत राहिला फक्त साडेतीन वर्षे तेथून तो केंटकी विद्यापीठात गेला प्रथम त्याने लेक्झिंग्टन शहरात जागा भाड्याने घेतली तिथली जागा सोडून त्याने त्याच शहरात एक घर विकत घेतले लेक्झिंग्टनमध्ये तो तीन-चार वर्षे राहिला तेथून तो रिजफिल्ड या गावी राहायला आला प्रथम त्याने अपार्टमेंट विकत घेतले व वर्षभर अपार्टमेंटमध्ये राहिल्यावर ते अपार्टमेंट भाड्याने देऊन स्वत चे मोठे घर विकत घेतले आता या नवीन घरात येऊन दोन-अडीच वर्षे झाली मी नुकताच त्याच्या नवीन घरात राहून आलो तेव्हा तो म्हणाला, मी फार तर एक दोन वर्षे इथे राहीन आता हे घर तर खूप मोठे आहे एक एकराचे कपाऊंड आहे. विस्तीर्ण आवारात फुलझाडे आणि गर्द झाडी आहे फिशपॉंड आहे मुलाना खेळायला झोपाळे, मकीबार आहे रिजफील्डची हवा पण चागली आहे. जिकडे तिकडे सर्व शात, हिरवेगार, भरदार उच वृक्ष पसरलेले अधुनमधून छोटी तळी सर्व बाजूनी छोट्या-मोठ्या हिरव्यागार डोंगरानी वेढलेले न्यूयॉर्क शहर मोटारने दीड तासाच्या अतरावर मला गाव एकदम आवडले पण मुलगा म्हणतो, इथे आणखी फार तर एक दोन वर्षे राहू हाय, हायर अँड स्टिल हायर अशी इथे प्रत्येकाची धडपड चाललेली असते तरुण वय आहे तोपर्यंत जास्तीतजास्त पैसा मिळवणे आणि तो खर्च करणे हे ध्येय स्वत चे घर घेऊन राहाणे ही एक इन्व्हेस्टमेंटच घराच्या किंमती वाढण्याकडेच इथे कल आहे. त्यामुळे एक घर कायम घेऊन राहणारे इथे क्वचितच आढळतील त्याच्या काही भारतीय मित्राची घरे तर याहून कितीतरी मोठी आहेत बहुतेक भारतीय चागलेच सुस्थापित झालेले आहेत

नोकऱ्या, व्यवसाय इथे सारखे बदलत असतात आता आम्ही काय आणि

इतर कुणीही मध्यमवर्गातले भारतीय काय, एकदा एखाद्या ठिकाणी जागा घेतली तर ती आपण कधीच सोडण्याचा विचार करीत नाही तीस वर्षे आम्ही एका ठिकाणीच राहात आहोत आणि यापुढेही राहू एकदा नोकरी लागली की निवृत्त होईपर्यंत आपण आहोत त्याच ठिकाणी जागा आणि नोकऱ्या याबाबतीत आपल्याकडे पुष्कळच दुर्भिक्ष जागा आणि नोकरी सोडायची वेळ आली म्हणजे आपण शभर वेळा विचार करू तशी परिस्थिती तिथे नाही

मी प्रथमच ज्या वेळी मुलाकडे गेलो होतो तेव्हा तो लेक्झिग्टनला होता त्या वेळी मुलाला ज्या वेळी सुट्टी मिळत असे किंवा वीकएडला दोन दिवस सुट्टीचे मिळत असत तेव्हा आम्ही वॉशिंग्टनला तर कधी शिकागोला जाऊन आलो मुलाच्या शेजारी एक अमेरिकन कुटुब राहात असे ते मला म्हणाले, तुम्ही भारतातून येऊन वॉशिंग्टन, शिकागो आणि इतर पुष्कळ ठिकाणी फिरलात आमचा सारा जन्म इथे गेला पण आजपर्यंत आम्ही आमचा गाव सोडून कुठेच गेलेलो नाही तरी दोघे नवराबायको नोकरी करून पैसे मिळवीत होते सर्वसाधारण छोट्या गावातली कुटुबे गाव सोडून कुठे बाहेर जात नाहीत कारण अमेरिकेन बहुतेक शाळेचे शिक्षण सपले की गावातच नोकरी बघतात व लगेच ससाराला लागतात विद्यापीठाचे कॉलेजचे शिक्षण सहसा कोणालाच परवडत नाही कॉलेजच्या शिक्षणाला फार खर्च येतो शाळेत शिकायला फी नसते पण विद्यापीठात चार वर्षाच्या शिक्षणाला कमीत कमी लाखभर डॉलर्स सहज लागतात तेव्हा कॉलेजचे शिक्षण बहुतेक विद्यार्थी नोकरी करून करतात किवा एकाने शिकायचे व एकाने नोकरी करायची असे आळीपाळीने शिक्षण घेतात व चागल्या नोकऱ्या पटकावतात

मुलाच्या शिक्षणाकडे इथे फार लक्ष दिले जाते मूल पाच वर्षाचे झाले की शाळेत मुलाला मुलाखतीला बोलावण्यात येते आई किंवा वडील मुलाला शाळेत घेऊन जातात मुलाची आरोग्यापासून सगळ्या प्रकारची चाचणी घेण्यात येते मुलाला चित्रे काढायला सागतात ओळखायला लावतात त्याला सोपे सोपे प्रश्न विचारतात आणि नतर मुलगा अगर मुलगी शाळेत केजीच्या वर्गात जायला योग्य आहे की नाही याचा निर्णय पालकाना कळवतात समजा मूल शाळेत जायला योग्य नाही असे कळविले आणि पालकानी जर शाळेत पाठवण्याचा आग्रह धरला तर शाळा आडकाठी करत नाही मुलाला शाळेत प्रवेश दिला जातो

मुलाना शाळेत फी नाही शाळेची बस मोफत असते युनिफॉर्म नसतो वह्या-पुस्तकाचा खर्च नाही वार्षिक परीक्षा वगैरे भानगड नसते रोजच्या अभ्यासावर त्याच्या प्रगतीची नोंद शाळा ठेवते चौथी-पाचवीपर्यंत होमवर्क पण नसते शाळा

अमेरिकेत गेल्यावर आपली मुले सहसा एके ठिकाणी तीन-चार वर्षापेक्षा जास्त राहात नाहीत अमेरिकेन राहणाऱ्या लोकाप्रमाणेच सारख्या जागा बदलत राहतात आता माझ्या मुलाचेच पहा ना प्रथम ता रॉचेस्टर विद्यापीठात पीएच्. डी करायला गेला तेथे तो पीएच्. डी मिळेपर्यंत राहिला फक्त साडेतीन वर्षे तेथून तो केंटकी विद्यापीठात गेला प्रथम त्याने लेक्झिंग्टन शहरात जागा भाड्याने घेतली तिथली जागा सोडून त्याने त्याच शहरात एक घर विकत घेतले लेक्झिंग्टनमध्ये तो तीन-चार वर्षे राहिला तेथून तो रिजफिल्ड या गावी राह्यला आला प्रथम त्याने अपार्टमेंट विकत घेतले व वर्षभर अपार्टमेंटमध्ये राहिल्यावर ते अपार्टमेंट भाड्याने देऊन स्वत चे मोठे घर विकत घेतले आता या नवीन घरात येऊन दोन-अडीच वर्षे झाली मी नुकताच त्याच्या नवीन घरात राहून आलो तेव्हा तो म्हणाला, मी फार तर एक दोन वर्षे इथे राहीन आता हे घर तर खूप मोठे आहे. एक एकराचे कपाऊड आहे. विस्तीर्ण आवारात फुलझाडे आणि गर्द झाडी आहे फिशपॉंड आहे. मुलाना खेळायला झोपाळे, मकीबार आहे रिजफील्डची हवा पण चागली आहे. जिकडे तिकडे सर्व शात, हिरवेगार, भरदार उच वृक्ष पसरलेले अधुनमधून छोटी तळी सर्व बाजूनी छोट्या-मोठ्या हिरव्यागार डोंगरानी वेढलेले न्यूयॉर्क शहर मोटारने दीड तासाच्या अतरावर मला गाव एकदम आवडले पण मुलगा म्हणतो, इथे आणखी फार तर एक दोन वर्षे राहू हाय, हायर अँड स्टिल हायर अशी इथे प्रत्येकाची धडपड चाललेली असते तरुण वय आहे तोपर्यंत जास्तीतजास्त पैसा मिळवणे आणि तो खर्च करणे हे ध्येय स्वत चे घर घेऊन राहाणे ही एक इन्व्हेस्टमेंटच घराच्या किंमती वाढण्याकडेच इथे कल आहे. त्यामुळे एक घर कायम घेऊन राहणारे इथे क्वचितच आढळतील त्याच्या काही भारतीय मित्राची घरे तर याहून कितीतरी मोठी आहेत बहुतेक भारतीय चागलेच सुस्थापित झालेले आहेत

नोकऱ्या, व्यवसाय इथे सारखे बदलत असतात आता आम्ही काय आणि

इतर कुणीही मध्यमवर्गातले भारतीय काय, एकदा एखाद्या ठिकाणी जागा घेतली तर ती आपण कधीच सोडण्याचा विचार करीत नाही तीस वर्षे आम्ही एका ठिकाणीच राहात आहोत आणि यापुढेही राहू एकदा नोकरी लागली की निवृत्त होईपर्यंत आपण आहोत त्याच ठिकाणी जागा आणि नोकऱ्या याबाबतीत आपल्याकडे पुष्कळच दुर्भिक्ष जागा आणि नोकरी सोडायची वेळ आली म्हणजे आपण शभर वेळा विचार करू तशी परिस्थिती तिथे नाही

मी प्रथमच ज्या वेळी मुलाकडे गेलो होतो तेव्हा तो लेक्झिंग्टनला होता त्या वेळी मुलाला ज्या वेळी सुट्टी मिळत असे किंवा वीकएडला दोन दिवस सुट्टीचे मिळत असत तेव्हा आम्ही वॉशिंग्टनला तर कधी शिकागोला जाऊन आलो मुलाच्या शेजारी एक अमेरिकन कुटुब राहात असे ते मला म्हणाले, तुम्ही भारतातून येऊन वॉशिंग्टन, शिकागो आणि इतर पुष्कळ ठिकाणी फिरलात आमचा सारा जन्म इथे गेला पण आजपर्यंत आम्ही आमचा गाव सोडून कुठेच गेलेलो नाही तरी दोघे नवराबायको नोकरी करून पैसे मिळवीत होते सर्वसाधारण छोट्या गावातली कुटुबे गाव सोडून कुठे बाहेर जात नाहीत कारण अमेरिकेत बहुतेक शाळेचे शिक्षण सपले की गावातच नोकरी बघतात व लगेच ससाराला लागतात विद्यापीठाचे कॉलेजचे शिक्षण सहसा कोणालाच परवडत नाही कॉलेजच्या शिक्षणाला फार खर्च येतो शाळेत शिकायला फी नसते पण विद्यापीठात चार वर्षाच्या शिक्षणाला कमीत कमी लाखभर डॉलर्स सहज लागतात तेव्हा कॉलेजचे शिक्षण बहुतेक विद्यार्थी नोकरी करून करतात किंवा एकाने शिकायचे व एकाने नोकरी करायची असे आळीपाळीने शिक्षण घेतात व चागल्या नोकऱ्या पटकावतात

मुलाच्या शिक्षणाकडे इथे फार लक्ष दिले जाते मूल पाच वर्षांचे झाले की शाळेत मुलाला मुलाखतीला बोलावण्यात येते आई किंवा वडील मुलाला शाळेत घेऊन जातात मुलाची आरोग्यापासून सगळ्या प्रकारची चाचणी घेण्यात येते मुलाला चित्रे काढायला सागतात ओळखायला लावतात त्याला सोपे सोपे प्रश्न विचारतात आणि नतर मुलगा अगर मुलगी शाळेत केजीच्या वर्गात जायला योग्य आहे की नाही याचा निर्णय पालकाना कळवतात समजा मूल शाळेत जायला योग्य नाही असे कळविले आणि पालकानी जर शाळेत पाठवण्याचा आग्रह धरला तर शाळा आडकाठी करत नाही मुलाला शाळेत प्रवेश दिला जातो

मुलाना शाळेत फी नाही शाळेची बस मोफत असते युनिफॉर्म नसतो वह्या-पुस्तकाचा खर्च नाही वार्षिक परीक्षा वगैरे भानगड नसते रोजच्या अभ्यासावर त्याच्या प्रगतीची नोंद शाळा ठेवते चौथी-पाचवीपर्यंत होमवर्क पण नसते शाळा

मोठ्या प्रशस्त असतात  वर्ग खूप मोठे असतात  खेळण्याच्या सर्व सुविधा शाळेच्या विस्तीर्ण पटांगणात असतात  शाळेची लायब्ररी पण खूप मोठी असते  बारावीपर्यंत शिक्षण मोफत असते  शाळेत स्वस्त जेवणाची सोय असते  आठवड्यात रोज जेवणात कोणचे पदार्थ मिळतील हे आधीच जाहीर केलेले असते  काही शाळात मोफत जेवण पुरविले जाते  विद्यार्थ्यांच्या चळवळी इथेही असतात  एका खाजगी शाळेत युनिफॉर्मवर बडवायझरबीयरसारखी वाक्ये होती  ती बदलावीत याबद्दल विद्यार्थ्यांनी चळवळ केली शाळेत मॉयनॉरीटीला ( ब्लॅक ) अन्यायकारक वागणूक दिली जाते म्हणून पालक व विद्यार्थ्यांनी बहिष्कार टाकला होता हे मी वर्तमानपत्रात वाचले  इकडे कॉलेजला पण स्कूलच म्हटले जाते

गेल्या वर्षीपेक्षा शिक्षणाकरता या गावच्या बजेटमध्ये एक कोटी डॉलर्सची कपात सुचवली गेली तर गावात नुसता हाहा कार माजला  वर्तमानपत्रात मुलाच्या शिक्षणाचे वाटोळे करणार काय म्हणून अग्रलेख आला  वाचकाची शेकडो निषेधपत्रे आली  दहा मिलियन डॉलर्सची कपात आवश्यक का अनावश्यक, यावर नागरिकाना मत देण्याचा अधिकार आहे तेव्हा या प्रश्नावर मते घेण्यात आली  शिक्षणाच्या खर्चात कपात करू नये या करता गावात सभा घेण्यात आल्या  मुख्य म्हणजे गावाच्या अदाजपत्रकात शिक्षणावर दहा मिलियन डॉलर्सची कपात पण गावातल्या वृद्ध नागरिकाकरता खर्चाचा आकडा वाढवण्यात आला होता

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
प्रवास
ग्रा. क. ८६७
२८५४८

म्हातारी वयोवृद्ध माणसे ही आपल्याकडे अडगळ झालेली आहेत त्याना अलीकडे घरात फारसा मान असा राहिलेला नाही घरात नाही आणि बाहेर कुठेही राहिलेला नाही जोपर्यंत माणूस मिळवत असतो, तोपर्यंत त्याची किमत पचावन्न ते साठ वयात आपल्याकडे माणसे निवृत्त होतात काहीना पेन्शन मिळते व काहीना फड ग्रॅच्युइटी मिळते तेसुद्धा जे नोकरी करीत असतील त्यानाच पण अमेरिकेत वयोवृद्ध नागरिकाना सरकार पेन्शन देते त्याच्याकडे वयाच्या पासष्टाव्या वर्षी माणूस निवृत्त होतो व त्याला वयोवृद्ध नागरिकाचे विशिष्ट फायदे मिळतात त्याला जर काहीच उत्पन्न नसेल तर सरकार दर महिना पेन्शन देते त्याच्या आजारपणाचा सर्व खर्च फुकट करते त्याला हॉस्पिटलमध्ये पैसे भरावे लागत नाहीत कोणच्याही डॉक्टरला दाखवता येते व केमिस्टकडे डॉक्टरानी लिहून दिलेली औषधे मोफत मिळतात ज्याची थोडीफार मिळकत असेल त्याना सवलतीच्या दराने औषधपाण्याचा, डॉक्टरतपासणीचा इत्यादीचा खर्च मिळतो बसने, रेल्वेने अर्ध्या दरात प्रवास करता येतो साईट सिईंगला, सिनेमाला अर्धा दर पडतो काही प्रातात तर बस घरी बोलावता येते ती बस घराच्या दाराशी येते व इच्छित स्थळी पोचवते व ज्या वेळी परत जायचे असेल त्या वेळी सागितल्या वेळी येऊन घरी नेऊन सोडते बहुतेक मोठमोठ्या सुपरमार्केट्समध्ये, स्टोअर्समध्ये ठराविक दिवशी दहा टक्के सवलतीत खरेदी करता येते हॉटेल मोटेलमध्ये पण सिनिअर सिटीझन्सना ही सवलत मिळते सिनिअर सिटीझन्स ( वयोवृद्ध नागरिक ) सरकारी नोकरीत असो वा खाजगी नोकरीत असो, कुठेही तो सिनिअर सिटीझन म्हणून ओळखला जातो स्त्री-पुरुषाना दोघाना पेन्शन मिळते त्यात स्त्री-पुरुष असा भेदभाव केला जात नाही

अमेरिकेत कोणचेही काम करायला कोणी कमीपणा मानत नाहीत पुष्कळ वयोवृद्ध नागरिक निवृत्त झाल्यावरही काम करू शकत असल्यास काम करतात आणि

त्याना काम पण मिळू शकते तुमतेच घरी बसून राहण्यापेक्षा जर काही काम करता येत असेल तर ते काम करतात कामात बदल म्हणजेच विश्रांती Change of work is rest असे पुष्कळाना वाटते व आपण जे काम नेहमी करीत होतो त्यापेक्षा काहीतरी नवीन करण्याची ईर्ष्या बाळगून कुठल्यातरी आपल्या आवडत्या छंदाला ते वाहून घेतात

माझी नात सुजाता ज्या वेळी तिसऱ्या इयत्तेत शिकत होती त्या वेळी आमच्या घराच्या कपाउंडसमोर शाळेची बस उभी राह्याची खर म्हणजे शाळेची बस गल्लीच्या कोपऱ्यावर उभी राहते व तिथेच विद्यार्थ्यांनी बसची वाट पाहत उभे राहायचे असते पण शाळेचे बसड्रायव्हर होते ते निवृत्त सर्जन एका सुप्रसिद्ध हॉस्पिटलमध्ये ते प्रख्यात सर्जन होते पण निवृत्त झाल्यावर ते शाळेच्या बसचे ड्रायव्हर झाले होते विद्यार्थ्यांना ते बसने शाळेत घेऊन जायचे शाळेतल्या लहान विद्यार्थ्यांना काटेकोर नियमाप्रमाणे न वागवता आपुलकीने त्याच्या घरासमोर बस उभी करून घेऊन जात असत त्यात त्याना आनद मिळत असला पाहिजे माझी त्याची ओळख झाल्यावर ते मला म्हणाले, माझी एक मुलगी आशियात काम करते बोलायला गोड सर्वांशी मिळून मिसळून वागणारे दिसले सर्व मुलाच्या पालकाशी त्याच्या ओळखी झाल्या आहेत शाळा सरकारी व बस पण सरकारी बसचे भाडे नाही

एक सिनिअर सिटीझन न्यूयॉर्कच्या वॉल स्ट्रीटवर एका मोठ्या कपनीत मॅनेजिंग डायरेक्टर होते त्यानी एक दिवस नोकरी सोडली व रिजफील्डसारख्या वीस हजार लोकवस्तीच्या गावात येऊन फुटपाथवर हॉट डॉग विकण्याचे ठरविले ते उत्तम हॉट डॉग बनवतात पाच-सहा प्रकारचे हॉट डॉग ते बनवतात आपल्याकडे गिरगावात जशी कुलकर्ण्यांची सुकी भाजी प्रसिद्ध होती, तसे या गृहस्थाचे हॉट डॉग ग्राम पचायतीच्या परवानगीने त्यानी फुटपाथवर हॉट डॉग विकण्याचे दुकान टाकले आहे. विशेषत लच टाइमचे वेळी फुटपाथवर त्याच्या या दुकानावर चागलीच मोठी लाईन लागते ते स्वत हॉट डॉग बनवून देतात हॉट डॉगबरोबर थड पेये पण त्यानी ठेवलेली आहेत रस्त्याच्या पलीकडे वेलार्ड पार्क सार्वजनिक बाग आहे पुष्कळसे लोक कुटुबातल्या सर्वांकरता हॉट डॉगची ऑर्डर देतात गर्दीच्या वेळी एक-दोन मुली त्याना मदत करतात त्याची मुलाखत न्यूयॉर्क टाइम्स व वॉल स्ट्रीट जर्नलमध्ये प्रसिद्ध झालेली आहे

ज्याचे शरीर थकले आहे, काम करवत नाही ते घरात बसून राहतात सकाळी जवळपास फिरायला जातात व फिरून आल्यावर रोजचा पेपर वाचतात व अगदीच करमेनासे झाले तर वाचनालयात जाऊन वाचीत बसतात व त्यातून कटाळा आला तर

बागेत बसून वेळ घालवतात बहुतेक वयोवृद्ध जोडप्याना टी व्ही पहायला आवडत नाही कसले मूर्ख चाळे व नाटके करतात आणि धागडधिगा घालतात आणि या इडियट बॉक्समध्ये लोक कसे पहात बसतात याचे त्याना आश्चर्य वाटते

मी तिथे असताना एकदा बस कपनीला फोन केला मला लायब्ररीन जायचे होते. बस फोन केल्याप्रमाणे सकाळी दहा वाजना घराच्या दारासमोर येऊन उभी राहिली त्या वेळी अचानक पाऊस पडायला लागला होता मी घरातून छत्री घेतली व छत्री उघडून बसमध्ये बसायला गेलो बस ड्रायव्हरने मला लायब्ररीच्या दारात सोडले त्या वेळी मी बस ड्रायव्हरला सागितले की दुपारी दोन वाजता मला न्यायला या आमच्या घरापासून दहा मैलावर लायब्ररी आहे.

लायब्ररीत गेल्यावर मी वाचण्यात गुग होऊन गेलो घरी नेण्याकरता दोन-तीन पुस्तके आधीच घेऊन ठेवली होती मधून मधून घड्याळाकडे पहात होतो कारण बस आल्यावर बसची खोटी नको व्हायला शेवटी व्हायचे तेच झाले बस ड्रायव्हर लायब्ररीत मला बोलवायला आला मी गडबडीत पुस्तके उचलली व ड्रायव्हरबरोबर बाहेर पडून बसमध्ये बसलो

बस साधारण एक दोन मैल गेल्यावर माझ्या लक्षात आले की माझी छत्री लायब्ररीतच राहिली मला वाटू लागले ड्रायव्हरला सागावे की तसेच छत्रीविना घरी जावे पण मी ड्रायव्हरला सागितले की माझी छत्री लायब्ररीत विसरली ड्रायव्हर म्हणाले, काही हरकत नाही No Problem त्यानी परत बस लायब्ररीत आणली व थाबवली म्हणाले, सावकाश जा आणि घेऊन या धावा पळायचे काही कारण नाही मी लायब्ररीन गेलो छत्री घेतली व बसमध्ये येऊन बसलो ड्रायव्हर काहीही अपमानास्पद बोलला नाही वयोवृद्धाना सौजन्यशीलता मिळते ती अशी यात श्रीमतीचा अगर गरिबीचा प्रश्न येतो कुठे ? आपल्याकडे साधे बसमधून चढण्या-उतरण्याकरता मोठ्या दिव्यातून जावे लागते

पुण्यात गेल्या वर्षी तात्रिक विद्यालयातील विद्यार्थ्यांची मागणी होती की, नापास झालेल्या विद्यार्थ्यांना पास करावे पुष्कळ ठिकाणी अशी विद्यार्थ्यांची चळवळ सुरू होते की पेपर फार अवघड काढले गेले तर परीक्षेशिवाय पुढच्या अभ्यासक्रमाला परवानगी द्यावी या बातम्या आपण वर्तमानपत्रात वाचतो, आणि म्हणतो हे काय चाललेय ? आमच्या वेळी असे नव्हते या विद्यार्थ्यांच्या चळवळीत विद्यार्थ्यांचे पालक मात्र गप्प असतात फक्त ज्याचे पालक राजकारणात असतात ते मात्र आपल्या पाल्याकरता सक्रिय लढा देतात हे आपण पाहातच आहोत

पण ही झाली मोठ्या विद्यार्थ्यांची गोष्ट अजून हे लोण आपल्या इकडे

बालविद्यार्थ्यांपर्यंत आलेले नाहीये ही एक समाधानाची गोष्ट म्हणायला पाहिजे पण बालविद्यार्थ्यांची चळवळ ती काय करणार ? त्याच्या पालकांनीच त्यात भाग घेतला तर

अमेरिकेत मात्र आपल्या मुलाच्या शिक्षणाबाबत पालक फारच जागृत आहेत असे सध्याचे तरी चित्र दिसले दोन मे १९८८ची न्यूज टाइम्समध्ये आलेली मी बातमी वाचली, ती अशी — हेडलाईनमध्ये छापली होती Parents outraged at school methods. अतिशय संतापलेले आईबाप आपल्या मुलाना घेऊन गेनफिल्ड एलिमेंटरी स्कूलमध्ये मोर्चा घेऊन गेले आणि त्यानी शाळेच्या अधिकाऱ्याकडे तक्रार नोंदविली की त्याच्या मुलाना चुकीने ती मठ्ठ आहेत म्हणून पुढच्या वर्गात घातले नाही खर म्हणजे शाळेचा अभ्यासक्रमच एकदम कमी दर्जाचा आहे. गेल्या वर्षी उन्हाळ्यात शाळाचालकानी किंडरगार्टनमधल्या मुलाना त्याचा अभ्यासक्रम सपल्यावर पहिल्या इयत्तेत घालायला पाहिजे होते पण पहिलीचा अभ्यासक्रम त्याना झेपणार नाही म्हणून मुलाना पहिलीत पाठवलेच नाही मरीयन गुडसन, पॅट पार्कर आणि सुसान पेज ह्या पालक आया म्हणाल्या, की आमची मुले इतकी काही ' ढ ' नाहीत ती इतर मुलाप्रमाणे अगदी नॉर्मल आहेत आणि त्याचे अभ्यास पण अगदी उत्तम नसले तरी सर्वसाधारण मुलाइतके निश्चितच आहेत त्याना ते खालच्या वर्गात ठेवू शकत नाहीत मुलाच्या आया म्हणतात, मुलाकडून त्या रोज भरपूर अभ्यास करून घेतात डझनभर कागद त्याचेकडून रोज लिहून घेतले जातात त्या म्हणतात, ही मुले पद्धतशीररित्या पहिलीत जायला लायक आहेत पण जिल्ह्याचा अभ्यासक्रम जवळ जवळ दुसरी इयत्तेच्या बरोबरीचा आहे त्यामुळे सर्वसाधारण विद्यार्थ्यांची पचाईत होते जिल्ह्याचे सुपरिंटेंडट ऑफ स्कूल्स् जॉन फिट्झ सायमन म्हणतात, की आईवडिलाना दोष देण्यात किंवा जिल्ह्याच्या अभ्यासक्रमाला दोष देण्यात काहीच अर्थ नाही

• • •

अमेरिकेत वर्षभर काम केल्यावर साधारण तीन आठवड्याची सुट्टी मिळते आपल्याकडच्याप्रमाणे आपल्या मुलाना शाळा-कॉलेजाना सुट्ट्या पडल्या की कुठेतरी खंडाळा, लोणावळा, महाबळेश्वर किंवा साऊथ इंडियाची ट्रीप, काश्मीरची ट्रीप कुठेना कुठे तरी जायचे असे बेत आपण ठरवत असतो अगदीच कुठे नाही तर गावी जायचे ठरवतो त्याचप्रमाणे अमेरिकेतली कुटुंबेही सुट्टीत कुठे ना कुठे जायचे बेत आखत असतात वर्तमानपत्रात टुरिस्ट कंपन्याच्या जाहिराती येत असतात या ठिकाणी चला अमूक पहा आरामात प्रवास करा चवदार उत्कृष्ट भोजन, एअर कंडिशन्ड बस, व्ही डी ओ ची व्यवस्था वगैरे वगैरे अमेरिकेत पण टुरिस्टचा धंदा जोरात असतो राहण्याची उत्तम व्यवस्था ज्या ठिकाणी घेऊन जाणार तिथल्या स्थळाचे देखावे बिकीनी घातलेल्या सुंदर तरुणींचे फोटो समुद्रकिनाऱ्यावर पोहोण्याच्या पोषाखातल्या स्त्रीपुरुषाच्या फोटोंच्या जाहिराती तिथल्या हॉटेलाची रसभरीत वर्णने, वर्तमानपत्रात व टी व्ही वर दाखवतात आणि मग जिथे जाल तिथे नुसती ही तोबा गर्दी सगळीकडे माणसेच माणसे गर्दीच गर्दी सामानाचे आणि बॅगाचे ढीगच्या ढीग जायची गर्दी आणि यायच्या वेळी गर्दी आणि गोंधळ सगळ्यानाच सगळ्या अडचणीना तोंड देता देता वैताग आणि संताप पैसा भरपूर असेल तर सुखाची सहल, नाहीतर जगभर कुठेही जा, परत म्हणून दूर करायची नाही ही प्रत्येक वेळी आपण शपथ घेतो व परत सुट्टी आली की कुठेना कुठे जायचे बेत करतो

पण ही गोष्ट फक्त ज्याच्याजवळ थोडेफार पैसे आहेत त्याच्या बाबतीत नाहीतर आमच्या शेजारची कुटुंबे म्हणतात आमचा सारा जन्म आमच्या या गावातच गेलाय अजून आम्ही शंभर-दीडशे मैलाच्या पलीकडे कधी गेलेलो नाही सिनसिनाटीला पण आम्हाला जायला जमले नाही माझी नात स्प्रिंगफिल्डला तिसऱ्या इयत्तेत होती तेव्हा तिच्या वर्गातली मैत्रीण तिला म्हणत होती आम्ही सुट्टीत फ्लोरीडाला

जाणार आहोत तू चल आमच्याबरोबर आमचे तिकडे समरहाऊस आहे. एकूण काय इथून तिथून सगळे सारखेच आहे, फक्त स्थळे निराळी

पण सुट्टीत कित्येक वेळा घरची कामे करायची राहून गेलेली असतात घरात काही सुधारणा करणे, घराला रग लावणे ही कामे अमेरिकेत घरातलीच माणसे करतात कारण मोलमजुरीने कामे करून घेणे सहसा सामान्याना परवडत नाही अत्यत महागाचे पडते खर म्हणजे कामे करायलाच माणसेच मिळणे मुष्किलीचे झालेले आहे प्रत्येक अमेरिकन कुटुबात सुताराची हत्यारे, बागेत काम करायला लागणारी सगळी आयुधे, उपकरणे, रग लावण्याचे सामान, हातोडे पान्हे, पकडी, निरनिराळी प्लबरची हत्यारे, स्क्रू ड्रायव्हर, खिळे, पट्ट्या, मेजर टेप सगळे काही घरात ठेवावे लागते व सारे स्वत करावे लागते किवा दुसऱ्याकडून किंवा शेजाऱ्याकडून शिकून घ्यावे लागते फर्निचरसुद्धा बॉक्समध्ये मिळते ते घरी आणल्यावर सुट्टे भाग आपल्याला जोडावे लागतात टेबले, रॅकस, खुर्च्या सगळे घरी आपण जुळवायचे बागेतली कामे स्वत करायची त्यामुळे कित्येक वेळा घराची नीट व्यवस्था लावण्यात सुट्टी निघून जाते आपल्याकडे बागच नाही आणि जागाच अपुऱ्या व मनुष्यबळ वाटेल तितके त्यामुळे आपण पुष्कळसे सुखीच आहोत असे म्हटले पाहिजे अजून तरी थोडीफार खटपट केली, थोडेफार जास्त पैसे दिले तर आपली कामे तरी होतात पण अमेरिकेत स्वत कामे केल्याशिवाय चालणारच नाही

• • •

एक दिवस सध्याकाळी शैलेंद्र म्हणाला, आज आपण डागा फॅमिलीकडे गप्पा मारायला जाऊ माझा मित्र डागा म्हणून आहे त्याच्याकडे जाऊ त्याचा मित्र ऑफिसमधून यायचा होता पण इतर मडळी घरी होती मुख्य म्हणजे मित्राचे वडील दादाजी घरी होते हे दादाजी पेशाने वकील होते भारतात पन्नास वर्षे वकिली करीत होते त्याची एक मुलगी व जावई अमेरिकेतच गेली कित्येक वर्षे वास्तव्य करून होते त्याचा मुलगा शैलेंद्रचा मित्र गेली वीस वर्षे बिर्ला ग्रूपच्या एका कपनीमध्ये मॅनेजर म्हणून काम करीत होता वीस वर्षे भारतात नोकरी केल्यानतर तो अमेरिकेत आला होता इथे येऊन तो इजिनियरिंग शिकला व तीन वर्षांपूर्वी त्याने आपली फॅमिली इथे अमेरिकेत आणली त्याचा मुलुडला ब्लॉक आहे. त्याच्या पत्नीला इथे खरे म्हणजे करमत नाही मुलुडच्या मित्रमडळीची आठवण येते मुबईला कसे बरे होते इकडे कुठे शेजारी येत-जात नाहीत कुणाशी गप्पा-गोष्टी करता येत नाहीत व घरात बसून कटाळा येतो तशी भारतीय मडळीत ये-जा असते, किमान आठवड्यातून एखादे दिवशी तिला इथे फार परके वाटते आपले असे काहीच वाटत नाही

मी शैलेंद्र, अनिता, मुलासह आल्यामुळे त्याना आनद वाटला दादाजीना शैलेंद्र म्हणाला, माझे वडील व पुतणी मुबईहून आलेत त्याच्याशी तुमची ओळख करून देतो

दादाजींना मला पाहून खूप आनद झाला माझे हात हातात घेऊन त्यानी माझी विचारपूस केली व मला म्हणाले की, ' तुमचा वेळ इथे कसा काय जातो ? इथे करमते का ? '

मी म्हणालो, " माझा वेळ मजेत जातो लायब्ररीत जातो एका वेळी दोन-तीन पुस्तके आणतो पुस्तके वाचीत बसतो फिरायला जातो मुलाशी थोडा वेळ खेळतो वेळ काय ? कसा जातो तेच कळत नाही "

त्याना माझा जरा हेवा वाटला ते म्हणाले, " माझा वेळ जाता जात नाही तुम्हाला पत्ते खेळायला येतात का ? "

मी म्हणालो, " मला पत्ते खेळायला येतात एकेकाळी मी खूप पत्ते खेळलोय "

" मग येत जा ना पत्ते खेळायला आपण दोघे पत्ते खेळू, '

तेव्हा मी म्हणालो, " मला पत्ते खेळायचा कटाळा येतो आणि आता मला पत्ते खेळायला आवडत नाही "

तेव्हा ते थोडेसे नाराज झाले मग म्हणाले, " निदान गप्पा मारायला तरी येत जा "

पण तेही मला जमण्यासारखे नव्हते कारण मला फुकट गप्पा मारायला आवडत नाहीत आणि याच्याकडे रोज मला कोण आणून सोडणार ?

अमेरिकेत ज्या मुलाचे आईवडील येतात त्याना वेळ कसा घालवायचा हा मोठा प्रश्न असतो मी जिथे जिथे भारतीय कुटुबात गेलो तिथे मला प्रथम पहिला प्रश्न विचारला गेला, तो म्हणजे " तुम्हाला इथे करमते का ? तुम्ही तुमचा वेळ कसा घालवता ? "

एक गोष्ट म्हणजे मला वाचनाचा खूप नाद आहे अमेरिकेविषयी मी आधीच खूप वाचलेले आहे इथल्या लेखकाची अनेक पुस्तके मी वाचलेली आहेत व दुसरी गोष्ट अमेरिकन चित्रपट अडतीस सालापासून मी पहात आलेलो आहे. टाइम लाइफ, सॅटरडे इव्हिनिग पोष्ट सारखी साप्ताहिके, मासिके व अमेरिकन चित्रपटसृष्टीतली मासिके पण मी अगदी तरुण वयापासून वाचलेली आहेत त्यामुळे मला इथले काहीच नवीन वाटत नाही मनाने मला अमेरिका कशी आहे याची पूर्ण कल्पना केव्हाच आलेली होती फक्त इथे कधी येऊन पोहोचू याबद्दल मात्र मी साशक होतो खाण्यापिण्याच्या बाबतीत माझी कधीच तक्रार नसते मला अमेरिकेत यायला मिळते हे माझे भाग्य ते माझ्या मुलामुळे शक्य झाले पण कोणी मला इथे कायम राहायला कसे वाटेल असे विचारले तर मी नक्कीच सागेन की कायम राहाला मला मुळीच आवडणार नाही

माझ्या बरोबरीचे ऑफिसमधले काहीजण माझ्या आधीच अमेरिकेस जाऊन आलेले मला भेटले ते म्हणाले, ' तुम्हाला अमेरिकेत करमायचे नाही अहो वेळ जात नाही दोन महिन्याचा व्हिसा होता पण महिन्याभरातच परत आलो काही उद्योग असेल तर वेळ जाईल पण उद्योग तिथे तुम्हाला काय मिळणार ? "

थोड्या गप्पा-गोष्टी झाल्यावर मुलाचा मित्र ऑफिसमधून आला मुलाच्या व त्याच्या गप्पागोष्टी झाल्यावर त्याने माझी चौकशी केली

मी त्याला म्हणालो, " माझ्या मुलाने मला सांगितले की, तुम्ही बिर्ला ग्रूपच्या कंपनीमध्ये वीस वर्षे जनरल मॅनेजर होता तुमचे पुष्कळसे शिक्षण इंग्लंडमध्ये झालेय भारतातली चांगल्या मोठ्या पगाराची नोकरी सोडून तुम्ही इथे कसे काय आलात ? ' त्यांना सात-आठ हजार रुपये महिना पगार होता

तो म्हणाला, " मी इथे काही सुखासुखी आलेलो नाहीये कुणाला चांगल्या पगाराची नोकरी सोडून परदेशी कमी पगाराची नोकरी करायला सुख वाटेल ? उलट इथे मी तीन वर्षे इंजिनियरिंगमध्ये घालवली फॅमिली भारतात होती मी इथे सुरुवातीला एकटाच आलो आता बऱ्यापैकी नोकरी मिळाल्यावर सर्वांना इथे आणले सध्या पगार कमी मिळतोय पण मी सुखी आहे. "

मी म्हणालो, " ते कसे काय ?

तो म्हणाला, " कारणे पुष्कळ आहेत एक म्हणजे आपल्याकडे औद्योगिक अशांतता, कामगारांचे वारंवार होणारे संप बरें, एकच युनियन असेल तर ठीक कामगारांच्या दोन दोन युनियन्स त्यांच्यामध्ये मारामाऱ्या कोणाला खूष ठेवायचे आणि कोणाला नाराज करायचे मी शहाणपणाने राजीनामा देऊन मोकळा झालो म्हणून ठीक झाले नाहीतर नाहीतर काय झाले असते कुणास ठाऊक ? मी गेल्यानंतर आमच्या मॅनेजमेंटमधल्या एक-दोघांचे कामगारांनी खून केले

" रात्रंदिवस डोक्याला टेन्शन काही सुचायचेच नाही आता मला जो भारतात पगार मिळत होता त्यापेक्षा थोडा इथे कमी मिळतो पण मी इथे सुखी आहे. डोक्याला अजिबात टेन्शन नाही आणि हा पगार काय कायम राहणार आहे ? पैसे पण जास्त मिळतील आता आपण आपल्या देशात नाही याचे वाईट वाटते पण इथे सगळेच परदेशातून आलेले आहेत आणि अमेरिका हा मुळी परदेशीयांचाच देश आहे कोण अमेरिकन मूळचा अमेरिकन आहे ? "

● ● ●

शुक्रवारी रात्री आम्ही नेहमीप्रमाणे मॉलमध्ये हिंडलो, फिरलो घरी परत फिरताना कारमध्ये शैलेंद्र म्हणाला, " पपा, आपल्याला सर्वांना उद्या पिक्निक्ला जायचेय आमच्या स्टॅटिस्टिक्स् डिपार्टमेंटची म्हणजे फॅकल्टीमधल्या प्रोफेसराची जेकबसन पार्कला सहल जायची आहे सगळे प्रोफेसर्स त्याच्या साऱ्या कुटुंबियासह सहलीला येणार आहेत मी सहलीचा प्रमुख आहे तेव्हा मला साऱ्या सहलीची व्यवस्था करावी लागणार आहे. प्रत्येकजण आपल्या घरचे एक-दोन पदार्थ घेऊन येणार आहेत तरीपण सामुदायिक असा हॅंबर्गर बनवण्याचा एक कार्यक्रम असतो त्याकरता हॅंबर्गरला लागणारे मटण, कोळसे, चांदीच्या फॉयल्स्, कोल्डड्रिंक्स वगैरे खरेदी करायचे आहे " मी म्हणालो, " ठीक आहे त्या निमित्ताने तरी तुझ्या डिपार्टमेंटमधल्या सगळ्या प्रोफेसराच्या ओळखी होतील ही जेकबसन पार्क कुठे आली ? "

तो म्हणाला, " गावापासून जवळच आहे ! "

' मग सकाळी लवकर उठायला पाहिजे "

" हो लवकर उठायला पाहिजे आपल्याला सहलीकरता सर्व सामान विकत घ्यायचेय शिवाय विद्यापीठातून क्रॉचेट खेळाचे सामान घ्यायला पाहिजे "

दुसरे दिवशी सहलीला जायचे म्हणून मी सकाळी लवकर उठलो लवकर म्हणजे सात वाजता पण घरात कुणीच उठले नव्हते मनाशी म्हटले, सहलीला जायचेय आणि अजून कसे कोणी उठले नाही ? परत मी बेडरूममध्ये गेलो व आठ वाजेपर्यंत गादीवर आराम करीत पडलो मग मात्र उठलो सर्व विधी उरकले किचनमध्ये जाऊन मी माझा चहा करून घेतला व लिव्हिंग रूममध्ये जाऊन वाचत बसलो नऊ वाजायला आले तरी कोणी उठण्याचे चिन्ह नाही म्हटले, सहलीला जायचेय हे याच्या लक्षात आहे की नाही ?

तेवढ्यात त्याच्या बेडरूमचा दरवाजा उघडला व शैलेंद्र व अनिताने दरवाजा

उघडताच मला लिव्हिंगरुममध्ये वाचत बसलेले पाहिले व दोघेही उद्गारले, "गुड मॉर्निंगऽऽ पपाऽऽ"

"गुडमॉर्निंग, अरे आपल्याला सहलीला जायचेय ना ? लक्षात आहे ना ?

"पपा, इथे मुबई-पुण्यासारखे सहलीला लवकर निघत नाहीत आपल्याला बारा-साडेबाराला जेकबसन पार्कला पोहोचायचेय तेव्हाच आपण सगळे तिथे जाणार आहोत आता चहा-पाणी करून आपण दोघे सहलीची खरेदी करायला जाऊ तोपर्यंत अनिता चिवडा करेल "

' चिवडा कसला ? "

" राईसच्या सिरीयलचा चुरमुऱ्याचा दाणे, काजू, बदाम घालून "

मी व शैलेंद्र साडेनऊला कारने बाहेर पडलो त्याने काय खरेदी करायची याची यादीच केली होती

प्रथम आम्ही हॅंबरगरमटण खरेदी केले नतर बदामी कोळशाची पाकिटे घेतली काडेपेट्या घेतल्या केरोसीन घेतले चादीच्या पत्र्याच्या फॉयलस्ची पाकीटे घेतली कोल्डड्रिंक्स क्रेट्स घेतले व नतर विद्यापीठात जाऊन क्रॉचेट गेमचा सेट घेतला व घरी आलो तोपर्यंत साडेदहा वाजले होते अनिताचा चिवडा पण तयार झाला होता तो आम्ही खाऊन बघितला चागला झाला होता सुजाता उठली होती तिचे सगळे अनिता आवरत होती

आम्ही बारा वाजता कारने निघालो व पाऊण-एकला जेकबसन पार्कमध्ये पोहोचलो पार्क खूपच मोठी होती लाब दूरवर ठिकठिकाणी पत्र्याच्या शेडस् होत्या ठराविक पत्र्याच्या शेडच्या जवळपास गाडी पार्क केली एक-दोघेजण कुटुबियासह त्याच वेळी येत होते एकमेकाला हाय हाय करून सगळे उतरत होते माणसे जमायला नुकतीच सुरुवात झाली होती मी, अनिता व सुजाता जवळपास झोपाळे व इतर खेळ होते तिकडे गेलो पार्कच्या बाजूने नदी वाहात होती घनदाट वृक्ष पुष्कळ होते आम्ही पार्कमध्ये इकडे तिकडे खूप हिंडलो शैलेंद्र सहलीचा मुख्य होता म्हणून शेडजवळ उभा राहून येणाऱ्याचे तो स्वागत करत होता एक-सव्वापर्यंत बरीच मडळी जमली त्या वेळी आम्ही परत आलो शेडमध्ये लाबलचक लाकडी टेबल होते व टेबलाच्या बाजूला लाकडी बाके होती शेडजवळच हॅंबरगर बनवण्याचे लोखडी ग्रील होते ग्रीलमध्ये बदामी कोळसे व त्यावर रॉकेल टाकून व थोडे कागद टाकून कोळसे पेटवले गेले सगळे प्रोफेसर व त्याच्या पत्नी या कामाला लागल्या कोळसे पेटल्यावर त्यावर पत्र्याच्या फॉयलस् ठेवल्या व त्यावर हॅंबर्गर बनवण्याकरता मटणाचे थालपिठासारखे आकार थापून त्यावर ठेवले सगळेजण काम करीत होते कोणी केकस् आणले होते कोणी फळे

आणली होती कोणा भारतीयानी पुलाव बिरयाणी आणले एक चायनीज होते त्यानी एग्जरोल आणले होते कोक पेप्सीच्या बाटल्या होत्या खायला-प्यायला पुष्कळ होते माझ्या मुलाने सगळ्याशी ओळख करून दिली पाच-सहा अमेरिकन प्रोफेसर होते श्रीनिवासन्, भापकर, राजू भारतीय प्रोफेसर एका अमेरिकन् प्रोफेसरची पत्नी चिनी होती हेड ऑफ दी डिपार्टमेंट प्रोफेसर गनी म्हणून होते ते सर्वांशी खेळीमेळीने बोलत होते ग्रील पेटवण्यात व हॅंबर्गर बनवण्यात त्यानी पुढाकार घेतला होता गनी हे अतिशयच साधे होते मूळचे ज्यू, सर्व जगभर फिरून आलेले केंटकी विद्यापीठात येण्यापूर्वी ते ऑस्ट्रेलियात विद्यापीठात शिकवत होते मुख्य म्हणजे ते गांधीवादी होते

पार्कमध्ये कोणी काही चुकून खाली टाकले तरी स्वत उचलून कचऱ्याच्या टोपलीत टाकत होते दीड-दोन वाजेपर्यंत खाणे-पिणे चालले होते त्यात गिनियाहून टीचिंग असिस्टंटशिप मिळालेला एक मुस्लीम पण होता तो म्हणाला, मला हॅंबर्गर चालायचा नाही प्रत्येक पदार्थात काय घातलेय याची चौकशी करून तो खात होता त्याला मुख्य म्हणजे साख्या पोर्कचा संशय येत होता

खाणे-पिणे झाल्यावर क्रॉकेटचा खेळ खेळायला सुरुवात झाली लाकडी चेंडू व लाकडी हातोडा असतो तो ठराविक लोखंडी कमानीतून घालावयाचा सगळ्याना खेळता येण्यासारखा हा मैदानी खेळ असतो मुले, मुली घसरगुडीवर झोपाळ्यावर गेली होती स्त्रिया आपआपसात गप्पा मारत हिंडत होत्या

जेकबसन पार्कमध्ये इतरही पुष्कळजण सहली करता आलेले होते जेकबसन पार्क पण खूपच मोठे आहे निरनिराळ्या ठिकाणी ज्या पत्र्याच्या शेडस् होत्या तिथे ग्रीलवर हॅंबर्गर बनवण्याचे काम चालू होते तिकडे जो तो आपआपल्या ग्रुपमध्ये गप्पागोष्टी करण्यात, खेळ खेळण्यात, हिंडण्यात-फिरण्यात दंग होता

पण कुठेही हल्लागुल्ला, अचकटविचकट गाणी, ढोल बडवणे व आरडाओरडा करत खेळ खेळणे नव्हते कोणी कोणाची टिंगल-टवाळी करीत नव्हते बाया-मुलींची टिंगल तिथे कोणी करीत नव्हते कोणी चुंबन घेत असले तरी तिकडे कोणी बघत नाही तरुण, वयस्क, म्हातारे सगळे साधे वागतात एखाद्या म्हाताऱ्या जोडप्याला मंद संगीतावर नृत्य करावेसे वाटले तर आपणहून ते नृत्य करू लागतील तेव्हा त्याची कोणी टिंगल करणार नाही उलट टाळ्या वाजवून कौतुकच करतील इथे कोणी फुले तोडीत नाही झाडाच्या फांद्या तोडणे, नासधूस हे प्रकार कुठेही दिसत नाहीत वाटेत तिथे कोणी थुंकत नाहीत आणि आजकाल सिगारेट ओढणारे क्वचितच दिसतात

जरी निरनिराळे ग्रुप असले तरी जो तो ग्रुप आपल्याच ह्याच्यात गर्क असतो झोपाळे, घसरगुड्या, मॅकीबार्स असतात पण कुठेही गर्दी वाटत नाही किंवा खेळाकरता

नवर लावावे लागत नाहीत कुठे फेरीवाले व खाद्यपदार्थ विकणारे पण दिसत नाहीत भिकारी दिसतच नाहीत त्यामुळे कुठेही वैताग येत नाही, अगर कोणाला उद्वेग येत नाही सारे कसे हसत खेळत मजेत चाललेले असते बरोबर आणलेले खाण्यापिण्याचे सामान, फराळ, खाणे, पिणे झाल्यावर नको असलेले सामान कचरा वगैरे टाकायला जागोजागी मोठी पिंपे ठेवलेली असतात त्यात लोक अनावश्यक सामान व कचरा टाकून देतात त्यामुळे पार्क स्वच्छ राहिले होते

चार-साडेचार झाल्यावर एक एक कुटुब आपआपल्या कारकडे वळले व एकमेकाचा निरोप घ्यायला लागले आम्ही पण साडेचारला निघालो व सव्वापाच-साडेपाचपर्यंत घरी येऊन पोहोचलो

गडबड नाही गोंधळ नाही सारी थोडक्यात पण भरपूर मजा असे हे अमेरिकन पिक्निक्

• • •

सर्वसाधारण बाई गर्भार राहिली की आपल्याकडे डोहाळेजेवणे सुरू होतात नातेवाईक आणि मित्रमैत्रिणी डोहाळेजेवणाकरता पहिल्टकरणीला नरी बोलावतात पण ते पहिल्या वेळीच आणि त्या वेळी फक्त जेवणच असते पूर्वी बागेतले, झोपाळ्यावरचे वगैरे प्रकार असत पण अमेरिकन बाई गर्भार राहिली की जेवायला तर बोलावतातच पण त्याबरोबर बाईला प्रेझेंट देतात आणि पुढे जन्माला येणाऱ्या बालकाकरता पण कपडे, खेळणी वगैरे वस्तू देतात नातेवाईक बोलावतात तसे मित्रमैत्रिणी, ऑफिसातली खास मित्रमंडळी पण बोलावतात आपल्याकडे डोहाळजेवणात फक्त स्त्रिया सहभागी होतात पण अमेरिकेन पुरुषमंडळी पण भाग घेतात अमेरिकेतल्या या समारंभाला बेबी शॉवर्स म्हणतात मूल जन्मायच्या आधीच त्याचे कपडे व त्याला प्रथम लागणाऱ्या साऱ्या वस्तू घरात जमा होतात

बाईला मॅटर्निटी होममध्ये फक्त तीन दिवसच ठेवले जाते बाई बाळंत व्हायच्या वेळेला नवऱ्याला बाळंतपण पहायला सांगतात त्यात त्याचा हेतु असा असतो की बाळंतपणात बाईला किती त्रास सोसावा लागतो तो तिच्या नवऱ्याला प्रत्यक्ष पहायला मिळावा व त्यापासून त्याने काय बोध घ्यायचा तो घ्यावा पुढचे बाळंतपण येऊ द्यायचे की नाही हे तो प्रत्यक्ष पाहूनच ठरवेल बालकाचा जन्म झाल्यावर तासाभराने फक्त नवऱ्याला बालक हातात पहायला देतात त्यानंतर बाईला आणि त्या बालकाला वॉर्डात अगर तिच्या खोलीत घेऊन जातात मॅटर्निटी होममध्ये फक्त बाईला भेटता येते नवबालकाला जर पहायचे असेल तर मूल काचेच्या भितीतून दाखवतात त्याला आपल्याला घेता येत नाही स्पर्श करणे तर दूरच राहिले तीन दिवसानंतर बाईला आणि मुलाला घरी पाठवले जाते जन्मल्यानंतर बालकाचे नाव ठेवावे लागते त्याची नोंद ताबडतोब होते, बारसे वगैरे प्रकार नाही

अमेरिकेत मातृदिन पाळला जातो "MOTHERS' DAY त्याकरता

आठवडाभर आपण आपल्या प्रिय आईकरता काय घेणार ? आईकरता हे घ्या, ते घ्या, अशा जाहिराती वर्तमानपत्रात व दूरदर्शनवर झळकू लागतात मॉलमध्ये मदर्स-डे करता खास सेल लागतात शाळातून मुलाना मदर्स डे चे महत्त्व सांगितले जाते कविता, लेख येत राहातात मदर्स डेच्या दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात गावातल्या वेचक वर्गातल्या निरनिराळ्या मुलामुलींचे फोटो येतात व त्यानी आईकरता काय केले याची त्याच्या शब्दात माहिती दिलेली असते एक मुलगा म्हणतो, ' मी माझ्या आईला बेडवरच नाश्तापाणी दिले ' एक मुलगी म्हणते की, ' आईला आघोळीनतर घालायला Bath Robe विकत घेतला ' एक म्हणतो, ' मी आईला एक लाल फुलाचा गुच्छ दिला '

जसा मदर्स डे साजरा केला जातो तसा महिन्यापधरा दिवसानतर ' फादर्स डे ' पण साजरा होतो पण एवढे सगळे दिन दर वर्षी साजरे होत असूनसुद्धा वृद्ध मातापित्याचे काय करावे, हा प्रश्न अमेरिकेतल्या लोकाना सतावतच आहे. मुले मोठी झाली, मिळवायला लागली की त्याचे स्वतत्र ससार थाटले जातात किंवा मुले कामधद्यानिमित्त गावाबाहेर जातात आणि मग वृद्ध मातापित्याजवळ कोणीही राहात नाही सरकार वृद्धाना पेन्शन देते त्यात त्याचे भागू शकते तरीपण मायेचा ओलावा मिळत नाही तरुणाना इच्छा असूनही लक्ष द्यायला वेळ मिळत नाही मदर्स डे, फादर्स डेला ते फोन करून ख्याली-खुशाली विचारतात शुभेच्छाकार्डे पाठवतात व दीर्घायुरारोग्य चिंततात

अमेरिकेतलीच एक आई म्हणते, *( तिच्याच शब्दात मी सागतो, )* ' दुर्दैवाने मला एकही मुलगी झाली नाही मला सगळे मुलगेच झाले मुलगी नाहीतर नाही पण मुलाची लग्ने झाली की ते मुली आणतील आणि मग मी माझी मुलींची हौस भागवेन पण तेही खरे नाही सुनेला मुलीप्रमाणे आपण वागवायला गेले तरी मुलीचे प्रेम काही आपल्याला मिळेल याची खात्री नाही

' माझ्या सुनेला मी मुलीप्रमाणे वागवले पण तिचे खरे प्रेम तिच्या आईवडिलावर. माझा मुलगा आणि सून तिच्या घरी जेवायला जातात मुलगा त्याच्या घरी जातो त्याच्या घरी वेळ पडल्यास राहातो आणि आम्ही आपले परत एकटे राहातो मुलगा आणि सून वेगळे घर करून राहातात आमच्याकडे केवळ कर्तव्य म्हणून एखादे वेळी येतात तासभर बसतात आणि निघून जातात त्याना आपल्या घरी जायची घाई झालेली असते ते आले की म्हणतात, '' चला, लवकर गेले पाहिजे, घरी फार कामे पडलेली आहेत

'' मी माझ्या मुलाना भरपूर प्रेम दिले लहानाचे मोठे केले त्याना उत्तम शिक्षण दिले त्याना उत्तम नागरिक बनवले पण त्याचे आता आमच्यावर प्रेमच उरले नाही

आणली होती कोणा भारतीयानी पुलाव बिरयाणी आणले एक चायनीज होते त्यानी एग्जरोल आणले होते कोक पेप्सीच्या बाटल्या होत्या खायला-प्यायला पुष्कळ होते माझ्या मुलाने सगळ्याशी ओळख करून दिली पाच-सहा अमेरिकन प्रोफेसर होते श्रीनिवासन्, भापकर, राजू भारतीय प्रोफेसर एका अमेरिकन् प्रोफेसरची पत्नी चिनी होती हेड ऑफ दी डिपार्टमेंट प्रोफेसर गनी म्हणून होते ते सर्वांशी खेळीमेळीने बोलत होते ग्रील पेटवण्यात व हॅंबर्गर बनवण्यात त्यानी पुढाकार घेतला होता गनी हे अतिशयच साधे होते मूळचे ज्यू सर्व जगभर फिरून आलेले केंटकी विद्यापीठात येण्यापूर्वी ते ऑस्ट्रेलियात विद्यापीठात शिकवत होते मुख्य म्हणजे ते गाधीवादी होते

पार्कमध्ये कोणी काही चुकून खाली टाकले तरी स्वत उचलून कचऱ्याच्या टोपलीत टाकत होते दीड-दोन वाजेपर्यंत खाणे-पिणे चालले होते त्यात गिनियाहून टीचिंग असिस्टंटशिप मिळालेला एक मुस्लीम पण होता तो म्हणाला, मला हॅंबर्गर चालायचा नाही प्रत्येक पदार्थात काय घातलेय याची चौकशी करून तो खात होता त्याला मुख्य म्हणजे मारखा पोर्कचा सशय येत होता

खाणे-पिणे झाल्यावर क्रोकेटचा खेळ खेळायला सुरुवात झाली लाकडी चेंडू व लाकडी हातोडा असतो तो ठराविक लोखंडी कमानीतून घालवयाचा सगळ्याना खेळता येण्यासारखा हा मैदानी खेळ असतो मुले, मुली घसरगुंडीवर झोपाळ्यावर गेली होती स्त्रिया आपआपसात गप्पा मारत हिंडत होत्या

जेकबसन पार्कमध्ये इतरही पुष्कळजण सहली करता आलेले होते जेकबसन पार्क पण खूपच मोठे आहे. निरनिराळ्या ठिकाणी ज्या पत्र्याच्या शेडस् होत्या तिथे ग्रीलवर हॅंबर्गर बनवण्याचे काम चालू होते तिकडे जो तो आपआपल्या ग्रुपमध्ये गप्पागोष्टी करण्यात, खेळ खेळण्यात, हिंडण्यात-फिरण्यात दग होता

पण कुठेही हल्लागुल्ला, अचकटविचकट गाणी, ढोल बडवणे व आरडाओरडा करत खेळ खेळणे नव्हते कोणी कोणाची टिंगल-टवाळी करीत नव्हते बाया-मुलींची टिंगल तिथे कोणी करीत नव्हते कोणी चुबन घेत असले तरी तिकडे कोणी बघत नाही तरुण, वयस्क, म्हातारे सगळे साधे वागतात एखाद्या म्हाताऱ्या जोडप्याला मद सगीतावर नृत्य करावेसे वाटले तर आपणहून ते नृत्य करू लागतील तेव्हा त्याची कोणी टिंगल करणार नाही उलट टाळ्या वाजवून कौतुकच करतील इथे कोणी फुले तोडीत नाही झाडाच्या फाद्या तोडणे, नासधूस हे प्रकार कुठेही दिसत नाहीत वाटेत तिथे कोणी थुकत नाहीत आणि आजकाल सिगारेट ओढणारे क्वचितच दिसतात

जरी निरनिराळे ग्रुप असले तरी जो तो ग्रुप आपल्याच ह्याच्यात गर्क असतो झोपाळे, घसरगुड्या, मकीबार्स असतात पण कुठेही गर्दी वाटत नाही किंवा खेळाकरता

नबर लावावे लागत नाहीत कुठे फेरीवाले व खाद्यपदार्थ विकणारे पण दिसत नाहीत भिकारी दिसतच नाहीत त्यामुळे कुठेही वैताग येत नाही, अगर कोणाला उद्वेग येत नाही सारे कसे हसत खेळत मजेत चाललेले असते बरोबर आणलेले खाण्यापिण्याचे सामान, फराळ, खाणे, पिणे झाल्यावर नको असलेले सामान कचरा वगैरे टाकायला जागोजागी मोठी पिंपे ठेवलेली असतात त्यात लोक अनावश्यक सामान व कचरा टाकून देतात त्यामुळे पार्क स्वच्छ राहिले होते

चार-साडेचार झाल्यावर एक एक कुटुब आपआपल्या कारकडे वळले व एकमेकाचा निरोप घ्यायला लागले आम्ही पण साडेचारला निघालो व सव्वापाच-साडेपाचपर्यंत घरी येऊन पोहोचलो

गडबड नाही गोंधळ नाही सारी थोडक्यात पण भरपूर मजा असे हे अमेरिकन पिक्‌निक्

• • •

सर्वसाधारण बाई गर्भार राहिली की आपल्याकडे डोहाळेजेवणे सुरू होतात नातेवाईक आणि मित्रमैत्रिणी डोहाळेजेवणाकरता पहिलटकरणीला तरी बोलावतात पण ते पहिल्या वेळीच आणि त्या वेळी फक्त जेवणच असते पूर्वी बागेतले, झोपाळ्यावरचे वगैरे प्रकार असत पण अमेरिकन बाई गर्भार राहिली की जेवायला तर बोलावतातच पण त्याबरोबर बाईला प्रेझेंट देतात आणि पुढे जन्माला येणाऱ्या बालकाकरता पण कपडे, खेळणी वगैरे वस्तू देतात नातेवाईक बोलावतात तसे मित्रमैत्रिणी, ऑफिसातली खास मित्रमंडळी पण बोलावतात आपल्याकडे डोहाळजेवणात फक्त स्त्रिया सहभागी होतात पण अमेरिकेत पुरुषमंडळी पण भाग घेतात अमेरिकेतल्या या समारंभाला बेबी शॉवर्स म्हणतात मूल जन्मायच्या आधीच त्याचे कपडे व त्याला प्रथम लागणाऱ्या साऱ्या वस्तू घरात जमा होतात

बाईला मॅटर्निटी होममध्ये फक्त तीन दिवसच ठेवले जाते बाई बाळंत व्हायच्या वेळेला नवऱ्याला बाळंतपण पहायला सांगतात त्यात त्याचा हेतु असा असतो की बाळंतपणात बाईला किती त्रास सोसावा लागतो तो तिच्या नवऱ्याला प्रत्यक्ष पहायला मिळावा व त्यापासून त्याने काय बोध घ्यायचा तो घ्यावा पुढचे बाळंतपण येऊ द्यायचे की नाही हे तो प्रत्यक्ष पाहूनच ठरवेल बालकाचा जन्म झाल्यावर तासाभराने फक्त नवऱ्याला बालक हातात पहायला देतात त्यानंतर बाईला आणि त्या बालकाला वॉर्डात अगर तिच्या खोलीत घेऊन जातात मॅटर्निटी होममध्ये फक्त बाईला भेटता येते नवबालकाला जर पहायचे असेल तर मूल काचेच्या भिंतीतून दाखवतात त्याला आपल्याला घेता येत नाही स्पर्श करणे तर दूरच राहिले तीन दिवसानंतर बाईला आणि मुलाला घरी पाठवले जाते जन्मल्यानंतर बालकाचे नाव ठेवावे लागते त्याची नोंद ताबडतोब होते, बारसे वगैरे प्रकार नाही

अमेरिकेत मातृदिन पाळला जातो "MOTHERS' DAY' त्याकरता

आठवडाभर आपण आपल्या प्रिय आईकरता काय घेणार ? आईकरता हे घ्या, ते घ्या, अशा जाहिराती वर्तमानपत्रात व दूरदर्शनवर झळकू लागतात मॉलमध्ये मदर्स-डे करता खास सेल लागतात शाळातून मुलाना मदर्स डे चे महत्त्व सांगितले जाते कविता, लेख येत राहातात मदर्स डेच्या दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात गावातल्या वेचक वर्गातल्या निरनिराळ्या मुलामुलींचे फोटो येतात व त्यानी आईकरता काय केले याची त्याच्या शब्दात माहिती दिलेली असते एक मुलगा म्हणतो, मी माझ्या आईला बेडवरच नाश्तापाणी दिले एक मुलगी म्हणते की, आईला आंघोळीनतर घालायला Bath Robe विकत घेतला एक म्हणतो, ' मी आईला एक लाल फुलाचा गुच्छ दिला '

जसा मदर्स डे साजरा केला जातो तसा महिन्यापधरा दिवसानतर फादर्स डे पण साजरा होतो पण एवढे सगळे दिन दर वर्षी साजरे होत असूनसुद्धा वृद्ध मातापित्याचे काय करावे, हा प्रश्न अमेरिकेतल्या लोकाना सतावतच आहे. मुले मोठी झाली, मिळवायला लागली की त्याचे स्वतत्र ससार थाटले जातात किंवा मुले कामधद्यानिमित्त गावाबाहेर जातात आणि मग वृद्ध मातापित्याजवळ कोणीही राहात नाही सरकार वृद्धाना पेन्शन देते त्यात त्याचे भागू शकते तरीपण मायेचा ओलावा मिळत नाही तरुणाना इच्छा असूनही लक्ष द्यायला वेळ मिळत नाही मदर्स डे, फादर्स डेला ते फोन करून ख्याली-खुशाली विचारतात शुभेच्छाकार्डे पाठवतात व दीर्घायुरारोग्य चिंतितात

अमेरिकेतलीच एक आई म्हणते, *( तिच्याच शब्दात मी सागतो, )* दुर्दैवाने मला एकही मुलगी झाली नाही मला सगळे मुलगेच झाले मुलगी नाहीतर नाही पण मुलाची लग्ने झाली की ते मुली आणतील आणि मग मी माझी मुलींची हौस भागवेन पण तेही खरे नाही सुनेला मुलीप्रमाणे आपण वागवायला गेले तरी मुलीचे प्रेम काही आपल्याला मिळेल याची खात्री नाही

माझ्या सुनेला मी मुलीप्रमाणे वागवले पण तिचे खरे प्रेम तिच्या आईवडिलावर माझा मुलगा आणि सून तिच्या घरी जेवायला जातात मुलगा त्याच्या घरी जातो त्याच्या घरी वेळ पडल्यास राहातो आणि आम्ही आपले परत एकटे राहातो मुलगा आणि सून वेगळे घर करून राहातात आमच्याकडे केवळ कर्तव्य म्हणून एखादे वेळी येतात तासभर बसतात आणि निघून जातात त्याना आपल्या घरी जायची घाई झालेली असते ते आले की म्हणतात, ' चला, लवकर गेले पाहिजे, घरी फार कामे पडलेली आहेत

मी माझ्या मुलाना भरपूर प्रेम दिले लहानाचे मोठे केले त्याना उत्तम शिक्षण दिले त्याना उत्तम नागरिक बनवले पण त्याचे आता आमच्यावर प्रेमच उरले नाही

सगळा ओढा आपल्या पत्नीकडे आणि तिच्या आईवडिलाकडे त्याच्या घरी त्याना बरे वाटते आईला काय वाटते याची मुलाना काहीच कल्पना नाही ''

यावर तिची मैत्रीण म्हणते की, '' तू काही म्हण पण बहुतेक मुलींचा ओढा सासूपेक्षा आपल्या आईकडेच अधिक असतो Mother-in-law आणि Mother यात हाच तर फरक आहे. ''

A son is a son, Till he takes a wife

A daughter is a daughter, All her life

'' तू तुझ्या मुलाला सागून पहा, तुला काय वाटते ते त्याला विचार की तुझ्या पत्नीशी मी कसे वागावे म्हणजे तिला बरे वाटेल ''

'' जर तू तिला हे कर ते करू नकोस, मुलाना असे वागवले पाहिजे आणि तसे वागवले पाहिजे असे जर सागू लागलीस तर ते कुणालाही आवडत नाही ''

'' मुलगा आणि सून आल्यावर आपल्या साध्यागप्पा गोष्टी केल्या आणि हसतखेळत वेळ घालवला आणि त्याना आवडणाऱ्या गोष्टी बोलल्या तर ते वरचेवर येतील ''

— पण तसे होत नाही आपल्याकडे आणि अमेरिकेतही

• • •

कुत्रे पाळण्याची हौस एकतर शहरातून सुखवस्तू लोकात असते किंवा खेडेगावात शेताचे रक्षण करण्याकरता कुत्रे पाळले जातात आपल्या इथे कुत्रे पाळतात पण त्याना जेवढी शिस्त लावायची जरूरी असते तेवढी ती कुत्रे पाळणाऱ्याकडून लावली जात नाही आपल्याकडे कुत्र्याला शी करायला बाहेर रस्त्यावर घेऊन जातात पण अमेरिकन कुत्र्याने रस्त्यावर घाण केली तर ती कुत्र्याच्या मालकाला काढावी लागते आपल्याकडील कुत्रीमालक फक्त आपल्या घरातील माणसाशी कुत्रा कसा वागेल व घरात त्याने कसे वागावे इतपतच त्याला तयार करतात आमचे एक मित्र आहेत त्याच्याकडे गेले म्हणजे, त्याचे कुत्रे घरी आलेल्या पाहुण्याला मालकाशी काही बोलूच देत नाही सारखे भुकत राहाते पुष्कळ कुत्र्याना शिस्त लावलेली नसते त्यामुळे आसपास राहाणाऱ्याना त्या कुत्र्याचा खूप त्रास होतो दुसरे म्हणजे बेवारशी कुत्री अमेरिकेत रस्त्यावर कुठेही आढळणार नाहीत आपल्याकडे बेवारशी कुत्री मुबई, कलकत्ता, पुणे यासारख्या मोठ्या शहरात तर आढळतीलच पण ती रस्त्यारून चालणाऱ्याना पुष्कळ वेळा चावतात मग त्याचा त्रास कुत्रा चावलेल्या माणसाला विनाकारण भोगावा लागतो कित्येक वेळा पिसाळलेला कुत्रा चावून माणसे मृत्युमुखी पण पडली आहेत

अमेरिकेत ज्याना कुत्रे पाळायचे असते त्याना कुत्र्याला आज्ञाधारकपणा, चागल्या सवयी लावण्याकरता क्लासेसमध्ये घालावे लागते कुत्र्याच्या पण शाळा आहेत वर्तमानपत्रात यासबधी जाहिरातीवजा बातम्या छापून येतात कुत्र्याच्या मालकाना शिकवले जाते रेडिग एलिमेटरी स्कूल, विल्टन क्लासेस, केले डॉग ओबेडिअन्स स्कूल अशा शाळा डॅनबरी गावात आहेत प्रत्येक गावात अशा कुत्र्याच्या शाळा व क्लासेस चालवले जातात तीन ते साडेपाच महिने वय असलेल्या कुत्र्याना किडरगार्टनमध्ये प्रवेश दिला जातो या किंडरगार्टनमधल्या कुत्र्याना जोपासायचे कसे

त्याची काळजी कशी घ्यावी या विषयी माहिती दिली जाते त्याच्याशी संपर्क कसा साधायचा आणि त्याना चागले वळण कसे लावायचे याचे शिक्षण कुत्र्याना व मालकाना दिले जाते आठवड्यातून दोन दिवस एकदा सध्याकाळी व एकदा सकाळी असे अडीच-तीन महिने क्लासेस घेतले जातात किंडरगार्टनचे शिक्षण पुरे झाल्यावर सहा महिने व त्याहून जास्त वय झालेल्या कुत्र्याना दात कसे वापरायचे, कुणाशी कसे वागायचे, उड्या कशा मारायच्या वगैरे शिक्षण दिले जाते आपल्याकडे कुत्र्याला पोळ्या, भाकऱ्या, दूध वगैरे देतात काही कुत्र्याना मटण खायला घालतात पण अमेरिकेत कुत्र्याचे अन्न ( Dog Food ) कॅन्स्मधून विकले जाते कुत्र्याचे मालक ते कॅंड फूड विकत घेऊन कुत्र्याना देतात कुत्र्याचे अन्न शास्त्रोक्त पद्धतीने बनविलेले असते Dog Food ची दूरदर्शनवर व वर्तमानपत्रात फार मोठ्या प्रमाणात जाहिरात केलेली असते

अमेरिकेत माजरे पाळणारी पण पुष्कळ कुटुबे आहेत माजराचे कॅट फूड विकणाऱ्या पुष्कळ कपन्या आहेत आणि कॅट फूडची पण टीव्हीवर दिवसातून अनेक वेळा जाहिरात केली जाते कुत्र्या-माजराचे चोचले कसे पुरवावे आणि त्याना कौतुकाने कसे वाढवावे याच्या टीव्हीवर जाहिराती तर येतातच शिवाय पाळीव प्राण्यावर वर्तमानपत्रातून, साप्ताहिकातून लेख पण येत असतात

आता नुसती कुत्री-माजरेच नव्हेत पण घराघरातून रगीबेरगी मासे पाळणे व कपाउडमध्ये तळे असेल तर त्यात मासे सोडणे हे असतेच आपल्याकडे पण पुष्कळ उच्चमध्यम वर्गीयात हॉलमध्ये शो म्हणून माशाचे प्रदर्शन माडलेले असते त्याच्याकरता पण खास खुराक असतो तो विकत मिळतो

पुष्कळ अमेरिकन घरात पक्षी पण पाळलेले असतात त्याना पण घरातल्या घरात उडायला शिकवले जाते त्याचे पण फार कौतुक चाललेले असते आमच्या समोर मिस्टर आणि मिसेस डील्स राहात होते त्यानी पोपट पाळलेला होता तो ते जेवायचे वेळी मिसेस डीलच्या डाव्या मनगटावर येऊन बसायचा व त्या त्याला उजव्या हाताने खाऊ घालायच्या त्या पोपटाच्या चोचीतला तुकडा पण त्या खायच्या पोटच्या पोराचे जेवढे कौतुक करतो तेवढे त्या पोपटाचे कौतुक चालायचे एकदा आम्ही त्याच्याकडे जेवायला गेलो त्या वेळी ते दृश्य पाहून तर आमच्यासारख्याला किळस आली इकडे जीवजनूबद्दल इतकी काळजी घ्यायची आणि दुसरीकडे आपल्या तोंडातले पक्ष्याला ओढून घ्यायला लावायचे किंवा त्याच्या चोचीतले आपण ओढून घ्यायचे आणि नकळत प्रेमापायी एखादा नवीन रोग ओढवून घ्यायचा या अमेरिकन लोकाना काय म्हणावे हे कित्येकदा कळेनासे होते एकीकडे

कुत्री, माजरे, माने पक्षी याच्यावर दया करावी, त्याना सहानुभूतीने वागवावे, त्याचे कोडकौतुक करावे, त्याच्याकरता तयार केलेले शास्त्रोक्त अन्न त्याना द्यावे, याकरता प्रचार चालतो वर्तमानपत्रात, साप्ताहिकात त्याच्यावर लिहिले जाते पुस्तके लिहिली जातात या पाळीव प्राण्यावर कथा, कादबऱ्या पण लिहिल्या गेल्या आहेत आणि दुसरीकडे भरपूर मास भरलेल्या रसाने भरलेल्या Juicy टेंडर नाजुक तगड्या, लुसलुशीत व चटकदार ब्रेस्ट, ऑक्स टेल सूप, टग सूप, व RIBS म्हणजे बरगड्या - नुसत्या बरगड्याचे पदार्थ बनविणारी हॉटेल्स् पण आहेत बीफची जाहिरात धष्टपुष्ट मारलेली गाय दाखवून केलेली असते तगड्या, ब्रेस्टच्या जाहिराती टीव्हीवर सारख्या असतात म्हणजे एकीकडे ब्रेस्टस्, लेग्ज, रीबस्, टेल, टग ( छाती, पाय, बरगड्या, शेपूट, जीभ ) सारे काही चवीने खायचे आणि दुसरीकडे प्राण्याना सहानुभूतीने समजून घ्या, त्याच्यावर दया करा असेही म्हणायचे सारे काही अजबच

पण हल्ली पुष्कळसे अमेरिकन शाकाहारी होऊ लागलेत कारण प्राण्याना धष्टपुष्ट करण्याकरता जे खायला घातले जाते, त्यामुळे पुष्कळ प्राण्याचे मास रोगट होते ते समजून येत नाही, असे लेख येऊ लागलेत मासाहारी लोकात कॅन्सरचे प्रमाण जास्त आढळून येते प्राण्याच्या मासामध्ये असे काही द्रव्य सापडले आहे की मास खाल्यामुळे कॅन्सर होण्याची जास्त शक्यता असते असे लेख अलीकडे येऊ लागलेत आधी अमेरिकन लोक हे फार हेल्थ-कॉन्शस् असतात त्यामुळे पुष्कळसे अमेरिकन हल्ली शाकाहारी होऊ लागलेत एड्सच्या भीतीमुळे एकपत्नीव्रत स्वीकारू लागलेत थोडक्यात सनातनी ब्राह्मण होऊ पहात आहेत आपल्याकडील ब्राह्मण अमेरिकन होऊ पहात आहेत बीफ मोठ्या चवीने व आवडीने खाल्ले जाते व त्याना म्हटले, अहो, गाईचे मास कसे चालते आपणाला ? आपण हिंदु आणि त्यातून ब्राह्मण गाईचे पोटात तेहतीस कोटी देव असतात " तर उत्तर मिळते, " भारतातली गाय पवित्र असते इकडची गाय अमेरिकन आहे. तिचे मास खायला काही हरकत नाही "

• • •

दिवाळींला मी लेक्झिंग्टनला होतो दिवाळीचे दिवस असूनसुद्धा आमच्या घरात नेहमीप्रमाणेच व्यवहार चालू होते कारण दिवाळीची सुट्टी अमेरिकेत कशी काय असणार ? जो तो आपल्या नित्याच्या व्यवहारात मग्न होता मला फक्त भारतातल्या दिवाळीची आठवण येत होती आमच्या घरी मुंबईला काय चालले असेल वगैरे विचार मनात येत होते व मनात मुंबईचे दिवाळीचे दृश्य उभे राहात होते सगळीकडे रंगीत आकाशकंदील व रंगीबेरंगी दिव्यांची आरास व फटाकड्यांचे आवाज कानात घुमत होते पण इकडे सारे शांत होते पण त्याच आठवड्यात वीकएण्डला लेक्झिंग्टनमध्ये बाप्टीस्ट चर्चचा हॉल मात्र भारतीयांची दिवाळी साजरी करण्याकरता घेतला होता लेक्झिंग्टन व त्याच्या आसपास राहाणारे केटकीतले भारतीय दुपारी चार वाजता एकत्र जमणार होते व त्या निमित्ताने कार्यक्रम पण ठरवले होते प्रत्येक भारतीय कुटुंबाने एक-दोन विशिष्ट पदार्थ घरी करून तेथे हॉलमध्ये घेऊन यायचे ठरले होते आम्ही चिवडा, लाडू तयार करून घेऊन गेलो होतो पिण्याकरता कोकच्या पेप्सीच्या ५०० मिलीलिटरच्या दोन बाटल्या घेतल्या होत्या

हॉलमध्ये रंगीबेरंगी पताका, फुगे व माळा लावून हॉल सजवला होता बहुतेक तरुण-तरुणी, मुले-मुली भारतीय पोशाखात जमा झाले स्त्रिया भरजरी साड्या, शालू नेसून दागदागिने घालून आल्या होत्या व पुरुषवर्ग झब्बा, पायजमा, कुडते व सलवारीमध्ये होते या भारतीयांच्या संमेलनामध्ये पुष्कळसे भारतीय अमेरिकन, चिनी, काळे बांगलादेशीय तरुण-तरुणी आपले परदेशी मित्र मैत्रिणींना घेऊन आले होते

गणपती, दुर्गादेवी यांच्या तसबिरी होत्या त्यांना फुलांचे हार घातले होते उदबत्त्या लावल्या होत्या निरांजने पेटवून ठेवली होती आरतीकरता कोणी झांजा व घंटा पण आणल्या होत्या प्रथम गणपतीची आरती झाली त्यानंतर ' ओम जय जगदीश हरे ' हे आरतीचे गाणे मिसेस खान या बांगलादेशीय तरुणीने गायले इथे

भारत, पाकिस्तान, बागला देशीय असे कोणी काही मानीत नाहीत सारे गुण्या-गोविदाने एकत्र जमतात इथे प्रातीयतेला पण वाव नसतो भारतातले सर्व प्रातीय जमा होतात साधारण सव्वाशे-दीडशे मडळी जमा झाली होती ओम जय जगदीश हरे' गाऊन झाल्यावर त्या तरुणीने आणखी एक बागला गीत गायले त्यानतर काही मुलामुलींनी गायन व नृत्य केले तबला, पेटी, सारगी सगळी भारतीय वाद्ये होती मुख्य दर्जेदार गाणी झाल्यावर मास्टर भगवानची लोकप्रिय गाणी 'शोला जो भडके टाइप गाणी झाली कोणी सिनेमातल्या लोकप्रिय कवाल्या गायल्या 'काले काले बालोंमे, गोरे गोरे गालोमे' झाले

गाणी, नृत्ये झाल्यानतर खाण्यापिण्याचा कार्यक्रम योजला होता सर्व कुटुबियानी आणलेले खाद्यपदार्थ टेबलावर ठेवले होते कागदाच्या डिशेस् व प्लास्टिकच्या काट्या– चमच्यानी आपल्याला आवडतील ते पदार्थ घ्यायचे थड पेयाकरता कागदी पेले होते कोणी काय पाहिजे ते घ्यावे व कुठेही बसून खावे खातापिता एकमेकाच्या ओळखी करून घ्याव्या त्या वर्षी भारतातून केंटकी विद्यापीठात शिकण्याकरता नवे विद्यार्थी आले होते ते सर्वांशी ओळखी करून घेत होते मुबईत गोरेगावला राहाणारा विद्यार्थी भेटला थडीचे दिवस होते बिचारा नुसरा पँट, शर्ट घालून आला होता त्याला इथल्या हवामानाची कल्पना नव्हती कुलकर्णी, देशपाडे, गागल, टिळक, भापकर, देव अशी पुष्कळ मराठी मडळी होती तशी श्रीनिवासन, अय्यर, राव, राजू अशी साऊथ इडियन पण होती पजाबी, काश्मिरी होते, खाणे-पिणे झाल्यावर कोणी पत्ते खेळायला बसले, कोणी गप्पा मारीत बसले आम्ही नवीन ओळखी करून गप्पा मारल्या व एकमेकाना आमत्रणे करून रात्री आठ वाजता घरी परतलो

रविवारी शैलेंद्रचे मित्र करण कौल व कीर्ती कौल यानी आम्हाला दिवाळीनिमित्त घरी जेवावयास बोलावले करण कौल हे श्रीनगरचे रहिवासी याना गाण्याची फार हौस, केटकी विद्यापीठात ते शिकवतात त्याची पत्नी कीर्ती कौल ह्या मध्यप्रदेशातल्या माहेरचे आडनाव टोपे त्याना थोडेफार मराठी बोलता येते व समजते त्याना रजत व विक्रम हे जुळे मुलगे त्याचे आमच्या घरी पुष्कळ जाणे-येणे आम्ही त्याचेकडे दिवाळीचे जेवावयास गेलो तर कीर्ती कौलने मला व शैलेंद्रला ओवाळले व कुकूमतिलक लावले कारण दिवाळी साजरी करायची ना जेवायला खास रव्याचे लाडू केले होते पण फार कडक झाले होते तिला माहीत होते की लाडू फार कडक आलेत म्हणून ती म्हणाली, लाडू बरोबर हातोडा पण द्यायला पाहिजे लाडू फोडण्याकरता तिने प्रथम प्रयोग करून पाहिला होता व त्याची तिला जाणीव होती इतर मिठाई पण होती

पण सगळे सारे खेळीमेळीने दिवाळीच्या भारतातल्या घरच्या आठवणी आम्ही एकमेकाला सागत होतो

अशी ही अमेरिकेतली भारतीयाची दिवाळी जगाच्या पाठीवर आपण कुठेही असलो तरी घरच्या आठवणी होतच राहाणार आणि समजा, भारतात दिवाळी साजरी केली तरी अमेरिकेतल्या दिवाळीच्या आठवणी येतच राहाणार

● ● ●

आपल्याकडे अत्यंत दुर्लक्षित असलेली गोष्ट जर कोणाची असेल तर गावातले वाचनालय कुठेही गावाचे वर्णन करण्याची वेळ आली की त्यात गावातल्या वाचनालयासंबंधी विशेष कोणी लिहिलेय असे वाचण्यात कधी येत नाही गावातली शाळा, रस्ते, घरे, हॉटेल्स, गावातली माणसे व फार तर देवळे व बाग-बगीचा याची माहिती मिळते पण वाचनालयासंबधी विशेष कोणी लिहीत नाही आणि कुठल्याही गावात कटाळा आला किंवा वाचावेसे वाटले तर गावातल्या वाचनालयात जावे तर जुनीपानी वर्तमानपत्रे, साप्ताहिके, मासिके फाटक्या तुटक्या अवस्थेत दिसतात व चार-पाच म्हातारी डोकी व दोन-चार गावढळ पोरे तेथे डुगडुगणाऱ्या बाकावर बसून वाचताना दिसतात त्यात एखादा विडी फुकत बसलेला दिसतो पोरे सिनेमाच्या जुन्या मासिकात डोके खुपसून वाचत असतात किंवा नटनट्याचे फोटो बघण्यात गर्क असतात वाचनालयात जी काही लाकडी कपाटात पुस्तके कुलूपबंद असतात त्याच्याकडे नजर टाकली तर ती सरस्त्या कादबऱ्यानी भरलेली दिसतात जास्त अधिक काही दिसणार नाही वाचनालयाजवळ कुठेतरी जोरात टाळमृदुगावर भजन चाललेले असते त्याचा कर्कश्श आवाज सारखा कानावर येऊन आदळत असतो त्यामुळे वाचनात अजिबात लक्ष लागत नाही रस्त्यावरचे धुळीचे लोट सारखे वाचनालयात येत असतात त्यामुळे वातावरण सारखे धूळमय झालेले असते विजेचे दिवे व पखे असले तरी ते थड पडलेले असतात ते कधी लावले जातात कुणास ठाऊक ? वाचनालयात गेल्यावर आपल्याला पाहिजे ते पुस्तक वाचावयास पाहिजे असेल तर ते पुस्तके वाचावयास देण्याच्या वेळात गेलात तरच मिळणे शक्य असते आणि ते मिळेलच याची खात्री नसते ही स्थिती आपल्याकडे बहुतेक ठिकाणी पहावयास मिळते पुष्कळ मोठ्या लोकसंख्येच्या गावात वाचनालयेच नाहीयेत

अमेरिकेत बहुतेक गावात वाचनालय हे असतेच अमेरिकेत रीजफिल्ड गावाची

बस्ती साधारण वीस हजार आहे पण तिथल्या वाचनालयात गेलो तर वाचनालयाचे आवार खूपच मोठे आवारात सुंदर बाग गाड्या पार्क करायला भरपूर जागा वातावरण एकदम शांत वाचनालय गावातल्या मुख्य रस्त्यावरच आहे पण रस्त्यावरच्या रहदारीचा आवाज वाचनालयाच्या इमारतीपर्यंत मुळीच येणार नाही वाचनालयाची इमारत बैठीच पण संपूर्ण स्वतंत्र व प्रशस्त वाचनालयाच्या दरवाजासमोर उभे राहिले की दरवाजा आपोआप उघडला जातो व आत पोहोचल्यावर आपोआप बंद होतो सर्व जमीन गालिचाने आच्छादलेली गुबगुबीत खुर्च्या कोच, काचेची निरनिराळ्या आकाराची टेबले व्यवस्थित मांडलेली चकचकीत पुस्तके विषयवार रॅक्समध्ये ठेवलेली सगळी प्रथम अलीकडे महिन्या-दोन महिन्यात प्रसिद्ध झालेली थोडा कालावधी लोटल्यावर त्याच्याच बाजूला ओपन रॅक्समध्ये विषयवार अक्षरवार रचलेली आपण जावे व आपल्याला हवी ती पुस्तके रॅक्समधून काढून बघावी व घ्यावीशी वाटली तर घ्यावीत व आरामात सोफ्यावर ठेवून पुढे पाय पसरून व दुसऱ्या गुबगुबीत स्टुलावर पाय ठेवून आरामात वाचीत बसावे सगळीकडे तरुण-तरुणी व वयस्क म्हातारे आपल्याला हवी ती पुस्तके काढून घेतात व अशीच आरामात वाचीत बसलेली आपल्याला दिसतील सगळीकडे एकदम शांत व गंभीर वातावरण राज्यातली त्या दिवसाची ताजी वर्तमानपत्रे व्यवस्थित ठेवलेली, शिवाय साप्ताहिके, पाक्षिके, मासिके नावाप्रमाणे व्यवस्थित ठेवलेली व्ही डी ओ कॅसेट्स् व्यवस्थित रॅक्समध्ये ठेवलेली लाँग प्लेइंग रेकॉर्डस्‌चे अल्बम ठेवलेले त्याशिवाय कॉम्प्युटरवर लेख व त्याच्या पुस्तकाचे नाव आल्यावर ते पुस्तक कुठल्या रॅकमध्ये कितव्या नंबरवर मिळेल ही माहिती पण मिळू शकते

आपली आवडती पुस्तके [illegible] आपण कितीही घरी घेऊन जाऊ शकतो व पधरा दिवसपर्यंत ठेवू शकतो जर पुस्तक वाचनालयात नसले तर वाचनालय ते विकत घेऊन आपल्याला वाचायला उपलब्ध करून देऊ शकते पधरा दिवसाच्या पुढे ठेवल्यास प्रत्येक दिवसाला पुस्तकाला दहा सेंटस् दंड आकारला जातो व्ही डी ओ कॅसेट एका वेळी एकच घरी घेऊन जाऊ शकतो व ती दुसऱ्या दिवशी परत करावी लागते आपणाला पाहिजे असलेली कॅसेट मिळाली नाही तर वाचनालय ती विकत घेऊन तुम्हाला पुरवते

मुलांच्या वाचनालयाचा स्वतंत्र विभाग आहे तीन वर्षांच्या बालकापासून ते मोठ्या मुलापर्यंत सगळ्या विषयावरची पुस्तके तिथे आहेत नुसती चित्राची पुस्तके पण असतात मुलाकरता खुर्च्या, टेबले, सोफासेट त्याच्याकरता खास बनवून घेतले आहेत लहान मुलाकरता योग्य अशी शैक्षणिक खेळणी पण ठेवलेली असतात थंड

पाणी पिण्याची सोय असते. मुलाकरता आठवड्यातून एक-दोनदा चित्रपट दाखवतात त्याना हस्तकला शिकवली जाते त्याकरता कागद, कात्री, पेन्सिल व रंग पुरवले जातात मुलाना पण पाहिजे तेवढी पुस्तके घरी घेऊन जायला मिळतात

वाचनालयात मुलाच्या आया आपल्या मुलाना दुपारी घेऊन येतात आया-मुलाचा वेळ मजेत जातो

वाचनालयाची वेळ सकाळी आठ ते रात्री आठपर्यंत असते

वाचनालय वातानुकूलित असते भरपूर हवा, उजेड व वाचनालयातील नोकरवर्गाची सेवा एकदम हसतमुख व नम्र असते

वाचनालयात आपल्याला महत्त्वाचा वाटणारा पुस्तकाचा मजकूर झेरॉक्स करून घेता येतो त्याकरता एका कॉपीला दहा सेंट्स् घेतले जातात आपण स्वत च झेरॉक्स करून घ्यायचे असते

वाचनालयात मासिक अगर वार्षिक वर्गणी नाही सारी वाचनालयाची सेवा मोफत असते फक्त तुम्ही गावचे रहिवासी असले पाहिजे

रीजफील्डचे हे वाचनालय मला फारच आवडले अर्थात ते कुणालाही आवडेल लेक्झिग्टनचे वाचनालय पण अगदी असेच आहे या सगळ्या सुखसोयी तिथेही आहेत मी लेक्झिग्टनहून परत भारतात आलो तर वाचनालयतल्या काम करणाऱ्यानी माझ्या सुनेजवळ माझी चौकशी केली व माझ्याविषयी चार चागल्या गोष्टी सुनेजवळ बोलून दाखवल्या व आम्ही तुमची आठवण काढतो असे पत्रातून लिहा म्हणून सागितले

रीजफील्डच्या वाचनालयाने माझ्यावर त्यापेक्षा जास्त मोहिनी घातली का ते मला नक्की सागता येणार नाही पण रीजफील्डच्या वाचनालयाचे वातावरण एकदरीत फारच रम्य आहे

मी रीजफील्डमध्ये असताना वसत ऋतु होता त्या निमित्ताने तेथे पुस्तकाचा सेल लावला होता या सेलची पद्धत अशी होती —— गावातल्या नागरिकानी आपल्या घरची नको असतील ती पुस्तके वाचनालयाला देणगी म्हणून द्यायची अशा देणगीदाखल मिळणाऱ्या पुस्तकाचा सेल वाचनालय घडवून आणते सर्व साधी पेपरबॉक्स पुस्तके सोमवार ते बुधवार प्रत्येकी ५० सेंटस्ला विकायला काढली व गुरुवार ते शनिवार हार्डबाऊड पुस्तके प्रत्येकी एक डॉलरला एक व रविवारी आपण कितीही पुस्तके एका पिशवीत मावतील एवढी फक्त एक डॉलरला सेलची जाहिरात गावातल्या वर्तमानपत्रात व सगळ्या स्टोअर्समध्ये व वाचलनालयात पण केली होती या सेलकरता काम करणारे सगळे सोशलवर्कर्स होते व सेल सर्वांकरता खुला होता मी व

माझ्या मुलाने या सेलचा पुरेपूर फायदा उठविला असा फायदा उठविणाराची गर्दी रविवारी खूप झाली होती बहुजन हिताय काम केले जाते ते असे

रीजफील्डमधल्या शाळेतल्या दोन विद्यार्थ्यांनी आपल्याला आपली गावातली लायब्ररी किती आवडते याचे वर्णन कवितेत केले आहे. कविता वाचल्यावर आपल्याला कळून येईल की आदर्श लायब्ररी कशी असावी आपल्या गावातल्या वाचनालयाविषयी त्याचे किती प्रेम आहे हे सहज दिसून येईल

## 'The Library

It looks like any building
When you pass it on the street
Made of stone and glass and marble
Made of iron and concrete
But once inside you can ride
A camel or a train,
Visit Rome Siam or Nome,
Feel a hurricane,
Meet a King Learn to sing,
How to take a pie
Go to sea plant a tree
Find how airplanes fly,
Train a horse and of course
Have all the dogs you'd like,
See the moon a sandy dune
Or catch a whooping like
Everything that books can bring
you will find inside the walls
a world for yor to share
when adventure calls
you cannot tell its magic
by the way it looks
But there s wonderment of books

— Gloria Guzman

*(Editor's note The author is a student of Scotland School)*

## The Reader

I Know a person who loves to read
He reads so fast a super speed
He reads books millions of pages long
Reads about American Chin and Hongkong
I never heard him say a word
He reads about Italy, Africa and more,
Reads about the rich, famous and the poor
Read books on Albany New York, hot dogs and park
I'have never heard him say a word!
He reads about Asia, London, Paris, Rome
Also witches, devils and little gnomes
Reads about oceans even some bys, about Colorado even
LA
I've never heard him say a word!
He reads every book he can find and his mom doesn't seem
to mind So finally it came,
Then he said, Read a good book lately?
After that he never spoke again!
Now how absurd to only say five short words!

ERIC - SESSLER

*(Editor's note The author is a student of Scotland School)*

• • •

मुबई-दिल्लीसारखी शहरे सोडली तर वीज वरचेवर जाणे हा आपल्याकडे नित्याचा क्रम होऊन बसला आहे कलकत्त्यासारख्या मोठ्या शहरालासुद्धा विजेचा प्रश्न सारखा भेडसावत असतो अमेरिकेतसुद्धा न्यूयॉर्क-वॉशिंग्टनसारखी शहरे सोडली तर इतर छोट्या-मोठ्या शहरात, गावात वारवार पॉवर फेल्यूअर होते माझ्या नातवाचा वाढदिवस होता त्या दिवशी गावात वादळ झाले झाडे पडली, वीज गेली आणि वीज गेल्यावर बाकी सारे व्यवहार हळूहळू थडावले दोन दिवस लोकाना पाण्याशिवाय काढावे लागले व घरात अधारात राहावे लागले पण ही गोष्ट झाली वादळ झाल्यामुळे. पण इतर वेळीही वरचेवर कुठे ना कुठे विजेचा प्रवाह बद पडत असतोच अमेरिका हे अगदी जगप्रसिद्ध पुढारलेले राष्ट्र जिथे नवे नवे शोध लावण्यात शेकडो शास्त्रज्ञ निरनिराळ्या विद्यापीठात रात्रदिवस गर्क असतात, तिथे पण वीजेचा प्रवाह अधुन मधून बद पडत असतो आणि तासतास लोकाना अधारात राहावे लागते भारतातल्या लोकाची कल्पना अशी की अमेरिकेत सर्व काही चागले चाललेले आहे तिथे इथल्यासारखे होत नसेल पण इथून तिथून सारखेच

गेल्याच वर्षी मी तिथे असताना वर्तमानपत्रात बातमी छापून आली होती Black out halts cup Game 4 बोस्टन शहरात स्टॅन्ले कपची फायनल, अटीतटीची फुटबॉल मॅच होती खेळ चालू असताना ९ वाजून ३२ मिनिटानी पॉवर फेल्यूअर झाली ते दहा वाजून सात मिनिटानी लाईट आले पण तोपर्यंत ९५ टक्के प्रेक्षक स्टेडीयमबाहेर काढले गेले होते वीज गेल्यामुळे काही जाहीर पण करता आले नाही पण दिवे आल्यावर जाहीर करण्यात आले की मॅच रद्द करण्यात आली आहे. या वर्षात हा दुसऱ्यादा मॅचच्या वेळी ब्लॅक आऊट झालाय असे वार्ताहराने म्हटले होते

अशीच दुसरी बातमी थोड्या दिवसात वाचण्यात आली की चुकीच्या अडरग्राऊड केबलमुळे एका विद्यार्थ्याचा शॉक बसून मृत्यु झाला आलबनी स्टेट

युनिव्हर्सिटी ऑफ न्यूयॉर्कच्या कॅंपसच्या हद्दीत एक तळे होते शुक्रवारी अधिकाऱ्याच्या लक्षात आले की, कॅंपस् हद्दीत जे एक तळे होते त्याच्या उथळ भागात साधारण दहा फूट अंतरावर एका विद्यार्थ्याला शॉक बसला व तो मेला विद्यार्थी गुरुवारी मेला त्या विद्यार्थ्याच्या मित्रानी सागितले, आम्ही हिंडत फिरत तळ्याच्या बाजूने चाललो होतो पण एकाएकी आमचा मित्र हिजीन्स थरथर कापायला लागला व पाण्याकडे खेचला जाऊन धाडकन् पडला व पुढे आलबनी मेडिकल सेंटरमध्ये तो मेल्याचे कळले त्याला विजेच्या धक्क्याने हार्टअॅटक आला व तो मेला अधिकारी म्हणतात, केबल दहा फूट जमिनीच्या खाली होती व विजेच्या सहायाने पपाने पाणी न्यायची सोय केलेली आहे आणि पपस्टेशन तळ्यापासून दहा फूट अतरावर आहे. तळे दीडशे फूट लाबीचे आहे व तळ कॉंक्रीटचा आहे. ते म्हणतात, केबल कुठे चुकीची टाकलेली आहे आणि केव्हापासून टाकलेली आहे ते कळायला मार्ग नाही विद्यापीठाला हा विद्यार्थी मरेपर्यंत काहीच कल्पना आलेली नाही स्टेट पोलीस व कॅंपस पोलीस, विद्यापीठातील तज्ज्ञ आणि इलेक्ट्रिकल एक्स्पर्टस् याची सपूर्ण चौकशी करीत आहेत

सार्वजनिक सुरक्षिततेसाठी तळ्याभोवतालचा भाग आता हिंडण्याफिरण्यासाठी बद केला आहे व गुरुवार रात्रीपासून वीजप्रवाह तोडून टाकण्यात आला आहे. डिस्ट्रिक्ट ॲटर्नीनी प्राथमिक चौकशी करून जाहीर केले की यात हिंसेचा प्रकार दिसून येत नाही केवळ अपघाती मृत्यु झालेला आहे विद्यापीठाच्या इमारतींवरील झेंडे शोकप्रदर्शनार्थ अर्ध्यावर ठेवले जातील आणि येत्या वसत ऋतूत दहा हजारावर लोक जमून जो उत्सव साजरा होतो तो रद्द केल्याचे विद्यार्थी सघटनेने जाहीर केले आहे

मागासलेले राष्ट्र असो अगर कितीही पुढारलेले राष्ट्र असो, विजेचे अपघात होतच राहातात आणि वीज बद पडणे कुठेही नवीन नाहीये

सबध न्यूयॉर्कभर एकदाच ब्लॅकआऊट झाला होता त्या वेळी काय हाहा कार माजला होता, त्यावर नतर शेकडो पुस्तके लिहिली गेली न्यूयॉर्कभर अंध कार होणे मात्र परवडण्यासारखे नाहीये हे मात्र निश्चित्.

• • •

अमेरिकेत नर्सेस मिळणे फार कठीण झालेय न्यूयॉर्क शहरात जी हॉस्पिटल्स आहेत तिथे आपल्याला जास्तीनजास्त भारतीय नर्सेस पहायला मिळतील आणि त्यात केरळीय नर्सेसचा भरणा जास्त आहे रात्रपाळीच्या नर्सेस तिथे सरळ तामीळ भाषेचाच उपयोग करताना आढळतील

सध्या तर कॉनेक्टिकट राज्यात पाचशे नर्सेसची जरूरी आहे फेडरल गव्हर्नमेंटचा अदाज असा आहे की, १९९० पर्यंत तीन लक्ष नव्वद हजार नर्सेस एकदर देशभर लागतील आणि दोन वर्षांत हे कसे शक्य होणार याची सरकारला चिंता पडली आहे, अशी वर्तमान- पत्रात बातमी आली त्या वेळी सरकार म्हणते, ही काही जाहिरात नाही पण एकाएकी देशात इतक्या प्रचड प्रमाणात नर्सेसचा तुटवडा कसा पडला हा मोठा जटिल प्रश्न उभा राहिला आहे काही वर्षांपूर्वी नर्सेस पुष्कळ मोठ्या प्रमाणात मिळत होत्या, असे मिचेल गोडीन वॉटरबॅरी सेंट मेरी हॉस्पिटलची भरती अधिकारी व कॉनेक्टिकट नर्स असोसिएशनची चेअरमन म्हणाली १९८५ पर्यंत एका नर्सच्या नोकरीकरता वीस अर्ज यायचे, पण आता तीन महिने थाबूनही एक पण क्वालिफाइड नर्स मिळू शकली नाही ती पुढे म्हणाली, की त्यामुळे काही ठिकाणी आरोग्य- सुविधा उघडायच्या लाबणीवर टाकण्यात येत आहेत कॉनेक्टिकट विद्यापीठात तीन वर्षांपूर्वी नर्सेसचा कोर्स शिकायला जी सख्या होती त्याच्या निम्म्यानेसुद्धा आता राहिलेली नाही

नर्सेसचा कोर्स शिकायला विद्यार्थी-विद्यार्थिनी मिळत नाहीत कारण वेतन कमी मिळते कामाचे तास जास्त पडतात हप्त्याची सुट्टी मिळत नाही किंवा मिळायला कटकटी होतात काम करताना सुविधा कमी असतात नर्सेस कमी त्यामुळे कामाचे प्रेशर जास्त आणि कारकुनी काम पण पुष्कळ करावे लागते सरकार पण नर्सिंग कोर्सकरता पैशाची मदत फार कमी प्रमाणात देते त्यात स्त्रियाना हा कोर्स करावा असे

वाटत नाही त्यापेक्षा ऑफीसमध्ये अकौंटिंग, बुककीपिंग, वकिली, इंजिनिअरिंग किंवा स्टोअर्समध्ये काम करणे त्याना बरे वाटते

पुष्कळ नर्सेसना हॉस्पिटल सोडून खाजगी क्लिनिक्स, तात्पुरत्या नर्सिंग एजन्सीज आणि खाजगी डॉक्टराकडे जास्त पगार मिळतो म्हणून त्या हॉस्पिटलमधल्या नोकऱ्या सोडून जातात काही स्वत च आरोग्य-सुधार-केंद्रे सुरू करतात

आता हॉस्पिटलमध्ये नर्सेस मिळत नाहीत तेव्हा पुष्कळ हॉस्पिटल्सनी तीन हजार डॉलर्स कॅश बोनस आणि पुष्कळ इतर सुविधाचे आमिष दाखवायला सुरुवात केली आहे. युरोप व आशियातील इंग्लिश जाणणाऱ्या देशातून, हॉंगकॉंगवरून पण नर्सेस मागवायला सुरुवात केली आहे जाहिरातीत जास्त पगाराची आमिषे दाखविली जातात त्याच्या देशातल्या पगारापेक्षा अमेरिकेतला पगार केव्हाही त्याना जास्तच वाटतो

• • •

अमेरिका एवढा अफाट देश, त्याचे पन्नास प्रात वैभवसपन्न देश अमेरिकेत पाचशेच्या आसपास विद्यापीठे व दोन हजार पाचशेपच्याऐंशी कॉलेजेस आहेत जगाच्या पाठीवरून दर वर्षी हजारो विद्यार्थी अमेरिकन विद्यापीठात शिक्षण घ्यायला मिळावे म्हणून येत असतात आपल्या मायदेशातल्या शिक्षणापेक्षा इथे जास्त ज्ञान प्राप्त होते असे त्याना वाटते आणि हे खरेही असते भरपूर अभ्यास करावा लागतो दिवसाचे अठरा अठरा तास अभ्यासात खर्च करावे लागतात प्रोफेसराना पण सतत अभ्यास करावा लागतो वर्षाला कमीत कमी एक-दोन सशोधनपर पेपर द्यावे लागतात आपल्याप्रमाणे एकदा प्रोफेसर झाले की वर्षानुवर्षे नुसत्या त्याच त्याच पाट्या टाकून चालत नाही अमेरिकेत सतत स्पर्धेला तोड द्यावे लागते कॉलेजशिक्षण महाग असूनही कॉलेजशिक्षणाकरता गर्दी फार असते

१९८९ मध्ये अमेरिकेतल्या पहिल्या नबरच्या हारवर्ड विद्यापीठात १२८४३ अर्ज पहिल्या वर्षाच्या प्रवेशाकरता आले होते त्यातल्या फक्त १८ टक्के विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला त्यावरून आपल्याला कल्पना येईल की, अमेरिकेन स्पर्धा ही काय चीज असते विद्यापीठाचे वार्षिक अदाजपत्रक साडेचार बिलीयन डॉलर्सचे आहे. तिथल्या प्रोफेसराना कमीत कमी १००४०० डॉलर्स वर्षाला पगार मिळतो

मी विद्यापीठाबद्दल सागत बसत नाही तो एक निराळा ग्रथच होईल सर्व शिक्षणाच्या अद्ययावत् सोयी असूनदेखील अमेरिकेत लहान गावात डॉक्टर मिळणे कठीण जाते सर्वसाधारण ४२३ माणसाना एक डॉक्टर अमेरिकेन उपलब्ध होतो असे म्हटल्यास आपल्याला आश्चर्य वाटेल भारतातसुद्धा डॉक्टर झाल्यावर लहान गावात प्रॅक्टिस करायच्याऐवजी मोठ्या गावात दवाखाना टाकण्याकडे प्रवृत्ती आहे. आता आपल्याइकडे पुष्कळ लहान गावात डॉक्टर असतात, ते खरे किती आणि खोटे किती कुणास ठाऊक ? कारण पुष्कळाना आधी डॉक्टर म्हणून मिरवण्याची हौस असते व

त्यात मुंबईसारख्या शहरातही डॉक्टर नसलेले डॉक्टर म्हणून व्यवसाय करीत असताना पकडलेले आहेत नीरा गावात तर एका डॉक्टराने भविष्य पण वर्तवतो म्हणून पाटी लावलेली मी पाहिली आहे.

अमेरिकेन आजारी पडणे म्हणजे अक्षरश सक्त आहे. साध्या डॉक्टरकडेही Appointment घेतल्याशिवाय जाता येत नाही तिथे गेल्यावर नुसते तपासण्याचे साठ डॉलर्स द्यावे लागतात औषधे डॉक्टर देत नाहीत ते प्रिस्क्रिप्शन लिहून देतात केमिस्टच्या दुकानात औषध तयार करून मिळते त्याचे पैसे निराळे द्यावे लागतात हॉस्पिटलमध्ये जर गेले तर दोन-तीन दिवसात हजार दोन हजार डॉलर्स सहज मोजावे लागतात

अमेरिकेत मेन प्रातात ॲशलॅंड म्हणून एक गाव आहे. तिथे वीस-पचवीस मैलाच्या परिसरात एकही डॉक्टर नाही गावाची वस्ती फक्त तीन हजार गावात रॉजर पेलींगवूड नावाचा हुशार विद्यार्थी होता पण कॉलेजचे शिक्षण घ्यायला त्याच्याजवळ पैसे नव्हते १९७३ साली तो पदवीधर झालेला होता तो गावातल्या प्रतिष्ठित मडळींना भेटला तो म्हणाला, मला डॉक्टर व्हायचेय पण मेडिकलला मला ॲडमिशन मिळत नाही मेडिकलला जायचे म्हणून मी क्लासेसना जाऊन अभ्यास केला मला गावाने जर मदत केली तर मी डॉक्टर झाल्यावर या गावातच व्यवसाय करीन व गावाची सेवा प्रथम करीन गावकऱ्यांनी १५०० सह्या गोळा केल्या व विद्यापीठात अर्जासोबत जोडल्या गावातल्या सहा सस्थानी त्याला वर्षाला १५००० डॉलर्स दिले आठ वर्षानतर त्याने गावाची सेवा करण्याचे वचन दिले कोणालाही असे वाटले नाही की रॉजर पेलिंगवूड हा आपल्याला फसवेल आज डॉक्टर रॉजर पेलिंगवूड हे गावातच प्रॅक्टिस करतात व आसपासच्या गावातील लोक त्याचेकडे येतात

प्रत्येक बाबतीत सरकारवरच अवलबून कोणी राहात नाही

आपल्या भारतातल्या गावाना हे आदर्श उदाहरण आहे.

सध्या अमेरिकेत पुष्कळसे आर्थिक स्थैर्य सर्वसाधारण लोकात निर्माण झालेले आहे. नोकऱ्या पुष्कळ प्रमाणात आहेत ज्याला काम करायचे आहे त्याला सहज काम मिळू शकते अमेरिकेचे सध्याचे राहाणीमान फार चागल्या रीतीने वाढलेले आहे आणि आजपर्यंत कधी इतके चागले नव्हते अशा प्रकारचे लेख १९८८ साली मी तेथे असताना प्रसिद्ध होत असलेल्या दैनिकातून वाचले आणि त्यानतर या लेखावर आलेल्या वाचकाच्या प्रतिक्रिया पण वाचल्या अमेरिकेत एकदर सगळीकडे आबादीआबाद आहे असे तिथे राहाणाऱ्या माणसानाच वाटते असे नाही तर परदेशातून काही दिवस राहायला आलेल्या आमच्यासारख्याना पण वाटते आणि तिथे

अमेरिका एवढा अफाट देश, त्याचे पन्नास प्रांत वैभवसंपन्न देश अमेरिकेत पाचशेच्या आसपास विद्यापीठे व दोन हजार पाचशेपच्याऐंशी कॉलेजेस आहेत जगाच्या पाठीवरून दर वर्षी हजारो विद्यार्थी अमेरिकन विद्यापीठात शिक्षण घ्यायला मिळावे म्हणून येत असतात आपल्या मायदेशातल्या शिक्षणापेक्षा इथे जास्त ज्ञान प्राप्त होते असे त्यांना वाटते आणि हे खरेही असते भरपूर अभ्यास करावा लागतो दिवसाचे अठरा अठरा तास अभ्यासात खर्च करावे लागतात प्रोफेसरांना पण सतत अभ्यास करावा लागतो वर्षाला कमीत कमी एक-दोन संशोधनपर पेपर द्यावे लागतात आपल्याप्रमाणे एकदा प्रोफेसर झाले की वर्षानुवर्षे नुसत्या त्याच त्याच पाट्या टाकून चालत नाही अमेरिकेत सतत स्पर्धेला तोंड द्यावे लागते कॉलेजशिक्षण महाग असूनही कॉलेजशिक्षणाकरता गर्दी फार असते

१९८९ मध्ये अमेरिकेतल्या पहिल्या नंबरच्या हारवर्ड विद्यापीठात १२८४३ अर्ज पहिल्या वर्षाच्या प्रवेशाकरता आले होते त्यातल्या फक्त १८ टक्के विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला त्यावरून आपल्याला कल्पना येईल की, अमेरिकेत स्पर्धा ही काय चीज असते विद्यापीठाचे वार्षिक अंदाजपत्रक साडेचार बिलीयन डॉलर्सचे आहे. तिथल्या प्रोफेसरांना कमीत कमी १००४०० डॉलर्स वर्षाला पगार मिळतो

मी विद्यापीठाबद्दल सांगत बसत नाही तो एक निराळा ग्रंथच होईल सर्व शिक्षणाच्या अद्ययावत् सोयी असूनदेखील अमेरिकेत लहान गावात डॉक्टर मिळणे कठीण जाते सर्वसाधारण ४२३ माणसांना एक डॉक्टर अमेरिकेन उपलब्ध होतो असे म्हटल्यास आपल्याला आश्चर्य वाटेल भारतातसुद्धा डॉक्टर झाल्यावर लहान गावात प्रॅक्टिस करायच्याऐवजी मोठ्या गावात दवाखाना टाकण्याकडे प्रवृत्ती आहे. आता आपल्याइकडे पुष्कळ लहान गावात डॉक्टर असतात, ते खरे किती आणि खोटे किती कुणास ठाऊक ? कारण पुष्कळांना आधी डॉक्टर म्हणून मिरवण्याची हौस असते व

त्यात मुंबईसारख्या शहरातही डॉक्टर नसलेले डॉक्टर म्हणून व्यवसाय करीत असताना पकडलेले आहेत नीरा गावात तर एका डॉक्टराने भविष्य पण वर्तवतो म्हणून पाटी लावलेली मी पाहिली आहे

अमेरिकेत आजारी पडणे म्हणजे अक्षरश संकट आहे साध्या डॉक्टरकडेही Appointment घेतल्याशिवाय जाता येत नाही तिथे गेल्यावर नुसते तपासण्याचे साठ डॉलर्स द्यावे लागतात औषधे डॉक्टर देत नाहीत ते प्रिस्क्रिप्शन लिहून देतात केमिस्टच्या दुकानात औषध तयार करून मिळते त्याचे पैसे निराळे द्यावे लागतात हॉस्पिटलमध्ये जर गेले तर दोन-तीन दिवसात हजार दोन हजार डॉलर्स सहज मोजावे लागतात

अमेरिकेत मेन प्रांतात ॲशलॅंड म्हणून एक गाव आहे. तिथे वीस-पंचवीस मैलाच्या परिसरात एकही डॉक्टर नाही गावाची वस्ती फक्त तीन हजार. गावात रॉजर पेलींगवूड नावाचा हुशार विद्यार्थी होता पण कॉलेजचे शिक्षण घ्यायला त्याच्याजवळ पैसे नव्हते १९७३ साली तो पदवीधर झालेला होता तो गावातल्या प्रतिष्ठित मंडळींना भेटला तो म्हणाला, मला डॉक्टर व्हायचेय पण मेडिकलला मला ॲडमिशन मिळत नाही मेडिकलला जायचे म्हणून मी क्लासेसना जाऊन अभ्यास केला मला गावाने जर मदत केली तर मी डॉक्टर झाल्यावर या गावातच व्यवसाय करीन व गावाची सेवा प्रथम करीन गावकऱ्यांनी १५०० सह्या गोळा केल्या व विद्यापीठात अर्जासोबत जोडल्या गावातल्या सहा संस्थांनी त्याला वर्षाला १५००० डॉलर्स दिले आठ वर्षांनंतर त्याने गावाची सेवा करण्याचे वचन दिले कोणालाही असे वाटले नाही की रॉजर पेलिंगवूड हा आपल्याला फसवेल आज डॉक्टर रॉजर पेलिंगवूड हे गावातच प्रॅक्टिस करतात व आसपासच्या गावातील लोक त्यांचेकडे येतात

प्रत्येक बाबतीत सरकारवरच अवलंबून कोणी राहात नाही

आपल्या भारतातल्या गावांना हे आदर्श उदाहरण आहे

सध्या अमेरिकेत पुष्कळसे आर्थिक स्थैर्य सर्वसाधारण लोकांत निर्माण झालेले आहे. नोकऱ्या पुष्कळ प्रमाणात आहेत ज्याला काम करायचे आहे त्याला सहज काम मिळू शकते अमेरिकेचे सध्याचे राहाणीमान फार चांगल्या रीतीने वाढलेले आहे आणि आजपर्यंत कधी इतके चांगले नव्हते अशा प्रकारचे लेख १९८८ साली मी तेथे असताना प्रसिद्ध होत असलेल्या दैनिकांतून वाचले आणि त्यानंतर या लेखावर आलेल्या वाचकांच्या प्रतिक्रिया पण वाचल्या अमेरिकेत एकंदर सगळीकडे आबादीआबाद आहे असे तिथे राहाणाऱ्या माणसांनाच वाटते असे नाही तर परदेशातून काही दिवस राहायला आलेल्या आमच्यासारख्यांना पण वाटते आणि तिथे

शिक्षणाच्या निमित्ताने वा टूरिस्ट म्हणून म्हणा किंवा कुठल्या नरी निमित्ताने आलेल्या माणसाला वाटते आपल्याकडे मोठ्या औद्योगिक शहरातून व त्याच्या आसपास गावातून पाहिले म्हणजे आपल्याला असेच वाटते की आपल्या इकडे पण उत्तम स्थिती आहे जागाचे भाव वाढत असले तरी दोन-चार लाख रुपयाच्या गोष्टी आणि फ्रीझ, टी व्ही च्या गोष्टी सामान्य माणूस पण करताना दिसतो पण दिसणे आणि प्रत्यक्ष सर्वसामान्य लोकापर्यंत जाऊन पोहोचणे यात खूपच अतर आहे

अमेरिकेतल्या एका सामान्य माणसाचे रोजच्या दैनिकात छापून आलेले पत्र त्याच वेळी मी वाचले त्यावरून थोडीफार खरी कल्पना आपल्याला येईल तो म्हणतो, ' अमेरिकेत सध्या एवढी सुबत्ता आहे हे कितपत खरे मानायचे ? कारण घरातली सगळी माणसे बाहेरील कामे करण्यात गर्क असतात नवरा-बायको व मुले कुठे ना कुठे काम करून पैसे मिळवतात कारण त्याना पैशाची गरज असते घराचा उपयोग करून ते भोगावयाचे म्हणजे पैशाची जरूरी आहेच घरसस्मार चालवायचा म्हणून जो तो आपआपल्या परीने कष्ट करून पैसा मिळवतो व घरात सबध दिवस कोणीच राहात नाही एकमेकाची तोडे एकमेकाला दिसत नाहीत व घराला घरपण असे राहात नाही मग घराचे आनदीपण कसे दिसणार आणि आर्थिक सुबत्ता कशी उपभोगणार ? फॅमिली लाईफ ते काय राहिले ? शिक्षण घ्यायला किंवा शिक्षणाचा दर्जा उचावायला कशी मदत होणार ? एकमेकानी एकत्र बसून विचाराची देवाण-घेवाण करणे म्हणा किंवा टी व्ही , रेडिओ याची करमणूक तरी केव्हा पहात बसणार किवा ऐकणार ? कुटुबाची एकात्मता कशी राहाणार ? आपण सर्व काही मिळवण्याच्या नादात आणि एकदर यशस्वीपणे चाल करण्यात फार मोठी किंमत मोजत आहोत चागला वेळ मिळवण्यात, कुटुब एकत्रित गुण्यागोविंदाने येण्यात वेळ ही फार मोठी मूल्यवान गोष्ट होऊन बसलीय आणि त्याकरता आपल्याला फार मोठी किंमत मोजावी लागत आहे अपार कष्ट करावे लागत आहेत आपण आपले स्वत चे घर घेऊ शकतो पण नव्या घरात आपण कौटुबिक सौख्य व समाधान मिळवू शकतो का ? आता अशी विचार करण्याची वेळ आलीय की, खरोखरच आपण काय करतोय आणि कुठे जातोय ? अशा तऱ्हेने जर आपण जीवन घालवू लागलो तर आपल्या मुलाबाळाचे शिक्षण कसे होणार व त्याच्याकडे कोण बघणार, हा खरा महत्त्वाचा प्रश्न आपल्यापुढे उभा आहे त्याचा आपण विचार करायला लागले पाहिजे

दुसरे पत्र वाचकाचे प्रश्न व अडचणी या सदर्भात माझ्या वाचण्यात आले ते एका टेक्सासमधल्या बाईचे होते तिने आपल्या अडचणीचा पाढा पुढे माडला होता त्यात ती म्हणते, ' आम्ही ३१००० डॉलर्सला एक घर विकत घेतले आणि आता फक्त

२८००० डॉलर्सचे देणे बँकेला द्यायचे आहे माझा नवरा घर विकत घेतल्यानंतर वर्षभराने वारला त्यामुळे मी बँकेला विनती केली की माझा महिन्याचा हप्ता जरा कमी करा मी हळूहळू मुद्दल कमी करीत जाईन व व्याजपण देईन पण बँक माझे काहीच ऐकून घ्यायला तयार नाही मला सोळा वर्षांचा एक मुलगा आहे त्याला शाळेत त्याचे प्रिन्सिपॉल मदत करायला तयार आहेत मी नोकरी करते मला वर्षाला सात हजार डॉलर्स पगार मिळतो व २२५० डॉलर्स बँकेत आहेत मी मुद्दल कमी करून बाकीच्या पैशावर मुद्दलाप्रमाणे व्याज देईन म्हणते, तर बँक या गोष्टीला तयार नाही ते म्हणतात जो महिन्याचा हप्ता आहे तोच भरला पाहिजे आणि त्याप्रमाणेच ॲग्रीमेंट झालेले आहे अशा तऱ्हेने हप्ते भरणे मला अशक्य आहे बँकेच्या म्हणण्याप्रमाणे मी पैसे भरत राहिले तर माझ्या वयाच्या ६९व्या वर्षी घर माझे होईल आणि एकदर सारे जमणे कठीण आहे प्रश्नाचे उत्तर दिले आहे की, बँकेचे कर्ज ॲग्रीमेंटप्रमाणे देणेच बरोबर आहे. ते जर शक्य नसेल तर तुम्हाला तुमच्याजवळ काही विकण्यासारखे असेल ते विकून हप्ते भरणे आवश्यक आहे नाहीतर तुमच्या हातून घर जाईल

अमेरिकेत अशी कितीतरी कुटुंबाची परिस्थिती आहे सर्वसाधारण शिक्षण असणाऱ्या मध्यमवर्गाचे वार्षिक उत्पन्न सरासरी बारा ते पधरा हजार डॉलर्सपर्यंत असते उच्च राहणीमानामुळे खर्च वाढते असतात व एकदर सर्व काही जमवण्याकरता खूप मेहनत करावी लागते आपल्याकडील जे लोक तेथे मिळवतात त्याचे कमीतकमी वार्षिक उत्पन्न साधारण तीस ते चाळीस हजार डॉलर्सपर्यंत असते व त्यातून विशिष्ट उद्योग, नोकरीधद्यात ते साठसत्तरहजार डॉलर्सपर्यंत पण मिळवतात त्याशिवाय आपल्या लोकाची क्रयशक्ती तिकडच्या लोकाच्या मानाने फार कमी असते त्यामुळे आपल्याला साहजिकच वाटते की अमेरिकेत सारे काही चागले चाललेले आहे

अमेरिकेत आर्थिक परिस्थिती प्रत्येक स्टेटमध्ये निरनिराळी असते काही स्टेट्समध्ये काही बाबतीत पुष्कळ विपुलता व स्वस्ताई वाटेल तिथल्या एकदर सर्वसाधारण स्टेटमध्ये किंमतीत आणि दुसऱ्या स्टेटमधल्या किंमतीत फरक वाटेल एका स्टेटमधून दुसऱ्या स्टेटमध्ये गेल्यावर फरक जाणवल्याशिवाय राहणार नाही आपल्याइकडे महाराष्ट्रात जी महागाई आहे, तितकी महागाई आपल्याला मद्रासमध्ये जाणवत नाही तीच परिस्थिती बिहारमध्ये गेल्यावर आपल्याला निराळाच अनुभव येतो तसेच टेक्सास, केटकी, कॉनेक्टिकट व न्यूयॉर्कमध्ये गेल्यावर आढळून येईल

अमेरिकेत चागले चाललेले आहे हे निश्चित त्यात वाद नाही पण थोडे अतरगात गेल्यावर असे दिसले की शेवटी माणसे कुठेही गेली तरी माणसे ती माणसेच

● ● ●

आपल्याकडे स्त्री-पुरुषाच्या कपड्यात जशी काळानुरूप फॅशन बदलत गेली तशी ती प्रत्येक देशात बदलत असते महाराष्ट्रात स्त्रिया नऊवारी साडीचा डोक्यावरून पदर घेत, नतर डोक्यावरचा पदर गेला आणि त्यानतर पाचवारी आले, पाचवारी काही वर्षे चालले आणि मग अगावरचा पदर पण ढळला गेला व मग त्याची जागा पजाबी ड्रेस आणि स्कर्ट्स्नी घेतली आता पजाबी ड्रेसवरचा दुपट्टा पण नावापुरता राहिला आणि स्कर्टस् व मॅक्सी आल्या आता सरसकट काही स्त्रिया मॅक्सी घालून रस्त्यावर चालताना आपण पाहतो चागले-वाईट ज्याचे त्याने ठरवायचे असते अर्थात् स्त्रियाच्या फॅशन्स येतात पाश्चिमात्य देशातून काही पाश्चिमात्याकडून मिनी स्कर्टसूही इथे आले पण मिनी स्कर्टस् मात्र एवढे काही लोकप्रिय झाले नाहीत मिनी स्कर्टला एक गोष्ट अवश्य लागते ती म्हणजे सुदर नाजुक निमुळते पाय पायाचे उत्तम देखणे प्रदर्शन मिनी स्कर्टमुळे होते दुसरी गोष्ट म्हणजे मिनी स्कर्टस् उच्च मध्यम वर्गीय लोकात विशेषत नवश्रीमतात दिसू लागले आपल्या इकडच्या मध्यमवर्गीयात मिनी स्कर्टस्ची फॅशन मात्र तितकी फोफावली नाही मिनी स्कर्ट विशेषत पारशी, ख्रिश्चन व नवश्रीमत या ठराविक वर्तुळात किंवा हिंदी सिनेमा क्षेत्रात काही काळ टिकून राहिली पो टी मा ब्लाऊझ, स्लीव्हलेसची फॅशनही आपल्याकडे प्रत्येकीलाच झेपण्यासारखी नव्हती वर्किंग क्लास, ऑफिस गोअर्स आणि त्यातल्या त्यात चार आकडी पगार घेणाऱ्यात किंवा ऑफिसमध्ये हलके-फुलके काम करणाऱ्या आर्टिस्ट, सेक्रेटरीयल जॉबवर, रिसेप्शनिस्ट स्त्रियामध्ये किंवा लिमिटेड कपन्यामध्ये उच्चपदावर काम करणाऱ्या स्त्रीवर्गामध्येच फॅशन दिसून येते आता त्याचे पाहून न झेपणाऱ्या स्त्रियासुद्धा ही फॅशन करतात पण ते तितकेसे प्रेक्षणीय ठरत नाही कारण अगावरच्या कपड्याच्या मूल्यावरून त्याची शान आपोआपच दिसून येते

अमेरिकेत पण ह्या मिनी स्कर्टवर स्त्रियामध्ये खूपच नाराजीचा सूर निघायला सुरुवात झाली आहे या अमेरिकन स्त्रियानी एकत्र येऊन सभा-भाषणातून विरोध वगैरे दर्शविला नाही, पण ऑफिसगोअर्स व काम करणाऱ्या स्त्रियानी हे मिनी स्कर्ट्स् घालायचे

नाही, असे ठरविले या स्त्रियानी मिनी स्कर्टकडे पाठ वळवली व ते विकत घ्यायचे टाळून ऑफिसमध्ये गुडघ्याखाली असणारे स्कर्टस् जे दिसतील ते विकत घेऊन वापरायचे ठरवले गुडघ्यावर दोन-तीन इच असणारे स्कर्टस् घातले तर आरामात खुर्चीवर बसता येत नाही सारखे आवरून सावरून बसण्यात वेळ जातो व आपल्या पायाकडे पुरुषाचे लक्ष जाते व कुणी आपल्याकडे बघतेय की काय असे सारखे वाटत राहाते व त्यामुळे काम करायला त्रास होतो जवळ जवळ साठ टक्के स्त्रिया लेबर डिपार्टमेंटमध्ये काम करतात आणि मिनी स्कर्ट घालून काम करण्यात त्याना शरम वाटते

कॅथलीन मॅकी ही कपडे बनवणाऱ्या एका उच्च कपनीची फॅशनच्या बाबतीत चिकित्सक शोध घेणारी तिने जाहीर केले की चाङ्गेल त्या स्त्रीने मिनी स्कर्ट घालून काम करणे मुळीच शोभादायक नाही ऑफिसमधल्या पुरुषानी स्त्रियानी मिनीस्कर्टस्मध्ये काम करावे ही अपेक्षा ठेवलेली आहे. स्त्रियाना मिनी स्कर्टस् मुळीच घालावेसे वाटत नाहीत या वर्षी परत मिनी स्कर्टस् बाजारात विकायला आले पण काम करणाऱ्या स्त्रियानी मिनी स्कर्टस् विकतच घेतले नाहीत मिनी स्कर्टस्चा सेल यदा ( १९८८ ) अजिबात होत नाहीये

मिनी स्कर्ट वापरल्याने पुरुषाचे लक्ष वेधून घेतले जाते व स्त्रियाना काम करताना फार काळजीपूर्वक काम करावे लागते अमेरिकेतले डॉ बार्ट– इलिनॉय विद्यापीठातले सोशिऑलाजीचे प्रोफेसर म्हणतात, मिनी स्कर्टमुळे पुरुषाच्या कामवासना उद्दीपित होतात व त्यामुळे हिंसेला प्रोत्साहन मिळते नीना टोटेनबर्ग– नॅशनल पब्लिक रेडिओची कायदेविषयक बातम्याची वार्ताहर– न्यूयॉर्क टाइम्सच्या लेखात म्हणते, The mini is a stupid and sexist idea मिनी स्कर्टमध्ये खुर्चीवर बसल्यावर माड्या उघड्या पडणार आणि अशा स्थितीत कोण माणूस - मग तो वकील, बँकर वा सेक्रेटरी असो - या बाईविषयी काय गभीरपणे विचार करणार

झुबी ॲडव्हर्टायझिंग कपनीची झुबीरिटा गोल्डस्टिअेन कपनीची अध्यक्षा जीन गोल्डस्टिअेन, ऑड्रिअन ए हॉल डायरेक्टर लॉस एजलीसची व्हाइसचेअरमन यानी वर्तमानपत्रातून या मिनी स्कर्टस्विरुद्ध खूप ओरड केली आणि सर्व अमेरिकेत या मिनी स्कर्टस्चा खप जवळ जवळ बद पाडून टाकला मिनी स्कर्टला आता गिऱ्हाईकच नाही बहुतेक सर्व स्त्रिया गुडघ्याखाली दोन-तीन इच असलेलेच स्कर्टस् वापरणे पसत करतात म्हणून त्या काही सनातनी किंवा काकूबाई झाल्या असे नव्हे शेवटी जे शोभेल व सभ्य दिसेल तेच करावे हीच अमेरिकन स्त्रियाची फॅशनबाबत भूमिका आहे. फार फॅशनेबल हे सारे बोलायला ठीक आहे पण जे ओंगळ व गलिच्छ दिसते तिथे देश कोणताही असू दे, विरोध, नापसती ही तावडतोब दिसून येते

शेवटी कुठल्याही गोष्टीचे अधानुकरण हे वाईटच

• • •

अल्पसंख्याकांचा प्रश्न आपल्याकडे आहे. पण या बाबतीत फक्त अल्पसंख्याक हेच चळवळ करतात त्यांच्या हक्काकरता भांडतात मोर्चे काढतात अल्पसंख्याकामध्ये विशेषत दलित वर्ग दलितांचे पुढारी डॉ आंबेडकर तसेच अमेरिकेत अल्पसंख्याक म्हणजे निग्रो आता निग्रोंना निग्रो किंवा निगर कोणी म्हणत नाही निग्रोंना निग्रो न म्हणता काळे म्हणावे याकरता पण त्यांना लढा द्यावा लागला या काळ्यांचा पुढारी मार्टिन ल्यूथर किंग त्याने या काळ्यांची चळवळ सुरू केली काळ्यांना गोऱ्यांप्रमाणेच सारे समान हक्क असावेत म्हणून चळवळी चालू आहेत काही विचारवंत गोरी माणसे या काळ्यांना गोऱ्यांप्रमाणे समान वागणूक मिळावी म्हणून त्यांच्या चळवळीत सामील झालेली आहेत आत्ता आत्तापर्यंत गोऱ्यांच्या शाळा-कॉलेजमध्ये काळ्या लोकांना प्रवेश दिला जात नव्हता दक्षिण अमेरिकेत तर काळ्यांचा अतोनात छळ चालू होता त्यांना गोऱ्यांच्या रेस्टॉरंटस्‌मध्येही प्रवेशबंदी होती मते देण्याचा अधिकार नव्हता नोकऱ्या मिळत नसत बसमध्ये मागे बसावे लागत असे सारे अपमानास्पद जिणे होते कित्येक वेळा स्टेटस्‌च्या गव्हर्नरनी प्रत्यक्ष अमेरिकेच्या प्रेसिडेंटचा हुकूम पण कॉलेज-प्रवेशाच्या बाबतीत धुडकावून लावलेला आहे केनेडींचा हुकूम पाळलेला नव्हता काळ्यांची शाळा-कॉलेजेस निराळी होती व आजही आहेत

पण अलीकडे काळ्यांना शाळा-कॉलेजात प्रवेश मिळतो गोऱ्यांबरोबर काळ्यांना पण शिक्षण घेता येते काळ्या शिक्षकांच्या, प्रोफेसरांच्या नेमणुका शाळा-कॉलेजातून व्हायला लागल्या आहेत तरीपण गोऱ्यांच्या मानाने काळे कमीच असतात आणि याकरताच तेथील कॉलेजेसमध्ये काळ्यांच्या नेमणुका जास्त प्रमाणात व्हाव्यात याकरता पालक व विद्यार्थी चळवळी करतात, मोर्चे नेतात काळ्यांच्या नेमणुका योग्य प्रमाणात ड्यूक विद्यापीठात नाहीत त्याकरता पाचशे काळ्या आणि गोऱ्या विद्यार्थ्यांनी मोर्चा काढला त्याकरता सह्या गोळा करण्यात आल्या ५८२४

विद्यार्थी असलेल्या विद्यापीठात २५५० सह्या गोळा करण्यात आल्या ड्यूक विद्यापीठात एकदर पस्तीस विषय १२९९ शिक्षक शिकवतात त्यात फक्त एकतीस काळे आहेत काळ्या शिक्षकाना जास्त वाव मिळाला पाहिजे ही विद्यार्थी आणि पालकाची मागणी आहे काळ्या विद्यार्थ्यांना पदवीपर्यंतचे शिक्षण घेता येते त्याना डॉक्टरेट करायची असली तर काही सोय नाही, अशी ड्यूक विद्यापीठात परिस्थिती आहे आणि त्याकरता काळे शिक्षक जास्त नेमले जावेत ही सगळ्या विद्यार्थ्यांची मागणी आहे आणि त्याकरता काळे आणि गोरे विद्यार्थी दोघेही प्रयत्न करीत आहेत अशीच चळवळ विल्यम कॉलेजमध्ये पण चालू आहे. त्यानी जाहीर केलेय की अशाच प्रकारच्या चळवळी अमेरिकेतल्या ९२ कॉलेजामध्ये चालू आहेत एवढे असूनसुद्धा काही कॉलेजात जरी काळे विद्यार्थी शिकत असले तरी ते आपापल्या ग्रुपमधूनच फिरत असतात त्याचे कँटीन निराळे असते त्याच्या सघटना त्यानी निराळ्या स्थापन केलेल्या आहेत त्यात काळे आणि गोरे हे सरळ सरळ निराळ्या तऱ्हेने वागतात काळ्याच्या कँटीनमध्ये सारे काळेच असतात पण गोऱ्याच्या कँटीनमध्ये ब्राऊन लोक जातात गोऱ्याबरोबर गुण्यागोविंदाने वागत असतात ब्राऊन म्हणजे काळ्यागोऱ्याच्या मधले म्हणजे बहुतेक आशियामधून आलेले ब्राऊनदेखील अल्पसख्याक पण त्याना फारसा जाच होत नाहीये काळ्या विद्यार्थ्यांचे म्हणणे असे की सगळ्याना सारखी वागणूक मिळाली पाहिजे काळे-गोरे हा वाद सपूर्ण नष्ट झाला पाहिजे

मिशिगन विद्यापीठात काळ्या विद्यार्थ्यांचा ग्रुप म्हणतो, की ' आम्हा काळ्याकरता एक निराळी सवलतीची योजना चालू केली पाहिजे आणि इतराच्या बाबतीत निराळी ' काही काळे विद्यार्थी कार्यकर्ते म्हणतात की विद्यापीठात काळ्याना सापत्नभावाने वागवले जाते आणि त्यामुळे त्याच्या ॲकेडेमिक करियरवर परिणाम होतो पण तेच आशियामधून जे विद्यार्थी इथे शिकायला येतात ते आपले वैशिष्ठ्य, सस्कृती ठेवून विद्यापीठात चागल्या तऱ्हेने यश सपादन करू शकतात अमेरिकन आणि आशियन विद्यार्थ्यांचे यश काळ्या विद्यार्थ्यांच्या डोळ्यावर येते आणि त्यामुळे काळ्या विद्यार्थ्यांत या विद्यार्थ्यांविषयी असूया निर्माण झालेली आहे आणि त्यामुळे काळ्या विद्यार्थ्यांनी एक नवी चळवळ निर्माण केलीय की विद्यापीठात काळ्या विद्यार्थ्यांची सख्या वाढवली पाहिजे

सर्वसाधारण नियम डावलून काळ्याना विद्यापीठात प्रवेश मिळाला पाहिजे काळ्याकरता विद्यापीठातले प्रवेशाचे नियम बदलले पाहिजेत तर सर्वसाधारण अमेरिकन लोक म्हणतात की वश-वर्ण भेद, जातीनिरपेक्ष अशी वागणूक प्रत्येक अमेरिकन नागरिकाला मिळावी म्हणजे सगळे भेद नाहीसे होतील व सर्वांना समान वागणूक मिळेल पण या राजकारण्यामुळे हे झगडे असेच चालू राहणार आहेत

दुसरे अल्पसंख्याक हे मूळचे इथले रहिवासी रेड इंडियन्स या रेड इंडियन्सची कौंसिल्स आहेत संघटना आहेत त्यांचा तर कुणीच त्राता नाहीये हे सगळे रेड इंडियन्स अगदीच हीन अवस्थेत दिवस काढत आहेत त्यांच्यातले पंचेचाळीस टक्के लोक बेकार आहेत वीस टक्के लोक सकस आहाराअभावी दर वर्षी मृत्युमुखी पडत असतात पुष्कळ हॉटेलबाहेर पाट्या लावलेल्या असतात - "रेड इंडियन्स आणि कुत्रे यांना आत आणण्यास सक्त मनाई आहे " त्यांना अमुक ठिकाणी जाण्यास मनाई आहे आणि तमुक ठिकाणी प्रवेश नाही, अशी त्यांच्यावर बंधने आहेत रेड इंडियन्स यांची ही अमेरिका पण या संबंध जमातींचा या गोऱ्या लोकांनी नायनाट केला त्यांच्याबरोबर जॉर्ज वॉशिंग्टनने जे तह केले होते आणि ज्या काही त्यांना सवलती दिल्या होत्या त्या सवलती पण आता या सध्याच्या अमेरिकनांनी काढून घेतल्या व त्यांना जगणे मुष्कील करून ठेवलेले आहे मार्लन ब्रँडो याने काही काळ रेड इंडियन्सच्या हक्काकरता चळवळ केली पण काही उपयोग झाला नाही ज्यांनी ज्यांनी रेड इंडियन्सकरता अमेरिकन सरकारशी थोडाफार लढा दिला त्यांचेच नुकसान झाले ते जीवनातून उठले त्यांचे जीवन रेड इंडियन्सप्रमाणेच उद्ध्वस्त झाले काळे त्या मानाने पुष्कळच बहुसंख्य आहेत चांगले संघटित आहे आणि त्यांचे जातभाई पण जगभर आहेत त्यांना पण पुष्कळ हालअपेष्टांना तोंड द्यावे लागते त्यातून ते मार्ग काढीत आहेत या वर्षी तर प्रेसिडेंटशिपकरता काळा उमेदवार पण उभा होता त्याचे नाव रेव्हरंड जेसी जॅक्सन तो निवडणुकीत मागे पडणार हे दिसतच होते पण प्रचार खूपच जबरदस्त केला होता आणि पुष्कळ गोऱ्यांचा पाठिंबा पण त्याला होता युनायटेड स्टेटस् ऑफ अमेरिका हे राष्ट्र झाल्यापासून आजपर्यंत गोराच राष्ट्राध्यक्ष झालेला आहे. या निवडणुकीत एक काळा उमेदवार राष्ट्राध्यक्षाच्या निवडणुकीकरता उभा राहिला काळ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण झालेला आहे ते कधी ना कधी काळा राष्ट्राध्यक्ष निवडून आणतीलच भारतात पण ' जगजीवनराम ' राष्ट्राध्यक्ष होणार होते कधी ना कधी भारतात पण दलित समाजातला राष्ट्राध्यक्ष नक्कीच निवडून येईल याची मला खात्री आहे

सर्व काही आपल्याकडे चालले आहे त्याप्रमाणेच चालते कुठेही गावात खून अगर चोरीमारी झाली तर शक्यतो पोलिस प्रथम एखाद्या काळ्या माणसाला अगर स्त्रीला पकडतात पण पोलीसातही काळ्या वर्गातले पोलीस अधिकारी आहेत काळ्या व्यक्तीचा खून झाला तर गोऱ्याला पण पकडले जाते

एका गावात एक गोरा तरुण आपल्या नूतन पत्नीला एकांत स्थळी प्रेम करण्याकरता घेऊन गेला व तिथे त्याने तिचा खून केला सरळ गोळी घालून तिला मारून टाकले व पिस्तुलाची विल्हेवाट लावल्यानंतर त्याने कांगावा सुरू केला की

आपण व आपली पत्नी प्रेम करत असताना एक गोळी दूरवरून आली व आपल्या पत्नीचा मृत्यु झाला त्या वेळी मी पाहिले की, दूरवरून एका काळ्या गनमॅनने गोळी घातली व तो क्षणात नाहीसा झाला

गोऱ्या पोलिसांनी एका काळ्या माणसाला पकडले व त्याच्याविरुद्ध भरपूर साक्षी-पुरावा गोळा केला कोर्टात काळ्या माणसाविरुद्ध खटला उभा राहिला खटला बरेच दिवस चालला होता त्या वेळी तो काळा माणूस परोपरीने सांगत होता की तो मी नव्हेच मी त्या वेळी तेथे नव्हतो पण त्याचे म्हणणे कोणीच ऐकायला तयार नव्हते शेवटी त्या काळ्या माणसाला इलेक्ट्रिक चेअरवर मरणाची शिक्षा जाहीर होणार हे निश्चित झाले अशा वेळी ज्याने खून केला होता त्याच्या भावाला, गोऱ्याच माणसाला त्याची दया आली त्याचे मन त्याला खाऊ लागले त्याला वाटले की निष्कारण एका निरपराध माणसाला मरणाची शिक्षा होतेय त्याने ऐन वेळी कोर्टात जाहीर केले की हा काळा माणूस पूर्णपणे निर्दोषी आहे व माझ्याच भावाने स्वत च्या पत्नीला गोळी घालून ठार केलेय ही बातमी जाहीर होताच काळ्या लोकांनी सरकारविरुद्ध निदर्शने केली मोर्चे निघाले काळ्याविरुद्ध खरे खोटेनाटे आरोप केले जातात याविषयी सभा होऊ लागल्या व गोऱ्याविरुद्ध जोराचा प्रचार होऊ लागला तो काळा माणूस आता सुटणार आहे खऱ्या खुन्याविरुद्ध खटला आता सुरू झाला आहे व या प्रसंगावर लगेच प्रत्यक्ष चित्रपट पण काढला जाणार आहे. अमेरिकेत अशा सत्य घटनांवर तावडतोब चित्रपट पण काढले जातात

अशीच एक दुसरी हकीगत एका गावात एका गोऱ्या श्रीमंत माणसाचा मध्यरात्री खून झाला पोलीसांनी तावडतोब कारवाईला सुरुवात केली तासाभरात एका काळ्या माणसाला रेल्वेस्टेशनवर अटक करण्यात आली त्या काळ्या माणसाला काही बोलूही दिले नाही त्या काळ्या माणसाजवळ एक छोटीशी प्रवासी बॅग होती त्यात पिस्तुल सापडले पोलीसस्टेशनवर त्याला नेल्यावर त्याला पोलीस ऑफिसरसमोर उभे करण्यात आले त्याला विचारले, या वेळी तू रेल्वेस्टेशनवर कसा ? तू कोण आहेस ? तू कुठून कुठे चालला आहेस ?

त्याने सांगितले की मी पोलीस ऑफीसर आहे मी रजेवर आहे व मी माझ्या आईला भेटण्याकरता या गावी आलो होतो आईला भेटलो व आता रात्रीच्या गाडीने परत जात आहे.

पोलीस ऑफीसर व पोलीस चक्रावून गेले तरी पोलीस ऑफीसर म्हणाला, या काळ्या माणसाचा काही भरवसा नाही याने पोलीस ऑफीसरचा बिल्ला पळवला असला पाहिजे चांगले चार-पाच गुद्दे हाणले म्हणजे हा खरे काय ते बोलेल

तो काळा पोलीस ऑफीसर शांतपणे म्हणाला, तुम्ही माझ्या ऑफीसला फोन

करून आधी विचारा आणि मग काय ते ठरवा '

पोलीस ऑफीसरने फोन लावला व चौकशी केली तेव्हा तो उडालाच तिथला पोलीस ऑफीसर म्हणाला, तुम्ही ज्याच्याविषयी चौकशी करीत आहात ते होमीसाइड खात्याचे मुख्याधिकारी आहेत तेच तुम्हाला खुनी शोधून काढण्यात मदत करतील

शेवटी त्या काळ्या पोलीस अधिकाऱ्याच्या हातात त्यानी खुनाची सारी सूत्रे दिली व त्यानेच खरा खुनी शोधून काढला व खुनी गोराच निघाला

या सत्य घटनेवरही चित्रपट निघालेला आहे तो गोऱ्या अमेरिकनानी काढलेला आहे. सिडने पॉयटर या काळ्या नटानेच काळया पोलीस अधिकाऱ्याची भूमिका केलेली आहे पण सत्य घटना ठरली की त्यावर मोकळेपणी कबुली द्यायची पण त्याची तयारी असते

काळे-गोरे वाद सपला, असे जरी म्हटले जाते तरी तो सपलेला नाहीये तो असाच अधुनमधून चालू राहणार आहे.

मला कॅनडाच्या कौन्स्युलेटच्या ऑफिसमध्ये जायचे होते न्यूयॉर्क शहरात मी रेडिओसिटी म्युझिक हॉलपर्यंत बरोबर आलो त्याच्या समोरच्याच रस्त्याच्या बाजूला कॅनडाच्या कौन्स्युलेटचे ऑफिस होते नाक्यावर एक पोलीस उभा होता त्याला मी पत्ता दाखवला व चौकशी केली तर त्याला नक्की कुठे आहे ते काही सागता आले नाही शेवटी थोडे जवळपास फिरल्यावर व रस्ता ओलाडल्यावर बिल्डिग दिसली व आम्हीच ऑफिस शोधून काढले आपल्याकडे पण पोलीसाला पत्ता पुष्कळ वेळा माहीत नसतो वेळ मिळेल तेव्हा पोलीसाशी त्याच्या कामाविषयी मी बोललो असेन पण मला असा एकच पोलीस आढळला, की तो म्हणाला, की आम्हाला खूपच काम पडते अगदी नको एवढे काम करावे लागते

आपण डोक्यात एक कोणती तरी कल्पना ठेवून जर प्रत्येक गोष्टीची चौकशी करू लागलो तर आपल्या मनाप्रमाणे उत्तरे मिळतीलच याचा काही भरवसा नाही एकदर अमेरिकन लोक किती काम करतात अशी जर चौकशी करत फिरले तर आपल्याला असे आढळेल की सगळीकडे कामाच्या नावाने टगळमगळ दिसेल आता घरात काही प्लबरचे आपल्याला न जमणारे काम असेल आणि प्लबरकडे गेलात तर तो चार वाजता बद करून गेलेला असतो तुम्हाला आधी अपॉईंटमेंट घेऊन मग जावे लागेल आपण केलेली प्रत्येक चौकशी बरोबरच असेल असे नक्की सागता येणार नाही एखाद्या वर्कशॉपमध्ये आपण कामगाराशी बोललो तर सरळपणे सगळी माहिती देतात अगदी त्याच्या बॉससमोर उघड उघड बोलतात पण काही ठिकाणी कामगार बोलायला पण तयार नसतात

सबध अमेरिकेन कारखान्यामध्ये जास्तीतजास्त पाच टक्के कामगाराची गैरहजेरी

असते याचा अर्थ वीसामध्ये एकतरी गैरहजर असतोच डेट्रॉइटमध्ये जिथे मोटार उद्योग मोठ्या प्रमाणावर आहे आणि कारखाने पुष्कळ आहेत तेथे उन्हाळ्यामध्ये सोमवारी आणि शुक्रवारी साधारण पधरा टक्के गैरहजेरी असते अमेरिकेत फक्त सोमवार ते शुक्रवार हे कामाचे दिवस असतात शनिवार-रविवार या सुट्टीच्या दिवसानतर कामावर जाण्याचा दिवस व शुक्रवार सपला की सुट्टीचे दोन दिवस कुणीकडून तरी तीन दिवस सलग सुट्टी मिळावी म्हणून पधरा टक्के कामगार ऑफिशियली सिक पडतात

सहा अमेरिकन लोकामध्ये एक हा केंद्रिय अथवा प्रातीय किवा गावातल्या स्थानिक म्युनिसिपालिटीत काम करणारा असतो आणि सर्वसाधारण सरकारी नोकरी फारच थोडे लोक करतात नोकरीमध्ये वर्षातून मिळणारी तीन आठवड्याची सुट्टी, मधून मिळणारी जोडून तीन दिवसाची सार्वजनिक सुट्टी सारे काही आरामात प्रत्येक कुटुबात चालते त्यातून काही युनियन्स् आठवड्याचे तास कमी करण्यासाठी लढत असलेल्या दिसतील

त्यामुळे अमेरिकेत पुष्कळ लोकात असे म्हटले जाते की अमेरिकन लोकाना काम करायला नको, नुसती मजा मारायला हवी मगळवार, बुधवार आपण दुपारी सुपर मार्केटमध्ये मॉलमध्ये गेलो तरी गर्दी दिसते रेस्टॉरटस्मध्ये सर्व टेबले भरलेली दिसतात

एका कामगार बाईला विचारले, तर ती म्हणाली, लोक मन लावून भरपूर काम करीत नाहीत फक्त कामाच्या टोपल्या टाकण्याचे काम करतात तस म्हटल तर गोष्ट खरी नाही आणि ती कुठेच खोटी पण नाही कारण आपल्याकडे मी परळ वर्कशॉपमध्ये एकदा ऑफिशियली चौकशीकरता गेलो होतो त्या वेळी काम सोडून पुष्कळसे कामगार पानतबाखूचे बार भरत गप्पा मारताना मी पाहिलेत पण काम केल्याशिवाय कारखाना चाललाय का ? कारखाना चालणारच पण जेवढे काम व्हायला पाहिजे तेवढे होत नाही

अमेरिकेत एका कारखान्याचे सुपरव्हायझर म्हणाले, कोणाला कामाची पर्वाच नाही सगळी डोट केअर अटीट्यूड आहे मला काय त्याचे ? पूर्वी अस नव्हत कामगार मनापासून काम करायचे त्याना पैशाची जरूरी होती आता कामगाराची वृत्ती बदललीय त्याना माहीत झालेय की आपल्याला सहजासहजी कामावरून काढून टाकता येणार नाही त्यामुळे ते जमेल तसे काम करतात

एका कामगाराला विचारले की, "खरोखरच तुम्ही काम मनापासून करता का ? तुमचे आईवडील, आजोबा जसे काम करायचे तसे तुम्ही करता का ? "

तो म्हणाला, 'नक्की सागता येणार नाही पण त्याच्यासारखे काम आमच्या हातून होणार नाही तो जमानाच निराळा होता त्या वेळी पैसा अपुरा होता आता भरपूर पैसा आहे आणि आम्हाला तो मिळाला पाहिजे

समजा, एक हजार जपानी कामगाराना आणि तेवढ्याच अमेरिकन कामगाराना सगळ्या सारख्याच मशिनरीवर काही काम करायला दिले तर कोण अधिक व चागले काम करेल ?

तर अमेरिकेत राहणाराच कामगार म्हणतो, की खरे बोलायचे तर बहुतेक जपान्याची याबाबतीत सरशी होईल

अमेरिकन शेतकरी म्हणतो की परदेशी माल वापरायला मला मुळीच आवडत नाही पण हल्ली अमेरिकन माल फार चागला बनत नाही ते नुसते आळशी झालेत मला म्हणायचेय, त्याना कशाचीच पर्वा नाही काही वर्षांपूर्वी जुन्या मशिनरीवर काम करायला आम्हाला मजा वाटायची त्या वेळी जी मशिनरी असे ती मजबूत, टिकाऊ होती पण आता सगळा कारभार ढिलढोल यावर त्याला विचारले गेले की " याचा अर्थ असा की अमेरिकन कपन्या जास्त पैशाच्या मागे लागून चागले काम करत नाहीत "

शेतकरी म्हणाला, " मला नक्की काहीच सागता येणार नाही कारण मी त्याचा अभ्यास केलेला नाही '

एक मोठा शेतकरी-- ज्याच्या सफरचदाच्या बागा आहेत तो-- म्हणतो की, आम्हाला बहामामधून माणसे आणावी लागतात कारण स्थानिक लोक काम करायला येत नाहीत गावातली माणसे फार थोडा वेळ काम करतात थोडेफार काम केले, थोडेफार पैसे मिळाले की सरळ घरी निघून जातात पधरा-वीस डॉलर्स मिळाले की खूष त्याना भरपूर काम करायला मिळत असूनही जास्त काम करायला नकोय जास्त काम करायला तयारच नाहीत मग आम्ही काय करायचे ?

स्टॅनफोर्ड नॉल हे कर्टीस नॉल कॉर्पोरेशनचे चेअरमन म्हणतात की अमेरिकन कामगाराला जेव्हा मनाला वाटेल तेव्हा तो गैरहजर राहून दोन-तीन आठवडे दाडी मारून सुट्टी मजेत घालवतो कारण त्याने थोडे काम करून भरपूर पैसा मजा मारण्याकरता जमा केलेला असतो पण हा शेरा कितपत खरा किंवा खोटा हे समजायला मार्ग नाही म्हणून क्लिव्हलँडला त्याच्याशीच सी बी एस चे वार्ताहर अँडीरूनी यानी बोलायचे ठरवले तर त्याच्या सेक्रेटरींनी फोनवर सागितले की, स्टॅनफोर्ड नॉल हेच स्वत सहा आठवडे विश्रातीकरता फोर्ट लॉटरडेल येथे गेलेत

तेथे जाऊन त्यानी त्याना गाठले तेव्हा ते म्हणाले की काही कामगार मडळी पुरेसे काम करून पुरेसे पैसे मिळवतात पैसे बँकेत वगैरे साठवत नाहीत चैन करायला पुरेसे पैसे मिळाले त्यापेक्षा थोडे अधिक मिळाले की मग ह्या मडळीचा कामाचा वेग कमी होतो विशेषत तरुण कामगार मडळींची सगळी ध्येय-धोरणेच बदलून गेलेली आहेत त्याच्या आईवडिलाना काम करून पोटापुरते पैसे मिळत होते पचवीस-तीस

वर्षांपूर्वी त्याची प्राप्ती फारच कमी होती काम जास्त होते आता दिवस बदललेत त्याना भरपूर पैसे मिळतात आणि त्यामुळे ते मुलाना पाहिजे ते देऊ शकतात आणि त्यामुळे मुलाना वाटते, आपल्याला पण एकदम भरपूर पगार पैसा मिळाला पाहिजे थोडे काम करून जास्त पैसा मिळाला पाहिजे

मग यावर उपाय काय ?

" आम्ही कंपनीचे वार्तापत्र काढलेय त्यात सुपरव्हायझर व सिनिअर अधिकाऱ्याची माहिती देतो शिवाय कामगाराचे वाढदिवस, ॲनिव्हर्सरी वगैरे छापतो आणि चांगल्या कामाबद्दल बक्षिसे जाहीर करतो '

" या गोष्टी पुष्कळच अपुऱ्या आहेत त्याचे पगार वाढवायला पाहिजेत त्याची युनियन याबाबतीत काहीच करत नाही काय ? "

" आम्ही कामगाराना जास्त कामाबद्दल जास्त डॉलर्स देतो जर त्यानी कामाचा ठराविक दर्जा वाढविला तर पैसे देतोच की "

" पण कामाचा दर्जा वाढवला तर तुम्ही जास्त पैसे देता पण कामाचा ठराविक दर्जा वाढवल्याप्रमाणे काम केले तर तुम्ही परत दर्जा वाढवता "

" पण हे असे प्रश्न कधीच संपणारे नाहीत प्रश्न गट्टानीचेच होतात "

" कामगार खरोखरच फार काम करतात काय ?

" होय "

' हे तुमच्या हिताचेच आहे पण त्याना याचा काही फायदा होतो का ? '

" होय निश्चितच होतो कारण काम करणाऱ्या काम गाला सगळीकडेच मानसन्मानाने वागवले जाते गोष्ट अशी आहे की काम करणाऱ्याला नेहमीच चांगली वागणूक व मान दिला जातो काम करण्यापेक्षा जे नुसता वेळ घालवा ऽ न्ता टगळमगळ करतात त्यापेक्षा "

विल्यम विनपींसिंगर हे मशिनिस्ट ॲंड एअरोस्पेस वर्कर्स युनियनचे व्हाटग प्रेसिडेंट हे अतिशय जहाल पण तितकेच प्रेमळ त्याना विचारण्यात आले की, स्टॅन फोर्डनॉल म्हणतात की, अमेरिकन कामगाराजवळ इतका पैसा झालाय की, ते मनाला येईल तेव्हा गैरहजर राहतात "

विनपींसिंगर हसले आणि म्हणाले की, " ते स्टॅन फोर्डनॉल जेवढे पैसे मिळवतात तेवढेच ते मिळवीत असतील '

" स्टॅन फोर्डनॉलबद्दल तुम्हाला काय म्हणायचेय ?

" ते सध्या फोर्ट लॉटरडेलमध्ये विश्रांती घेत आहेत "

विनपींसिंगर म्हणाले, त्याच्यासारखे लोक आहेत म्हणून आम्हा युनियन वर्कर्सना काम आहे.

समजा, एक हजार जपानी कामगारांना आणि तेवढ्याच अमेरिकन कामगारांना सगळ्या सारख्याच मशिनरीवर काही काम करायला दिले तर कोण अधिक व चांगले काम करेल ?

तर अमेरिकेत राहणाराच कामगार म्हणतो, की खरे बोलायचे तर बहुतेक जपान्यांची याबाबतीत सरशी होईल

अमेरिकन शेतकरी म्हणतो की परदेशी माल वापरायला मला मुळीच आवडत नाही पण हल्ली अमेरिकन माल फार चांगला बनत नाही ते नुसते आळशी झालेत मला म्हणायचेय, त्यांना कशाचीच पर्वा नाही काही वर्षांपूर्वी जुन्या मशिनरीवर काम करायला आम्हाला मजा वाटायची त्या वेळी जी मशिनरी असे ती मजबूत, टिकावू होती पण आता सगळा कारभार ढिलढोल यावर त्याला विचारले गेले की " याचा अर्थ असा की अमेरिकन कंपन्या जास्त पैशाच्या मागे लागून चांगले काम करत नाहीत "

शेतकरी म्हणाला, ' मला नक्की काहीच सांगता येणार नाही कारण मी त्याचा अभ्यास केलेला नाही '

एक मोठा शेतकरी-- ज्याच्या संत्र्यांच्या बागा आहेत तो-- म्हणतो की, आम्हाला बहामामधून माणसे आणावी लागतात कारण स्थानिक लोक काम करायला येत नाहीत गावातली माणसे फार थोडा वेळ काम करतात थोडेफार काम केले, थोडेफार पैसे मिळाले की सरळ घरी निघून जातात पंधरा-वीस डॉलर्स मिळाले की खूष त्यांना भरपूर काम करायला मिळत असूनही जास्त काम करायला नकोय जास्त काम करायला तयारच नाहीत मग आम्ही काय करायचे ?

स्टॅनफोर्ड नॉल हे कर्टीस नॉल कॉर्पोरेशनचे चेअरमन म्हणतात की अमेरिकन कामगाराला जेव्हा मनाला वाटेल तेव्हा तो गैरहजर राहून दोन-तीन आठवडे दांडी मारून सुट्टी मजेत घालवतो कारण त्याने थोडे काम करून भरपूर पैसा मजा मारण्याकरता जमा केलेला असतो पण हा शेरा कितपत खरा किंवा खोटा हे समजायला मार्ग नाही म्हणून क्लिव्हलँडला त्यांच्याशीच सी बी एस चे वार्ताहर अँडीरूनी यांनी बोलायचे ठरवले तर त्यांच्या सेक्रेटरीनी फोनवर सांगितले की, स्टॅनफोर्ड नॉल हेच स्वत सहा आठवडे विश्रांतीकरता फोर्ट लॉडरडेल येथे गेलेत

तेथे जाऊन त्यांनी त्यांना गाठले तेव्हा ते म्हणाले की काही कामगार मंडळी पुरेसे काम करून पुरेसे पैसे मिळवतात पैसे बँकेत वगैरे साठवत नाहीत चैन करायला पुरेसे पैसे मिळाले त्यापेक्षा थोडे अधिक मिळाले की मग ह्या मंडळींचा कामाचा वेग कमी होतो विशेषत तरुण कामगार मंडळींची सगळी ध्येय-धोरणेच बदलून गेलेली आहेत त्यांच्या आईवडिलांना काम करून पोटापुरते पैसे मिळत होते पंचवीस-तीस

वर्षांपूर्वी त्याची प्राप्ती फारच कमी होती काम जास्त होते आता दिवस बदललेत त्याना भरपूर पैसे मिळतात आणि त्यामुळे ते मुलाना पाहिजे ते देऊ शकतात आणि त्यामुळे मुलाना वाटते, आपल्याला पण एकदम भरपूर पगार पैसा मिळाला पाहिजे थोडे काम करून जास्त पैसा मिळाला पाहिजे

मग यावर उपाय काय ?

" आम्ही कपनीचे वार्तापत्र काढलेय त्यात सुपरव्हायझर व सिनिअर अधिकाऱ्याची माहिती देतो शिवाय कामगाराचे वाढदिवस, ॲनिव्हर्सरी वगैरे छापतो आणि चागल्या कामाबद्दल बक्षिसे जाहीर करतो "

" या गोष्टी पुष्कळच अपुऱ्या आहेत त्याचे पगार वाढवायला पाहिजेत त्याची युनियन याबाबतीत काहीच करत नाही काय ? '

" आम्ही कामगाराना जास्त कामाबद्दल जास्त डॉलर्स देतो जर त्यानी कामाचा ठराविक दर्जा वाढविला तर पैसे देतोच की "

" पण कामाचा दर्जा वाढवला तर तुम्ही जास्त पैसे देता पण कामाचा ठराविक दर्जा वाढवल्याप्रमाणे काम केले तर तुम्ही परत दर्जा वाढवता "

' पण हे असे प्रश्न कधीच सपणारे नाहीत प्रश्न ग[illegible]र्नीचेच होतात "

" कामगार खरोखरच फार काम करतात काय ?

" होय "

" हे तुमच्या हिताचेच आहे पण त्याना याचा [illegible]ही फायदा होतो का ? "

" होय निश्चितच होतो कारण काम करणाऱ्या का[illegible]ला सगळीकडेच मानसन्मानाने वागवले जाते गोष्ट अशी आहे की काम क[illegible]ाऱ्याला नेहमीच चागली वागणूक व मान दिला जातो काम करण्यापेक्षा जे नुसता वेळ घालव[illegible] टगळमगळ करतात त्यापेक्षा "

विल्यम विनपीसिगर हे मशिनिस्ट ॲड एअरोस्पेस वर्कर्स युनियनचे [illegible] प्रेसिडेंट हे अतिशय जहाल पण तितकेच प्रेमळ त्याना विचारण्यात आले की, ' स्टॅन फोर्डनॉल म्हणतात की, अमेरिकन कामगाराजवळ इतका पैसा झालाय की, ते मनाला येईल तेव्हा गैरहजर राहतात "

विनपीसिगर हसले आणि म्हणाले की, " ते स्टॅन फोर्डनॉल जेवढे पैसे मिळवतात तेवढेच ते मिळवीत असतील "

" स्टॅन फोर्डनॉलबद्दल तुम्हाला काय म्हणायचेय ?

" ते सध्या फोर्ट लॉटरडेलमध्ये विश्राती घेत आहेत "

विनपीसिगर म्हणाले, त्याच्यासारखे लोक आहेत म्हणून आम्हा युनियन वर्कर्सना काम आहे.

आमच्याजवळ स्टॅटिस्टिक्स आहे. मला वाटते तुमच्या युनियनमध्ये पण असेल. डेट्रॉइटमध्ये आठवड्यात सोमवार आणि शुक्रवार पुष्कळच गैरहजेरी असते.

विनपीसिंगर म्हणाले, " असे अनेक उद्योगधंदे आहेत की, तेथेही अशीच परिस्थिती असणे शक्य आहे.

पण प्रत्येक कामगाराला असे दांडी मारून घरी बसण्याचा काही हक्क वगैरे आहे की काय ? तुम्ही युनियनचे कार्यकर्ते म्हणून विचारतो ?

खरं म्हणाल तर कामगाराला काम करायचे की नाही हे त्याचे त्याने ठरवायचेय. होय त्याला काम करावेसे वाटले नाही तर तो करणार नाही.

अमेरिकन कामगार मेहनत घेऊन जेवढे काम करायला पाहिजे तेवढे काम करतात का ?

मला वाटते ते भरपूर काम करतात. मला नेहमीच वाटते की ते खूपच कष्ट करतात.

ते भरपूर काम करत नाहीत असे म्हणणारे पण पुष्कळ लोक आहेत. त्याबद्दल तुम्हाला काय म्हणायचेय ?

' एकंदर साऱ्या गोष्टी लक्षात घेऊन व त्याचा कामाच्या सर्व संदर्भाशी अर्थ लावून मला असे म्हणायचेय की, कामगाराचे शारीरिक श्रमाचे काम कमी होत चाललेय. पूर्वीपेक्षा शारीरिक श्रम फार कमी पडतात. सगळीकडे उद्योगधंद्यात प्रचंड प्रमाणात ऑटोमॅटिक मशिनरी आल्यामुळे कामगारांना कामच कमी पडू लागलेय. त्यामुळे शारीरिक काम करणाऱ्यांची गरज वाटेनाशी झालीय.

तसं जर तुम्ही म्हणत असाल तर आपल्या घरात पण पुष्कळ काम कमी झालेय. ऑटोमॅटिक मशिनमुळे घरातले काम पण आपण फारच लवकर करू शकतो. घरापुढचे गवत आपण मशिनने कापतो. डीशवॉशरमुळे, धुलाई मशिनमुळे आपले काम खूपच वाचते व इतर कामे करायला पुष्कळ वेळ मिळतो. मग पण आपण कमी काम करतो का ? नव्या नव्या शोधामुळे, नव्या तंत्रज्ञानामुळे शारीरिक श्रम कमी होत आहेत, हे म्हणणे म्हणजे कामच उरले नाही हे म्हणणे तितकेसे बरोबर नाही. आता तर रोबटस् सर्व कारखान्याचे काम करू लागणार आहेत आणि त्यामुळे कामगारच लागणार नाहीत. त्यामुळे बेकारी वाढत जाईल असे म्हणण्यात काही अर्थ नाही. "

' सगळीकडे बेकारी माजेल ही कल्पना शुद्ध वेडेपणाची आहे. सगळीच कामे मशिनमुळे होतील किंवा माणसामुळे होतील, हे म्हणणे काही बरोबर नाही. मशिन सुरू करायला माणसे लागणार आणि त्याची देखभाल पण माणसेच करणार. सर्वस्वी मशिनवर अवलंबून राहायला आणखी कितीतरी वर्षे लागतील.

कामे केल्याशिवाय काही देश पुढे येत नाही. कामे सगळीकडे होत

असतातच पण पूर्वीसारखे आता होत नाही Good Old days ही म्हण जो तो कुठेही कुठल्याही देशात सारखी वापरत असतो आमच्या वेळी अस नव्हत हो आमच्या वेळी काय पाऊस पडायचा ? असा आता कधी पडत नाही, असे जुने म्हातारे लोक सगळीकडे म्हणत असतात ''

आपल्याकडे पण म्हणतात, स्वातंत्र्यपूर्व कालात

माणसाला काम आवडो अगर त्याचा तिटकारा असो पण काम हे करावेच लागते

एका मोटारीच्या कारखान्यात एका कामगाराला विचारले की, '' तुला तुझ्या कामाचा तिटकारा वाटतो का ? ''

'' नाही कारण कुरकूर करण्यात काहीच अर्थ नाही आवडो अगर न आवडो, पोटाकरता काम व्यवस्थित करायलाच पाहिजे अगदी आवड जरी नसली तरी काम व्यवस्थित झालेच पाहिजे ''

'' मग तुला काम करायला आवडते ?

'' आवडलेच पाहिजे ''

'' तू कसले काम करतोस ? ''

'' सगळी घाण व कचरा काढून स्वच्छ करणे ''

'' पुष्कळ लोकाना हे काम आवडणार नाही पण त्याचे तुला काही वाटत नाही ? ''

'' नाही, बिलकूल काही वाटत नाही मी अगदी मन लावून काम करतो आणि माझे काम सपवून मी समाधानाने घरी जातो ''

दुसऱ्या एका कामगाराला हेच प्रश्न विचारले तर तो म्हणतो,

'' हो माझे काम मला आवडते पण काही काही वेळा आवडत पण नाही पण काही वेळेला काही कामे चागली असतात आणि काही कामे या कामाहून खराब असतात ''

तिसऱ्या कामगाराला विचारले, '' तुझे काम तुला आवडते का ? की तुला तुझ्या कामाचा तिटकारा वाटतो की एकदर तुला कसे काय वाटते ? ''

'' नक्की मला काहीच सागता येणार नाही इथे काम करायला मला आवडते पण कधी कधी इथे यायला नकोसे वाटते

बहुतेक सर्व कामगाराना काम करायला पाहिजे असते आणि कामे पण मनापासून करतात आणि काही कामगाराना तर आपले काम खास महत्त्वाचे आहे आणि ते फक्त आपणच चागले करू शकतो याचा त्याना अभिमान वाटतो

आता रस्त्यात पोस्टमन दिसला त्याला विचारले की, '' तुला तुझे काम

करायला मजा वाटते का ?

पोस्टमन म्हणाला, मला लोकांशी बोलायला आवडते मला ही वॉटरगेटची हद्द दिलेली आहे. माझी निरनिराळ्या लोकांशी आणि विविध उद्योग करणाऱ्या लोकांशी चागली ओळख झालीय

तस पाहिल तर जो तो मनापासून काम करत असतो तस काम केल नसत तर सारेच व्यवहार थड पडले असते आणि राष्ट्र रसातळाला गेले असते

एका बुटाच्या कारखान्यातल्या कामगाराला विचारले की, तू किती वर्षे काम करत आहेस ?

तो म्हणाला, " बेचाळीस वर्षे "

हेच काम

हो, हेच काम

' हेच काम करायला तुला आवडते का ? "

" चागलेच आवडते '

" दुसरे तू काहीच करू शकणार नाहीस ?

" दुसरे करता येईल की नाही हे सागता येणार नाही "

" तू ते आवडीने करतोस ?

" होय "

दुसरी एक कामगार मुलगी बुटाना पॉलीश करत होती तिला विचारले, " तू इथे नोकरीला कधी लागलीस ? "

" शाळेचे शिक्षण सपल्यावर दोन दिवसात मला इथे नोकरी मिळाली १९७३ साली

" आज ७६ साल आहे त्या वेळेपासून इथेच नोकरी करीत आहेस ?

होय

आणखी किती वर्षे तू इथे नोकरी करशील ? "

" ओऽऽ ! किती वर्षे ते मी कसे सागू ? पण बहुधा आणखी काही काळ.

तुला तुझे काम आवडते ? "

हो हे काम फार सोपे आहे. "

" पण पैशाची जरूरी नसेल तर तू काम करशील ? "

खर म्हणाल, तर पैशाकरताच नव्हे. पण घरी बसून तरी काय करणार ? बोअर होऊन जाईन घरी कामच नाही नुसते बसून कटाळा येणार त्यापेक्षा इथे कामात असणे बरे चार पैसेही मिळतात आणि वेळ पण चागला मजेत जातो "

दुसरीकडे एका रेडीमेड कपड्याच्या फॅक्टरीमध्ये काम करणारी बाई म्हणते,

की, '' या कारखान्यात मी गेली अडतीस वर्षे काम करीत आहे आणि मी इथे प्रत्येक मिनीट मजेत घालवते कारण मला इथे काम करायला आवडते '' ती हसत म्हणते, '' पुष्कळशी वर्षे मी इथे शिवणाच्या मशीनवर काम करत होते आणि मला शिवण आवडते ''

एकच एक काम करायचा कटाळा येतो असे म्हटले जाते आणि सतत तेच तेच काम करणे आळसाचे व कटाळवाणे होते आणि त्या कामाचा तिटकारा येतो, असा सर्वसाधारण समज आहे पण ही गोष्ट नितकीशी खरी नाही पाहणाराला असे वाटते, पण जे कामगार काम करत असतात त्याना तसे वाटत नाही प्रत्येकालाच त्याला आवडणारे काम मिळते असे थोडेच आहे ? अमेरिकन कामगार दिवसाचे आठ तास काम करत असतो त्या वेळी घरच्या- दारच्या सगळ्या काळज्या विसरून तो काम करतो आणि आपण आपले काम व्यवस्थित करतोय, यातच त्याचे सारे सुख सामावलेले असते

आता गोष्ट अशी आहे की सगळ्यानाच आपले काम आवडते असे नाही पुष्कळ वेळा काम आवडत नसूनही पैशाकरता करावे लागते जादा पगार मिळतो म्हणून काही लोक न आवडणारे काम करतात तर कित्येक वेळा काम आवडीचे असते पण पैसे कमी मिळतात त्यामुळे पुष्कळ वेळा बेकार म्हणण्यापेक्षा मनासारखे काम मिळत नाही म्हणून बेकार राहण्याची पाळी अमेरिकन माणसावर येते

शारीरिक कष्टाची कामे असतात तिथे पगार अर्थातच कमी मिळतो पण जिथे बुद्धीचा, घेतलेल्या शिक्षणाचा उपयोग करावा लागतो तिथे केव्हाही जास्त पैसे मिळतात श्रमाची कामे करणारी माणसे बुद्धीजीवी वर्गापेक्षा अमेरिकेत जास्त आहेत हल्ली काय झालेय, पुष्कळ लोक शिक्षणाकडे जास्त लक्ष देतात आणि काहीतरी शैक्षणिक किंवा तांत्रिक कामाची नोकरी मिळावी म्हणून खटपटीत असतात

त्यामुळे काय झालेय की शाळेत शिक्षकाची नोकरी मिळवण्याकरता, हजारो उत्सुक असतात पण शहरातला केरकचरा वाहून नेण्याकरता माणसे मिळत नाहीत न्यूयॉर्कमधल्या शाळेतल्या शिक्षकाला वर्षाला २५००० डॉलर्स मिळतात पण तोच Garbageman ला वार्षिक ३०,००० डॉलर्स द्यावे लागतात शिक्षकापेक्षा भग्याला पगार जास्त

आपल्याकडे पण हीच परिस्थिती आहे. मोठमोठ्या कपन्यामध्ये सफाईकाम करणाऱ्याला तीन ते चार हजार पगार मिळतो पण सरकारी नोकरीत काम करणाऱ्या ऑफिसरला पुष्कळच कमी पगारावर काम करावे लागते

मार्सेल मूलबेरी हे शेतकरी आहेत त्याच्या सफरचदाच्या बागा (Orchards) आहेत आणि ते सफरचदाचा धदा करतात त्यापासून इतर अन्नाचे पदार्थ तयार

करतात ते म्हणतात आमच्याकडे जे नेहमीचे कामगार आहेत त्याना माहीत आहे की मी पण त्याच्या बरोबरीने काम करतो त्यामुळे ते कामात अजिबात कुचराई करत नाहीत त्याना मनापासून काम करायला आवडते व ते भरपूर काम करतात पण ज्या वेळी हगामाचे दिवस येतात तेव्हा गावातले लोक काम करायला येत नाहीत आम्हाला बाहेरून लोक आणावे लागतात ते पण पुरेसे मिळत नाहीत गावातले लोक बेकार राहतील पण कामाला येणार नाहीत त्यामुळे आमचा जो वार्षिक कार्यक्रम असतो त्याला तडे पडतात ज्याना काम नसते त्याना शेतावरचे काम करायला नको असते त्यामुळे हगामाचे काम पुष्कळसे पडून राहते गेल्या वर्षी चाळीस हजार पेट्यामधील फळे इथे शेतावरच नासून गेली ज्या वेळी इथे सफरचद तोडण्याचे काम चालू होते त्याच वेळी शेतापासून थोड्या दूर अतरावर काही माणसे भरदुपारी उन्हात आडवी होऊन पडली होती ''

सॅम ब्राउन हे अमेरिकन उद्योगपती आहेत ते म्हणतात की, ' मी ज्या वेळी अठरा वर्षांचा होतो त्या वेळी मला बँकेचे पाचशे डॉलर्स कर्ज होते पधरा वर्षांनतर मी बँकच ताब्यात घेतली त्या वेळी मी दिवसाचे चोवीस तास काम करीत होतो पण आता एवढे काम लोक कुठे करतात ? श्रम करायचे दिवस असतात तरुणपणी त्या वेळी मरेपर्यंत काम करायला पाहिजे मला काही माझ्या घरचा पैसा नव्हता माझ्याजवळ काहीही नव्हते प्रथम मी धदा सुरू केला तो बँकेचे कर्ज घेऊन १९३८ चा फोर्डट्रक पहिल्या प्रथम मी घेतला आता माझ्याजवळ प्रत्येकी चाळीस हजार डॉलर्स किंमतीचे सातशे मोठे ट्रक्स् आहेत माझ्या कपनीत गोरे, काळे, पुरुष, स्त्रिया सगळे काम करतात सगळ्याना सारखे काम आहे. पधराशे कामगारात कमीतकमी दोन-तीनशे काळे कामगार आहेत आणि ते फार उत्तम काम करणारे आहेत हे सगळे अस्फाल्ट लेयर्स (Asphalt Layers) युनियनमधून माझ्या कपनीत आले

मी ज्या ज्या वेळी ते काम कसे करताहेत हे पहायला जातो त्या वेळी खरोखरच त्याच्या कामाची मी तोड भरून स्तुती करतो तिथल्या तिथे मी त्याना पन्नास-शभर डॉलर्स देऊन टाकतो व म्हणतो, ' फार कडक उष्णतामानात तुम्ही काम करताय तीनशे साठ डिग्रीत तुम्ही काम करताय तुम्हाला थड करण्याकरता याची जरूरी आहे. त्याच्याबरोबर आपण पण काम केले पाहिजे म्हणजे त्याना हुरूप येतो आमचा कोणी द्वेष करीत नाही कामगाराना असे वाटत नाही की मालक आपल्या जिवावर मजा मारतोय त्याना आम्ही किती कष्ट करतो ते उघड उघड दिसतेय कोणत्याही कामगाराला तुम्ही विचारलेत, तर तो तुम्हाला म्हणेल की मालक पैसेवाले झालेयत याचे आम्हाला वैषम्य वाटत नाही सार सगळ सोप वाटतय पण दिसत तितक ते सोप नाही आम्ही धदा वाढवतो त्या वेळी कामगाराना निरनिराळी कामे

उपलब्ध करून देतो ''

अमेरिकन उद्योगधद्यामध्ये धदेवाल्याना उत्कृष्ट काम जास्तीतजास्त पाहिजे असते यासाठी कामगार मोठ्या सख्येने काम करीत असतात आणि ओपन मार्केटमध्ये कारखानदार जेवढे काही जास्त चागले असेल ते स्वत करता ओरबाडीत असतात त्याच वेळी कामगाराच्या युनियनस् कारखानदाराकडून जास्तीतजास्त फायदा, सोयी, सवलती मिळवून घेण्याकरता भाडत राहतात त्या वेळी ते कारखान्यामुळे आपले घर चाललेय याचा अजिबात विचार करत नाहीत हीच स्थिती आपल्याकडे पण दिसून येते

हे युनियनचे पुढारी युद्धपातळीवर येतात आणि बडे उद्योग विरुद्ध युनियन पुढारी दोघेही अप्पलपोटे फक्त स्वत चाच विचार करतात दोघाविषयी सहानुभूती निर्माण होऊ शकते पण दोघेही कशाचाच विचार न करता फक्त स्वार्थी, आपमतलबी, अज्ञानी आणि सत्तापिपासू बनतात आणि अशा वेळी कोणाविषयीही सहानुभूती राहात नाही

विल्यम विनपीसिगर हे असे एक कामगाराचे पुढारी आहेत की ते आपली मते कधीच बदलणार नाहीत कारखानदाराशी ते काम सुरळीत चालू होण्याकरता रेसभरही मागे सरणार नाहीत आपलाच हेका शेवटपर्यंत चालू ठेवत राहतील त्याना ॲडी रूनी– सी बी एस चे वार्ताहर यानी विचारले की, '' समजा, तुम्हाला जनरल मोटार्सचे अध्यक्ष केले तर तुम्ही कामगाराच्या हिताच्या गोष्टी किती करू शकाल आणि काय कराल ? ''

विनपीसिगर म्हणाले, '' मला जनरल मोटार्सचे अध्यक्ष व्हायला काही आवडणार नाही कारण मी त्यातला तज्ज्ञ नाही आणि मला तिथे काहीही माहीत नसताना मी काही एक ठरवू शकणार नाही मी नुसत्या अदाजाने काही बोलू शकत नाही साधी कल्पनाही मला करता येत नाही ''

' बरोबर आहे कामगाराच्या अडचणी काय आहेत त्या माहीत झाल्याशिवाय तुम्ही काय करणार ? ''

पहिली आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे आधी बडे उद्योगपती आणि कामगाराच्या युनियन्स यात विरोधी सूर आहे की नाही हे पाहिले पाहिजे अमेरिकेत अलीकडे एक फॅशन झाली आहे की काहीतरी नवीन योजना तयार करायच्या की ज्याच्यामुळे कामगार आणि कारखानदार यात कमी प्रमाणात सघर्ष होतील आणि तटे आपोआप सुटतील ''

' म्हणजे तुम्हाला सगळी माहिती आहे आणि तुम्ही युनियन पुढारी या गोष्टीना घाबरता मग तुम्ही चागले पुढारी [illegible]

'' नाही युनियन पुढारी मुळीच होऊ शकणार नाही कारण तुम्हाला मॅनेजमेंटच्या अडचणींची कल्पनाच नाही आम्हाला त्याच्या अडचणींशी काहीच कर्तव्य नाही माझ्यापुढे सतरा अडचणी उभ्या आहेत मला युनियनने निवडून दिलेय मला ज्या लोकानी नेमलेय त्याच्याकरता मला काम हे करायलाच पाहिजे मला काही कारखाने चालवण्याकरता नेमलेले नाही युनियनचा अधिकारी कार्यकर्ता म्हणून माझे काम मला केलेच पाहिजे ''

आयव्हिग ल्व्यग्स्टोन हे अतिशय कर्तृत्ववान, मृदुभाषी, जरा नेहमीपेक्षा निराळ्या वृत्तीचे गृहस्थ युनायटेड ओटो वर्क्सचे व्हाईस प्रेसिडेंट आहेत ते म्हणतात, '' कारखाने, उद्योग चालवायचे म्हणजे मॅनेजमेटचे सदैव लक्ष असते, ते कपनीच्या फायद्याकडे त्याकरता कामगारसना जास्तीतजास्त सुखसोयी व सवलती देऊन त्याचेकडून चा ..र काम करून घेणे कामगार आणि मॅनेजमेंट यात चागल्या प्रकारचे सबध ठेवण्यासाठी स. ख लक्ष पुरवणे व उत्तम प्रकारचे उत्पादन तयार करण्याकडे लक्ष ठेवणे जरूरीचे असते ''

मिस्टर मिलर याचा घड्याळे तयार करण्याचा कारखाना आहे ते त्याच्या धद्यात पूर्णपणे यशस्वी आहेत कारखान्यात उत्तम प्रतीच्या घड्याळाचे उत्पादन व्हावे याकरता रात्रदिवस ते वन मेहनत करतात उत्तम घड्याळे बनवणे हेच त्याचे ध्येय ते म्हणतात,' ' चागली घड्याळे लोकाना देऊन लोकाचा विश्वास सपादन करणे हे आमचे पहिले काम पैसा मिळवणे ही दुय्यम गोष्ट ''

जॉनाथन बेनब्रिज हे चागले सुशिक्षित, न्यूयॉर्कसारख्या शहरात चागल्या वस्तीत राहात होते केनेडी एअरपोर्टवर डेल्टा एअर लाईनमध्ये तिकीट एजटचे काम करीत होते रोज सुटबूट-टायमध्ये वावरत होते त्याची पत्नी सुझी व त्याना एक छोटासा मुलगा पण आहे. ते या न्यूयॉर्क शहराच्या धकाधकीला कटाळले बसगाडीची कटकट, रस्त्याने तोबा गर्दी याचा त्याना कटाळा आला एक दिवस ते चागली नोकरी सोडून शहरापासून दूर एका छोट्या गावात जाऊन त्यानी तेथे थोडी जमीन विकत घेतली तिथे आता ते फळे व भाजीपाल्याचे उत्पन्न काढतात आता ते कोणाचे नोकर नाहीत ऑफिसला जायची धावपळ नाही नसेच ठराविक नोकरीचे पैसे पण नाहीत ते म्हणतात, '' मी इथे माझ्या मनाप्रमाणे काम करतो माझ्या मेहनतीप्रमाणे मला पैसे मिळतात मला कशाचीच फिकीर नाही आता आम्हाला बँकेकडून गाडी घ्यायला कर्ज मजूर झालेय याचा अर्थ आमचे चागले चाललेय काही जरी असले तरी आम्ही आमचे स्वतत्र आहोत कुणाचे ताबेदार तर नाही यातच आम्हाला समाधान आहे ''

आता हे दुसरे फ्रेड स्टेट हे गेली पधरा वर्षे न्यूयॉर्क शहरात एका ऑफिसात काम करत होते तस पाहिल तर त्यानी नोकरी सोडताना नक्की काहीच ठरवल नव्हत शहरी जीवनाचा कटाळा आला म्हणून त्यानी नोकरी सोडली व एका छोट्या गावाचा आसरा घेतला सारे आयुष्य त्याचे मोठ्या शहरात गेलेले पण आता ते पुष्कळ काम करतात त्याची पत्नी एनीड ही पण त्याना कामात मदत करते पण कामाच्या मानाने पैसा कमी मिळतो तरी पण त्याचे काम त्याना आवडते ते आता घोड्याची पैदास करतात सात वर्षांपूर्वी फ्रेड व त्याची पत्नी एनीड आणि तीन मुले एका छोट्या गावाच्या एका गल्लीबोळात आले तेथे त्यानी एक जुने फार्महाऊस विकत घेतले तेसुद्धा गावापासून दूर तीन मैल जिथे शहरी सस्कृतीचा वाससुद्धा येणार नाही अशा ठिकाणी

फ्रेड म्हणतात, "शहरामध्ये निरनिराळ्या समस्याना तोंड देता देता नाकी नऊ यायचे मुलाच्या शाळा कुठेतरी दूर असायच्या त्याना नेण्याआणण्यात व त्याच्यावर लक्ष ठेवण्यात पुष्कळ वेळ जायचा पण इथे मुले स्वत हून कुठेही हिंडू फिरू शकतात शाळा जरी दूर असली तरी ती स्वत एकटी शाळेत जाऊ-येऊ शकतात इथे कसे मोकळे मोकळे वाटते तसे शहरात वाटत नाही इथे मुलाचा आम्हाला कामाला तर उपयोग होतोच शिवाय आम्ही एकमेकाजवळ असतो शहरात आमची एकमेकाची गाठ फक्त सध्याकाळीच पडायची "

" प्रत्येकाने असे स्वतत्रपणे खेड्यात राहायचे ठरवल्यावर शहरातल्या जनरल मोटार्स- सारख्या कपन्या चालायच्या कशा आणि प्रॉडक्शनशिवाय देश समृद्ध व्हायचा कसा ? " असा प्रश्न त्याना विचारण्यात आला

तेव्हा एनीड म्हणाल्या, " आम्हाला मोटारगाड्याची विशेष जरूरी नाही मोटारगाड्या, पैसा व चागल्या गोष्टींचा साठा असणे यावर आम्ही सुख मानत नाही आम्हाला आमच्या गरजेपुरत्या सुखसोयी मिळाल्या म्हणजे पुष्कळ झाले असे आम्ही मानतो '

फ्रेड म्हणाले, " तसे सगळे आमच्याकडे आहे. पण जास्तीतजास्त मिळवण्याचा अट्टाहास आम्ही करत नाही पण आम्ही जेवढे मिळवतो तेवढ्याकरता लोकाना खूपच जबाबदाऱ्या पेलाव्या लागतात तसे आमचे नाही

" आता शहरी जबाबदाऱ्या ज्या असतात त्या वेळच्या वेळी कराव्या लागतात पण इथे आजचे काम उद्यावर टाकले तरी ते आमचे आम्हाला करायचेय याची आम्हाला जाणीव असते आणि न करून कोणाला सागणार ? ते करावेच लागले शेवटी गोष्ट अशी आहे की, म्हातारपणी कुठे जायला लागू नये स्वत चे पोटापुरते असले म्हणजे पुष्कळ झाले "

बेनब्रिज काय किंवा फ्रेड स्टेट काय ही किती जरी झाली तरी खेडेगावात राहणारी शहरी माणसे त्याना तिकडे गावात सुखाने राह्यचेय् ती तिथे सुखाने राहतील पण आता जॉर्ज लापेले हे गृहस्थ तर नेहमी खेड्यातच राहतात त्याना शहरी संस्कृतीचा अजिबात गंध नाही ते एका तळ्याकाठी घर बांधून राहतात शहरातले लोक सुट्ट्याच्या दिवसात तळ्याकाठी राहायला येतात आणि त्याच्याच सुविधाकरता लापेले हे कष्ट करतात जॉर्ज लापेले हे काय करू शकत नाहीत ? तर ते सगळे काही करू शकतात पण त्याच्या मनात असले तर करतील नाहीतर खुशाल नाही म्हणून सांगतील ' आता इथे तळ्याच्या बाजूला येणारी सगळी शहरात राहणारी माणसे इथे आपली सुट्टी मजेत घालवायला आलेली असतात याचे इथे काही अडले, समजा नळाचे पाणी तुंबले किंवा नळाला पाणी यायचे बंद झाले शेगड्या पेटेनाशा झाल्या, बॉरिंग मशिन बिघडले, बोट बिघडली तर ते मला बोलावणे पाठवतात कोणत्याही वेळी, अगदी मध्यरात्रीसुद्धा मग मी माझ्या मनाला येईल ती मजुरी सांगतो तर कधी मी त्या वेळी जात पण नाही कधी कधी मी आठदहा तास काम करतो त्याशिवाय माझे घरचे काम निराळे असते माझे घर मी स्वत बांधलेय माझ्या मनाप्रमाणे वर्षाचे सहा महिने मी काम करतो बाकीच्या वेळी कामच नसते त्या वेळी मी आराम करतो दुसरे कुठलेही काम करत नाही जास्त पैसा मिळवण्याची मला मुळीच हाव नाही

एक ट्रक आहे. एक कार आहे स्वत चे घर आहे पोटापुरते काम आहे आणखी माणसाला जास्त करायचेय काय ? जास्त काम करून जास्त पैसे मिळवायचे आणि सरकारला फुकट टॅक्स देत बसायचे मी आहे त्यात समाधानी आहे मला काही राजकारणी व्हायचे नाही की काही नाही माझ्या अपेक्षा फार मर्यादित आहेत ते म्हणतात, तरुणाना अजिबात काम करायला नको कारण ते फार सुशिक्षित असतात आणि त्याना हलक्या कामाचा तिरस्कार वाटतो त्याना काम कमी आणि पैसे जास्त मिळवण्यात रस असतो म्हणून मी काही त्याचा द्वेष करत नाही ज्याच्या त्याच्या कुवतीप्रमाणे जो तो मिळवत असतो आणि ते एक प्रकारे योग्यच आहे

क्लिव्हलँडमध्ये लिंकन इलेक्ट्रिक कंपनी अर्ध्या डझनाहून अधिक प्रकारची विजेची उपकरणे बनवते विशेष नवीन असे काही नाही पण ते कॅमेरामन, रिपोर्टर्स, याना आपल्या कारखान्यात येऊ देत नाहीत लिंकन इलेक्ट्रिक कंपनी अमेरिकेत चांगलीच प्रसिद्ध आहे ते काही गुप्त शस्त्रास्त्र बनवत नाहीत पण ते जे काही कारखान्यात बनवतात, त्याबाबतीत ते विशेष काळजीपूर्वक बनवण्याकडे लक्ष देतात आणि त्यानी त्यात कसे यश मिळवलेय याबद्दल कुणाला कुठेही माहीत होऊ नये याची ते खबरदारी घेतात कामगार आणि कंपनी याचे जे एकदर एकमेकाशी

सलोख्याचे सबंध आहेत तसे सबंध अमेरिकेत कुठेही पहायला मिळणार नाहीत असे आहेत

कामगाराकरता कारखान्यात संगीत नाही त्याच्याकरता पोहोण्याचे तलाव नाहीत करमणुकीकरता बोलींग ॲलीज नाहीत कामगाराना खूष ठेवण्याकरता फसव्या योजना नाहीत फक्त एक गोष्ट महत्त्वाची आणि ती म्हणजे पैसा फक्त पैसा

एका कामगाराला विचारले की, " लिंकन इलेक्ट्रिक कंपनीच्या यशाचे रहस्य ते कोणते ? '

बोनस सोडून माझे वार्षिक उत्पन्न अठरा ते वीस हजार डॉलर्स '

बोनस एकंदर किती मिळतो ?

' बोनस सर्वसाधारण ०० टक्के मिळतो

" म्हणजे एकंदर छत्तीस ते चाळीस हजार वार्षिक उत्पन्न तुमचे आहे

" आसपास तेवढे मिळतात '

" म्हणून तुम्हाला लिंकन इलेक्ट्रिक कंपनीत काम करायला आवडते "

" होय म्हणून आम्ही मनापासून काम तर करतोच आणि तक्रार करायला जागाच नाही म्हणून दुसरीकडे जायची इच्छाच होत नाही आम्ही कुटुंबात दोन गाड्या ठेवू शकतो सेव्हिंग अकाऊंटमध्ये पैसे ठेवू शकतो आणि सुट्टीत पुष्कळ मजा मारू शकतो "

एक कामगार भरपूर आणि निरनिराळी कामे कंपनीत करू शकतो काही तर सगळ्या प्रकारची कामे करू शकतात थोडक्यात एक कामगार दहा कामगाराचे काम करू शकतो कामाची जागा एअरकंडिशंड पाहिजे असा त्याचा मुळीच हट्ट नाही कारण त्याना कल्पना आहे की, त्यामुळे खर्च वाढेल आणि खर्च वाढला की पैशात कमतरता येईल कामगाराच्या पैशाने सगळे होते हे त्याना माहीत आहे.

लिंकन इलेक्ट्रिक कंपनीत बढती मिळते ती सिनिओरीटीवर नाही तर काम करणाऱ्याच्या ताकदीवर व गुणवत्तेवर

काम करताना ट्रॅंझिस्टर कोणी लावत नाही कॉफी पिणे तर दूरच राहिले दर सहा महिन्यानी प्रत्येक कामगाराने किती काम केले हे पाहिले जाते त्याचा बोनस त्याच्या कामाच्या दर्जावर ठरवला जातो १९३४सालापासून पगाराइतकाच बोनस दिला जातो आणि पगार पण चांगले दिले जातात १९५८ सालापासून आजपर्यंत कधीही औद्योगिक तंटा लिंकन इलेक्ट्रिकमध्ये झालेला नाही कामगाराची इथे युनियन नाही आणि दुसऱ्या कुठल्या युनियनला मिळण्याचा त्याचा विचार पण नाही

कंपनीत सगळीकडे खुले मोकळे वातावरण आहे. कामगाराच्या अडचणी दूर करण्याकरता सल्लागारमंडळ आहे एकटा कामगार किंवा कामगाराचा गट सल्लागार

मंडळींशी विचाराची देवघेव करू शकतो व अधिकाऱ्याशी पण बोलू शकतो कामगाराला काही अडचणी वाटल्या आणि त्या सोडवण्यात वेळ लागेल असे वाटले, कारण प्रॉपर चॅनेलमधून जाण्यात पुष्कळच वेळ लागणार आणि अडचण तातडीची आहे तर थेट कंपनीच्या अध्यक्षाना फोन करून त्याच्याबरोबर ताबडतोब मुलाखतीची वेळ ठरवून मार्ग काढू शकतो कंपनीचे अध्यक्ष पण कामगाराची अडचण स्वत पुढाकार घेऊन सोडवू शकतात लिंकन इलेक्ट्रिक कंपनी ही भांडवलशाहीची कंपनी आहे कंपनी स्वत भरपूर नफा कमावतेय व कामगाराना पण भरपूर प्रमाणात श्रीमंत बनवते

डोनेली मिरर कंपनी हॉलंड मिशिगन स्टेटमध्ये आहे त्यानी कामगार आणि कंपनी या दोघानी मिळून स्कॅन लॉन प्लॅन बनवला आहे आणि तो गेली बारा वर्षे व्यवस्थितपणे चालू आहे कंपनीच्या फायद्यात कामगाराना भागीदारी मिळते लिंकन इलेक्ट्रिक कंपनी जशी चालते त्याच धर्तीवर ही कंपनी आपला कारभार चालवते डोनेली कंपनीचे उत्पादन उत्तम प्रकारे, भरपूर प्रमाणात होते आणि कामगारवर्ग कामाला दांड्या अजिबात मारत नाही

तिथली एक स्त्री-कामगार म्हणते की, " या कंपनीत काम करायला तिला आवडते कारण इथे कसलाही त्रास नाही सगळेजण आपले काम व्यवस्थित करत असतात आणि आम्ही एकमेकाना मदत करीत जास्तीतजास्त काम करतो कारण उत्पादनाप्रमाणे आम्हाला कंपनीच्या बरोबरीने फायदा मिळतो "

डिक ऑर्थर हे स्कॅन लॉन प्लॅन अमलात आणण्यात कंपनी मॅनेजमेंट आणि कामगार याच्यामध्ये मध्यस्थाची भूमिका पार पाडतात ते म्हणतात की, मी कामगाराना सांगतो की, तुम्हाला जास्त दाम पाहिजे ना ? मग उत्पादन वाढवा जितकी जास्त मेहनत घ्याल, जितके चांगले काम कराल तितका कंपनीच्या फायद्यामध्ये तुमचा भाग असेल कंपनीचा जितका फायदा वाढवाल तितकाच फायदा तुम्हाला होईल जर सरासरी उत्पादनापेक्षा कामगारानी दहा टक्के वाढ दाखवली तर कंपनीचे पहिले दहा टक्के आणि त्यावर जे उत्पादन होईल त्यात कंपनी आणि कामगार याचा फायद्याचा भाग पन्नास पन्नास टक्के समसमान

पण विल्यम विनपीसिंगरसारखे कामगार युनियनचे पुढारी असे म्हणतात की, पहिले दहा टक्के हे कंपनीचे काय म्हणून ? त्या दहा टक्क्यातसुद्धा कामगाराचा हक्क आहे

पण असल्या कामगार युनियन पुढाऱ्याचे कामगार ऐकायला तयार नाहीत कारण गोष्ट अशी की ज्यानी कंपनी स्थापन केली त्याचा प्रामाणिकपणे पाहिले तर

पहिला हक्क कायदेशीर आहे जे भाडवल कपनीने गुतवले व कारखाना स्थापन करून रोजगार उपलब्ध करून दिला त्याचा त्याना दहा टक्के नफा हा केव्हाही रास्त होतो साधे नुसते बँकेत पैसे टाकले तर बँक आपल्याला पाच टक्के घरबसल्या व्याज देते मग कपनीला जर दहा टक्के मिळाले तर त्यात कामगारानी निम्मा हिस्सा मागणे केव्हाही योग्य होणार नाही, असे कपनीतल्या कामगाराचे म्हणणे आहे.

एखाद्या माणसाने कपनीत पैसे गुतवले तर त्याच्या शेअरवर त्याला योग्य तो फायदा मिळणे आवश्यक आहे, हे जितके खरे आहे, तितकेच कपनीत काम करणाऱ्या कामगाराला रास्त फायदा मिळणे हे पण योग्य आहे.

सारासार अमेरिकन कामगाराकडे पाहिले तर वाटते की ते काम विशेष करत नाहीत पण एकदर जगात कामगाराची उत्पादनशक्ती पाहिली तर असे दिसून येते की ते जर्मनीहून ३५ टक्के जादा काम करतात व जपान्यापेक्षा ६४ टक्के ज्यादा उत्पादन करतात

तसे वर वर पाहिले तर अमेरिकन कामगार खूप काम करताना दिसत नाहीत पण जसे दिसते तसे नसते

अमेरिकन कामगाराना त्याचे काम करायला आवडत नाही ही गोष्ट तसे ते पुष्कळ वेळा बोलत असले तरी ती काही खरी नाही आता काही लोक तक्रार करीत असतील पण असे फारच थोडे आढळून येतील पण हे सगळीकडेच दिसून येईल मालक लोक चिक्कार पैसे कमावतात म्हणून त्याचा द्वेष ते करीत नाहीत आपल्याकडे घोषणा होतात, 'मालक, मॅनेजर चोर है.' पण अमेरिकेत तसे नाही

मालकाने कॅडीलॅकमध्ये बसणे त्याना आवडेल, व्हॉक्स वॅगनमध्ये नाही मालक आहेत म्हणून नोकऱ्या आहेत आणि अमेरिका भाडवलशाहीच्या चौकटीत राहूनही समाजवादी राष्ट्र बनत आहे

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
कु-प्रवास ७७९
ग्रं. क्र. २८५४८
२०/६/८३
ठाणे शाखा (स्वतंत्र प्रत)

जगात सगळ्या देशात मध्या तरी मंदीची लाट आलेली आहे भारतात मंदी आहेच पण इराकने कुवेत घेतला आणि महागाईत आणखी भर पडली अमेरिका हा सर्व जगात संपन्न आणि सार्‍या सुखसोयींनी समृद्ध असा देश समजला जातो तरीही अमेरिकेत मंदीची मोठ्या प्रमाणावर लाट आलेलीआहे दोन वर्षांपूर्वी माणशी सहा हजार चोवीस डॉलर्स वर्षाला खर्च होत असे आता चार माणसाचे १२०९२ डॉलर्समध्ये भागवले जाते साधारण अमेरिकेच्या लोकसंख्येच्या निम्म्याच्यावर लोकाचे वार्षिक उत्पन्न २५००० डॉलर्सच्या आत आहे.

डेन्टन हे ५१ वर्षांचे गृहस्थ आहेत ते अमेरिकेतल्या एका लहानशा गावात राहतात ते एका भाड्याच्या कारखान्यात काम करतात ते म्हणतात, " शहरात म्हणे एका वेळच्या जेवणाला ४०० डॉलर्स खर्च करतात बाप रे ! ओ माय गॉड, ४०० डॉलर्स ! आम्ही चारशे डॉलर्समध्ये सहा महिने जेवू, आमची राहाणी अगदी डामडौलाची नसली तरी आम्ही आमचा प्रपच उत्तम तर्‍हेने चालवतो "

डेन्टन आणि त्याची पत्नी हेन्री याचे स्वत चे ३०,००० डॉलर्सचे तारणविरहित घर आहे ते म्हणाले, आम्ही सर्व काही रोखीने विकत घेतो क्रेडिटकार्ड्स आमच्याजवळ नाहीत आम्ही ती घेतलेलीच नाहीत जोपर्यंत आमचे उधारीशिवाय चालतेय तोपर्यंत आम्ही ती घेणार नाही त्या दोघाचे वार्षिक उत्पन्न २५००० डॉलर्सच्या आतच आहे

शाळेचे शिक्षण झाले की इथे सर्वसाधारण लहान गावात, शहरात मेकॅनिक टर्नर फिटरची नोकरी पकडतात अमेरिकेत मध्य पश्चिमेत अजून अमेरिकेच्या मानाने बरीच स्वस्ताई आहे इथे घरे व जमीन तशी खूप स्वस्त आहे २५००० पेक्षा कमी उत्पन्न असलेल्याची संख्या जास्त आहे बहुतेकाचे उत्पन्न वार्षिक १५००० डॉलर्सच्या आतच असते ते त्यातच भागवतात त्याना त्याच्या परिस्थितीची जाणीव आहे

विवियन फिलीप्स हिचे वय तीस एका छोट्या कंपनीमध्ये सेक्रेटरीची नोकरी करते आणि नुकतीच तिला मुलगी झालेली आहे. एकंदर आपल्या मिळकतीनुसार ती आपले घर चालवते ती म्हणते, आम्ही खाण्यापिण्यावर जास्त पैसे उधळत नाही कपडे सगळे स्वत घरी धुतो व सेलमध्ये स्वस्तात स्वस्त गोष्टी हुडकून काढून विकत घेतो तिचे पती जॅक याचे वय ३६ आहे व एका कारखान्यात मेकॅनिकचे काम करतात ते म्हणाले, मी भलताच चिक्कू मारवाडी आहे. मी जे काही पैसे मिळवतो त्यातले थोडे फार अडचणीच्या वेळी उपयोगी पडावेत म्हणून बँकेत टाकतो, जुन्या-पान्या वस्तूच्या मी शोधात असतो आणि घरात काही मोडतोड झाली किंवा काही बिघडले तर मी स्वत ने दुरुस्त करतो त्यात आमची १९७९ ची Chevy Pi-ckup गाडीसुद्धा आली

बॉब डेन्टनसुद्धा शनिवार-रविवारी घरात काही उपकरणे बिघडली असल्यास स्वत च दुरुस्त करतात त्याना तीन मुले आहेत हेझी डेन्टन मुले शाळेत गेली की, पार्टटाईम '' मॅक्डॉनल हॉटेलमध्ये काम करून संसाराला हातभार लावते पैसे थोडे शिल्लक टाकून त्याना घर विकत घ्यायचेय

तीन-चार बेडरूमच्या घराला त्या गावात पन्नास हजार डॉलर्स पडतात प्रॉपर्टी टॅक्स वर्षाला साधारण तीन-चारशे डॉलर्स पडतील त्यामुळे साधारण ज्याचे उत्पन्न वार्षिक २५००० डॉलर्सच्या आसपास आहे ती नैऋत्य अमेरिकन प्रांतातली कुटुंबे आपले स्वत चे घर घेऊ शकतात या भागात ७५ टक्के कुटुंबाची स्वत ची घरे आहेत तर अमेरिकेत ६४ टक्के कुटुंबाची स्वत ची घरे आहेत

अमेरिकेच्या नैर्ऋत्य भागात मिसूरी कॅनसास, ओक्लहामा आणि आर्कनसास हे प्रांत येतात मध्यम व गरीब अमेरिकन्स निवृत्त झाल्यावर त्या भागात राहण्यास येतात कारण तेथे कमी दरात जमीन मिळते व अमेरिकेच्या मानाने तिथे काटकसरीने उर्वरित आयुष्य घालवता येते

इथल्या लहान गावात तरुण फार काळ राहात नाहीत ते मोठ्या शहरात जास्त पगाराच्या आशेने जातात जास्त पगार मिळतो पण सर्व काही महाग मिळते व खर्चही वाढतो आता जॉपलीन या शहराची लोकसंख्या फक्त ४१००० आहे. जीम हिमले सॅन डिएगो या शहरात राहणारा तो म्हणतो मी त्या शहरात परत कधी जाणार नाही तिकडे काय फार मोठा समुद्र आहे समुद्राशी मला काय करायचेय ? त्याचे वय ४० आहे तो गावातल्या कारखान्यात फावरमेलचे काम करतो आणि शिवाय बिल्डिंग कॉन्ट्रॅक्टरचेही काम बघतो त्याने बऱ्यापैकी पैसे मिळवलेले आहेत त्याला जीप वॅगनर घ्यायची आहे अशा तऱ्हेने कुटुंबाकरिता गाडी घ्यायची त्याने ठरविले आहे त्याची पत्नी मेरी

ही नोकरी करीत नाही ती घरचे काम करते व स्वत च्या दोन मुलाकडे लक्ष देते तो म्हणतो, आम्ही अगदी सुखात आहोत

जॅक फिलीप्स हा जॉपलीनमध्ये मेकॅनिकचे काम करतो तो म्हणतो, मला जीन्स घ्यायची असेल तर मी ' वॉल मार्ट 'मध्ये घेतो ( वॉल मार्ट स्टोअर्सची जाहिरात कायम असते We sell for less ' आणि खरोखरच इतरांपेक्षा ते स्वस्तात विकतात ) जॉपलीनमध्ये तीन ' वॉल मार्ट आहेत वॉल मार्टमध्ये मला २० डॉलर्सला जीन्स मिळते ३० डॉलर्स कमी पण माझ्या मुलाची गोष्ट वेगळी आहे त्याला सारेच भारी किमतीचे पाहिजे असते माझ्या अगदी विरुद्ध तो बाहेर जाईल आणि सत्तर डॉलर्सचे टेनिसचे बूट घेऊन येईल मला वाटते, हा सारा मूर्खपणा आहे. मला ज्या वेळी टेनिसचे बूट घ्यायचे असतात त्या वेळी मी फक्त पधरा डॉलर्समध्ये बूट घेऊन येतो आणि ते पण चागले टिकाऊ असतात

आपल्याकडे तरी मध्यम वर्गात काय चालते ? जुन्या पिढीत आणि नव्या पिढीत हाच फरक आपल्याकडे पण असाच दिसतो आपल्याकडील कित्येक लोक म्हणतात, गड्या, आपला गावच बरा मोठ्या शहरात पैसे जास्त मिळतील पण तिथेही खर्चाची मिळवणी कशी करायची ? प्रथम जागेपासून सुरुवात तीच स्थिती अमेरिकेतही आहे मोठ्या शहरी जागेपासून सुरुवात तीन रूमच्या जागेला तेराशे ते पधराशे डॉलर्स महिन्याला भाडे द्यावे लागते आणि जागाही मुष्किलीने मिळते शिवाय शहरातली महागाई लहान गावाच्या तुलनेने जास्तच असते ज्या घराला नैर्ऋत्य अमेरिकेतल्या प्रातात ५०००० डॉलर्स पडतात त्याच घराला न्यूयॉर्क, वॉशिंग्टन, डीसी प्रातात तीन ते चार लाख डॉलर्स पडतात एकूण काय, आपण आहोत तेथेच बरे आहोत असे म्हणण्याची पाळी येते

भारत काय किंवा अमेरिका काय, मध्यम वर्गाची स्थिती इथून तिथून सारखीच

भरपूर शिक्षण असेल आणि अगात काही विशेष गुण असतील त्यालाच शेवटी किमत असते पुष्कळाना वाटते, अमेरिकेत भरपूर पैसा आहे आणि तिथे गेल्यावर पैसा मिळवणे सोपे हे वाटते तितके सोपे नाही भरपूर कष्ट करायची तयारी आणि वैशिष्ट्यपूर्ण शिक्षण असेल त्यालाच सारे जमण्यासारखे आहे. त्याकरिता मग परदेशात जायचीही जरूरी नाही भारतातही सारे शक्य आहे

— ● —

RLFBK-0027548